

# रूजवातीच्या गोष्टी

## प्रा. श्रीराम काळे

a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# रुजवातीच्या गोष्टी

## लघुकथा संग्रह

प्रा.श्रीराम विनायक काळे

# रुजवातीच्या गोष्टी (कथासंग्रह)

**लेखक: प्रा.श्रीराम विनायक काळे**

एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्.

मोबाइल 8766764641

ई मेल shriramkale.sk@gmail.com

**मुखपृष्ठ- swayam art & graphics**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# रुजवातीच्या गोष्टी (कथासंग्रह)

या पुस्तकाची प्रथम आवृत्ती ऑक्टोबर२००३ मध्ये प्रचार प्रकाशन कोल्हापूर यानी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखकउत्तेजनार्थ अनुदानातून प्रकाशित केली होती.

या पुस्तकाची द्वितीय आवृत्ती जानेवारी२००९मध्ये श्री कालराज प्रकाशन, देवगड यानी प्रकाशित केली होती.

लेखक

प्रा.श्रीराम विनायक काळे

एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्.

shriramkale.sk@gmail.com

8766764641

ISBN - 978-81-908189-3-3

मुखपृष्ठ- swayam art & graphics

या सर्वांचे आम्ही ई आवृत्तीला व विनामूल्य वितरणाला परवानगी दिल्याबद्दल मन:पूर्वक आभार मानतो.

## --- ई साहित्य प्रतिष्ठान

ई प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन :  १४ जानेवारी २०२४

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

a

## लेखक परिचय :

प्रा . श्रीराम विनायक काळे.

एम्. ए.एम्.एड्. एम्.फील्.

बी.एड्. कॉलेज देवगड येथे २८ वर्षे प्राध्यापक पदावर सेवा.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदानातून प्रचार प्रकाशन कोल्हापूर तर्फे ‘रुजवातीच्या गोष्टी’ हा कथासंग्रह प्रकाशित.

अणुरेणू,देवदुर्ग, आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, माहेर, अपूर्व, वसुधा, प्रतिबिंब, जत्रा,साहित्य सहयोग या दिपावली विशेषांकामध्ये सुमारे ८० लघुकथा प्रसिद्ध.

पुढारी नवांकुर कथास्पर्धा , प्रतिबिंब पुणे आयोजित राज्यस्तर कथास्पर्धा, तरुणभारत अक्षरयात्रा कथास्पर्धा, बॅ.नाथ पै कथास्पर्धा सावंतवाडी, को.म.सा.प देवरुख आयोजित कथास्पर्धा, i pustak HUB आयोजित कथास्पर्धा, साहित्य सहयोग कोल्हापुर आयोजित कथास्पर्धा अशा विविध कथास्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त.

कालराज प्रकाशन देवगड तर्फे ‘पाखरांची भाषा’ हा कथासंग्रह प्रसिद्ध.

विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली तर्फे ‘बॅडकमांड’ हा कथासंग्रह प्रसिद्ध.

# लेखकाचे मनोगत

## (ई आवृत्तीच्या निमित्ताने...)



2002 मध्ये नवलेखक उत्तेजनार्थ अनुदानासाठी प्रस्ताव दिला तेव्हा मी बारा कथांची फाईल दिली होती. संग्रहाचं शीर्षक ज्येष्ठ साहित्यिक आणि माझे बंधू शरद काळे यानी सुचवलं होतं . प्रस्ताव मंजूर झाला पण पुढचे तीन महिने उलटले तरी प्रकाशकाकडून काहीच प्रतिसाद आला नव्हता. मी आशाच सोडली होती पण अकस्मात प्रकाशका कडून कथासंग्रहासाठी प्रस्तावना मागणीच पत्र आलं, ती दिल्यावर चार दिवसात संग्रह छापून झाला. त्याना शासना कडून अनुदान उचलणे यापलिकडे फारसे स्वारस्य नव्हते म्हणून किमान पृष्ट संख्या होईल एवढ्या कथा संग्रहात समाविष्ट होत्या .

या पुस्तकाची द्वितीय आवृत्ती जानेवारी२००९मध्ये श्री कालराज प्रकाशन, देवगड यानी प्रकाशित केली होती. या आवृत्तीत त्यावेळी वगळलेल्या आणि नंतर प्रसिद्ध झालेल्या अशा एकूण चौदा कथा समाविष्ट केलेल्या आहेत. तुंबसाळ, शिदोरी,सांबरशिंग, अत्रंग, भुतां रडचत या कथांना जिल्हास्तर कथा लेखन स्पर्धांमध्ये पारितोषिकंही मिळालेली आहेत. डॉ. विद्याधर करंदीकर यानी दिलेला

अभिप्राय ई आवृत्तीत मी अभिमानाने नमूद केला आहे. या आवृत्तीला मुखपृष्ठ ही नव्याने करून घेतलेलं आहे. रसिक वाचकाना या कथा नक्कीच आवडतील असा विश्वास आहे.

छापील पुस्तक ही संकल्पना आता जवळ जवळ मोडीत निघालेली आहे. म्हणून ई साहित्य प्रतिष्ठानने तंत्रज्ञानाच्या या युगात रुजु केलेल्या ई बुक या नव्या रुपात माझा रुजवातीच्या गोष्टी हा कथासंग्रह प्रकाशित करताना मला अतीव आनंद होत आहे. बदललेल्या सामाज माध्यमातून रसिक वाचकांपर्यंत माझं साहित्य पुस्तक रूपाने पोचविण्याचं काम ई साहित्य प्रतिष्ठानमुळे सुकर झालं. याबद्दल मी ई साहित्य प्रतिष्ठानचा ऋणी आहे.

प्रा.श्रीराम काळे.

# प्रस्तावना



प्रस्तुत कथा संग्रहाचे लेखक प्रा.श्रीराम काळे यांची एक नाविन्यपूर्ण विषयावरील कथा २००१ च्या ‘किरात’ च्या दिवाळी अंकासाठी प्रथमच माझ्या हाती आली. कथा उशिरा आल्यामुळे ती त्या वर्षा ऐवजी २००२ अंकात प्रसिद्ध करण्याचे मी त्याना कळवले. ‘किरात’ साठी आलेली त्यांची ‘ पाखरांची भाषा’ कथा वाचून ते एक प्रतिभाशाली लेखक असल्याची ओळख त्या एकाच कथेवरून मला झाली. तशा वृत्तपत्र पुरवण्यांमधून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या काही कथा आणि लेख वाचनात आलेले होते तेंव्हाच त्यांची स्वतंत्र आणि प्रगल्भ लेखनशैली मला भावलेली होती.

प्रा.श्रीराम काळे यांचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. दक्षिण कोकणातील देवगड- राजापुर -कणकवली या तालुक्यांच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य पूर्व ते स्वातंत्र्योत्तर वीस पंचवीस वर्षे या कालखंडात घडणाऱ्या या कथा आहेत. तत्कालिन ब्राह्मण कुटुंबातील सहजीवन, संघर्ष, भाऊबंदक्या, उध्वस्त होत चाललेली एकत्र कुटुंब पद्धती, तत्कालिन गावरहाटी, रूढी , परंपरा, श्रद्धा अंधश्रद्धा, लोकभ्रम आणि समाज संकेत यांचे मनोज्ञ दर्शन त्यांच्या कथांमधून घडते. तेंव्हाचा तो कालखंड पाहिलेल्या नी जगलेल्या जुन्या पिढीतल्या वाचक वर्गाला या कथा

पुन:प्रत्ययाचा आनंद देतील , तर नव्या पिढीतल्या वाचकाना जुन्या अद्भूतरम्य कालखंडात गुंगवून ठेवणाऱ्या आहेत.

संग्रहातील बहुतेक सगळया कथांचे विषय लेखकाचे वास्तव्य असलेल्या परिसरातील, त्यांनी अनुभवलेल्या किंवा वडिलधाऱ्यांच्या तोंडून ऐकलेल्या घटनांमधून निवडलेले आहेत. त्यानी शब्दबद्ध केलेल्या व्यक्तिरेखांमधून मानवी स्वभावाचे विविध पैलू समोर येतात. दारिद्र्यातही स्वाभिमानाने जगणारी , प्रचलित शिक्षणाचे फारसे संस्कार न होताही उच्च तत्वज्ञान जपणारी ,कष्टाच्या बळावर जीवनमान सुधारणारी किंवा आयुष्यभर कष्ट आणि दैन्य- दु:खच वाट्यालाआलेली,तसेच कपटी,कावेबाजआणि इरसाल स्वभावाची माणसे या कथांमधून भेटतात. त्यांच्यातील सहजीवन आणि परस्परातील संघर्ष हे सगळे तत्कालीन संवादशैली आणि शब्दकळा यामधून लेखकाने चपखलपणे मांडलेले आहे. तत्कालीन लोकजीवनाबरोबरच निसर्गाचेही प्रत्ययकारी दर्शन या कथांमधून होते. त्या काळानुरूप वातारण निर्मिती वर्णनातून साकार करण्याची किमया लेखकाला चांगली साधली असून त्यामुळे त्यांच्या कथा मनाला भिडतात.

अनेकदा वास्तवातल्या घटना काल्पनिक वाटाव्यात अशी दाहकता त्यामध्ये असते. या कथांमधिल काही पात्रांच्या स्वभावातून , कृतीतून लेखकाने ती प्रभावीपणे मांडली आहे. त्यामुळे संवेदनशील मनाला या कथा अंतर्मुख करतात. ‘वाघजईतले दिवस’ मधला आत्मकेंद्री बबन, ‘शिदोरी’ आणि ‘करंजी’ या कथांमधली स्वाभिमानी , करारी आई, नवऱ्याचा बदफैलीपणा, मुलाचा अकाली मृत्यू यांमुळे डोके फिरलेली पण परिस्थितीचे भान असलेली चंद्रुआक्का असे मानवी

a

स्वभावाचे विविध पैलु साकारणाऱ्या व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत समर्थपणे रेखाटल्या आहेत.

कित्येकदा वातावरण निर्मितीसाठी केली जाणारी घटना आणि निसर्ग यांची तपशीलवार वर्णने कथेला मारक ठरतात. पण इथे तसे होत नाही. 'देवाची सामक्षा' मधिल मंदिर आणि परिसराचे चित्रण, 'तुंबसाळ' मधिल दुर्दैवाची मालिका, 'भुतां रडचत' मधिल कांडेचोराची आणि कातकऱ्याची वर्णने ही त्यातल्या नाविन्यामुळे वाचकाला खिळवून ठेवतात, हेही लेखकाचे मोठे यश आहे.

साहित्य निर्मिती ही काहीशी प्रवृत्ती निदर्षक असते. लेखकाची जीवननिष्ठा आणि सात्विक वृत्ती, संवेदन शीलता हा कथासंग्रह वाचताना प्रत्ययास येते. समाज प्रबोधन आणि उच्चनीतीमूल्य संस्करणाची आशी त्यांच्या कथांतून जाणवते.

आपल्या अवतीभवती दिसणारे नवंवीन विषय घेवून त्यावर चांगली कथा बांधण्याची क्षमता श्रीराम काळे यांच्याजवळ निश्चितच आहे, हे या पहिल्याच कथासंग्रहाने दाखवून दिले आहे. एक सर्जनशील लेखक म्हणून त्यांची ओळख या कथासंग्रहामुळे वाचकाना होईल यात शंका नाही.

- श्रीधर मराठे

संपादक साप्ताहिक 'किरात', वेंगुर्ला

# अभिप्राय

## ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ. विद्याधर करंदीकर .....

कथा लेखक श्रीराम काळे यांचा , 'रुजवातीच्या गोष्टी ' या कथा संग्रहातल्या सगळ्याच कथा चित्तवेधक आहेत. नुकत्याच वाचल्या सारख्या त्या अजूनही मनात ताज्या आहेत. त्या कथा प्राधान्याने 'संसार कथा' आहेत. त्या मर्यादेत राहून, प्रकृति-विकृतीच्या सीमारेषांचा शोध घेणाऱ्या आहेत. अनेक पर्याय सूचित करणाऱ्या आहेत. त्यातल्या व्यक्तिरेखा संस्मरणीय आहेत. 'करंजी' कथेत आपला मुलगा विसू मार्गाला लागल्यावर त्याच्या बळावर दिवाळीच्या करंज्या समाधानाने करणारी आई आहे. ढासळलेल्या चिरेबंदी वाड्याचे अवशेष म्हणून खेळण्यातला लाकडी घोडा आणि सांबरशिंग घेवून जाणारा, व्यवहारात फसलेला अशोक 'सांबरशिंग' कथेत आहे. पाखरांना, वानरांना त्रास देणारा, त्यांचा अकारण जीव घेणारा मोहन 'देवाची सामक्षा' या कथेत आहे. 'मरणभोग' कथेत पतीच्या व्यभिचाराचे आणि पुत्रनिधनाचे दुःख यांनी डोके सैरभैर झालेली चंद्रू आक्का आहे. 'शिदोरी' मध्ये सुखाला चटावलेला आणि त्यासाठी आपण होऊन श्रीमंता घरी दत्तक जाणारा बाळु आहे. कांडेचोरांच्या शिकारीची 'भुतां रडचत','तुंबसाळ',' वकिली डाव', आणि 'देवकळा' या कथा वेगळ्याच कथावस्तूमुळे स्मरणात राहतात.' वाघजईतले दिवस' ही कथा तर एखाद्या स्मृती श्राद्धासारखी आहे. 'प्रकृते क्रियमाणानी' आणि इतर कथाही वाचकाच्या मनात उत्कंठा निर्माण करणाऱ्या आहेत.

विद्याधर करंदीकर

# अर्पण पत्रिका



ती. भाऊ ती, सौ. वहिनी,

तुमच्या प्रोत्साहनामुळेच मी लिहिता झालो

प्रा. श्रीराम काळे

# अनुक्रमणिका

०१.देवाची सामक्षा

०२.करंजी

०३.वाघजईतले दिवस

०४.मरण भोग

०५.वकिली डाव

०६.तुंबसाळ

०७. शिदोरी

०८.भुतां रडचत

०९.मराठेसर देवो भव

१०.अत्रंग

११.देवकळा

१२.प्रकृतेः क्रियमाणानी

१३. सांबरशिंग

१४.उत्तराधिकारी

# १. देवाची सामक्षा

चार मुलींच्या पाठीवर काकुला नवससायासाने मुलगा झाला. सगळे देव पालवुन झाले. शेवटी आमच्या घृष्णेश्वराला अण्णानी जाब घातला नि त्याच्या प्रसादाने मोहनचा जन्म झाला. तेव्हापासून दर वर्षी वामनकाका घृष्णेश्वराच्या उत्सवाला नेमाने यायला लागले. काकु तेवढी चार-दोन वर्षांनी यायची. हया खेपेला मात्र काकु तब्बल आठ वर्षांनी आलेली. मोहन आता चांगला मोठा झालेला. तसा तो माझ्यापेक्षा दोन वर्षांनी लहान. पण लाडाकोडात वाढल्यामुळे दूध तुप नी अक्रोड बदामाचा खुराक खावून तो माझ्यापेक्षा भारी दणकट नि थोराड वाटायचा. खुप वर्षांनी भेटलेल्या आम्हां भावडांच्या गप्पा रंगात आल्या. तिन्हीसांज झाली नी आटवल खाऊन आम्ही ओसरीवर झोप्या काढीत गाणी म्हणत राहीलो. रात्री निजानिज झाली तरी आमच्या पोरांच्या खुसपुस गप्पा सुरूच. मी मोहनला काय काय माहीती सांगत ऱ्हायलेला. मध्य रात्री रोजच्याप्रमाणे भैरवाची फेरी सुरू झाली.

ईश्वराच्या देवळा जवळच्या दरडीतल्या गुहेतला भैरव म्हणजे वाडेखोलातला राखणदार. रात्री ईश्वराच्या देवळापासून तो जुगाईच्या देवळापर्यंत त्याची फेरी असायची. तो कुण्णा कुण्णाला दिसत नाय. मात्र त्याच्या व्हाणाची करकर आणि हातातल्या दांड्याचा दण-दण आवाज तेवढा ऐकू येतो. मोहनला भारी नवल वाटले. आम्ही कान पाडून राखणदाराच्या दांड्याचे आवाज ऐकले नि गुडुप्प

झोपलो. सकाळी उठल्यावर आमचा पातळभात खाऊन झाला. मग मी मोहनला घेऊन आमच्या घरासमोरच्या डोंगर कपारीतली पांडव लेणी दाखवायला निघालो. वाडीत एका तडीला घाडूयांची घरे, दुसऱ्या तडीला गुरवांची घरे नि मध्ये घडीव चिऱ्यानी बांधलेली पाळंद! आमच्या परसवात पाळंदीला दोन फाटे फुटायचे. एक आम्हा म्हाजनांच्या अंगणाबाहेर दिंडी दरवाजापर्यंत यायचा. दुसरा फाटा मोडण घेऊन व्हाळाकडे जायचा. बारमाही पाण्याचा व्हाळ,त्यावर तीन कमानीचा चिरेबंदी पुल. पुलावरून व्हाळा पलीकडे गेलं की थोडा सपाट भाग आणि सहापुरूष उंच बांधकाम असलेली भली मोठी दरड. बत्तीस पायऱ्यांची अवघड चढण चढूण वर गेलं की घृष्णेश्वराच्या मंदिरासमोरचं विस्तीर्ण आवार नि कडेला हारीने बांधलेल्या सोळा दीपमाळा.

मध्यभागी सगळयात उंच एकोणीस छिनेलांची दीपमाळ आम्हा म्हाजनांची. मोहन आणि मी व्हाळातल्या पुलावर जाऊन थांबलो. डाव्या हाताला उंच दरडीच्या टोकाला असलेल्या दगडी गोमुखातून सतत पडणारा पाण्याचा झोत नि त्यामागची कुंडं बघून मोहन हरखून गेला. पुलावरून सात कुंडं नि त्यामागे झरी पर्यंत बांधलेला पाट, त्याकडेच्या केगदी सगळं दिसायचं. झरी म्हणजे पाट शेवटतो तिथे दरडीतला एक पत्थर दुभंगून झालेल्या फटीतून पडणारी पाण्याची संततधार! तेच पाणी सात कुंडात खेळून शेवटी गोमुखातून झोतानं बाहेर पडायचं. उन्हाळ पावसाळ बारा महिने! पुलाच्या कमानीवर उभं राहून समोर बघितलं की घृष्णेश्वर मंदिराच्या दोन्ही बाजूना असलेले दगडी हत्ती नि त्यांच्यावर बसलेले माहूत दिसायचे. घृष्णेश्वराचं देऊळ एकसंध जांभ्या दगडांत खोदून केलेलं. देवळाच्या सभागृहाचं छत सपाट नि त्याच्या मागचा भाग टप्प्या टप्प्यांनी उंच होत वर

आभाळपर्यंत गेलेला. सभागृहाच्या छतामागे गोपूर सुरू व्हायचं. त्या भागात वावभर रूंदीची कमान. कमानीवर पाच पांडव अन् त्यांच्या दोन्ही बाजुना गरूड,मारूती कोरलेले. मध्यभागी जााडजूड तो भीम. त्याच्या उजवीकडे अर्जुन नि त्याच्या बाजुला लांब केसांचा दाढीवाला धर्म. भीमाच्या डावीकडे बारके बारके नकुल-सहदेव, गरूड नि मारूती तेवढे लंगोटे नेसलेले, पण पांडव पाचही नागडे! दाढीमिशा असलेले,एवढे मोठे बापये झालेले पांडव नागडे राहिलेले बघून आम्हाला हसायलाच यायचं!

खुप म्हणजे अगदी बक्कळ वर्षांपूर्वी कौरव - पांडवांच युध्द झालं. त्यानंतर पाची पांडव झरीवाडीत आले. पाण्याचा पाट, सात कुंडं, घृष्णेश्वराचं देऊळ, त्याच्या बाजूची भैरव,गणपतीची देवळं, धर्मशाळा, झालंच तर आजुबाजुच्या गुहा, देवळा समोरची दरड, नि दीपमाळासुध्दा पांडवांनीच बांधलेल्या. फक्त एका रात्रीत त्यांनी एवढं काम केलं. देवळाभोवतीचा प्रदक्षिणेचा मार्ग बांधून झाल्यावर पांडव दमले. मग ते देवळाजवळच्या वडाखाली झोपले. त्यांचा जरा डोळा लागला एवढ्यात पहाट झाली नि कोंबडा आरवला. कोंबड्याची बांग आयकून पांडव फटाफटा उठले. तसेच देवळावर चढून छतावरच्या कमानीत जाऊन बसले. या गडबडीत ते झोपले होते त्या वडाखालीच त्यांची धोतरं सुटून ऱ्हायली. पांडव कमानीत बसल्यावर धाकट्या सहदेवाने भावांकडे वळून बघितलं तर काय, सगळे भाऊ आपले नागडेच!

सहदेव ही गोष्ट भावांना सांगणार एवढ्यात सूर्याची किरणं आली नि पांडव दगडाचे झाले. अशी नागड्या पांडवांची ‘आख्या’ आज्जी सांगायची. या आख्येचा पुरावा म्हणजे चार पांडव पुढा करून आहेत. फक्त पाचवा सहदेव तेवढा उजव्या कुशीला वळलेला दिसतो अन् दुसरं म्हणजो वडाखालची त्यांची झोपेत सुटलेली

a

दगडी धोतरं, त्यांच्या निऱ्यासुध्दा स्पष्ट दिसतात. पायऱ्या चढून आम्ही वर आलो. म्हाजनांची उंच दीपमाळ मी त्याला दाखवली. दर वर्षी उत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच टिपऱ्या पौर्णिमेला कोहाळयाच्या नायतर पोपयाच्या अर्धुकाच्या टिवळयात चिंधींचा भोत खोचून टिपूर पाजळतात. ते टिपूर जो - तो मानकरी देवळाबाहेर आणतो. गावातले तरूण झिलगे ते पेटते टिपूर दीपमाळेवर चढून अगदी उंच शेंड्यावर ठेवतात. आम्हा म्हाजनांचा टिपूर भारी उंच. एकावर एक अशी दीड हाती एकोणीस छिनेलं ठेवलेली. आमच्या दीप माळेवर कुणा लुंग्या सुंग्याला चढायची छाती होत नाय. इतक्या उंचीवर चढून खाली बघितलं की चढणाऱ्यांच्या टीरी कापतात असं अण्णा सांगत.

अख्ख्या वाडेखोलात फक्त झिलू गुरव किंवा बबन घाडी दोघेच म्हाजनांच्या दीपमाळेवर चढणारे! ही माहिती ऐकल्यावर मोहन आमच्या दीपमाळेजवळ निघाला. चारी अंगाने फिरून नीट निरखलं.” मी जर या दीपमाळेवर चढून दाखवलं तर काय हरशील? आपली पैज” मोहन ताठ्यातच बोलला. मी आपलं मनात म्हटलं, ह्याच्या फुकटच्या गमज्या आहेत. हा कसला चढतो इतक्या उंच दीपमाळेवर1 भले भले गडी मारे पैजा मारतात. पण अर्ध्यापर्यंत चढले की लागले लटपटायला. ढेंगात शेपुट घालुन झक मारीत हार पत्करतात. मी म्हणालो, “ तू दीपमाळेवर चढलास तर एक आणा देईन. पण अगदी शेवट शेंडयापर्यंत जायचं. “ एक बारीकसा दगड उचलुन देत मी पुढे म्हटलं, “दीपमाळेच्या अगदी टिकाळीला हा दगड ठेवायचा. पण जर का तू कच खाऊन अर्ध्यावरून परत आलास तर मात्र तुझा भोवरा तू मला द्यायचास. आहे कबूल?” मोहनचा भोवरा मला भारी आवडलेला, म्हणुन पौर्णिमेला जत्रेसाठी मी जीव जीव म्हणून साठवलेला एक

आणा....पण मोहन नक्की हरणार ही खात्री होती म्हणून मी पैज लावली. मोहन कबूल झाला.आम्ही हातावर हात ठेवून पैजा मारली.

देवळाकडे तोंड करून मोहनने घृष्णेश्वराला नमस्कार केला नि तो दीपमाळेवर चढायला लागला. तो अर्ध्यावर गेला की परत येणार हा माझा होरा. मोहन एका एका छिनेलावर पाय देत निघाला. तो बारा टप्पे चढून गेला तरी आपला वरच निघालेला. व्हाळात भांडी घासायला आलेली भागी गुरवीण.तिने दीपमाळेवर चढणाऱ्या मोहनला बघितलं मात्र, झालं "ओ म्हाजनांनू, पावण्याचो झील टिपरार चडताहा, बेगीन् येवा." तिने बोंबाबोंब केली. माडाचं शिपणं करणारा धाकू, अण्णा, काका, काकू सगळीजणं देवळाकडे धावली. एवढं रामायण घडलं तरी मोहन जिद्द सोडीना. मी त्याला काकुळतीला येऊन सांगितलं, "मोठी माणसं येण्यापूर्वी खाली उतर, मी हरलो म्हणून कबूल करतो.." पण छे! मोहन राजी झाला नाही.

माणसं व्हाळातल्या पुलावर येईपर्यंत मोहन दीपमाळेच्या शेंड्याला पोहोचला. मला हाकारीत म्हणाला,"नीट बघ... हा दीपमाळेच्या शेंड्यावर पैजेचा खडा ठेवतोहे....नायतर मागाहून नाय म्हणशील." पैज जिंकून मोहन तिसऱ्या टप्प्यावर येईतो मंडळी येऊन थडकली. काका ओरडणार असं मला वाटलेलं पण उलटच झालं. ते म्हणाले,"शाब्बास रे मोहन! महाजनांचं नाव राखलंस. न घाबरता सावकाश खाली उतर." मग काकूकडे वळून ते म्हणाले,"तू आणि उगाच रडू भेकू नकोस. ईश्वराच्या प्रसादाने झालाय तो. त्याला देवाची राखण आहे. लहान असताना मी नि अण्णा कैक वेळा ह्या टिपरावर चढायचो. आमची पोरं तरी कशी मागे ऱ्हातील?" त्यांच्या बोलण्यामुळे सगळयानाच मोकळं वाटलं.

a

मोहन खाली उतरल्यावर काका म्हणाले,” हे बघ मोहन! झाडापेडावर, कुठे उंच चढल्यावर एक लक्षात ठेव. आपलं अवसान जातंय असं वाटलं तर खाली जमिनीकडे बघायचं नाही. ईश्वराचं नाव घेऊन तिथेच वेंगाट घालून जरा दम खायचा. मात्र घाबरून उडी बिडी मारायचा आचरटपणा नाही करायचा. जावा खेळा आता.” काका असं बोलल्यावर काय विचारता! आम्ही हुईऽऽऽक करीत ओरड घातली नी लगेच धाव मारून देवळाच्या कडेला असलेल्या हत्तीवर चढायला लागलो. माझ्या मागून मोहन पण चढायला लागला. हत्तीच्या पाठीवर जाऊन आम्ही माहुताजवळ गेलो. त्याच्या फेटूयावरून, मिशांवरून हात फिरवला. हत्तीच्या पाठीवरून कडेची कमान धरून आम्ही सभागृहाचं छत गाठलं. मग इकडे तिकडे फिरून सरळ गोपुराच्या दिशेने गेलो. आता पांडव केवढे मोठे दिसायला लागले. मोहननं पांडवाच्या चोटलीला हात लावला. खालून हातभर उंच दिसणारे पांडव जवळून बघितल्यावर मोठ्या बापयांएवढे वाटायला लागले. गरूडाची चोच तीन वीत चार आंगळ लांबीची भरली. मग पुढे चालत जाऊन आम्ही पलीकडच्या हत्तीच्या पाठीवर उतरून तिथून खाली उड्या टाकल्या. आम्ही धबाधबा उड्या टाकल्यावर वळचणीला बसलेली वटवाघळं चिर्ररऽऽ चिऽऽर्रर करीत उडाली. वाघळं उडताना दिसल्यावर कुठूनसा शिंगचोच्या झेपावत आला नि त्यानं दोन उडती वाघूळं चोचीत धरून मटकावून टाकली.

हत्तीच्या पोटाखालून पुढे होत आम्ही मावळतीकडच्या दारातून घृष्णेश्वराच्या सभागृहात गेलो. आत शिरताच वाघळांच्या लेंड्या-मुताचा उग्र-खारट दर्प भस्सकन नाकात शिरला. आमची चाहूल लागताच छताला लटकणारी वाघळं भिरभिरायला लागली. त्यांचा चिरचिराट घुमला. मोहनला भारी अप्रुप वाटलं.

a

शेकड्यांनी, हजारांनी वाघळं. बाप रे! जमिनीवर त्यांच्या लेंड्यांचा इतका खच पडलेला की लेंड्या चुकवून मुळी पायच टाकता यायचा नाय. सभागृहातुन आतल्या भागात जायच्या कमानीत भली मोठी घंटा. जमिनीवरून उड्या मारून काय हात पोहोचेना. मग कमानीखाली भिंतीतल्या कोनाड्यात एक पाय देऊन मी नक्षी कामाची कड धरून त्यावर चढलो. तिथून खाली उडी मारताना ठाऽण्णकन घंटा वाजावली. घंटेच्या ठणाठणा आवाजाने आमच्या कानांचे दडे बसले. तेव्हा घंटा वाजवायचा खेळ थांबवून आम्ही आतल्या भागात शिरलो. आत खुपच काळोख. थोडावेळ डोळे मिटून गप्प राहिल्यावर मग डोळे उघडले तेव्हा दूरवरचा गाभारा, गाभाऱ्यातली घृष्णेश्वराची पिंडी,त्यावरचा पाच फड्यांचा पितळी नाग नि गळती, गाभाऱ्या समोरचा भला मोठा नंदी, सगळं नीट दिसायला लागलं. मोहन नंदीच्या पाठीवर बसला. मी गाभाऱ्या जवळच्या कोनाड्यातला शंख काढला नि वाजवला. मोहनन सुध्दा शंख वाजावायला बघितलाय पण त्याला काय जमेना. नुसतं फुस्स व्हायचं. मी त्याला शंख कसा वाजावायला ते दाखवलं. या भागात आणखी एक मजा असायची. ईश्वराची पालखी आणि नगारा. आम्ही पालखीत बसून बघितलं. हाताच्या मुठी लाल होऊन दुखेपर्यंत नगारा बडवला. दणदणाटामुळे घाबरलेली वटवाघळं सैरावैरा उडायला लागली.

ईश्वराला नमस्कार करून आम्ही बाहेर आलो. मग भैरव, महाकाली, गणपती ही देवळं फिरलो. धर्मशाळा,कपारीत कुठे कुठे खोदलेल्या गुहा सगळीकडे फिरून आम्ही गायमुखा कडे गेलो. तोपर्यंत दुपार झाली. पोटात कावळे ओरडायला लागले. आम्ही गोमुखातून पडणाऱ्या झोताखालीच न्हायला बसलो. व्हाळात कुठे कुठे पडलेले पिवळे-तांबूस ठिसुळ दगड घेऊन त्यांनी अंग घासायचं असतं, दगड

झरत जाईल तसतसं अंग उजळतं. आम्ही एकमेकांच्या पाठी खसाखसा चोळल्या नि आंघोळ झाल्यावर ओलेत्यानेच घराकडे धावत सुटलो.

दुपारची जेवणं झाल्यावर मोठ्या माणसांची वामकुक्षी सुरू झाली.

आता तर आम्हाला मोकळं रानच मिळालं. आमची जोडगोळी घराबाहेर पडली. या वेळी आम्ही सात कुंडं नि झरीकडे गेलो. दुपारी उन्हाचा कडाका असला तरी कुंडांच्या परिसरात कसं थंडगार,निवांत वाटायचं. चारी बाजुना अष्ट, बकुळी, कळंब, आंबे अन् जांभळीची उंचच उंच झाडं! फळं खायला कोण कोण पक्षी आलेले. बाळी चिमणी, परटिणी, शेंडेपाखरं, हळदिवे, भोरड्या, भुरल्या चिमण्या, वेडे राघू, साळुंक्या, खरब्या, कोकीळ, भुर्रर भुर्रर उडत बकुळं जांभळं मटकावायची. आम्ही सात कुंडाजवळ गेलो तेव्हा चार-पाच मुंगसं पाटाच्या कडेला सकेऱ्यात खेळताना दिसली. त्यांच्या पलीकडे पाण्यावर आलेल्या रान कोंबड्याही दिसल्या. आमची चाहूल प्रथम त्यानांच लागली. क्लक् -क्लक् करीत त्यांनी दडी मारली. मग मुंगसंही सुळुसुळु करीत दगडां खालच्या बिळात शिरली.

आम्ही पाखरं बघत झरीपर्यंत गेलो. जांभळीवर चढुन फांद्या गदागदा हलवल्यावर जांभळांचा नुसता खच पडला. झरी-पलीकडच्या चिंचेवर पाच - पंचवीस माकडांचानुसता हुदुदु चाललेला. मोहन तिकडे धावला. तो माकडांना दगड मारू लागला. माकडं भुरूभुरू उंच फांद्यांवर चढून वाकूल्या दाखवायला लागली. मोहननं अगदी जीव खाऊन दगड मारले तरी त्याचे दगड माकडांपर्यंत पाहोचेनात. मग बकुळीवर बसलेल्या पाखरांना त्याने दगड मारून हाकलून लावलं. “इथे डेळकीनं पाखरं मारायला मजा येईल. मी सायकलची ट्यूब आणलीहे. आपण डेळकी बांधुया चल,” मोहन म्हणाला. आम्ही दडदडत घरी गेलो.

a

मोहननं आपल्या तोस्तानातून ट्यूबचा हातभर तुकडा काढला. आता त्याला डेळकीसाठी लाकडाचं गेचूक हवं होतं. आम्ही कोयता घेऊन व्हाळात गेलो. व्हाळाच्या कडणीला कऱ्याची कितीतरी झाडं. कऱ्याचं लाकूड टिकाऊ नि त्याच्यावर गेचकं असलेल्या फांद्या पण मिळतात याची मला उज्जू माहिती. मी त्याला चार गेचकं तोडून दिली. त्यातलं एक मोहनला पसंत पडलं. मी त्या दुडेळी गेचकाची साल काढून ते मापात तोडून गुळगुळीत करून दिलं. रबर कापायला म्हशी भादरायची कात्री आणून दिली ट्यूबच्या आंगळभर रूंदीच्या दोन पट्टया नि बांधायला रबराच्याच बारीक बारीक चिरफोळया मोहननं व्यवस्थित कापल्या. त्याने रबरी पट्टया मापात कापुन घेतल्या. त्या दुडेळयावर रबरी चिरफोळीने शिस्तीत बांधल्या. आता त्याला दगड ठेवण्यासाठी चामड्याचा तुकडा हवा होता. मी पडवीच्या माळयावर चढुन जुन्या चपलांच्या ढिगातून एक बरासा जडणाचा तुकडा शोधून दिला. जडणाच्या चामड्यांतून चार आंगळ लांब नि तीन आंगळ रूंद तुकडा त्याने कापून घेतला. त्याच्या दोन बाजुना रबरी पट्टया ओवण्यासाठी चीर पाडून घेतली. जवळ जवळ तास दीड तास खपल्यावर एकदाची डेळकी तयार झाली.

आपल्या कसबावर खुष होऊन मोहन शीळ घालीत म्हणाला, “आता पाखरांची कंबक्ती भरली. तु नुसती मजा बघीत ऱ्हा. माझा नेम म्हणज्ये काय! पाखरांचा खच पाडतो की नाय् बघ तू.” अण्णा -काकांनीसुध्दा डेकळी बघून मोहनचं कौतुक केलं. अण्णा म्हणाले, “कसब आहे खरे. भारी हुषार पोर बाबा.” मोहननं डेकळी ताणून फटाफटआवाज काढून दाखवले. तेवढ्यात काकूनं खायला हाक मारली. पोहे नि खोबऱ्याचा तुकडा खिशात कोंबीत आम्ही बाहेर पडलो. वाटेनं चालता चालता पोह्याचे बकाणे भरले.

a

मोहन व्हाळात उतरला. चांगले गुळगुळीत बेतके दगड शोधून खिशात भरून घेतले. मग आम्ही झरीकडे निघालो. सात कुंडांजवळच्या एका खुंटावर शेंडे पाखरू बसलेलं दिसलं. मला हाताने थांबण्याची खुण करून मोहन दबकत दबकत पुढे निघाला. शेंडे पाखरू बिचारं आपल्या नादात! पाखरू माऱ्याच्या अंतरात येताच मोहननं नेम घेऊन डेळकी ताणली नि फाटकन दगड सोडला. मला हे कसब नव्यानेच बघायला मिळालेलं. त्याचा नेम मात्र अचूक खराच. पाखरू बद्दकन खाली पडलं. मोहननं पंख धरून ते उचललं. त्याची मान लटकली न् चोचीतुन थेंब थेंब रक्त गळत ऱ्हायलं. त्याने रक्ताचा थेंब डेळकीला लावला. डेळकीला रक्त लावलं की नेम अचूक लागतो असं मोहन म्हणाला. डोळा फुटलेलं, रक्त ओघळणारं, लोळागोळा झालेलं ते पाखरू बघून माझ्या अंगावर शहारे आले. पोटात मळमळायला लागलं.

आता सकाळ, दुपार मोहनंचा हा नादच सुरू झाला. दिसेल ते पाखरू टप्प्यात आलं की, ते डेकळीने उडवायचं परसवात, व्हाळात, झरीजवळ, देवळाभोवती मोहन एकसारखा हिंडत ऱ्हायचा. नुसती पाखरंच नव्हे तर सरडे,चोपय,व्हाळातले मोठे मोठे बेडूक... दिसेल ते जीव मारायचा. अगदीच काय नसेल तर ईश्वराच्या, देवीच्या देवळात छताला लटकणारी वाघळं मारायची. ती तर ढिगांनी. मोहननं वाघळांचा नुसता खच पाडला. माझ्या अंगावर रेपा येत. मन खायला लागे. रात्री झोपल्यावर मेलेली पाखरं,वाघळं डोळयांसमोर येत. मध्यान्ह रात्र झाली तरी मी जागाच म्हणताना आईनं मला विचारलं. मला रडू यायला लागलं. मोहनचं पाखरं मारणं ऐकून काकूसुध्दा चिडली. दुसऱ्या दिवशी तिने मोहनला चांगला लंबे केला. “ मेल्या, देवाच्या दारात पाखरं मारतोस? कुठे पापं फेडशील? ब्राह्मणाच्या पोटी जन्माला येऊन कसले नष्टचर्य नाद हे तुझे? थांब तुझी डेळकीच

चुलीत घालत्ये." काकूनं डेळकी काढून घेताच मोहन बोंबा मारू लागला. आता काका मध्ये पडले. अण्णा म्हणाले,"अरे मोहन, त्या मुक्या जीवांना मारून आपल्याला काय मिळणार? आणि देवळातली वाघळं बिचारी, देवासमोर त्यांची हत्या करणे बऱ्याचे लक्षण नव्हे. तू बाकी कसलेही खेळ खेळ पण पाखरं नको मारू बाबा." काकांनी काही न बोलता काकूच्या हातातली डेळकी काढून घेतली. मोहनला उचलून ते खळयात घेऊन गेले. त्याला डेळकी परत देऊन म्हणाले, "हे बघ पाखरं मारशील ती घरी दाखवायला आणू नकोस. देवळात वाघळं मारली तर ती उचलून बाहेर नेऊन टाकीत जा." मग माझ्याकडे बघून ते म्हणाले, "बाहेर काय झक मारायची ती मारा. इथे घरात आई-काकूंपर्यंत काय पोचवू नका. जावा पळा आता नि दुपारी वेळेवारी घरी या." काकाच असं बोलल्यावर मोहन शेफारूनच गेला. हुय्यऽऽ हुय्य करीत त्याने व्हाळाकडे धाव घेतली. मोहनबरोबर जायला माझं मन राजी नव्हतं पण नाइलाजाने मी गेलो.

आताशा मी त्याचा नाद सोडला. मला आडबाजूला घेऊन आईनं बजावलं, "हे नाद चांगल्याचे नव्हेत. मोहन लाडाकोडाचा. तो काय करील ते करो बापडा. तू त्याच्याबरोबर एरव्ही काय ते खेळ. पण पाखरं मारायला जात जाऊ नकोस."मी जाईनासा झालो तरी त्याचं काही अडलं नाय. घाडी-गुरव यांची पोर त्याच्याभोवती जमली. खरबी, लाव्हा असलं खाण्याजोगं पाखरू त्यानं मारलं तर ती पोर सागोतीला घेऊन जात. कुठे -कुठे पाखरांची बसल, ठिवं शोधून ती त्याला घेऊन जात. मोहनच्या रोजच्या फिरतीमुळे झरीवर आता पाखरू नजरेला पडेना. मग तो आडवणात फिरत राहायचा. पाखरांची घरटी शोधायची,त्यातली अंडी फोडायचीय

पिल्लं मारायची, घरटी उस्कटून टाकायची असले धंदे चालत. एखादं अर्धमेलं पाखरू मिळालं तर घरातलं मांजर नेऊन त्याला ते द्यायचा. असले खेळही होत.

देवळामागच्या जुनाट तिरफळीच्या झाडावरचं धामण्या पोपटाचं पोखर पोरांच्या नजरेला पडलं. पोपटाची पिलं बाळगायची म्हणून मोहन काकांच्या पाठी लागला. काका तिरफळीवरचं पोखर बघून आले. भिकू गुरवाला पोखरातली पिल्लं काढून द्यायला बोलावलं. तिरफळीच्या अंगाला असंख्य काटे, झाडावर चढणं भारी अवघड. पण झिलु युक्तिबाज. पावसाळी सोनचाफ्याची फुलं काढण्यासाठी ठेवलेलं वेळवाचं कणक लावून तो तिरफळीच्या बेचक्यापर्यंत गेला. मग पाय ठेवण्यापुरत्या खापा मारीत त्याने पोखर गाठलं. पोखराचं तोंड कोयत्याने रूंद करून आतली चारही पिल्लं घेऊन तो अल्लाद खाली उतरला. पिल्लांचे डोळे नुकतेच उघडलेले असावेत. त्यांच्या अंगावरची पिसं अजून पूर्णपणे हिरवी सुध्दा झालेली नव्हती.

एवढे लहान गोळे जगवायचे कसे हा प्रश्नच पडला. काकू तर काकांवर डाफरली, “एवढे लहान गोळे कर्माचे जगणार, पोराच्या नादी लागून त्या अश्राप पिल्लांच्या प्राणावर तुम्ही उठलाहात. अशाने तळभंजन होईल....” अण्णानी एका करंडीत जुनेराचा चौघडी तुकडा टाकून त्यावर पिल्लांना ठेवलं. भाताची शितं दुधात कुस्करून,कधी आंब्याचा रस कधी चिकवाची फोड कुस्करून ते समक्ष पिल्लांना भरवायचे. पाच-सहा दिवसांत ती पिल्लं चांगली टुकटुकीत झाली. ‘च्राँऽऽच्राँ’ करीत करंडीत फिरू लागली. अण्णांचं बघून आता मोहनसुध्दा त्यांना भरवायचा. पिल्लं आणल्यापासून त्याचा दिवस पिल्लांमध्ये जाऊ लागला. डेळकी बंद झाली. अशात सांगलीला जायचा दिवस उजाडला. काकांनी स्वतः पिल्लांची करंडी सांभाळली. सांगलीत गेल्यावर भला मोठा पिंजरा करून घेतला.

चारही पिल्ले मोठी झाली. त्यांना कंठ फुटले. त्यांतला एक पोपट बोलायलाही लागला. काका पत्रातून न चुकता पोपटांची खुशाली कळवायचे. पाखरांमुळे मोहनला वाडेखोलाचा चांगलाच लळा लागला. दिवाळी व मे महिन्याच्या पूर्ण सुट्टया तो वाडे खोलात घालवायचा. सुट्टी मिळाली की एखाद्या बहिणीला सोबत घेऊन तो हुकमी यायचा. तो आल्याची वर्दी मिळाली की घाडी-गुरवांची पोरं आमचं घर गाठायची. वेळ- काळ कसलंही भान न ठेवता तो पाखरं,वाघळं मारीत राही. आई-अण्णांना त्याचा हा नाद आवडत नसे. पण काय करणार? मोहन आला की मागील दारी, पुढील दारी बसलेल्या पाखरांकडे पाहून आई म्हणायची, “बाबांनो,आता इथून नाहीसे व्हा. तुमचा काळ वाडेखोलात आलाहे.” मोहन आपला फिस्सकन हसायचा. पाखरांकडे बघून म्हणायचा, “ दाखव अजून नाचून दाखव. डेळकी बांधून झाली की तुझा नाच कसा बाहेर काढतो ते बघ.”

मोहन मोठा झाला तरी पाखरं मारायचा त्याचा नाद काय थांबला नाही. अभ्यासात त्याची प्रगती यथातथाच असली तरी काकांच्या ओळखीमुळे (हो! काका शिक्षण खात्यात दिपोटी! त्यांच्या मुलाला मास्तर कसे नापास करणार?) मॅट्रिकपर्यंत तो वर चढत गेला. मॅट्रिकला मात्र त्याची गाडी अडली. मुळात तो इंग्रजी, गणित सोडून फिजिऑलॉजी हायजीन, नागरिकशास्त्र, चित्रकला असले विषय घेऊन परीक्षेला बसला. (तरीही तो फक्त मराठी आणि चित्रकला या दोनच विषयांत उद्धरला, हा भाग निराळा.) त्यावेळी मॅट्रिकच्या परीक्षा लवकर होत. परीक्षा झाल्यावर नवीन एअरगन घेऊन मोहन वाडेखोलात आला. घरी येताना वाटेतच शेगलाच्या झाडावर बसलेला शिंगचोच्या त्याने मारला.

a

आता चांगलं हत्यार त्याच्या हातात आलेलं. कवडे, ढोक, पाणकोंबड्या, कुवाकोंबड्या, ल्हावे अशी खाण्याजोगती पाखरं तो टिपायचा. मोठे मोठे बापये सुध्दा त्याच्यापुढे गोंडा घोळीत. दुपारी, तिन्हीसांजा वाटेल तेव्हा, वाटेल तिथे मोहन फिरत राहायचा. त्याच्या कर्तृत्वाला वाडेखोलाचं क्षेत्र पुरेना. पुरळ, मुटाट, बापर्डे, मणचे, कालवी इथल्या आमच्या आते- मावशांकडे तो जायचा चार-चार दिवस शिकारी करीत राहायचा. सगळ्यानाच हे रूचत असे अशातला भाग नाही. पण एक म्हणजे थोरा - मोठ्याचा मुलगा, त्याला कसं बोलायचं हा प्रश्नच! दुसरं म्हणजे त्याचा शिकारीचा नाद सोडला तर मोहन अगदी सरळ नि मनमिळावू. लाडाकोडात वाढलेला, पण खाण्या जेवण्याची चत्राई नाही. बापर्ड्याला माझ्या मावशीकडे अठरा विश्वे दारिद्र्य. तिच्याकडे दुवक्त आमटी-भात, भाकरी मिळण्याचीही भ्रांत. बरेच वेळा पोटभरतीला आटवल,आंबील, बरके गरे, भोपळ्याची नायतर तोवशाची भाजी असायची. मोहन उलट मावशीला सांगायचा,"माझ्या एकट्यासाठी भाकरी भात करु नकोमावशी. मला भोपळ्याची भाजी,आंबिल, भयंकर आवडते. आमच्या घरी आई करीत नाही." त्याच्यासाठी दोन भाकऱ्या केलेल्या असल्या तरी तो आंबिलीची पातेली पुढे ओढी. तो पानात पडेल ते पोटभर खाऊन आनंदात राहायचा. गुरं चरवायला न्यायचा. गाई म्हशींच दूध काढायचा. काजु - रतांबे पाडून द्यायचा. त्याच्या ह्या गुणांमुळे त्याच्या शिकारीबद्दल कुणाची तक्रार नसे.

एकदा संध्याकाळी झोपाळ्यावर बसलेले असताना अण्णांनी त्याच्या परीक्षेची- अभ्यासाची चौकशी केली. त्याने इंग्लिश - गणित सोडलेलं ऐकल्यावर अण्णांनी त्याची चंपी केली. परीक्षेत हमखास पास होईन असेही मोहन सांगेना. त्यावरून हा काय दिवे लावणार ते अण्णांनी ओळखलं. त्याला चांगलं बोधामृत

a

पाजलं. मोहन रडला तेव्हा मात्र आई मध्ये पडली. त्या रात्री मोहन रागाने जेवला नाही. सकाळी उठल्यावर मी मुटाटला आत्याकडे जातो असं आईला सांगून तो चालता झाला. तो गेल्यावर आई- अण्णांचं चांगलंच भांडण झालं.''ही गोष्ट भावोजींच्या कानावर गेली तर उगाच वितुष्ट येईल.'' आई करवादली. अण्णा मात्र खंबीर.

''ह्या कारणामुळे वामन तुटला तरी बेहेत्तर. एवढ्या मोठ्या हुद्दयावर काम करणारा माणूस! ह्याचा पोर असा वारेभक्..... ही गोष्ट काय भूषणावह नव्हे. मला तो वामन्या शब्दाने तरी विचारूदेच, नाय त्याचा सुखडा साफ केला तर बघ. विद्या हा ब्राह्मणाचा छंद, शिकारी हा नव्हे! उद्या पोरगा वाह्यात गेला तर कोणाच्या नावाने रडेल हा वामन? मी भीत नाय त्याला! असल्या नादासाठी त्याचा पोर नाय आला वाडेखोलात तरी बेहेत्तर.'' चार दिवसांनी मोहन आत्याकडून परत आला. त्याला अण्णा ओरडले वगैरे काही मनात न धरता तो पंधरा दिवस राहिला नि सांगलीला गेला. तो गेल्यावर काकांकडून काही खारट तुरट पत्र येईलसं वाटलं होतय पण तसं काही झालं नाही. पुढे कधी तरी वामनकाका आले तेव्हा अण्णांनीच अशाला असे झाले, हे त्यांच्या कानी घातलं. तेव्हा मोहन याबद्दल अवाक्षरही त्यांना बोलला नव्हता हे समजलं. हल्ली त्याने काकांच्या मागे लागून बंदुकीचं लायसेन्स काढलं. दुनळी काडतुसाची बंदुक त्याने घेतल्याचं कळलं. काकांनी त्याला कापड दुकान काढून दिलं. त्या वेळी आई-अण्णा मुद्दाम सांगलीला जाऊन आले. त्याचा शिकारीचा नाद काही कमी झाला नाही. चांगल्या चांगल्या लोकांशी त्याच्या ओळखी झाल्या. रोज संध्याकाळी मित्रमंडळींबरोबर तो सांगलीच्या आसपास शिकारींना जायचा.

त्या वर्षी बंदुक घेऊन मोहन वाडेखोलात आला. येण्यापूर्वी आमच्या बरोबर सदू गुरवालाही आपण बंदुक घेऊन येणार असल्याचं त्यानं कळवलं. मोहन गाडीतुन उतरला तेव्हा त्याचं मित्रमंडळ जमा झालं. आमच्या मळयात डुकरं पुष्कळ. आडवणात ससे, भेकरी, लांडोरीसुध्दा आढळत. या खेपेला मोहन रात्र-रात्र घरात नसायचा. त्याने खुप शिकार केली. तो चोरून मटण खातो ही कुणकुण आई-अण्णांच्या कानांवरही गेली. घाडी-गुरवांची पोरं त्याने मारलेली शिकार न्यायची. मटण रांधून गुपचुप त्याला खाऊ घालायची. मोठी शिकार मिळाली नाही की मोहन झरीवर फिरायचा. पाखरं मारणं,देवळातली वटवाघळं मारणं हेही चालूच. काही ना काही जीव मारण्यासाठी त्याचे हात शवशिवत असावेत हेच खरं.

अलीकडे वामनकाका उत्सवाला येऊन गेले की नंतर आगे मागे मोहनची खेप ठरलेली. वाडेखोलात तो शिकार करायचाच, पण मुटाट-पुरळ इकडे पाहुणे मंडळींकडे जाऊनही तो शिकारीसाठी फिरायचा. तो आला की पंधरा दिवस, पाऊण महिना त्याचा मुक्काम ठरलेला. आमच्या गावातही दोन-तीन बर्कनदार झालेले. तसेच आडवणात नी सड्यावर झाळी-बेटे तोडून हापूस कलम लागवडी सुरू झाल्यामुळे जंगल कमी झालेले. सिलीपाट नि कलम लागवडीमुळे झाडांची बेसुमार तोड झालेली. आडवनात खुटवळ काढून कोळशाच्या भट्टया सुरू झालेल्या. त्यामुळे हळुहळु शिकार कमी होत चालली. त्या वर्षी तर तीन चार दिवस पायपीट करूनही मोहनला शिकार मिळाली नाही. जनावरांचा निवासच ऱ्हायला नाही.अधून मधून केरळ- मद्रास इकडचे लोक यायचे नी सायरन वापरून शिकार करायचे. त्यांनी तर शोधून शोधून जनावरं साफ केली.

मोहन वैतागला.झरीवर पाखरं मारायला गेलेला असताना त्याला सशाच्या, भेकरांच्या लेंड्या दिसल्या. देवराईला अजून कोणाचा हात लागलेला नव्हता. राईतली झाडं तोडायला,शिकार करायला देवाचीच बंदी असायची. अजूनपर्यंत तरी देवाचा हुकुम मोडायचं धारिष्ट्य कोणी केलेलं नव्हतं. झरीवर पारधीला बसायचा मोहनचा बेत त्याने घाडी- गुरवांना सांगितला. ही बातमी अण्णांच्या कानी आली तेव्हा त्यांनी आकांड-तांडव केलं. भलतं सलतं धाडस करू नकोस,असं त्यांनी मोहनला निक्षून बजावलं. घृष्णेश्वराचं देवस्थान भलतचं जागृत . इथे देवाच्या हुकुमाविरूध्द काही गोष्ट केली तर त्याचं प्रत्यतंर आल्याशिवाय राहणार नाही हे त्यानी बजावलं. मोहन शिकारीसाठी नुसता वेडापिसा झालेला! अण्णांच्या नकळत त्याने देवाला कौल लावून विचारणा केली. पण कौल मिळाला नाही.

मोहनची भलतीच पंचाईत झाली. दुपारच्या झरीवर पाखरं मारायला गेलेला असताना जांभळीवर आलेले वादंर त्याला दिसले. मोहन टाकोटाक घरी जाऊन बंदुक घेऊन आला. जांभळी वरच्या कळपामधील हुप्प्यावरच त्याने बार टाकला. वर्मी गोळी लागलेला वानर दोन्ही हातांनी फांदी गच्च घरून काही वेळ लोंबकळत राहिला. मग त्याचा एक हात सुटला. स्वतः भोवती गिरकी मारून वानर झरीत कोसळला. बाराचा आवाज ऐकून कळपातल्या वांदरीणी सैरावैरा पळाल्या. उगाच बोंबाबोंब नको म्हणून मोहनने झरीतला वांदर उचलला नि लांब काटवणात फेकून दिला. पाच-सहा दिवसांनी हात साफ करायला मिळाले या आनंदात मोहन सातकुंडाजवळुन वर आला. भैरवाच्या गुंफेसमोर तो आला. त्याने सहज नजर केली तर गुंफेमागच्या अष्टावर दडलेल्या कळपातल्या दोन-तीन वांदरिणी दिसल्या.

a

ईश्वराच्या देवळाला वळसा घालून पलीकडच्या अंगाने गेलेल्या चढणीवरून मोहन दबकत दबकत निघाला. झाळींच्या आडोशाने दडून बसत - बसत तो अष्टाकडे सरकायला लागला. अष्टाचं झाड टप्प्यात आलं. फांद्यांच्या आडोशाला भयाने एकमेकींना लगटलेल्या दोन वांदरिणी मोहनने टेळल्या. सावधपणे नेम धरून त्याने बंदुकीचे दोन्ही चाप लागोपाठ ओढले. धाड्धाड् दोन बार झाले. वांदरिणी भैरवाच्या देवळावर आदळून देवळा समोरच्या ओवरीत कोसळल्या. मोहनने झरीत पहिला बार टाकला. त्याचा आवाज ऐकून सदु गुरव घराबाहेर पडून देवळा कडे निघालेला. तो व्हाळात पुलावर असतानाच दोन बार होऊन भैरवाच्या देवळावरून कोसळलेल्या वांदरिणी त्याने बाघितल्या. तो धावत पुढे गेला. मेलेल्या वांदरिणी त्याने उचलून लांब नेऊन टाकल्या. देवळातली घागर भरून आणून त्याने ओवरीत सांडलेलं रक्त धुवून टाकलं. “ म्हाजनानूं, ह्यां लय वायट क्येलास. हय पारद करूक द्येवाची बंदी हा....शिकारीक कऊल दिलान नाय द्येवान ह्यां तुमी बगलासच. द्येवाची सामक्षा मिळाल्याशिवाय ऱ्हवणार नाय्. नाक-त्वांड घासून चुकी मागा.” असा सल्ला त्याने मोहनला दिला. मोहन मनोमन चरकला. पण घृष्णेश्वरा समोर हात जोडून चुक कबूल करणं टाळून वरकरणी हसण्यावारी नेत तो घराकडे निघाला. व्हाळातल्या पुलावरून उतरताना सळ्ऽऽ सळ् करीत एक भला मोठा पिवळा धम्मक नाग सरसरत गेला. मोहनचा त्याच्यावर पायच पडायचा पण नशिबाने तसं झालं नाही. घरी गेल्यावर संध्याकाळपर्यंत मोहन झोपाळयावर झोप्या घेत राहीला. मनातून घाबरलेल्या मोहनला रात्री नीज येईना. खुप उशिराने त्याचा जरा डोळा लागला. त्याला वेडीवाकडी स्वप्नं पडली. स्वप्नात तो गायमुखाखाली आंघोळ करीत असताना कडेच्या झाडांवरून धडाधडा उड्या मारीत शे-सव्वाशे

वांदर जमले. मोहनकडे किच्च किच्च दात विचकत पाहत ते रडायला लागले. मोहन घाबरून अंथरूणात उठून बसला. तो घामाने निथळला. त्याच वेळी घड्याळात बाराचे ठोके पडले. ठोके थांबल्यावर भैरवाच्या फेरीची जाग लागली. भैरवाच्या दांड्याचे आवाज जवळ जवळ ऐकायला येऊ लागले. आमच्या महाजनांच्या घरासमोर दोन-तीन वेळा खुप जोराने धाण्-दाण् दांडा वाजला. मोहनला मग झोपच आली नाही.

सकाळी उठून तोंड धुताना आई-अण्णांचं संभाषण त्याच्या कानांवर आलं. अण्णा बोलले,''काल मध्यान् रात्री भैरवाची फेरी झाली ना ती आयकलिस काय गो? आमच्या वाड्यासमोर दोन-तीन वेळा दणादणा दांडा वाजलेला मी आईकला.कशामुळे काय बिनसले कळेना. मोहन्यान शिकारी साठी कौल लावून देवाचा होकार मागितलान होता, अशी वदंता माझ्या कानावर आलीहे त्यामुळे देव कोपला नसेल ना?'' हे ऐकल्यावर मात्र मोहन अंतर्बाह्य हादरून गेला. त्याने सामान आवरले अन् जाण्याचा बेत केला. तो चहा घेत असताना आईला तसे म्हणाला. आईने त्यावर म्हटलं, लवकरसा निघालास? चार-आठ रोजा ऱ्हाईना होतास. शिकार मिळत नाय म्हणून तुझे मन लागत नाय की काय? काय बोलावं मोहनला सुचेना. तो उत्तर योजून बोलला,''काकू, तिकडे दुकान नोकरांवर पातून आलोय् . हल्ली दुकान होबेस चालते. आपण स्वतःनाही तर फुकट आहे.'' आईलाही हे पटलं. मोहन सांगलीला निघून गेला. सांगलीत गेल्यावरही त्याला नीज पडेना. रोज वेडीवाकडी स्वप्नं पडायची. काळाकभिन्न कोचाऱ्या शिंगाचा बैल शिंगं रोखीत मारायला यायचा... कधी वाघळं चिर्रर चिर्रर करीत डसायला यायची.... कधी दात विचकत वांदर अंगावर यायचे. त्याला झोप म्हणून लागेना. आठ-पंधरा दिवस तो सैरभैर

झाला. धड काही बोलेना. जेवी खाई ना! एक दिवस सकाळीच तोंड धुतल्यावर तो घराबाहेर पडला. बरेच दिवस घरातच घोंगशी घालून पडलेला मोहन आपण होऊन घराबाहेर पडला,या गोष्टीचा काकूला आनंदच झाला. जरा बाहेरची हवा लागली, मित्रमंडळात गप्पाष्टकं झाली की पोर थाऱ्यावर येईल असा आपला तिचा अंदाज! दुपारी दुकान बंद करून नोकर चावी देऊन गेला. तेव्हा मोहन दुकानाकडे फिरकलेला नाही हे कळलं, घरात काही न सांगता कुठे - कुठे भटकणं हे काही मोहनच्या बाबतीत नवीन नव्हतं. संध्याकाळी मोहन आला नाही तेव्हा मात्र काकूचा जीव थाऱ्यावर ऱ्हाईना. आख्ख्या सांगलीत मोहनच्या परिचयातल्या माणसांकडे चौकशी झाली, पण कुठेच काय मागमुस लागला नाही. मोहन बेपत्ता झाल्याला चार दिवस लोटले. कसलाही धागादोरा लागू न देता त्याचं बेपत्ता होणं आता आमच्या दृष्टीनं एक गुढच आहे!

◙ ◙ ◙ ◙ ◙ ◙ ◙

# २. करंजी

बरेच दिवस वाजत असलेले जोशांचे वेगळेचार एकदाचे झाले अन् अण्णांनी त्यांचा मोठा मुलगा ‘भाऊ’ याला वेगळा टाकला. हे सगळे नाटक अण्णां जोशांची ची बायको बायजाई, धाकटा मुलगा दिनू नि त्याची बायको भागी या तिघांचे! दिनूचे लग्न लागले आणि महिनाभरातच ‘घरात कली शिरला’ असे भाऊंची बायको जानकी उभारत म्हणाली. मुळात दिनूसाठी मुलगी बघायचा कार्यक्रम झाला तेव्हाच चकणी,दात पुढे असलेली, देवीच्या व्रणांनी चेहरा भरलेली भटांची ‘येसु’ भाऊंनी नापसंतच केली. मुलगी बघून आल्यावर रात्री ओसरीवर बोलणी झाली. त्या वेळी भाऊ स्पष्टच म्हणाले, “आमचा दिनू कुठे नि हे घुबड कुठे ? सरळ नापसंत म्हणून कळवा.” पण शिदूनाना भट हे बायजाईच्या नात्यातले! मोठी तालेवार असामी! मुलीसाठी पंचवीस तोळे सोने,पाचशे रूपये रोख, दोन्ही मांडवाचा खर्च आणि मानपान करायची शिदुनानांची तयारी आहे, याची बोलवा कानांवर आल्यानंतर बायााईनेच हे स्थळ जुळवुन आणलेले!

खरे तर पैशा च्या आमिषाला भुलण्यासाठी जोशांची परिस्थिती कोरम होती असेही नव्हते. हयातभर गहाणवट नि व्याजबट्टा करून अण्णांनी खुप माया जमा केलेली! त्याशिवाय आत्त्याची इस्टेट गडप केलेली होतीच!! मनात आणले तर

अण्णा जोशी स्वतःची आणि बायकोची सुध्दा सुवर्ण तुला करू शकेल असे लोक म्हणायचे नी ते सत्यही होते. पण म्हणूनच बायजाईला अती द्रव्यलोभ! भाऊंनी मुलगी नापसंत असल्याचा शेरा मारल्यावर, "रूप काय मध घालुन चाटायचे आहे ? मुलगी रूपाने बेतान् काळ-सावळी वाटली तरी बरी ठसठशीत आहे नि आमचा दिनू तरी कुठे एवढा मदनाचा पुतळा लागून गेलाहे ? सरळ पसंत आहे म्हणून कळवा." असा निर्णय बायजाईने दिला. घरात तिचाच शब्द चालायचा.

भागी इस्टेट घेऊन आली म्हणून बायजाईचा तिच्यावर भारी लोभ. वास्तविक घरातल्या सगळ्या माणसांची जेवणे झाली की मग काय उरलेसुरले असेल ते सुनांनी मान खाली गिळायचे, असा तो काळ! पण बायजाई भागीला आपल्या बरोबर जेवायला वाढायची. तिला लाडाने 'धाकटी' म्हणायची. हळुहळु तिचे 'धाकटी' हेच नाव रूढ झाले. सास्वा सुनांचे चांगलेच मेतकुट जमले. अगोदर एकटी बायजाई थोरल्या सुनेचा -जानकीचा छळ करायची. आता तिच्या जोडीला धाकटी आली. जानकीबरोबर तिची चार पोरे, त्यांचेही हाल व्हायला लागले. 'इतके खातात, दुपारी नुसता हुडदा घालतात.....' अशा धाकटीच्या तक्रारी सुरू झाल्या. एकदा धाकटीच्या माहेराहून करंज्या आल्या. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे आल्या-आल्या डबा उघडुन बायजाईने दोन करंज्या तोडांत टाकल्या, दोन धाकटीच्या हातावर घातल्या. जानकीची लहान मुलगी कुशी, तिने हात पुढे केलान् तर तिच्या ढुंगणावर चापटी मारून धाकटीने तिला हाकललेन् आणि करंज्यांचा डबा स्वयंपाकघरात नेऊन ठेवलान्.

सकाळची शाळा सुटून वासु, मनी, बाळु घरी आली. त्यांना पाळंदीत गाठूनच कुशीने करंज्यांची वर्दी दिलीन्. मनी थोडी जाणती आणि समंजस! तिने

a

कुशीला दटावले , पण बाळु लहान. त्याचे तोंड करंजी खायला हुळकले. पाटी-पुस्तके ओसरीवर ठेवून,धाबळी पालटून धडसे कपडे बदलून पोरे पाय धुवायला गेली. विसू आगरात पळाला. मनी बावीवर कपडे धुणाऱ्या आईला मदत करायला गेली. जावळपास मोठे माणूस नाही असे बघितल्यावर कुशी आणि बाळू स्वयंपाकघरात गेली. डबा उघडून दोघांनीही एक एक करंजी घेतली नि खायला सुरवात केली.परसदारी बसलेल्या धाकटीने स्वयंपाक घरात काहीतरी खडबडल्याचा आवाज ऐकला अन् ती दणदणत आत आली. बघते तर पोरे करंज्या खाताहेत. तिची नुसती आग आग झाली,"मेली दुर्लक्षणी कार्टी! हलकटांना सारखी नुसती खावखाव सुटलेली. मेल्यांनो खाण्यासाठी चोऱ्या करता. उद्या लोकांची घरें फोडाल नी दरवडे दिखील घालाल." बाळयाचे बखोट धरून तिने कुशीच्या पाठीत चार दणके घातले. "बाळया, एवढा मोठा घोडा झालास तरी अक्कल नाय तुला.... माझ्या माहेराहून आलेल्या करंज्या काय चोरा-पोरांना वाटून टाकायला पाठवल्यान् आहेत माझ्या बापसान् ? थांब चांगली अद्दल घडवते तुला. "

बाळयाला फराफरा ओढीत धाकटी चुलीजावळ गेली. चुलीतले जळके कोलीत काढून तिने बाळूच्या गालावर टेकवले. जीवाच्या आकांताने बाळू किंचाळला. कुशीनेसुध्दा घाबरून भोकांड पसरले. पोरांचा ओरडा ऐकून धुणे तसेच टाकून जानकी घराकडे धावली. काय झाले ते कळल्यावर वेदनांनी आक्रंदन करणाऱ्या बाळूच्या पाठीत तिने सुध्दा धपाटे घातले. शरमेने तिच्या डोळयातून पाणी आले. बाळूचा गाल भलताच भाजलेला. चांगला टळटळीत फराटा त्याच्या गालावर उमटलेला. पोराची आळप थांबेना. तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य आईच्या लक्षात आले. बाळूला पाणी पाजून लामण दिव्यातले कडू तेल तिने भाजलेल्या व्रणावर

सोडले. त्याला मांडीवर घेऊन ती थोपटीत बसली. थोड्या वेळाने बायजाई घरी आली. तिने काही विचारण्या पूर्वीच धाकटीने तिच्या कानात कायतरी खुसफूस केली. बायजाई तोंडाचा पट्टा सोडणार होती , पण पोराच्या गालावरचा व्रण बघून ती सुध्दा घाबरली.

दुपारी पुरूष घरी आले. दिनूकाका, भाऊ सगळे आयकून सुध्दा गप्प बसले. म्हातारा अण्णा तेवढा करवादला, “पोर केवढा, त्याची चूक ती काय नि शिक्षा केवढी ..... ही म्हणजे हडळीच्या वरताण झाली.” हे ऐकल्यावर धाकटी तणतणली, “चोरी केलीन् म्हणून जरा धाक लावण्यासाठी नुस्ता चटका दिला, मी हडळ काय ? आजपावत कोणाचा वाकडा शब्द मी आयकून घेतला नाय. पोराला पाठीशी घालून मला हे अपशब्द काय ?” रागाने तरातरा आत जाऊन धाकटीने करंज्याचा डबा उचलला. तशीच बाहेर येऊन तिने करंज्यांचा डबा अण्णांच्या समोर दाणकन टाकला. ओसरीवर करंज्यांचा नुसता पेर झाला. धाकटीचा अघोचारीपणा बघून सगळी माणसे अवाक् झाली. पण कोणीच काही बोलले नाही.

दिवस जात होते तसतशी धाकटीची धुसफूस वाढायलाच लागली. नेहमी पोरांवरून काहीतरी कलागती व्हायच्या.तरी विसू हल्ली फायनलच्या शिक्षणासाठी त्याच्या आजोळीच राहीलेला. भाऊ ‘ब्र’ ही काधीत नसत. भांडण त्यांच्या स्वभावातच नव्हते. पण ते न बोलता बाकीच्यांना ‘फुस’ लावतात असे धाकटी करवादून म्हणायची. आई मात्र अतीच झाले तर एखादा शब्द बोलायची. बाळूच्या गालावर भाजल्याची चांगलीच खुण ऱ्हायलेली. तो तर धाकटीच्या वाऱ्लाही उभा राहत नसे.लग्नाला तीन वरसे झाली तरी धाकटीची कुस उजवली नाही. थोरली सून कायतरी करणी-कारूक करते असे सासू आडपडद्याने बोलायची. आईला सगळे

अनावर व्हायचे. डोळ्यातून पाणी काढले नाही असा तिचा दिवस जाईना. अलग राहून उपासमार काढावी लागली तरी परवडले असे तिला वाटायचे. नवस - सायासाने एकदाची धाकटी गरोदर राहिली. चला आतातरी 'करणी करते' हा आपल्यावरचा आरोप तरी टळला म्हणून आई देवाला हात जोडायची. धाकटीवर तर बायजाईने छत्र छायाच धरलीन्. तिसऱ्या महिन्यातच धाकटी डोळीत बसून माहेरी राहायला गेली. आठ-पंधरा दिवसांनी ' सुनेला बघिनसे झाले' म्हणून ऊठसूट बायजाईच्या धाकटीच्या माहेरी खेपा व्हायला लागल्या. घरातला कली गेल्यामुळे आईचाही जाच जरा कमी झाला. घरात शांतता आली. बघता बघता धाकटीला आठवा महिना लागला.

"आता आठ दिवसांनी मी धाकटीच्या माहेरी जाईन ते तिचे बाळंतपण उरकुनच येईन."ओसरीच्या उंबऱ्यावर बसून पदरातले शेंगदाणे खात खात बायजाई अण्णांना सांगत होती. तेवढ्यात पाळंदीतुन कोणीतरी येताना दिसले. उन्हात चालून घामाघूम झालेला शिदुनानांकडचा गडी तानू बाणे ओसरीवर येऊन टेकला. बसल्याबरोबर त्याने पाणी मागितले . तांब्याने वरूनच धार ओतून घटा घटा करीत आख्खा तांब्या रिकामा करून तानू बाण्याने ढेकर दिला. मग तो निरोप सांगू लागला., "शिदुनानांनी मुद्दाम माका पाटवलानी. येसू आठोळी बाळत झाली, झील झालो हुतो तो ग्येलो, येसूपण लय शीक हा..."हे ऐकून सगळयांच्या तोंडचेच पाणी पळाले. नेमके त्याचवेळी कुशीच्या पाठीवर आईलाही दिवस गेलेले. बायजाईचा नुसता जळफळाट झाला, "जावेचे पोर खाऊन हिची कुस उजावली, लावसट मेली!" बायजाईचा तोंडपट्टा सुरू झाला. आई बिचारी कानकोंडी झाली. दोन महिने विश्रांती घेतल्यानंतर धाकटी घरी आली. आता मात्र आईच्या छळाला पारावार राहीला

नाही.''हिच्यापोटी आळवत जलमणार. माझे तळपट केलेन्, हिला बरे भोगणार नाही.''असे शिव्याशाप धाकटी आता राजरोसपणे देऊ लागली. कुशीच्या पाठीवर आईला मुलगा झाला. धाकटी नी बायजाई ह्यांना जसे सुतकच आले!

सुवेर फिटल्या-फिटल्या चौदाव्या दिवसापासून आईच्या कामाचा चरक सुरू झाला. शेकभाज नाही, अंगाला लावणे नाही. आईची आंघोळ होण्यापूर्वी धाकटी थाळीत पाणी ओतून विस्तव विझवून टाकायची. आई गार पाण्याने अंघोळ करायची. हल्ली तिच्या अन्नाचीही आबाळ व्हायला लागली. दुपारी पुरूष माणसे जोवली की बायजाई उरलेली आमटी पिऊन टाकी. मग वेस्वार नाहीतर मसाला घेऊन आई ताकाबरोबर भात गिळायची. मग वेस्वार -मसाला दडवला जाऊ लागला. ताकही संपायला लागले. आई भातावर फक्त मिठाचे दाणे टाकी आणि पाणी ओतून भात ओला करून तसाच गिळी. कुठच्या जन्माचे पाप फिटते आहे, हेच आईला कळेना! नवरा तर धौम्य मुनी. माहेरी सांगून उगाच त्यांच्या जीवाला घोर नको म्हणून आई मुग गिळून सगळे सहन करायची.

शाळेला सुट्टी पडली नि विसू आजोळाहून घरी आला. त्याला आता चांगली समज आलेली. आईच्या कामाचा धिबिडगा त्याच्याने बघवेना. आई नेहमीप्रमाणे भाताला मीठ लावून पाणी ओतून घास गिळायला लागली. विसू अचंबित झाला. "हे गो काय आई? तुला आमटी नाय उरली ? वेस्वार -ताक घेऊन तरी जेव!" आई शांतपणे म्हणाली तु आज बघतोहेस, मीच पातकी. माझे भोग कधी सरतील देव जााणे.... अंगावर पिणारे पोर आहे म्हणून मला जीव जगवायला हवा इतकेच....

रागाच्या तिरमिरीसरशी विसू ओटीवर गेला अन् अण्णांच्या पुढ्यात उभा राहून म्हणाला, “आजोबाऽऽ! तुम्हाला माहिती आहे का? माझी आई पाणी ओतून भात गिळत्येहे. तुम्हाला शोभते का हे ?'' बायजाई कडकडत म्हणाली, “मोठा आला आयशीचा कैवार घेणारा! इथे काय चीजा वस्तू कुलपात घालून का ठेवल्या आहेत.पाच गळग्रहांची आईस झाली तरी अजून ओयऱ्याचा अंदाज नाही आणि मी म्हणत्ये, एखाद्या दिवशी संपले कालवण तर त्याला काय करणार? आमची सासू आम्हाला चार-चार दिवस उपाशी ठेवायची, तसे तर नाय्ये ना ? हिला दोन ठाव गाडाभर मिळते ऽऽ हे ना ? ‘‘

आजीचे वात्ताडन ऐकून मनी पुढे आली,”आज्जी, किती खोटे बोलत्येस, आईला अंदाज नाहीओयऱ्याचा असे म्हणवते तरी कसे गो तूला .....डाळ-तांदुळ-तेल सगळे तू नाहीतर काकू दोघी काढून देता. तुम्ही ओयरून द्याल तेवढे आई रांधते. सकाळी पातळ भात खाऊन झाल्यावर वेस्वार-मेतकूटाचा डबा काकू न चुकता फडताळात टाकून कुलूप घालत्ये. कसल्या वस्तूला हात लावायची सत्ता आईला आहेच कुठे ?” आपले नाव निघालेले ऐकताच धाकटी काकू वादळत आली, “किती खोटारडी नि अघोचरी पोर ही! न्हाती - धुती झालेली पोर पण जीभेला काही हाड, उद्या सासरी गेल्यावर काय दिवे लावणार आहे देवच जाणे! ओयरा कमी वाटला तर अधिक मागून घ्यायला हिचे तोंड काय धरलेले आहे काय गो वेसवे ?” भडकलेली मनी हात ओवाळीत म्हणाली, “तु एवढी मोठी बायको नि ओसरीवर येऊन पुरूषांच्या पुढ्यात कसले अपशब्द उच्चारतेस, शोभते का तुला हे ? उगाच कांगावखोरपणाने काहीतरी शोभवून घेतले की झाले. घरात काय चालले आहे ते न

a

कळण्या एवढी मी कुक्कुलं बाळ नाही आता! पण काकू, तुझे नि आजीचे जे काय सुरू आहे ना,ते मात्र बऱ्याचे नाही. देव बघून घेईल. ‘‘

आता भांडण चांगलेच रंगात आले. काकु मनीला,आईला, भाऊंना अर्वाच्च शिव्या घालु लागली. “जावेन् करणी करून माझा पोटचा गोळा खाल्लान्.’’ धाकटी काकू गळा काढून रडायला लागली. पुरूष माणसे अस्वस्थ झाली. काका बायकोची कड घेऊन मध्ये पडला. त्याने विसूच्या फाऽड्फाऽऽड् मुस्काटात मारल्यान्. काकू-आजींना दुरूत्तरे केलीन् म्हणून आईने मनीला झोडून काढलेन्. दुपारच्या वेळी घरात नुसती लंका झाली.

शेवटी सगळ्याचे पर्यवसान वेगळेचारात झाले. चार भांडी-कुंडी,दोन मण भात आणि चौथ्या हिश्शाची पडझडातली जमिन देऊन अण्णा जोशानी थोरल्या मुलाला वेगळा टाकला. घराच्या मागील बाजूला एकखणी पडवीत त्याचे बिऱ्हाड झाले. सोनेनाणे, रोकड पैसा यांतली कपर्दिकसुध्दा भाऊला मिळाली नाही. उलट आईच्या गळ्यातले चार मणी नि दोन वाट्या असलेले वाखाच्या दोऱ्यात ओवलेले मंगळसुत्र तिच्या गळ्यातच होते म्हणून राहिले! बाकी तिला माहेराहून लग्नात घातलेले दागिने - टिक्का,अंगठी,नथ,चार बांगड्या, पाटल्या तसेच भाऊंना दिवाळ सणाला दिलेला तीन तोळ्यांचा गोफ सगळे बायजाईच्या ताब्यात असायचे. भाऊंनी चाचरतच त्याची मागणी केली तर “आज इतकी वरसे सहा-सहा तोंडे आमच्या जीवावर तीन त्रिकाळ हादडता अहात त्याला काहीच खरचले नाय काय रे सोद्या ?” असे उत्तर बायजाईने दिले.

खंडाचे भात यायला अजून अवकाश होता. तोपर्यंत पेज घालून पोरांना जिते ठेवायचे, ते चालेल. रोजचा जाच तरी चुकला असाच विचार आईने केला.

गुरांपैकी एक भाकड गाय नि एक म्हैस तीही मारकुटी आणि आई - भाऊं शिवाय कोणालाच दुध काढू द्यायची नाही म्हणून त्यांच्या वाटणीला आली. आईने दुधाचा रतीब घालायला सुरवात केली, तेवढेच चार पैसे हाती येतील! कामाचा धिबिडगा आता कमी झाला. मोकळ्या वेळात द्रोण-पत्रावळी लाव, फुलवाती करून दे असली कामे करून आई पै-पैसा गाठीला लावू लागली. भाऊसुध्दा कष्टाळू. ते टकळीवर सुत काढून जानवी जोड करायचे. रोज डोळ्यानी टिपे गाळीत लाजिरवाणे जिणे जगण्यापेक्षा एक वेळ उपाशी राहणे परवडले असे आईला वाटायचे. काटकसरीच्या संसारातही ती सुख मानायची. तोंडाने सतत गणपतीचा जाप करीत आई आला दिवस आनंदाने साजरा करायची.

हां-हां म्हणता दिवाळी तोंडावर आली. प्राप्त परिस्थितीत बडेजाव जमणारा नव्हता. पोहे आणि रव्याचे लाडू एवढा मर्यादीत घाट आईने घातला. चकल्या-करंज्या करायच्या म्हणजे तेल जास्त लागणार! त्यापेक्षाही बाळूला डागल्यापासून आईने करंजी वर्ज्यच केलेली. दिवाळी आली. सुट्टीत मुंबईतला मामा सहकुटंब येणार होता. म्हणून विसू आजोळीच ऱ्हायला. चाव दिवस उजाडला. न्हाऊन - धुऊन, पोहे-लाडू खाऊन पोरे पुढील दारी अंगणात खेळायला गेली.वेगळेचार झाले तरी अण्णा नातवंडाना हाक मारायचा. कधीतरी गुळाचा खडा हातावर घालून त्यांच्याकडून पाय चेपून घ्यायचा. बाळूला देवाची पुजा करायला बोलवायचा. धाकट्या दिवाकरला ओटीवर ठेवून बाळू, कुशी अंगणात खेळायला लागली.

धाकटी काकू उंबऱ्यात बसून खात ऱ्हायलेली. हल्ली तिला डोहाळे लागलेले. सारखी खाव खाव सुटायची,म्हणून वाटीत दोन चकल्या-कंरज्या घेऊन वाटी पदराआड धरून ती खात बसली. तेवढ्यात कोणीतरी फराळ मागायला आले.

हातातली वाटी उंबऱ्याआड ठेवून पोहे आणायला धाकटी आत गेली. नेमका त्याचवेळी दिवाकर दाराजवळ पोहचला. उंबऱ्याआड वाटीतली अर्धवट खाऊन ठेवलेली कंरजी उचलून त्याने खायला सुरवात केली. पोह्यांची रोवळी घेऊन धाकटी बाहेर आली. तिने ठेवलेल्या वाटीतली करंजी खाताना दिवाकर दिसला मात्र तिचा जो भडका झाला, आधीच तिला त्याचा दुस्वास वाटायचा. रागासरशी दणदणत येऊन तिने दिवाकराला लाथ मारली. खळयात खेळणारी बाळू, कुशी बघितच राहिली. लाथेसरशी दिवाकर भिरकटत भिंतीवर आदळला. रडे फुटण्याआधी डोक्यावर अवघाती आपटल्यामुळे त्याने तडफडणारे मांजर 'क्यांव' करते तसा आवाज काढला नि तो बेशुध्द झाला. डोक्यावर खोक पडून रक्त वाहायला लागले. "आई-भाऊ ऽऽ धावा होऽऽ, काकूने दिवाकराला मारलेन् बघा या." पोरांनी ओरड मारली. कुशी धावतच पुढे गेली. दिवाकरच्या डोक्यावर पडलेल्या जखमेवर हात दाबून धरला. आई -भाऊ धाव मारीत आले. पोराची अवस्था बघून आई माघारी जाऊन पाण्याचा तांब्या घेऊन आली.

अण्णांना एकसारखा परसाकडला जायचा चळ होता. ते खोरणात बसलेले असताना पोरांचा गलका ऐकल्यावर त्यांनीही आवरते घेतले. दिवाकरची दातखीळच बसलेली. आईने त्याच्या मस्तकावर पाणी थोपटले. एका हाताच्या कुळच्यात पाणी घेतले. दुसऱ्या हाताचे बोट त्याच्या दाढवणाकडे सारीत त्याची दातखीळ उघडण्याचा प्रयत्न केला. कुळच्यातले पाणी त्याच्या तोंडात घातले तरी पोर तोंड उघडीना. धास्तावलेल्या आईने त्याच्या छातीवर कान टेकवला. इवले काळीज भयाने धाड् धाड् उडताना ऐकल्यावर तिच्या जीवात जीव आला आणि रडायचे तिला त्या वेळी सुधरले.

a

तोपर्यंत भाऊ कांदा घेऊन आले. कांदा फोडून हुंगवल्यावर पोराने डोळे उघडले.त्या क्षणी घट्ट वळलेल्या त्याच्या बाळमुठी उघडल्या. उजव्या हाताच्या मुठीतली करंजीची कड खाली पडली. त्याच वेळी अण्णा घरी आले. ओटीवरचा गलका बघून त्यांना पायावर पाणी घेऊन चुळ भरायलाही सुधरले नाही. कानावर जाानवे असलेल्या स्थितीतच ते पायऱ्या चढून वर आले. “काय झाले? ‘‘ अण्णांनी विचारले. मुले म्हणाली, “काकूने दिवाकरला लाथ मारून उडवलेन. डोक्याला खोक पडली नि दातखीळ बसली त्याची.’’ गप्प ऱ्हाती तर ती धाकटी काकूच नव्हे. पोरांच्या सांगण्यावर सारवासारवी करण्यासाठी ती म्हणाली, “मी मारे उंबऱ्याच्या आड म्हणून फराळाची वाटी ठेवली. पण या पोरांनाच मुळी अभरवणा झालेली. हा नेमका तिथे पावला. माझ्या हातात रोवळी होती म्हणून उगाच लाथेन् जरा ढोसल्यासारखे बरीक केले मी, त्याचा तोच मागे सरकून भिंतीवर आदळला. मी काय दिखी अतिरेकपणा नाय हो केलेलाऽऽ.”

धाकटीचे स्पष्टीकरण ऐकल्यावर मात्र शांत-संयमी भाऊ कमालीचे खवळले. “एवढ्या लहान अर्भकाला मारायला तुला लाथ उचलवली तरी कशी म्हणतो मी.... तु बाई आहेस की कैदाशीण?”असे म्हणत त्यांनी फाडकन धाकटीच्या कानशिलात भडकवली. काकू छाती पिटित बोंबा मारायला लागली. हे सगळे रामायण घडत असताना बायजाई घरात कुठे होती,

सणवार कसलाही विचार न करता ती उपाध्ये वठारात गप्पाष्टकांना गेलेली. आताशी पोरे पुढील दारी,ओसरीवर जायचीही बंद झालेली. आईने ओसरी पडवी दरम्यानच्या दरवाजाला कडी घालून तिथे लाकडी पेटारा ठेवला नि जा-ये करण्याचा मार्गच मुळी बंद केला. पोरांना पुढील दारी न जााण्याची ती तंबी द्यायची. बाळ्या

देवपुजा करायला गेलाच तरी आई तो येईपर्यंत टकत राहायची. पूजा करून नैवेद्याचा गुळ न खाताच बाळ्या मागच्या पावली मागे यायचा. दिवाकरला तर ती नजरेआडच पातीत नसे. भाऊसुध्दा कारणा - कारणानेच ओसरीवर बसायचे. भाऊ, बायजाई नि दिनू काका मात्र काही दिवस गेल्यावर कोडगेपणाने मागीलदारी भाऊंच्या बिऱ्हाडात निरशा दुधाचा चहा घ्यायला हमखास यायचे. थोरलीचे करणे - करतव चांगले म्हणून बायजाई हक्काने आमटी-भाजी आपल्या हाताने वाटीत काढून न्यायची. धाकटी काकू मात्र मागील दारी फिरकतही नसे. भाऊंनी तिच्या कानशीलात मारले म्हणून अधून -मधून तिचा कान दुखायचा. जरा काही दुखले खुपले तरी त्याचे कारणसुध्दा धाकटी काकू तेच सांगायची नि शिव्याशाप द्यायची. “ चुकून कुठे जरा धक्का लागला त्याचे रांडेच्यानी केवढे भांडवल केलेनी. त्यांच्या श्रापां मुळेच मला मुलगी झाली....”

फायनलची परीक्षा देऊन विश्वनाथ घरी आला. घरची ओढघस्तीची परिस्थिती त्याला गप्प बसू देईना. आपण नक्की फायनल पास होणार याची त्याला खात्री. पास झाल्यावर कुठेतरी शाळा मास्तराची नोकरी मिळण्याची आशा होती. तोपर्यंत कुठे दुकानात वगैरे काम मिळाले तर बघूया,असा त्याने भाऊंच्या पाठी लकडा लावला. भाऊंनी ओळख काढून विजयदुर्गच्या जांभेकरांकडे शब्द टाकला. त्यांची पेढी, धंद्याचा व्याप खुप मोठा. मुलगा सातवी झालेला आहे. हिशोब ठिशोब ठेवले अन् देवपुजा केलीन तरी पुरे असा विचार मामा जांभेकरांनी केला. जेवून-खाऊन महिना चार रूपये पगारावर विसू मामांकडे पेढीवर ऱ्हायला. मुलगा नेकीचा. त्याचे अक्षरही वळणदार, महिना भरातच त्याने मामांची मर्जी संपादन केली.

a

विसू सकाळी लवकर उठून आंघोळ, देवपूजा उरकून पेढीवर जायचा. हिशोब लिहिणे,अडी नडीला माल द्यायला मदत करायची, कौले मोजून द्यायची,दिसेल ते काम विसू न सांगता करायचा. दुपारी जेवण झाले की वामकुक्षी करणे टाळून विसू पेढीवर जायचा.घाऊक खरेदीदारांची यादी आली असेल त्याप्रमाणे जिन्नस मोजून ठेवायचा. मालाची पोती सारखी करायचा. बंदरावर कौलांची वखार होती तिथे खेप मारायचा. संध्याकाळी कंदील लावल्यावर मामा उठतील तेव्हाच त्यांच्या बरोबर तो घरी परतायचा. संध्याकाळी बाजारात फिरून ये,असे मामा सांगायचे पण विसू पेढी सोडून जायचा नाही. दरमहा चार रूपये पगार ठरला होता खरा पण पहिल्याच पगाराला मामांनी खुष होऊन सहा रूपये त्याच्या हातावर ठेवले नि ते म्हणाले, “उद्या घरी जाा. पैसे आईकडे देऊन तिच्या पाया पड. दोन दिवस रहा नि ये.” विसू घरी जायला निघाल्यावर मामांनी त्याच्या लहान भावंडासाठी खजूर,जर्दाळू, शेंगदाणे, शिवाय दोन रत्तल गुळ. रत्तलभर खडीसाखर, चहा पावडर, पायलीभर बारीक तांदूळ अशा वस्तू दिल्या.

विसू मामांच्या पेढीवर चांगलाच रूळला. आता हिशोबा बरोबर वसूलीची कामे करायलाही तो जायचा. विसूच्या गावचा गाडीवाला विठू अधून मधून बोटीचे पॅसेंजर पोहोचवायला न्यायला विजयदुर्गात जायचा. तो हटकून मामांच्या दुकानात विसूला भेटायला जायचा. विसूचा गाववाला म्हणून मामा दरवेळी त्याला पान सुपारी,तंबाखू द्यायचे. त्यांच्या पेढीवर विसूचे वजन आहे हे बघून तो सुखवायचा. त्याचा मोठेपणा, खुशाली घरी आई-भाऊंना सांगायचा. घरी लागणारा जिन्नस आई विठूकडे कळवायची. विठू आला की, मामा जातीनिषशी चौकशी करून स्वतः माल मापून द्यायचे.

a

हळूहळू दिवाळी जवळ आली. एक दिवशी मामा त्याला म्हणाले, “अरे विश्वनाथ, दिवाळीचा सीझन म्हणजे आमच्या दृष्टिने फार महत्वाचा. दिवाळीत तू पेढीवर हजर हवास. दिवाळीपूर्वी चार दिवस तू जिन्नस घेऊन घरी जाऊन ये. मग भाऊबीजेच्या दिवशी तू घरी गेलास, नी चार दिवस राहिलास तरी चालेल. लक्ष्मी पूजनाला सगळी खाती बदलायची असतात. बरीच लिखापढ करावी लागते.” दिवाळीपूर्वी चार -सहा दिवस मामांनी विठू गाडीवाल्याला वर्दी दिली. विठू गाडी घेऊन पेढीवर आला. मामांनी स्वतःच्या मनानेच सामानाची यादी केली. स्वतःच्या देखरेखी खाली जिन्नस नीट पोत्यात बांधून गाडीत चढवून दिले. दुपारी विठू त्यांच्याकडेच जेवला. जेवण झाल्यावर, “तू सामान घेऊन घरी जा. उद्या रहा नि परवा परत ये .”असे सांगून मामांनी विसूला घरी पाठवले. विसू घरी पोहोचेपर्यंत संध्याकाळ झाली. सामानाची बोचकी घरी आणून पोहोचवल्यावर विठू घरी गेला. रात्री जुड्या पुड्या सोडताना आईची कोण धांदल उडाली. सामानात फुलबाजे, चंद्रज्योती नी फटाके बघितल्यावर कुशी,बाळ्या,दिवाकर नाचायलाच लागली. भाऊंनी गुळाची ढेप फोडायला घेतली.

सामानसुमान आलेले बघितल्यावर भाऊ नि बायजाई दोघे मागील दारी येऊन बसली. दोघांनाही बचकभर गुळ खाल्ला. एक भला मोठा गुळाचा खडा उचलून,” इथे चांगला गुळ मिळत नाय. मला खायला होईल...”असे म्हणत बायजाई उठली. अण्णा मात्र, “आज मी इथेच जेवतो. सुनेने विसूसाठी कायतरी केलेन तर आमचीही सोय होईल. चार घास चवीरवीने खाईन,” असे म्हणत तिथेच थांबले. रात्री जेवणे उरकल्यावर निजानिज झाली. विसू आईजवळ आडवा झाला. आई त्याला एका हाताने थोपटायला लागली. अकस्मात आईचा हात धरून काहीतरी

आठवल्यासारखे करीत विसू उठून बसला. "आईऽऽ रागावणार नसलीस,रडणार नसलीस आणि होय असे वचन देत असशील तरच एक गोष्ट सांगेन म्हणतो." त्यावर आई म्हणाली, "होय रे ऽऽ बाबा ऽऽ होय! एवढे काय सांगणारेस ते सांग बघू . दिले मी वचन." विसू म्हणाला, "आईऽऽ यंदा कंरज्या कर! आणि यंदाच्या दिवाळीपासून तू सुध्दा कंरज्या खायला लाग!"

विसूचे बोलणे ऐकून आई अवाक् झाली. क्षणभर कोणीच काही बोलले नाही. आईचे रडे सुरू झाले नाही, त्यामुळे धीर चेपून विसू पुढे बोलला,

"आईऽऽ देवाच्या दयेने आता चांगले दिवस आले. यापुढे तुझे दैन्य आणि वनवास संपले असे समज! माझे एवढे ऐकच. ह्या करंज्यानी इतके रामायण-महाभारत घडविले. यंदा त्याचे उट्टे फेडण्यासाठी मुद्दाम करंज्या कर!" आई मनात म्हणाली की, विसू आता पोर ऱ्हायला नाही. तिला आतून कढ आले. पण वचन दिले होते म्हणून आणि पोर अभिमानी आहे, या वयात याला केवढी समज आली! आता त्याचे ऐकायला हवे, असा विचार करून आलेले कढ जिरवून डभर हसत आईने कबुली दिली. "मामांनी उद्या राहायला सांगितले आहे. पण पेढीवर दिवाळीच्या खरेदीची गर्दी असणार, मला राहून चालायचे नाही "असे सांगून विसू गाढ झोपला. कैक वर्षानी आईलाही बिनघोर झोप आली.

लक्ष्मीपूजनाची गडबड पूर्ण झाली. दिवाळीच्या दिवशी मामांनी सगळयाच नोकरांना पगार आणि दिवाळी भेटवस्तू दिल्या. त्यांचा तो सालाबाद रिवाजच असायचा. विसुला उत्तम मस्राईज धोतराचे पान आणि सदऱ्याचे कापड दिले. त्याचा पगार वाढवून सहा ऐवजी नक्त दहा रूपये विसूच्या हातात ठेवीत मामा म्हणाले, "विसू, तुझ्या सामानाचे बिल खात्यावर टाकू . पुढच्या महिन्यापासून दरमहा हप्त्याने

कापून घेऊ. या वेळी सणा सुदीला पुरी रक्कम घरी ने आणि हो ऽऽ आज संध्याकाळी तू घरी गेलास तरी चालेल. भाऊबीज करून सावकाश परत ये " संध्याकाळी काळवे पडण्यापूर्वी विसू घरी पोहोचला. तो पाय धुवून आईच्या पुढ्यात जाऊन बसला. भिंतीच्या कडेने मांडलेल्या टोपल्यांवरचे केळीच्या पानाचे फाळके बाजूला करून आईने त्याला फराळाचे जिन्नस दाखवले. "विसू, दोन दिवस आल्या-गेलेल्याला भरभरून फराळ वाटला, त्यानेच माझे पोट भरले. विसू, बाकीच्यांना वाटल्या खऱ्या पण मी काही अजून करंजी खाल्लेली नाही. म्हटले, तू आलास की दोघांनी मिळून कंरज्या खायच्या."

आई उठली. तिने सगळ्या मुलांना हाका मारून प्रत्येकाला करंजी दिली. भाऊ-विसू यांना वाटीतून दोन-दोन कंरज्या दिल्या. स्वतः एक कंरजी घेतली. सगळीजण आनंदात करंजी खायला लागली. करंजीचे टोक मोडून तोंडात घातल्यावर मात्र आईला रहावेना. तिचे रडे डोळयांबाहेर आले. विसूसकट सगळेच एकदम गप्प झाले. मग पदराने डोळे टिपीत आई म्हणाली, "अरे खुळयांनो, गप्प का झालेत. माझे रडे आनंदाचे आहे. या करंजीचे इजा-बिजा झाले! तिजा काय होतो याचा घोर लागला होता माझ्या जीवाला. पण देव अगदीच कृतघ्न नाही बरे! तिसरी करंजी आनंद-ऐश्वर्य घेऊन लक्ष्मीच्या पावलाने आली. पोरांनो,एक लक्षात ठेवा! यापुढे दिवाळीलाच नव्हे प्रत्येक सणावाराला घरात करंजी झालीच पायजे. मी आहे तोपर्यंत करीनच, पण माझ्या माघारी तुम्हीसुध्दा माझा हा वसा म्हणून सांभाळा!"

तिन्हीसांजा होत आलेल्या. आईने देवापुढे समई लावली. नेसण-खोचण ठाकठिक केले. रोवळीभरून कंरज्या आणि सोबतीला दिवाकरला घेऊन आई धाकटीकडे गेली. धाकटी मुलीला मांडीवर घेऊन झोप्या काढीत बसलेली.

करंज्यांची रोवळी सास्वेपुढे ठेवून आई म्हणाली,’’यंदा विसूच्या कष्टांवर चार जिन्नस धादूसपणे करता आले. वेगळी ऱ्हायल्ये खरी,पण तुमच्या आशीर्वादाने बरे दिवस आले. म्हटले आता अढी नको.’’ रोवळीभर कंरज्या बघून सासू चाट झाली. “अगो बायो, इतक्या करंज्या? सगळ्याच भरून आणल्यास की काय ? पोरांना तरी चार राखून ठेवल्यास की नाय ?’’

मग तोंडभर हसत आई म्हणाली, “असे कसे? ठेवल्या तर! त्यांना तर आधी हव्या. यंदा भरपूर केल्या आहेत करंज्या. विसूने हे इतके जिन्नस आणून टाकलेन्. म्हटले यंदा तरी जरा हात सोडून करूया. सासूबाई ऽऽ मी इतक्या दिवाळ्या बघितल्या, इतक्या दिवाळ्यांना फराळाचे केले पण यंदा मात्र मला करंज्या केल्यासारख्या वाटल्या!’’

# ३.वाघजाईतले दिवस

दादांची वाघजाईच्या शाळेत बदली झाली. त्यांचा शेती-शिक्षणाचा कोर्स झालेला अन् वाघजाईच्या शाळेत शेती विषय सुरू केलेला असूनही शेती शिक्षक नव्हता. भांबेडात दादा खुप कंटाळलेले. एकतर घरापासून बराच लांबीचा पल्ला,दुर्गम गाव आणि शाळेत मुले खुपच कमी. दुसरे म्हण जे भांबेड शाळेत फक्त चारच यत्ता असल्यामुळे शेती विषय नव्हता, म्हणून कोर्स करूनही दादांना भत्ता मिळाला नाही. तसेच वर्षभरात राजाची चौथी पुरी झाली की त्याच्या पुढच्या शिक्षणाचा प्रश्नच निर्माण झाला असता. मराठी शाळा मास्तराला काय मागितल्यावर लगेच बदली मिळणार थोडीच? म्हणून दादांनी वर्षभर अगोदरच डिस्ट्रिक्ट स्कुल बोर्डाकडे बदली मागणीचा अर्ज केला. कर्मधर्म संयोगाने अर्ज केल्यावर महिनाभरातच बदलीचा हुकूम आला. वाघजाई सगळ्या दृष्टिने सोईस्कर. विजयदुर्ग खारेपाटण लाँच सर्व्हिसची लाँच वाघजाईच्या बंदरात थांबायची. तिथून पुढे अर्ध्या तासाच्या अंतरावर वाघोटण बंदर. तिथे उतरले की दीड तास मकाण मारून पडलेला घर गाठणे सोईचे पडणार होते. सगळा नीट विचार करूनच दादांनी वाघजाई मागितली.

बदलीच्या हुकूमात तळाशी गिजबीज अक्षरात टीप लिहीलेली होती,

a

“मागणीवरून बदली. सबब भत्ता मिळणार नाही. हुकुमदेखत वाटचाल न भोगता वाघजाई शाळा नं. १ येथे हजर होणेचे आहे.” हुकूम वाचून दादा मोठ्या पेचात पडले. भत्त्याचे एकवेळ ठीक पण वाटचाल भोगायची नाही म्हणजे मोठाच पेच होता. या तळ टीपेच्या टीपेच्या शेऱ्याचा अर्थ असा होता की, आज संध्याकाळी साडेपाच वाजता कार्यालयीन वेळानंतर म्हणजे शाळा सुटल्यावर भांबेड शाळेतला चार्ज सोडायचा आणि उद्या सकाळी साडेसात वाजता शाळा उघडण्यापूर्वी तिथे हजर राहावयाचे. (त्या काळी मराठी शाळा सकाळी साडेसात ते साडेदहा आणि दुपारी अडीज ते संध्याकाळी साडेपाच अशा दुवक्त भरत) बदलीच्या नियमाप्रमाणे खरे तर वाटचालीसाठी म्हणून दोन दिवसांची सवलत द्यायची असा नियम होता. पण दादांनी स्वेच्छेने बदली मागितली होती. शिक्षण खात्याने प्रशासकीय पातळीवर केलेली ती बदली नव्हती. म्हणून प्रवास भत्ता देणे किंवा न देणेची मुभा बदली हुकूमावर सही करणाऱ्या अधिकाऱ्याला होती.

अक्षरावरून दादांनी ओळखले की हे शिक्षण खात्यातल्या नाटेकर कारकूनाचे डोके! नाटेकर म्हणजे भारी तिरकम शेट आणि खत्रूड. तो फडतुस कारकुंडा होता खरा पण त्याचा मेहूणा डिस्ट्रिक्ट स्कुल बोर्डात होता. त्या वगीवर नायटेकर मूत जाळायचा. तो बदलीचे टेबल सांभाळायचा. तो हुकूम लिहिल त्यावर डिकेसाहेब डोळे मिटून सह्या करी. शेफारलेल्या नाटेकराला असल्या फुसकुल्या सोडायची नी शाळा मास्तरांवर कुरघोड्या करायची खोडच! म्हणून शिक्षक मंडळी त्याचा उल्लेख “विघ्नसंतोषी / पोटदुख्या किंवा नायटेकर” असा करीत. हा बदली हुकूम म्हणजे मोठेच गंडांतर आले असे दादांना वाटले. कारण भांबेड ते वाघजाई

a

म्हणजो आठ तास चालीचे मकाण! भांबेड ते राजापूर, राजापूर ते खारेपाटण आणि खारेपाटणपासून लाँचने अगर लांबच्या पाय वाटेने वाघजाई असा दीर्घसूत्री प्रवास.

नायटेकराला हे माहिती होते पण दादानी शेती कोर्स चे कारण नोंदल्यामुळे खात्याला झक् मारून त्यांची बदली करणे भाग पडले होते तो डूख धरून नायटेकराने असा वचपा काढला होता.खरेतर वाटचाल न भोगता ही अट बेकायदेशीर होती. पण बदली हुकूमावर साहेबाने सही केल्यावर मागाहून तळटीप घालून नायटेकराने डाव साधला होता. सकाळी आठच्या दरम्याने हुकूम आला आणि दादांची पळापळ सुरू झाली. बारीक शोध - तपास केल्यावर भांबेडच्या सरदार पाताडे यांच्या वखलातला तानाजीराव पाताडे याची सासुरवाडी वाघजाईत असल्याची माहिती मिळाली. तो अधूनमधून वाघजाईत जाऊन यायचा. त्याच्या परिचयाचा मार्ग आणि चोरवाटासुध्दा त्याला पाठ. मग दुपारी दादा त्याला भेटले. तानाजीराव यायला तयार झाला. एरवी तर राजापूर ते खारेपाटण सर्व्हिस मोटारने जाता आले असते पण शाळा सुटल्यावर निघायचे म्हणजे सगळा प्रवास पायी आणि रात्रीच्या वेळेत पुरा करायचा होता. वाटेत खायला म्हणून सांज्याच्या पोळया, लसणीचे तिखट, कंदील, काड्या पेट्या आणि बाटलीभर जादाचे रॉकेल अशी सगळी जय्यत तयारी झाली. चार्ज सोडून संध्याकाळी शाळा सुटण्यापूर्वी तासभर तानाजीराव नि दादा यांनी भांबेड सोडले. राजापूर दस्तूरी नाका येईतो काळोख पडला. मग कंदील पेटवून पूढची चाल सुरू झाली.

दादा नि तानाजी हातिवल्यात धनगराच्या मांगराजवळ पोहोचले तेव्हा धनगर निजायच्या तयारीलाच लागलेला होता. तिखट-पोळी खाऊन झाल्यावर त्यांनी पुन्हा चालायला सुरूवात केली. आता वाटेत कुठेही न थांबता थेट वाघजाई

a

गाठायची असाच त्यांचा बेत होता. पहिल्या कोंबड्यापर्यंत वाघजाई गाठून तिथेच उजाडेपर्यंत विश्रांती घ्यायची असा त्यांचा विचार होता. पण हे मकाण अपेक्षे इतके जवळचे नव्हते. दोघेजण कुणकवणात पाहोचले तेव्हा शुक्र उगवला नि पहिला कोंबडा झाला. अजूनही तास दीड-तास मकाण मारायचे होते. दमछाक झाली होती तरीही दोघांनी वेग वाढवला. ते वाघजाई शाळेच्या व्हरांडयात बसले तेव्हा दुसरा कोंबडा झाला. कंदील विझवून दोघेही व्हरांड्यातच लवंडले. सूर्य उगण्यापूर्वीच दादांना जाग आली. त्यांनी तानाजीरावाला हलवून हलवून उठवले. शाळेजवळच असलेल्या घाड्यांच्या घरी चौकशी करून दोघेही हेडमास्तर मांगले यांच्या घरी गेले.

दादांना मांगल्यांच्या बिऱ्हाडी पोहोचवून तानाजीराव सासरवाडीला गेला. आंघोळ करून, धोतर धुवून वाळत घालून दादा मांगले मास्तरांबरोबर शाळेत गेले. दुपारी शाळा सुटल्यावर दादा मांगल्याच्याच बिऱ्हाडी गेले. काल बरोबर घेतलेल्या पैकी फक्त दोन पोळया उरल्या होत्या. त्याच खाऊन ऱ्हायचा दादांचा बेत होता. पण मांगले ऐकेनात. मग त्यांच्या पडवीतच पिठले - भात रांधून दादा जेवले. खरे तर मांगले हे जैन समाजाचे मांसमच्छी न खाणारे. पण तो काळच वेगळा होता. जैनांकडे जेवणे दादांना पटले नसते अन् मांगल्यांनीही ब्राह्मण माणसाला आपल्याकडे जेवायचा आग्रह केला नसता. जेवून झाल्यावर दादांनी जरा झोप घेतली. दुपारी सव्वादोनला ते मांगले गुरूजीं बरोबर पुन्हा शाळेत गेले. मग मांगले गुरूजींनी गावचे पोलीस पाटील तात्या देसाई यांना निरोप पाठवला.

संध्याकाळी शाळा सुटल्यावर दादा वस्तीला तात्या देसायांकडे गेले. तात्यांच्या दोन मुली नि दोन मुलगे शाळकरी होते. शाळेत ब्राह्मण मास्तर आले याचा तात्यांना आनंदच झाला. मास्तर तुम्ही बिऱ्हाडकरीपर्यंत निःसंकोच पणे

a

आमच्याकडे रहा. इथे बिऱ्हाडाला घरांचा तोटा नाही. चार-पाच ब्राह्मणांची घरे ओस पडलेली आहेत. जो उठतो तो मुंबई गाठतो. दोन-चार दिवसांत बिऱ्हाडासाठी घर ठरवा. रात्री दोघांच्या मनमुराद गप्पा झाल्या. दादांना लवकरात लवकर भांबेडचे बिऱ्हाड हलवायचे होते. म्हणून दुसऱ्या दिवशीच बिऱ्हाडासाठी घर बघायची पृच्छा दादांनी केली. त्यांचे तात्यांशी बोलणे सुरू असताना देसाईकाकू पुढे येऊन म्हणाल्या, "गुरूजी,आमच्या घराजवळच बबन मिराशाचे घर रिकामे आहे. तुम्ही तिथेच बिऱ्हाड करा. आम्हाला तरी शेजार आहे कुठे ? तुमची मंडळी आली तर मला जरा हाक मारायला, बसा-उठायला संगत मिळेल. "

बबन मिराशाचे घर अण्णांच्या घरापासून हाकेच्या अंतरावर . तो मुंबईत स्थायिक झालेला. वर्षातून एखादी खेप तो वाघजाईत घालायचा.त्याच्या घर-घरभाटा पलीकडे अण्णा मिराशाचे घर. ते बबनचे चुलत चुलते. बबनच्या घराची चावी त्यांच्याकडेच असायची संध्याकाळी दादा नि तात्या अण्णा मिराशाना भेटले. अण्णांनी बबनचे घर उघडून दाखविले. घर चांगले प्रशस्त. माजघर, स्वयंपाकघर, देवखोली,बाळंतणीची खोली, पुढची मागची पडवी नि ऐसपैस अंगण. मागील दारी गोठा अन् घडीव दगडांनी बांधलेली विहिर. स्वतंत्र परडे परसू. दादांना घर पसंत पडले. भाड्याची वगैरे चर्चा झाली.

अण्णानी लगेचच घराची चावी दादांकडे देत म्हटले, "मास्तऽर आता ही किल्ली ठेवा हो तुमच्याकडेनच . घर जरा झाडून सारवून बरी घेयस् हवें." थोडा वेळ थांबून हां ऽऽहां करून अण्णा पुढे म्हणाले,"तुमची लेकरें बाळें फिरणार. कुटे किरडू काटा असेल. त्यापक्षी आदीच सावध ऱ्हायलेलें बरें. तुमी तुमचे सोई सवडीन् कसे काय ते जमवा. तो तुमचा वेव्हार. तेचेत मी कशा दकल देयची? हांऽऽ बबन माजेशी

बोलून गेलेला आहे. नायतरी घरात राबता नसला तर घर कोसळायस् कितीसा वेळ हो? पण बबन्यान् भाडें मत भलतेंच ताट सांगितलेन् आहे . वर्षास बारा रूपये. तो शहर बाजार फिरणारा, भाडें काय कमी करीलसे दिसत नाय् मज. भलता हिमटा माणूस.अवो, हा मनूक्ष म्हंजे धुवून कडी, उरलेल्याची वडी करणारा नी चुराची रेवडी करून खाणारा. बरें तें असो. तो कदी सटी सहामाशी चतुर्थी शिगमेस कदीतरी पावेल न पावेल. तेच्या मंडळीस काय इतें गोड लागत नाय. तो एकटाच येतो, ऱ्हातो, माजेकडेच दुवक्त पुख्खा झोडतो तो नि जातो झालें....भाडे आपले परभारी तेचेच कडे मनयार्डरीन पाटवा तुमी. उगाच माजेवर ती जोकमदारी कशा हो?”

दादा नि तात्या माघारी आले. रात्री जेवणे आटोपल्यावर घर झाडणे, साफसफाई आपण पाहतो असे तात्या म्हणाले. त्यांची माली,सुंदरी, विद्याधर, गोपाळ चौघे शाळेत जाणारी मास्तरांचा शेजाार लाभला तर पोरे अभ्यासाला लागतील या विचाराने तात्यांना समाधान वाटले. दुसऱ्या दिवसापासून बबनच्या घराची साफ सफाई सुरू झाली. देसायांनी उत्साहाने सगळे करून घेतले. अगदी भिंती सारवणे, जमिनींचे खड्डे भरून आटेकोपर सारवण, परड्यातले वेलदोर कापून लखलखीत बेणणी व्यवस्थित पार पाडली. शनिवार सकाळी शाळा सुटल्यावर दादा लाँचीने खारेपाटण, तिथून दस्तूरी नाक्यापर्यंत सर्व्हिस मोटारने आणि पुढे चालत असा प्रवास करून दुपारी तीनच्या दरम्याने भांबेडला पोहोचले.

पुढच्या गुरूवारी बिऱ्हाड - बाजले हलवायचा बेत ठरवून दादा रविवारी वसतीला वाघजाईत आले. ठरल्याप्रमाणे गुरूवारी संध्याकाळी चार वाजता लाँच वाघजई बंदरात थांबली.आई,आक्का,विजू,राजा आणि सोबत आलेले तानाजीराव, भिवा बाणे लाँचीतून उतरले. देसाईणकाकू, गडी -पैरी घेऊन मास्तरांच्या मंडळींना

a

आणायला बंदरावर थांबलेली होती. सगळी माणसे, सामानसुमान बबनच्या घरात डेरेदाखल झाले. पोरे घरभर धावायला लागली. ऐसपैस घर बघून आई भलतीच खुश झाली. तेवढ्यात देसायांच्या पोरांची फटावळ डोक्यावर टोपल्या घेऊन आली. मंडळीसाठी लाडु- चिवडा आणि तांब्यातून चहा देसाईण काकूंनी पाठवलेला. चहा-फराळ सुरू असताना सुंद्री म्हणाली,"काळेमाई,आज रात्री सगळयांचेच जेवण आमच्याकडे करायचे आहे असा आईचा निरोप आहे."

खाणेपाणी उरकल्यावर मुलांच्या गप्पा सुरू झाल्या. आईने सामान सोडून मांडामांड सुरू केली. माली-सुंदरी आपण होऊन आईच्या मदतीला वाकल्या. आई स्वयंपाक घरात गेली. तिथे घडवंचीवर चार-पाच डबे नि दोन टोपले झाकून ठेवलेले. आईने उघडून बघितले तर तांदूळ, डाळ, भाकरीचे पीठ, साखर, चहापुड, कांदे - बटाटे, मिरच्या आमसोले, गुळ, तेल, कुळथाचे पीठ, दगडी पेल्यात मीठ अशा वस्तू! आई चक्रावून गेली. माली पुढे येऊन म्हणाली. "काळेमाई,आमच्या आईनेच हे जिन्नस पाठवून दिलेंनहेत. तुम्ही आल्या आल्या लगेच दुकानावर कुठे जाणार?" सामान लावून झाले. रात्री आयत्या वेळी देसायांकडे जाऊन आयते जेवायला बसायचे आईला परवडले नसते. काही मदत करता आली तर वेळेवारी गेलेले बरे असा विचार करून आई तयारीला लागली. तोंड धुऊन केसावरून फणी मारून तयारी करून आई मालीला म्हणाली, "मी जरा तुझ्या आईशी गप्पा मारायला जाते. तुम्ही काय करता ?" माली सुंद्री म्हणाल्या, "तुम्ही जावा माई. आम्ही इथेच खेळतो. आम्ही नीट लक्ष ठेवतो. काळोख पडण्यापूर्वी इथे कंदील लावून ठेवू आणि दार बंद करून सगळयांना घेऊन येऊ. जवळ तर आहे आमचे घर. तोपर्यंत आम्ही इथेच

खेळतो. इथे कोणी मोठे माणूस नाही ओरडायला. आम्हाला हवा तसा धुडगूस घालायला मिळेल.”

आईने भांबेडातून येताना करून आणलेल्या रव्याच्या वड्या घेऊन ती देसायांच्या घरी गेली. देसाईणीशी तिचे चांगलेच सूत जामले. दादासुध्दा संध्याकाळी नेमाने तात्यांच्या ओसरीवर बसायचे. देसायांची सगळी मुले तर कायम माईच्या घरी असायची. मुला - मुलांचे चांगले जमायचे. भांडण-तंटा नाही धुसफूस नाही. संध्याकाळी पाढे,परवचा म्हणून झाल्यावर देसायांची मुले नाइलाजाने घरी जायची. माली-सुंद्री थोड्या जाणत्या. त्यांनी आईला चांगलाच जीव लावला. दादांना मनाजोगती शाळा - गाव मिळाला. शाळेभोवती तीस-पस्तीस गुंठे जमीन. भोवती पक्का गडगा घातलेला. भरपूर पाणी असलेली विहिर. दादा उत्साहाने कामाला लागले. जामिनी नांगरून नीट मोमापाने ‘दळे’ पाडून घेतले. मास्तर कष्टाळू - हौशी आहेत म्हटल्यावर गावातली हौशी -घरंदाज माणसे मदतीला सरसावली. दळयांमध्ये भात, नाचणी, वऱ्या, भुईमुग,कारली,नवलकोल, मुळा, बावच्या, मिरच्या, अशी हंगामाप्रमाणे आलटून-पालटून पिके घ्यायचे दादांनी योजले.

शाळेसमोर आणि कुंपणाच्या कडेने पध्दतशीर फुलझाडे,फळझाडे लावायची योजना आखली. लागवड सरळ रेषेत,पध्दतशीर,खड्डे मारून,नीट निगा राखून शास्त्रशुध्द असल्यामुळे लवकरच बाग दिसू लागली. वाघजाईसारख्या आडगावात पोरांना मुद्दाम होऊन शेती शिकवायची गरज नव्हती. ती कामे त्यांच्या अंगवळणी पडलेलीच होती,अभ्यासापेक्षाही त्या कामात त्यांना रसही होता. फक्त करून घेणारे कुणीतरी हवे होते. महिनाभरात सगळी पूर्वतयारी पूर्ण होत आली. त्याच सुमारास घरमालक बबन मिराशी याचे मुंबईहून पत्र आले. दादा घर उघडून राहायला

a

लागल्याचे पत्र अण्णांनी त्याला लिहिले होते. ते मिळाल्यावर बबनचे ते उत्तरादाखल पत्र आले.

*॥ श्री कुलस्वामिनी प्रसन्न ॥*

*श्रीयूत रा. रा. काळेमास्तर यांस सप्रेम वंदे विनंती विषेश*

*मुद्दाम पत्र लिहिण्यास कारण तुम्ही आमचें घरात बायको मुलांसह*

*ऱ्हाईल्यांचे आण्णा मिराशाचे पत्र पावलें. गेली ८वरसें घर बंदच होते. पोटासाठी मुंबईत ऱ्हाईण्याचा प्रसंग माजेवर आला. वडील होते तों पावत ते रांधून खात पण वडलार्जित घर त्याणी राखले. त्यांच्या माघारी ब्राम्हण बिऱ्हाड ठेवा असें मी आण्णा मिराशांस कित्तेंक वेळा सांगितले.पण काय करणार हो ? येऊन-जाऊन भाऊबंदच ते. आमचे घर कोसळले तरी त्यांचे काय खरचणार होघ? त्यांस तेच हवे. पण कुळस्वामिनी माजें हाकेस धावून आली. कारण तिनेच तुम्हांस आमचे घरात राईण्याची बुध्दी दिली. आमचे देवस्थान बाधते, समंध आहे असे काहितरी तुम्हांस सांगून फितवण्याचा प्रयत्न कोण्ही करतील तर ते मनावर घेऊ नये. आमच्या घरभाटात काही बाधीकार नाही. तुम्ही ऱ्हाणारच आहात तर आमचे काही कुळाच्च्यार माज्या वतीने फुडे चालविलेंत तर मला तेवढेच बरे भोगेल . एक नंबर मुदां - प्रतिवरसी फाल्गुनात महापुरूषाचा भट वाढाईचा. त्यास आगरातच जेवायास वाढायचें. पाच पानें नेवेद्दाची ठेऊन पाणी सोडईचें. एक गोग्रास, दुस्रें ठिकाण बंद्यास, तिस्रे मुळ पुरूषांस, चौथे गुरवास आणि पाचवें अंबेजोगाई कुळस्वामिनीस ते नैवेद्द म्हणून तुम्ही खावयाचे. ब्राम्हण कऱ्हाडे वखलाताच सांगावा. कोकणस्थ आम्हांस पाळणार नाई. दोन नंबर मुदां - नवरातरात आमचें देवाऱ्ह्यात देवीची मुर्त आहे ती*

a

पायघडीवर ठेऊन नऊ दिवस नंदादीप लावायचा. रोज मंडपीस माळ बांधायची. दर दिवशी येक माळ वाढवीत जाणेची येणे प्रमाणे नववें दिवशीं नऊ माळा बांधाईच्या. देवीला रोज कुर्डूचे फुल वहायचे आणि मंडपीस आंब्याच्या टाळा बांधायचा. नऊ दिवस पुजा करणाराने घटी बसायचे. तुम्हास सवड नसेल तर आमच्या वखलातला भट बसविलात तरी चालेल. त्यास दक्षिणा साहा आणे द्यावी (महापुरूषाचें भटास एक आणा देयचा). लळिता पंचमीस खिरीचा नेवेद्द करून देवीस दाखवाईचा. दुसरे एक,तीन वरसानी एकदा ब्रम्हनदेवास समाराधनेचा आमचा पालट येतो. तेव्हा ब्रम्हन देवाच्या देवळातच नेवेद्याचे जेवण रांधाईचे. दोन भट नि घाडी गुरव यांस जेवण वाढायचे. ब्रम्हन देवास नारळ ठेऊन तो सांगणे करून वाढवायचा. एक कवड गुरवास देयची,एकीची खिराफत करून वाटायची. ब्राम्हणास एक एक आणा दक्षणा देयची . आमचे घरभाटात सहा माड जिते होते. पोफळी दोन होत्या. त्या बव्हतेक मेल्या असतील. त्यांस आळे करून नित्यनेम पाणी वोतायचें. निमें नारळ तुम्ही कष्टाबदल घेयचे. निमे विकून उत्पन्न मज देयचें. देव कार्यास नारळ आमचे माडाचेच वापरायचे. शिगम्यात देवाचे निशाण खेळे टिपरी मारून जातात. त्यास नारळ नि सवा आणा देऊन आम्हास सुख भोगावे असे गाऱ्हाणे नावनिशीवार करायस् सांगावे. दोन पुरातन आंबे साखरम् बिटकी, धोदांबा आहेत. ते धरले काय मला कळवावें. हाल्ली कयरीला दर बरा येतो. कयरी पाठवून उरतील ते आंबे पिकून खाली पडल्यावर तुमच्या लेकराबाळांनी पुंजावून खावे. त्यास माजी हरकत नाय. परसू परडे साफ ठेवावे. ठिकाणास वई करावी. वईस जितारू खुंट घालावेत. काठ्या आठ वईस लागतील त्या मलकी बेटातल्या तोडणेच्या. आवती काठीस हात लावूं नये. मागच्या खेपेला बावीस आवती काठ्या, सहा कोंब शिलक होते ते मी मोजले आहेत. आता

*किती शिलकी आहेत ते मोजून कळवावे. घर,ठिकाण तुमचे समजून देखभाल करा. रक्षण करून भक्षण करावे. धाकू बाण्याने दोन वरसें खंडाचे भात घातलेले नाही. त्यास जारा हडसून खडसून विच्चारावे. आठ मण भात त्याणें देणे लागते. ते तुम्ही घेऊन वापरलेत तरी चालेल. मी आल्यावर गावात दराची चवकशी करून भाताचे पयसे ठरवीन. दुस्रें एक मत्वाचे म्हंजे, रोज सोवळयाने देवपुजा करावी. देव्हाऱ्यात शितळादेवीची मुर्त चांदीची आहे. तिस खरें शंभर नंबरी सोन्याचें मंगळसुत्र दोन मणी वाट्या असे आहे. देवाची पुजाा करताना ते निर्माल्यातुन गहाळ व्हायला देऊ नये. आणखी एक मत्वाचें म्हंजे भाड्याचे मी बारा रूपये आण्णा मिराष्यांस बोललो होतो खरें,पण महर्गता फारच झालेली आहे तरी विचार करिता भाडें बारा अयवजी पंधरा रूपये करून मला मनयार्डरीन वरसाचें भाडे आगावू पाठविलेत तरी चालेल. इथे आम्ही च्यार खोल्यांचे म्हयना अडीच रूपये भाडें ठोकून देतो. तुम्हाला आख्खे घर आमचें वापराईला आयतें मिळाले आहे. सध्या मला जरा निकड आहे तेव्हा भाडें लवकर पाठवाल तरे बरें होईल. देवकत्या चे दहा आणें,मनयार्डरीचं कमिशन भाडे रकमेतून कापून घ्यावे. उगाच तुम्हाला तरी तोशीश कशास देयची हो. आणि एक महत्वाचे पथ्य म्हणजो घराच्या भिंती, खांड बारें, बारें, खांब यांजवर खिळे चुका ठोकू नयेत. पत्राचे उत्तरी खुलासा साद्यंत कळवावा. तुमच्या मुलालेकरांस आशीर्वाद. तुमच्या सौ. मंडळीस सा.*

*नमस्कार. आपला कृपाभिलाषी,*

*रा. रा. बबन. धोंडो मिराशी ,बॉम्बे.*

दादा-तात्या यांनी पत्र वाचले. बबनच्या खडूसपणाचे त्यांना हसू आले. त्यांनी उत्तरी कळविले- त्याच्या अपेक्षा आपल्याच्याने पुऱ्या होणार नाहीत. फक्त

रोजची देवपुजा आपण करू. बाकी त्याची वार्षिके- कुळाचार आपल्याला जमायचे नाहीत. ठिकाणाची साफसफाई, देखभाल कृतज्ञता बुध्दीने करू. नारळ पडलेले जमवून देवखोलीत ठेवू. बबन येईल तेव्हा त्यानेच काय ती निर्गत लावावी. भाडे वर्षाचे सहा रूपये परवडेल, इकडे सार्वत्रिक तेवढाच दर आहे. जमत असेल तर बघावे अन्यथा आपण दुसरे घर बघू. दादांचे पत्र वाचल्यावर बबनचे तात्काळ उत्तर आले. तो काय समजायचे ते समजला. दादांचे म्हणणे कबूल आहे. त्यांनी खुशाल रहावे. सहा रूपये भाडे चालेल असे त्याने कळविले होते. त्याचे उत्तर आले आणि दादा निर्धास्त झाले. त्यांचे वाघजाई पर्व खऱ्या अर्थाने सुरू झाले.

शेती कामाची मुळात आवड असलेली शाळेतली पोरे मनापासून राबायला लागली. दादांनाही शेतीची खरी आवड. त्यांना भेट कलम, खुंटी कलम, गुटी कलम, डोळे भरणे या कलाही चांगल्या अवगत होत्या. त्यांचा हातगुणही असा की त्यांनी लावलेले झाड सहसा मरायचे नाही. शाळेच्या प्रवेशव्दारात काठ्यांचे कायमस्वरूची तोरण करून त्यावर कृष्णकमळीचा वेल वाढायला लागला. कुठून कुठून पैदा करून दोन-तीन प्रकारच्या कण्हेरी, जास्वंदी, कोरांटया, सदाफुल्या, अबोल्या, दोन रंगाचे सोनचाफे, पांढरा-तांबडा चाफा,चार रंगाच्या गुलबक्षी, अनंत, तगर, गुलछडी, पारिजातक, तुळशी, गुलाब, बोगन वेल, रातराणी, तऱ्हेतऱ्हेची फुलझाडे त्यांनी लावली. तसेच चिक्कु, फणस, पेरू, आंबा, काजू, आवळा, रायआवळा, बिंबल, जांभुळ, पोपणशी, लिंबू, साखरलिंबी, कडूलिंब, कढीपत्ता, हरतऱ्हेची कमी पाण्यात होणारी फळझाडे योजनापूर्वक लावली. शाळेच्या मागे एक जुनाट रायवळ आंबा होता त्याला हापूस, पायरी, माणकुर, पावशी आंबा, तोतापुरी आंबा अशा पाच

प्रकारच्या खुंट्या भरल्या. एकाच झाडाला पाच प्रकारचे आंबे असलेल्या या कलमाला दादा 'पंचगुणी कलम' म्हणत.

दादानी शाळेसमोर चार माड, दोन पोफळी लावल्या. झाडांना पाणी घालायच्या पाळया ठरवून दिल्या. अगदी सुट्टीत सुध्दा मुले पाळीप्रमाणे पाणी घालायची. शाळेतली शेती हा लोकांच्या कौतुकाचा विषय झाला. गावात कुणी पै-पाहूणा आला की ग्रामस्थ त्याला मुद्दाम शाळेची बाग दाखवायचे. आई-दादांचा लोकसंग्रह वाढत चालला. कृष्णा गुरव,दादू धुवाळी,आण्णा मिराशी,दाजीकाका रानडे,भलुभाऊ साठे, दत्तु घाडी, दुकानदार दात्ये, नानू पेंढारकर ही माणसे चार दोन दिवसांनी मुद्दाम आढळून जायची. तर म्हातारी गुरवीण, येशी काकू, सुमा वहिनी, काशीबाणी,भागी परबीण, रानडीण,दात्ये वैनी अधून मधून दुपारी गप्पाष्टकांना आईकडे टेकायची. देसायांचे घर म्हणजो आईदादांचे हक्काचेच. तात्यां देसायांचा रोज सकाळचा चहा मास्तरांकडे हा जणु रिवाजच झाला. थोडे स्थिरस्थावर झाल्यावर कृष्णा गुरव नि दादू धुवाळी म्हैस बाळगण्यासाठी दादांच्या मागे लागले. कृष्णा बोलणारा मोठा पक्चंदन, "मास्तऽऽर! गाबतास तारू नि भटास गुरू हे हवेंच. बबन मिराशाचा गोठा आहेच. झालेतर त्याचे भाडें द्या. गोठ्यास गवत ठेवायला माळा आहे. तुम्ही म्हैस बाळगा."

दादू धुवाळी गुरांचा वैद्य. तो वैद्यगिरी करीत आसमंतात फिरायचा. "मास्तर,मी तुमका म्हस घेवन् देतंय. अडनड आमी सांबाळताव. गवत काडयेची जोकम मी बगतय्. कदितरी वयच् ताकाचा पांढरा पानी दिलास की पुरे. तुमी फकस व्हय म्हना,मगे मी कायता बगतय्..." आईदादांनी त्यांच्या सांगण्याचा विचार केला, नाहीतरी चारदोन वर्षे कशीच काढायची होती. मग म्हैस घेतली तर काय बिघडले ?

हो-नाही करत बेत ठरला. आठवडाभरात दादू नि कृष्णा एक उत्तम म्हैस घेऊन आले. कृष्णा गुरवाने स्वतः दावे वळून दिले, गताडी घातली, गवत आणून टाकले. म्हैस विऊन दुध द्यायला लागली. वाघजाईचा मळा दुपिकी. उन्हाळ-पावसाळ कायम हिरवा चारा म्हशीला मिळे. कुळथाचे गुळी, शेंगदाण्याचे गुळी, मुबलक मिळे . पोराबांळाना मनमुराद दुभते मिळायला लागले. कृष्णा-दादू नित्यनेम ताजे ताक, दही घेऊन जात. फक्त दुध काढायचे काम आई-दादांवर पडे. बाकी सगळी उस्तवारी दादू-कृष्णा दोघेही आपुलकीने करीत. त्यांच्या मदतीचा उच्चारसुध्दा करण्याची सोय नव्हती.,ती माणसे आई दादांशी जीव जोडून होती. दुधा - तुपाचे चार पैसे आईच्या शिलकीत पडू लागले. जनावराची बडदास्त कशी ठेवायची हे त्यांना कृष्णा गुरवाने शिकवले असे दादा वाघजाई सोडल्यावरही आम्हांस सांगायचे.

पाच वर्षे कधीच मागे पडली. राजा फायनल होऊन आठवीच्या शिक्षणासाठी खारेपाटणला ऱ्हायला. देसायांची मालू लग्न होऊन सासरी नांदायला गेली. देसायांच्या विद्याधराला तर स्कॉलरशिप मिळाली. रत्नागिरी केंद्रात तो पहिला आला. फायनलच्या परीक्षेचे निकालही सुधारले. फायनलच्या मुलांचे रात्रीच्या वेळी जादा तास दादा घ्यायचे. त्यांच्या कामाची तारीफ ग्रामस्थ करायचे. वाघजाई शाळेभोवती तर जसे नंदनवनच उभे राहीले. गावात येणारे अपरिचित दादांना वाघजाईचेच समजत.सगळे गुण्या गोविंदाने सुरळीत चाललेले असले तरी दादांना मात्र घरचे वेध लागले. सुशीआत्ते लग्न होऊन सासरी गेली आणि तात्या आजोबा एकटे राहिले. पडेलचे घर त्यांना खायला येई. सुन -मुलगा-नातवंडे सगळे गोकुळ आपल्या भोवती हवे असा धोशा त्यांनी लावला. "तु हेकडा बदली करनी घेऽऽ" दर खेपेला ते दादांना विनवू लागले. बहिणींनी सुध्दा पत्रे पाठवून घरी राहायला जा असे

निक्षून कळवले. गप्पांच्या ओघात दादा ही गोष्ट तात्यांना बोलेले. “डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डात माझी ओळख आहे. तुमच्या बदलीचे काम मी करतो. “ तात्यांनी शब्द दिला.

नेमके त्याच वेळी डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर गायतोंडे वाघजाईच्या व्हिजिटला आले. जिल्हा एज्युकेशन इन्स्पेक्टरच्या वरचे कुणीतरी साहेब शेती शाळांना भेटी देण्यासाठी रत्नागिरी जिल्हयाच्या दौऱ्यावर येणार असल्याने त्याची योजना ठरविण्यासाठी गायतोंड्यानी मुद्दाम वाघजाई शाळेला व्हिजिट दिलेली. दादांच्या कामाचा लौकिक गायतोंडे ऐकून होते. समक्ष पाहून खात्री झाल्यावर वाघजाई शाळा त्यांनी निवडली. मंडणगड,दापोली,संगमेश्वर, रत्नागिरी, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, बांदा असा साहेबांचा १०/१२ दिवसांचा दौरा ठरला. पाऊण महिन्या नंतरची तारीख वाघजाई भेटीसाठी ठरली. दादांची गडबड उडाली. एवढे मोठे साहेब येणार. काहीतरी नावीन्यपूर्ण त्यांना बघायला मिळाले पाहिजो. तशी बाग बघता आली असती. पेरू- चिकू, अननसे धरलेली होती. मिरच्या, वांगी, भेंडी, कारली,काशी भोपळे,लाल भाजी, मुळा अशा भाज्याही बहरलेल्या होत्या. त्यासाठी काही वेगळे करण्याची जरूरी नव्हती.

दादांनी सगळा परिसर साफसुफ करून झांडाच्या फांद्या छाटून सगळे नीटनेटके केले. नव्याने आळी बांधून घेतली. पोरे राबायला लागली. ग्रामस्थांची सभा घेऊन मोठ्या साहेबांच्या भेटीची माहिती देऊन त्यांच्या आगत स्वागताची जंगी तयारी ठरली. शाळेसमोर मातीत भारताच्या नकाशाचा आकार दादांनी कोरला. नकाशाच्या सीमा,घटक राज्यांच्या सीमा, बोट दीड बोट वर खोदून दाखवल्या. त्यात आळीव नी मेथी पेरली. इतर राज्यांच्या जागी वेगवेगळी कडधान्ये मोड ती काढून

a

नीट पसरली. नकाशाच्या शीर्षस्थानी 'कृषि प्रधान भारत' ही अक्षरे कोरून त्यात लाल भाजी पेरली. रोज सकाळ -संध्याकाळ जातिनिशी पाणी देऊन दादांनी हिरवा भारत बनवायला सुरूवात केली. आठ दिवसांत शाळेच्या प्रवेशव्दाराच्या कमानीत उभे राहिल्यावर भारत आणि वरची अक्षरे ठळक नजरेत भरू लागली. साहेबांच्या भेटीचा दिवस जवळ येऊ लागला. दादा निर्धास्त झाले. आपल्या वरिष्ठानी आपले काम पहावे अशी त्यांची सुप्त इच्छा नशिबानेच फलद्रुप व्हायचा योग आला म्हणा ना!

सगळा लवाजमा घेऊन साहेब एकदाचे वाघजाई बंदरात उतरले. तिथून ढोल-ताशे वाजवीत त्यांना समारंभपूर्वक शाळेपर्यंत आणण्यात आले. मुख्य प्रवेशव्दारापासून शाळेच्या दरवाजापर्यंत मुले रांगेंत उभी राहीली. साहेब प्रवेशव्दारात थांबले. कृष्णकमळीच्या फुलांनी बहरलेली कमान नीट निरखून बघितली. चार फुलेही खुडून घेतली. साहेब मंद पावले टाकीत नकाशासमोर येऊन थांबले. त्यांच्या मागोमाग डिके साहेब,गायतोंडे,सीनि. ए. डी. आय. सावंत, मुरकर आणि नाटेकर,जोग हे कारकून आणि शिपाई असा वीसेक माणसांचा लवाजमा आलेला. शाळेच्या दारा समोर मांगले गुरूजी हात जोडून स्वागताला उभे राहिलेले अन् पाठीमागे दादांसह सगळे शिक्षक. नायटेकर बाजूला होऊन गुरूजींकडे आला. दादांजवळ जाऊन तो फुसफुसला, “काळे मास्तर,सगळे व्यवस्थित आहे ना ? हा साहेब खोलात शिरणारा आहे. तुम्ही इथे काय केलेत त्याचे माप आज पदरात पडेल तुमच्या. ठीक तर ठीक,नायतर काय खैर नाही तुमची.” दादांना आधीच नाटेकराचा राग. ते चटकन म्हणाले, श “नाटेकरभाऊ,सायबांची भीती मला नाय. माझे काम कसे आहे. ते आता कळेलच तुम्हालाही.” तेवढ्यात बाहेर उभे असलेल्या मोठ्या

साहेबांनी विचारले, शाळेतले शेती शिक्षक कोण आहेत? त्यांना जरा बोलवा.” दादा साहेबांसमोर जाऊन उभे राहिले.

दादांच्या खांद्यावर थोपटीत साहेब म्हणाले, “गुरूजी, हा तुमचा नकाशा म्हणजो आम्हाला दिलेली खरी मानवंदना. हे उभे करायला, टिकवायला किती सायास पडले असतील याची किंमत मला कळते” तेवढ्यात कोणीतरी पाणी, सरबत घ्यायला आत चला....अशी विनंती साहेबांना केली. साहेब म्हणाले, “आधी नको! कमानीवरची कृष्णकमळे बघुनच तहान भागली. आधी या गुरूजींचा शेतीफार्म बघुया. चला गुरूजी,तुम्ही काय काय केले आहे ते पहायचे आहे मला.” मग दादांनी सगळा भाग त्यांना फिरून दाखवला. बागेतल्या पेरूवरचे दोन-तीन पेरू, लिंबावरची लिंबे, चिकु, वांगी साहेबांनी तोडून घेतली. घडाने भारावलेल्या केळी अगदी जवळ जावून निरखल्या. काशी भोपळा बघून तर साहेब खुष झाले. “गुरूजी, तुम्ही मला भेट म्हणून काही देणार असाल तर एक जून झालेला भोपळा द्या. इतका लहान भोपळा आम्ही प्रथमच बघतो आहोत.”

मग पंचरंगी कलम दादांनी दाखविले. त्यावर नुकता मोहोर येऊ लागलेला. फार्म फिरून बघितल्यावर ऑफिसकडे जाता जाता साहेब सांगू लागले. “गुरूजी, मी इथे येण्यापुर्वी चारपाच शेती शाळा बघितल्या. अहो काय सांगायचे! एका शाळेत गेलो तर जेमतेम दहाबारा दिवसांपूर्वी लावलेली चार झाडे, फुलझाडे आणि फक्त एकच पेरूचे झाड. झाडावरचे पेरू एकजात सगळे पिकलेले. म्हणून सहज झाडाजवळ गेलो तो काय आश्चर्य! पेरू दोऱ्याने बांधून ठेवलेले. आयत्या वेळी ते तरी काय करणार म्हणा. नशीब आमचे. तिथल्या मास्तरांचा भुगोल तरी पक्का होता. पेरूच्या झाडाला सफरचंदे नाही बांधली. शिक्षकांनी असे ताळतंत्र सोडले तर समाज

का नाही रसातळाला जाणार? गुरूजी,तुम्ही या आडगावात जो करून दाखविलेत त्याचा कित्ता इतरांनी गिरवावा एवढे आदर्श काम आहे तुमचे.”

मग डिके साहेबांकडे वळून ते म्हणाले,”मिस्टर डिके, जिल्हयातल्या शेती शाळांना ऑर्डर काढा. सगळया शेती शिक्षकांनी एकदा वाघजाई शाळेतला शेती फार्म बघावा. शिक्षक काय काय करू शकतो, त्याने काय करावे? हे बघू दे एकदा सगळयांना! आणि या गुरूजीना,काय हो तुमचे नाव?” दादा म्हणाले, “विनायक रामकृष्ण काळे.” मोठे साहेब म्हणाले, “तर या काळे गुरूजींना एक खास प्रशस्तिपत्र आणि एक इन्क्रिमेण्ट द्या. आमच्या भेटीचा, आमच्या रिपोर्टचा उल्लेख करा. “

मग साहेबानी दप्तराची जुजबी तपासणी केली. भात, नाचणे, भाजीपाला, केळी, विकून आलेल्या रक्कमा तालुका शाळेत जमा केल्याच्या नोंदी असलेल्या रजिस्टरवर तेवढी साहेबानी सही केली नी विजिट बुकात शेरा लिहिला. सगळी मंडळी जेवली. नायटेकराचे तोंड तर खेटर मारल्यासारखे झालेले.जेवणखाण उरकल्यावर डिकेसाहेब शाळेच्या शेरे बुकात शेरा लिहीत असताना देसाई आणि मांगले गुरुजीनी दादांची कौटुंबिक अडचण कानावर घालून त्यांची बदली करण्याची विनंती केली. तसेच भांबेडातून बदली करताना त्याना वाटचाल सुद्धा भोगू दिली नव्हती असे म्हटल्यावर डिके साहेब बोलले,”हे काय भलतेच सांगताहात तुम्ही, कुठे भांबेड नी कुठे वाघजाई. एकाच गावात एका शाळेतून दुसऱ्या शाळेत बदली असेल तर वाटचाल नाही मिळत.” त्यावर तो हुकूम मांगले गुरुजीनी साहेबाना दाखवला. डिके साहेबांनी कपाळावर हात मारून घेतला.मग नाटेकराला बोलावून घेतले आणि बदलीच्या हुकूमावर त्याने आपल्या हस्ताक्षरात लिहिलेल्या शेऱ्याकडे

निर्देश करीत ते म्हणाले, “असले कुकर्म पुन्हा नका करू. हे धसाला लागले तर सस्पेंड व्हाल. “

मग डिके साहेबानी दादाना बोलावून घेतले. “काळे गुरूजी, आज तुम्ही आमची अब्रु राखलीत. तुमची अडचण आम्ही नाही तर कोणी दूर करायची फक्त शाळा कोणती हवी तेवढे सांगा. अरे नाटेकर” तशी नायटेकर गडबडीने पुढे झाला. डिकेसाहेब म्हणाले, “काळे गुरूजींची बदलीची ऑर्डर घालायची आहे. त्यांना शाळा कुठली हवी ते लिहून घ्या.” दादा म्हणाले,”पुरळ कसबा,तालुका देवगड.” डिकेसाहेब म्हणाले, “नाटेकर, चार दिवसानी साहेबांचा दौरा पूर्ण करून रत्नागिरी गाठल्यावर दुसऱ्या दिवशी काळे गुरूजींच्या बदलीची ऑर्डर आणि विशेष वेतनवाढ दोन्ही हुकूम नोट करा नि आमच्या सहीला ठेवा.” दादांनी सुटकेचा निश्वास सोडला.

साहेबांनी व्हिजिट झाल्यावर पंधराव्या दिवशी दादांना खास बाब म्हणून एक वेतन वाढ दिल्याचा हुकूम, प्रशस्तिपत्र आणि बदलीची ऑर्डर आली. या वेळची बदली खात्याने केलेली असल्यामुळे प्रवास भत्ता, वाटचाल दादांना मिळायची होती. सामानसुमान आवरून दादांनी जाण्याची तयारी केली. इष्टमित्रांचे निरोप घेणे, कुठे चहापाणी, कुठे जेवण यांत चार दिवस कसे निघून गेले कळलेच नाही. मोठ्र्या थाटामाटात दादांचा निरोप

समारंभ पार पडला. त्या कार्यक्रमाला तालुक्यातले सीनियर ए. डी. आय. जातीनिशी हजर राहीलेले होते. चार दिवसानी वाघजाई सोडायचा दिवस उजाडला. तात्या देसाईंकडे जेवण उरकून आई-दादा मुले, सामान यांसह बंदराकडे निघाले. सगळा गाव दादांना निरोप द्यायला बंदरावर जमलेला. दादू धुवाळी, कृष्णांणा गुरव,

दत्तु घाडी सामान पोहोचवायला पडेल पर्यंत यायचे होते. लाँच आली. मंडळी लाँचीत बसली. लाँच सुरू झाली आणि आईने डोळयांना पदर लावला. दादा घट्ट मनाचे, पण त्यांनीही बाजूला तोंड फिरवले. आई - दादांच्या आयुष्यातले अविस्मरणीय पर्व आता संपले होते.

काही काळ मायेखातर वाघजाईची माणसे पडेलला यायची. आई-दादा वर्ष दोन वर्षानी वाघजाईत जायचे. पण हळूहळू हेही बंद झाले. वाघजाई फक्त स्मृतीत उरली. मुलांना पुसट पुसट थोडे स्मरते. कधीतरी गप्पांच्या ओघात विषय निघाला की आई रसभरीत वर्णने सांगते. तिथला ब्रह्मदेव, तिथली माणसे यांचे आई जे वर्णन करते ते आम्हाला स्वल्प विरामासह तोंडपाठ आहे. आई रंगात येऊन सांगत असताना आम्ही भांवडे एकमेकांना खुणा करतो,सुना तोंडावर पदर घेऊन खुसखुसतात पण आईचे लक्ष असते कुठे ? ती आपली वाघजाईच्या आठवणीत आकंठ बुडून गेलेली!

a

# ४. मरणभोग

“हा काळ आपला मुर्दाडासारखा पुढे ऽऽ पुढे जातोहे ,पण ह्यानेच घात केलान माझा, ह्याला कुठेतरी आरेखायला हवा.” चंद्रुआक्का दाराच्या उंबऱ्यात बसल्या बसल्या योजीत होती. संध्याकाळचा सुमार. घराखालच्या मळयात टोकाला दर्या, दिवसभर घटकापळांनी पुढे पुढे सरकत सरकत हा सूर्य एकदा दर्यातबुडाला की झाली रात्र! अरेच्या! इतके दिवसांत हे असे सुचलेनाही? स्वतःच्या कल्पनेचे चंद्रुआक्काला हसायला आले. “आत्ता बघते कसा थांबत नाय काळ तो...” ती एकटक सूर्याकडे बघून त्याला दटावायला लागली. त्याने थोडावेळ चंद्रुआक्काकडे लक्ष नाहीसे केलेन् पण ती नजर खळवीत नाहीसे दिसल्यावर त्याचा नाईलाज झाला. हाताने खुण करून ‘थांब’ असा इशारा तिने केला अन् सूर्य थांबला. पाच-दहा मिनिटे तो तसाच कसानुसा थांबलेला. मग जरा धीर करून म्हणाला, “चंद्रुआक्का, अगो मी असा थांबू शकत नाही मला जायला हवे. “

आता तिचा धीर चेपला. मनाशी काहीतरी योजना आखीत ती म्हणाली, “मग मी सांगत्ये तसा जा.उलटा मागे जा. जा मागे....जा....हां अस्सा.” नकळत तिचा आवाज तार सप्तकापर्यंत पोहोचला. तशी गोठ्यात म्हशीचे दुध काढायला गेलेला तिचा नवरा म्हणाला, “ हां, झाले वाटते हिचे खुळाचार सुरू! आधी आत जा बघू.

आत जात्येस की येऊ ?" नवऱ्याच्या दरडावणीने चंद्रुआक्का नाईलाजाने माघारी वळली. "नायतर मेला खरेच काठी घेऊन यायचा. "

सोप्यातल्या खिडकीतून तिने परत सूर्याकडे लक्ष केले. चंद्रुआक्काला घाबरून त्याचे उलट दिशेने जरा जरा मागे जाणे सुरू झाले नी, "मेल्या जा की जारा पटापटा... अजून जोरात, अजून जोरात, जोऽऽऽरात!" मग सूर्याला गरागरा फिरण्या शिवाय गत्यंतर राहिले नाही.आता उलटे दिवस यायला लागले! ती एक एक दिवस मोजीत राहिली. हा मासिक निवृत्तीचा दिवस, हे तेरावे....हे बारावे....हा सारी भरल्याचा दिवस! होता होता अंगणातल्या फणसाखाली पडलेला सुरेश.....डोके फुटून मेंदू बाहेर आलेला,नाकातोंडात रक्त, आणि किंकाळी मारणारी खुद्द चंद्रुआक्का!त्या दृष्याने मात्र चंद्रुआक्काचे भान सुटले. "नको ऽऽनको ऽऽऽ " ती खरेच किंचाळली. आतून तिची मुलगी बयो धावतच बाहेर आली. खिडकीचे गज धरून चंद्रुआक्का भेदरलेल्या अवस्थेत उभी. "आई ऽआई ऽऽआधी सावध हो!" मुलीच्या हाकेने चंद्रुआक्का भानावर आली. मुलगी विचारत होती, "आई,काय झाले ? का ओरडलीस ?"

वास्तविक तिनेही केवळ विचारायचे म्हणून विचारले एवढेच. हल्ली चंद्रुआक्काला ओरडायला काही कारण लागत नसे. तिचे डोके फिरले तेव्हापासून असल्या गोष्टींची बयोला सवय झालेली. "बयो, अगो काय बघ...." झाला प्रसंग सांगायचे अगदी जिभेवर आलेले, पण बयोला पटले नसते म्हणून चंद्रुआक्काने विषय तिथेच थांबवला."आई, संध्याकाळ झालीय्, जरा देवाचे नाव घे म्हणजे शांत वाटेल.उगाच आरडाओरड नको." असे बजावीत बयो आत गेली. चंद्रुआक्का परत खिडकीतून बघायला लागली. मघाशी तर हा उलटा जात होता. तिच्या मनात विचार

आला पण आता सूर्य खरेच दर्यात डुबायला लागलेला. चंद्रुआक्का स्वतःशी च विचार करीत बसली. चुकलेच माझे, थोडा वेळ कळ काढायला हवी होती, सूर्य आणखी मागे मागे गेला असता तर सुरेश जिवंत झाला असता . त्याला लहान - लहान झालेला बघता आला असता.

"आता खेळ पुरे झाला हो. हात पाय धुवून परवचा म्हणा. उजाळणी म्हण." चंद्रुआक्का असे ओरडल्यावर मात्र सुरेश गुपचुप पाय धुवून झोपाळ्यावर बसला. परवचा, मराठी महिने, राशी, तिथी म्हणून झाल्या आणि उाळणी सुरू झाली. सुरेशचे सहापासूनचे पाढे तेवढे पाठ नव्हते. तो मध्ये मध्ये चुकायचा म्हणून चंद्रुआक्का त्याच्याबरोबर म्हणायला लागली. "सहा एके सहा, सहा दुणे बारा...,नवा आठा बहात्तर, नऊ नव्वे एक्याऐंशी."आवशीचा घोव एक्याऐंशी" भलूनाना करवादला, "आता गप ऱ्हा.... नायतर चार वादाटे ओढीन पाठभर, तीन्हीसांजा पण म्हणायचो नाय मी."

चंद्रुआक्काची तंद्री भंगली. "हा साला शनी सारखा राशीलाच लागलाहे माझ्या." तिने कडाकडा बोटे मोडली. "म्हणे गप्प बस,नायतर वादाडे ओढीन....! ओढ वादाडे,चामडे सोलून काढ माझे.आपल्या पापांवर पांघरूण घालायचे म्हणजे माझे तोंड बंद करायलाच हवे . देवाने कशाला हा बाईचा जन्म दिलान कोण जाणे. दोन पोरे झालेल्या या बापयाला हे नाद सुचतात! जात नाही धर्म नाही! नाही म्हणजे अब्रू सोडावी तरी किती हो म्हणत्ये मी माणसान्! इतके दिवस बोलवा होती कानावर,आज प्रत्यक्ष माझ्या डोळ्यानीच बघितले तुमचे थेर."

चंद्रुआक्काच्या या शब्दांनीच तेव्हा भलूनानाला कोण फोड आले. "रांडेच्ये कामधंदा सोडून कोनीत कडमडायला तुला कोणी सांगितलेन होते ?आणि

काय थेर बघितलेस माझे?”चंद्रुआक्का बेभान होऊन ओरडली. “हा मात्र निर्लज्जपणाचा कहर झाला.” भलूनाना वेळी-अवेळी कोनीत जातो. गुरे राखायचे नाव फक्त....रख्मी धनगरीण तिथे येते, दोघे तासन् तास मांगर बंद करून असतात. ही बोलवा चंद्रुआक्काच्या कानावर आली होती.भागी परटीण तोंडाळ!भाडभीड न ठेवता तिनेच चंद्रु आक्काला सांगितलेन. मग पाळत धरून चंद्रुआक्का भलूनानाच्या मागावरच राहीली. त्यांनी आत जाऊन मांगर बंद करून घ्यायची खोटी, चंद्रुआक्का तश्शी धावत पुढे गेली अन्”दार उघडा,बाहेर या आधी” अशी बोंब तिने मारली. भलूनाना दार उघडून बाहेर आला. रख्मी मागच्या बाजूची कवाडी उघडून पळाली. मग भलूनानाशी चंद्रुआक्काची बाचाबाची झाली. “रख्मी तुमच्यापुढे मांगरात शिरलेली मी माझ्या डोळ्यांनी बघितली. आणखी कसले पुरावे हवे मी म्हणत्ये, करून सवरून वर तोंड करून बोलायला जीभ रेटत्येच कशी?”

आता मात्र भलूनाना संतापला. आधीच रंगाचा बेरंग झाल्यामुळे तो चवताळलेला.”आता गप्प बस नायतर वादाडे ओढीन पाठभर.” पण चंद्रुआक्का कसली गप्प बसायला. ती रागाने म्हणाली, “नाय जनलोकात अब्रुचे धिंडवडे काढले तर ओगल्यांच्या घराण्याचे नाव नाय घ्यायची” भलूनानाने मग आंजणीच्या झाळीचा एक फाटा मोडून घेतला अन् चंद्रुआक्काला मरीमर झोडून काढले. त्यांचा कालवा ऐकून मोंडूयांचे चार झिलगे धावत आले. ते मधे पडले. मग मात्र काही न बोलता भलूनाना वाटेला लागला.

चंद्रुआक्का अंगावरचे वळ बघायला लागली. “म्हणजे माझ्या मनाचेच खेळ होते तर सगळे?” भानावर येत ती म्हणाली. म्हणजे लोक म्हणतात तसे खरेच माझे डोके फिरले की काय ? तिलाच काहीच सुधरेना. “आई,चहा घे घोटभर”

चहाचा कप तिच्यापुढे ठेवीत बयो म्हणाली. भलूनाना झोपाळयावर चहा घटाळीत बसलेला होता. चंद्रुआक्काला त्याची किळस आली . कुठच्या जन्मीचे पाप म्हणून हा शेतकिडा मला मिळाला.ह्याच्या नावाने कुंकू लावायचे म्हणजे सुध्दा पाप आहे पाप! एवढा पोटचा पोर गेला. सगळा गाव हळहळला. दांडग्या छातीचे जगुनाना, तो सदू बापट! पण सुरेशला उचलून तिरडीवर नेऊन ठेवताना त्यांचे हात कापायला लागले. पण या शेतकिड्याने जनरीत म्हणून तरी दोन टिपे गाळावी होती. पण नाही.....त्या प्रंसगातही पान खाऊन किवेण पडल्यासारखे त्याचे तोंड .... पानाचा तोबरा सांभाळीत कुत्रा बोलला काय? तर म्हणे “व्हायची गोष्ट झाली, आता दुःख करून काय उपयोग?” शरमसुध्दा कशी वाटली नाय म्हणत्ये मी असले अघोचरी बोलायला? चंद्रु आक्काला वाटले. तेवढ्यात भलूनाना म्हणाला,”बयो आणखी घोटभर असला तर आणगो चहा.”

भलूनानाची टिंगल करण्यासाठी चंद्रुआक्का मग कवन म्हणायला लागली. “चहा घ्यावा,चहा द्यावा,चहा जगीचा विसावा”चंद्रुआक्काचे डोके फिरल्यापासून तिला बाहेर जायची बंदी केलेली. सारा दिवस उंबऱ्यात बसून ती समोरच्या दर्याकडे बघत राहायची. हल्ली लहरीत असली की,चंद्रुआक्का गाण्यात बोलायची. आत्तासुध्दा पोस्टमन पत्रे वाटायला वाडीत चाललेला. तो दिसल्यावर चंद्रुआक्काला कवन आठवले. पोस्टमन हाकेच्या अंतरात आल्यावर तिने सुरू केले,”अंगात ड्रेस खाकी, पत्रांची ब्याग हाती, शोधीत हा कुणाला आला टपालवाला...”

चंद्रुआक्का तालासुरात म्हणायला लागली. पोस्टमन हसला. आतुन बयोची हाक आली. “आई चल आंघोळ करून घे.” चंद्रुआक्का गाण्यातच म्हणाली, “आंघोळीला चला. चला जाऊ चला....” चंद्रुआक्का उठून आंघोळीला

a

गेली. दोन तांबे अंगावर ओतून ती पाय चोळायला खाली वाकली. पायावर सूर्य किरणाचा गोल कवडसा पडलेला, मध्येच वाऱ्यावर पान हललेआणि कवडसा नाहीसा झाला. मग पुन्हा दिसायला लागला. कवडशांचा लंपडावाचा खेळ बघून सुरेश खुदकन हसला. हात पुढे करून

त्याने कवडसा मुठीत धरला. तो जे काही दिसेल ते तोंडात घालायचा. त्याने मुठ तोंडासमोर आणून उघडली तो आत काहीच नव्हते. त्याची फजिती बघून चंद्रुआक्काला सुध्दा हसायला आले.''खुळा रे खुळा!'' पुन्हा एकदा कवडशाच्या आड पान आले. कवडसा नाहीसा झाला अन् त्याच्याबरोबर सुरेशसुध्दा. मग चंद्रुआक्का सुरेशला शोधायला लागली. तेवढ्यात तिला लख्ख आठवले. सुरेशला पाळण्यात झोपवून आपण आंघोळीला आलो. चटकन आंघोळ करून घरात जायला हवे. सुरेश आता उठेल. त्यापूर्वी भात शिजायला हवा. मग लगोलग आंघोळ करून ती घरात गेली.

सुरेश जाऊन वर्ष होत आले. सगळीच हळूहळू सुरेशला विसरायला लागलेली. भाव्यांकडचे मागणे आल्यापासून बयोसुध्दा मनोमन सुखावली. चार दिवसांनी भाव्यांकडची माणसे तिला बघायला येणार होती. तिने घराची झाडलोट सुरू केली. हल्ली चंद्रुआक्काही जरा बरी....बरी म्हणजे तिचे ओरडणे, आळपणे पुष्कळ कमी झालेले. बाकी बेताल हसणे, गाणी म्हणणे होते तसेच होते. मुलाकडच्यांना या गोष्टीची कल्पना होती. पण माणसे येतील तेव्हा त्यांना हे चळींदर समोर दिसायला नको म्हणून बयोची मोठी बहिण सुमी हिने आईला चार दिवस माझ्याकडे पाठवा असा निरोप दिला. भलूनाना तिला पोहोचवायला जायचा होता. पिशवी घेऊन चंद्रुआक्का बाहेर पडली. उंबऱ्यात आल्या आल्या तिला आठवण

झाली, “सुम्ये,उगाच हुंदडत राहू नको. सुरेशकडे लक्ष ठेव नीट आणि दर्याकडे त्याला एकटा पातू नको हो.”आतुन बयो नुसते ‘हो’ म्हणाली अन् चंद्रुआक्का चालायला लागली. वाटेत धाकू कुंभाराने हाक मारली, “काय ग्ये भटणी,” बाहेर जायच्या खुषीत चंद्रुआक्काने त्याला कवन म्हणून दाखविले. “चाक फिरवतो गरागरा ,मडके करतो भरा भरा , तर मग मी कोण ? धाकू कुंभार” धाकू हसतच पुढे गेला. पाराजवळ एस. टी. चा स्टॉप. चंद्रुआक्का पिशवी मांडीवर घेऊन पारावर बसली. थोडया वेळाने लांबून गाडी येताना दिसली. चंद्रुआक्का अगदी खुषीत आली. “गाडी आली गाडी आली झुक् झुक् झुक् शिटी कशी वाजे बघा कुक् कुक् कुक् “

गाडीतून उतरल्यावर पिशवी काखोटीला मारून चंद्रुआक्का भराभरा निघाली. भलूनाना आता तिचा नवरा नव्हता अन् तिच्या तो खिागणतीतही नव्हता. तिला बघताच “आज्जी आज्जी” करीत नातवंडे तिला बिलगली. सुमीने विचारले,”आई नाना कुठेत ?” चंद्रुआक्का झटकन उत्तरली,”नानात नाना फडवणीस नाना इतर नाना करीती तनाना. मी एस्टीत बसायला आले तिथपर्यंत मेल्यान् पाठ धरलीन माझी. पण मी कसली वस्ताद! दिल्या त्याच्या

हातावर तुरी नि बसल्ये गाडीत. तो गेला असेल तिकडे त्याच्या मैतरणीकडे.” आजीचे हे मजेशीर बोलणे ऐकून नातवंडे हसायला लागली. त्यांना दटावीत सुमी आत गेली. थोड्याच वेळात भलूनाना आत आले. त्यांना पाहताच चंद्रुआक्का पुढे झाली. त्यांना ओवाळण्याचा अविर्भाव करीत म्हणाली, “अहो, नाऽऽना तुम्ही खावा सुपारी पाना आणि करा ठणाणा..... पळा इथून. “

नाना गेल्यावर मात्र चंद्रुआक्काचे चळिंदर जरा कमी झाले. ती नीट बोलून चालून राहीली. अधून मधून तिचे गाण्यात बोलणे मात्र चालायचे. पण जावई,

a

नातवंडे, सुमी कुणालाच ती उपमर्दकारक काही बोलली नाही. चार दिवसांनी सुमीने तिच्या जाण्याचा विषय काढला तर चंद्रुआक्काचे आपले भलतेच सुरू झाले," त्या भल्याचे तोंड नाही हो बघायची मी..... माझा सुरेश गेलाए मालवणात नोकरी करायला. त्याला खोली मिळाली की तो येईल मला न्यायला. मग मी जाईन मालवणला. नांदायला, नांदायला, नांदायला,मला नाही जायाचं नांदायला." हे कर्मकठीणच झाले. दोन दिवस गेल्यावर मग सुमी म्हणाली, "आई मालवणला जाऊ या ना सुरेशकडे? त्याचा निरोप आला सकाळी,उद्या तुला मालवणला पोचवायला सांगितलेन आहे त्याने." हे ऐकताच चंद्रुआक्का खुषीत आली. दुसऱ्या दिवशी ती खुषीतच सुमीबरोबर बाहेर पडली. गाडीत आक्का शांत होती. गाडी थांबल्यावर उतरताना मात्र आपण फसलो हे तिच्या लक्षात आले. "सुम्ये खोटारड्ये, शेवटी मला फसवलेस की गो....."आक्का रडायला लागलीय. पण काहीही आक्रस्ताळेपणा न करता आक्का घराकडे जायला निघाली.

बयोच्या लग्नाची गडबड सुरू झाली. कसले तरी कार्य आहे हे आक्काने ओळखले, पण तिला कोणीच काही बोललेले नव्हते. लग्नाला आठ दिवस राहीले अन् पत्रिका छापून झाल्या. घरात देवापुढे पत्रिका ठेवून झाली. आक्काने बयोलाएका बाजुला घेतले अन् विचारले, "बयो, तुझा घोडनवरा बापुस माझ्या उरावर सवत आणतोहे की काय?" बयो म्हणाली,"आई, काय भलतेच बोलतेस,अगो,माझेच लग्न आहे!" अपमानाने आक्काला रडू आले, "चांडाळणी, तुझे लग्न आणि मला कोणीच नाही गो मला बोललीत, मी का तुझे लग्न मोडायला जाणार होत्ये?"

मग नवरा मुलगा कोण-कुठला याची चौकशी करून काय काय तयारी झाली, देणे-घेणे काय ठरले ते खडान् खडा तिने बयोला विचारले. कुणाला काही न

विचारता सवरता तिने रूखवताचे जिन्नस करायला घातले. वड्या थापता थापता, “विहिणींनो बसा भोजनाला, आज हा उशीर फार झाला...” तिने सुरू केले. आता घरात चार पाहूणे मंडळी जमली. आक्काचे गाणे म्हणणे सोडले तर ती खुळी आहे असे कोणाला खरेही वाटले नसते. लग्न दोन दिवसांवर आले तेव्हा मात्र अजून सुरेश कसा आला नाही या काळजीत ती पडली. कुणीतरी प्रसंगावधान राखुन त्याला रजा नाही,तो लग्नाच्या दिवशी परभारे तिकडे येईल असे सांगितले. आक्काचेही समाधान झाले.

आक्काला लग्नाला न्यायची नव्हतीच, पण तसे सांगुन तिला पिसळवा कशाला म्हणून “तुला लग्नाच्या दिवशी तिकडे नेऊ, तुझे हे चळिदंर बघून बयोचे लग्न मोडले म्हणजे? तुझे गाणी म्हणणे,हसणे, आम्ही समजून घेऊय पण लोक नावे ठेवतील. लग्नाच्या दिवशी तु आणि सुमी सकाळच्या गाडीने या.” अशी तिची समजुत घातली. सगळी मंडळी गेल्यावर मात्र चंद्रुआक्का उमजली. “मला फसवलेनी....” म्हणून उंबऱ्यात बसून ती रड रड रडली. दुसरे दिवशी सकाळीच उठून तिने दारात पोतेरे फिरवून त्यावर छानपैकी राधाकृष्णाची रांगोळी काढली. साग्रसंगीत देव पुजा केली, लग्नाच्या मुहूर्ताच्या वेळी देवाच्या पुढ्यात बसून मंगलाष्टके म्हटलीन. वरण भात, गोडाचा सांजा असे जेवण रांधलेन. महापुरूषाला पान, गोग्रासाचे पान ठेवलेन. दुपारी जेवल्यावर मायलेकी आडव्या झाल्या. चंद्रुआक्का खुषीत सुमीला म्हणाली, “सुम्ये, आता माझा घोर मिटला. मला तेवढी सुरेशकडे मालवणला पोचव म्हणजे झाले. मालवणात जााईन, तुप रोटी खाईन,जाडजुड होईन......”

a

सुमी वैतागली,"आई, तुझ्या मांडीवरच सुरेशने प्राण सोडला, तो फणसावरून पडुन गेला,म्हणून तर तुझे डोके फिरले. या गोष्टीला आता दोन वर्षे होऊन गली. तुझी कवने, उखाणे आणि पाचकळपणा बघितला की आम्हाला अगदी लाजिरवाणे होते , एकेकदा वाटते खरेच तुझे डोके फिरलेले आहे की तू आमच्यावर जाणूनबुजून कसला सूड उगवण्यासाठी ही नाटके करतेस." सुमीचे शब्द तापलेल्या षशिशासारखे चंद्रुआक्काच्या कानांत पडले आणि सगळे घर तिच्याभोवती गरागरा फिरायला लागले."सुरेश गेला? माझ्या काळजाचा तुकडा गेला," म्हणून ती धाय मोकलून रडायला लागली. आक्काचे खुळेचार, ती नानांचा करीत असलेला उपमर्द आणि आत्ताचे तिचे अघोचारी रडणे यांमुळे वैतागलेली सुमी म्हणाली,"तरी लग्नाला जायला नाचत होतीस. तिथे मांडवात असे तमाशे करून लग्नात विघ्न घातले असतेस तर नानांना गळ्यात धोंडा बांधुन जीव द्यायला हवा होता. " आता मात्र आक्काचा पण संयम सुटला, "नाना, मोठा आला गो तुझा नाना. एवढा पुळका आला तर मध घालून चाट त्याला. या तुझ्या नानाचे एक एक प्रताप सहन करीत उभा जन्म जिवंतपणी मरण जगल्ये गो मी सुम्ये!"

आक्का पुढे सांगायला लागली. " लग्न होऊन महिनाभर नसेल झालेला.नमसवाडीतले झिलगे कलागत घेऊन तिन्हीसांजेला लक्ष्मी यायच्या वेळी घरात आले. शिदू भाटल्याच्या विधवा भावजयीची कळ काढली म्हणून वाडीतल्या गड्यांसमक्ष ह्या ह्या ओटीवर त्याने तुझ्या नानाच्या तोंडात व्हाण मारलीन् नी वाडीतल्या पोरांनी चपलांची माळ त्याच्या गळ्यात घातलेनी .... खरं तर गावातुन त्याची धिंडच निघायची, पण मी आडवी गेल्ये, त्यांच्या हातापाया पडल्ये म्हणून पुढची नाचक्की टळली. केवढा रामाचा अवतार गो तुझा नाना! ह्या प्रसंगामुळे तरी

a

धडा शिकावा होता त्याने, पण नाही! रख्मी धनगरणीबरोबर मांगरात शेण खाताना मी त्याला पकडला आणि त्याच्याकडून गुरासारखा मार खाल्ला....हा मानेवरचा वळ बघ माझ्या आणि विचार तुझ्या नानाला ही गोष्ट खरी काय! नरकडे ढोर बांधून घातले की जमते, पण शिंदळ झालेल्या माणसाला कसा आरेखणार? जत्रेत येणाऱ्या गोसावणी, त्यांच्याशी ह्याचे आंबटषोक पोटच्या गोळ्यांसाठी मी जिती होत्ये गो सुम्ये, आणि डोके तर माझे कधीच फिरलेले आहे.

हातातोंडाशी आलेला पोर फणसावरून पडून गेला आणि मी अगदीच खुळाचार करायला लागल्ये इतकेच. माझे डोके फिरवून महालक्ष्मीन मेहेरबानीच केलीन् गो माझ्यावर. सुरेश मालवणात आहे या आशेवर मी आला दिवस ढकलीत ऱ्हायल्ये. आज तु मला शहाणी केलीस गो, नाही म्हणायला बयोचा पाश होता. आता ती सुध्दा काळजी मिटली. मी सुखाने मरायला मोकळी झाल्ये. “ तिरमिरीसरशी चंद्रुआक्का उठली. देवापुढे जाऊन पाट मांडला. बांगड्या, मंगळसुत्र काढून देवासमोर ठेवले. डोक्याचे कुंकू पुसले. सुमी हे बघून गडबडूनच गेली. “आईऽ आई… तू काय आरंभलेस हे?” पदराने डोळे पु शीत चंद्रुआक्का म्हणाली, “सुम्ये,अगदीच कशी गो तू खूळी? ज्याच्या नावाने हहे सौभाग्य लेणे ल्यायचे तोच गेला....अहेवपणी मरायचे भाग्यही माझ्या वाट्याला आले नाही. उभा जन्म मला छळायचे ते छळलेनच पण दावेदार जातानाही मला रंडकी करून गेला गो ऽऽ!”आणि चंद्रुआक्का गळा काढून रडायला लागली.

◘◘◘◘◘◘◘◘

# ५. वकिली डाव

कोर्टाचा बेलिफ, ठाणे अंमलदार, पोलिस पाटील अन् दाजी बामण हे लटांबर भाऊ भिडूयांच्या घरावर जप्तीची डिक्री बजावण्यासाठी निघाले. स्वतःला मोठा हुषार आणि निःस्पृह समजणारे भाऊ, तालुक्यात घडणाऱ्या असंख्य घडामोडी त्यांच्या 'मर्मभेद 'साप्ताहिकामध्ये छापून यायच्या.एवढेच नव्हे तर घटनांमागचे पडद्याआडचे सूत्रधार,त्यांच्या कृष्ण कारवाया यांच्या बित्तबातम्या त्यांच्या संपादकीय अग्रलेखात असायच्या. जिल्ह्या बाहेर पार मुंबई, पुणे, सुरत इकडे स्थायिक झालेली दशक्रोशीतील कुटुंबे त्यांच्या साप्ताहिकाचे वर्गणीदार! साप्ताहिक हातात पडले की आजच्या अग्रलेखात कोणाचे कुलंगडे बाहेर पडलेय या उत्सुकतेपोटी अग्रलेखाची पारायणे व्हायची. साप्ताहिक आणि इतर छपाईची कामे असायची. छापखाना व्यवसाय म्हणून चांगला चाललेला. भाऊंच्या वडिलानी सुरू केलेला प्रेस आणि साप्ताहिक मुखपत्र.त्यानी वानप्रस्थ स्वीकारून व्यवसाय मुलाकडे सूपूर्द केला अन् धंद्याला उर्जितावस्था आली अन लौकिकही वाढला.

समाज प्रबोधनाच्या वेडाने झपाटलेले भाऊ कुणाचीही भीड मुर्वत न बाळगता अन्यायाला वाचा फोडायचे! अन्याय कर्त्याचा घणाघाती समाचार घ्यायचे. स्थानिक पातळीवरच्या सावकार, जमीनदार मंडळीपासून तो तालुका पातळीवरच्या अधिकाऱ्यापर्यंत सगळे भाऊना वचकून असायचे. पण त्या बरोबर अशा प्रकरणात दुखावलेले हितशत्रुही भाऊना सतावायचे. मामलेदार कचेरीतले सालिना दोन अडीचशे रूपयांचे काम, सहा महिन्यापूर्वी भाऊनी कसल्याशाा संदर्भात मामलेदारावर ताशेरे ओढले अन् ते काम बंद झाले. याशिवाय काही पैसेवाली मंडळी भाऊंवर अब्रु नुकसानीचे खटले दाखल करायची.

a

भाऊंच्या साप्ताहिकातले अग्रलेख, त्यात नावनिशीवर संदर्भ असल्यामुळे काही वेळा भाऊ हुकूमी कचाट्यात सापडायचे अन पाच रूपये दहा रूपये दंडही व्हायचा. दाजी बामण गावतला खोत, महार, भंडारी याना त्याच्या कडे वेठबिगारी करायला लागे. गावातल्या देवस्थानाचाही दाजी मोठा मानकरी. वास्ताविक दात्ये हे वेतोबाचे पुजारी, त्याना देवस्थानची इनामतही मिळालेली. पण मध्यंतरीच्या पडत्या काळात दाजी बामणाने ते ताब्यात घेतले. भाऊ प्रेस-साप्ताहिक स्वतःच्या जबाबदारीवर सांभाळायला लागल्यानंतरची गोष्ट. शिमग्यातल्या मानपानावरून दाजी बामणाने भर सभेत जमलेल्या ग्रामस्थांना फटकारले. सगळे अपमान गिळून गप्प राहिले. पण भाऊ मात्र इरेला पेटले. सखाराम दात्यांच्या मुलाशी जवळीक करून त्याना विश्वासात घेतले. गावातल्या जुन्या जाणत्या मंडळीशी चर्चा करून यापूर्वीच्या प्रथा परंपरा यांची चर्चा केली. अन् या खटाटोपात दात्यांच्या बळदात काही जुने कागदपत्र हाती आले. पेशवाईच्या काळातला एक जुना दस्तऐवज हाती आला.

सखाराम दात्यांच्या पणजोबाचे नाव त्या दस्त ऐवजात होते. मग भाऊ कामाला लागले. दात्यांची वंशावळ शोधून काढली अन् एका साप्ताहिकात मुळ दस्तऐवजासह सगळे प्रकरण प्रसिध्द केले. साप्ताहिक प्रसिध्द झाले अन् दुसऱ्याच दिवशी गावात राजरोस चर्चा व्हायला लागल्या. आठ दहा दिवसांनी मुंबई, पुण्याकडच्या ग्रामस्थांची पत्रे यायला लागली. गुढी पाडव्या दिवशी गाव देवाच्या देवळात सभा झाली. चार जाणत्यांनी दाजीची चूक त्याच्या पदरात घातली अन् वेतोबा बामणाच्या कब्जातून सुटला, कोर्ट कचेऱ्या न करता! त्यानंतर ‘वेतोबा अजगराच्या जबड्यातून सुटला हा भाऊंचा अग्रलेख फार गाजला. बोरूने मोठ्या

a

अक्षरात त्या अग्रलेखाची नक्कल काढून गावातल्या पोरानी गाडीतळा जवळच्या पिंपळावर लटकावली.

झालेच तर गावात नव्याने सुरू झालेल्या हायस्कूलच्या इमारत बांधकामाचे प्रकरण . दाजी बामणाने त्यावेळी केलेले गटबाजीचे राजाकारण, भाऊनी खुमासदारपणे रंगवलेले. दाजी बामण भाऊना पाण्यात बघायचा. त्यांच्यावर एकदा मारेकरी घालण्यापर्यंत ही त्याची मजल गेली. पण भाऊंचा लोकसंग्रह अफाट.रात्री प्रेसमध्ये काठ्या लाठ्या घेऊन मारेकरी शिरले. त्याना बघताच नोकरानी आरडाओरडा सुरू केला अन् प्रेस जवळच्या गावडे वाडीतले पाच पन्नास झिलगे धावले. मारेकऱ्यानी रागरंग बघून पळ काढला.त्या घटनेपासून रोजा संध्याकाळी गावडे वाडीतली पाच सहा मंडळी नित्यनेमाने प्रेस समोर गप्पा मारायला जमू लागली. प्रेस बंद होईपर्यत कुणी ना कुणी डिंबी देऊन बसून रहायचा.

गहाणवटीच्या एका व्यवहारात दाजी बामणाने हरी चोडणकराच्या घरावर जप्ती आणली . वास्तविक दोनशे रूपये मुद्दलापोटी चोडणकराने साडेतीनशे रूपये जमा केलेले. पण दिलेल्या रकमेची पावती त्याने घेतलेली नव्हती. कर्ज फिटले असेल म्हणून तो गाफिल ऱ्हायला. बामणानेही काही विचारणा केली नाही अन् प्रॉमिसरी नोटची मुदत संपायला महिनाभर राहिलेला असताना बामणाने कोर्टात केस गुदरली. पुरावा चोडणकराच्या विरोधात! भाऊ भिड्यानी सल्ला दिला ‘कोर्टा पुढे हात जोडून एवढेच सांग. मी घेतलेल्या रकमेची परतफेड म्हणून एक पै सुध्दा घेतली नाही असे बामणाने वेतोबाची शप्पथ घेऊन कबूल करावे.’ वेतोबा जागृत! बामण वेतोबाची खोटी शप्पथ घ्यायला कचरेल असा भाऊंना अंदाज!

a

बामणाने वेतोबाची शप्पथ घ्यायला नकार दिला. पण चोडकराने आपल्यावतीने हा एकमेव पुरावा असल्याचे सांगितले म्हणून कोर्टाने तसा हूकूम केला. बामणाने खोटी शपथ घेतली. केस त्याने जिंकली. चोडणकराच्या घरावर जप्ती आली. घरातले हांडे-भांडे, धान्य-कडधान्य, अगदी माळयाच्या फळया, घराच्या गल्लीत डाळलेले शिवार, जवळ जवळ हजार -दीड हजाराचा ऐवज बामणाने हडपला. चोडणकर देशोधडीला लागला. घर उघडेच टाकून तो सासुरवाडीला रहायला गेला. भाऊ अस्वस्थ झाले. पुढच्या साप्ताहिकात 'सावकारी पाश' ह्या शिर्षकाखाली त्यानी इत्यंभूत वृत्त छापले. अगदी स्वार्थी बामणाने वेतोबाची खोटी शपथ घेतली इथपासून ते चोडणकराच्या घरातून जप्त केलेल्या सामानाची बाजारभावे होणारी किंमत तपशीलवार दिली. हा न्याय वेतोबाच्या दरबारात मिटेल. देवस्थान जागृत आहे. केल्या कृत्याची फळे दाजी याची देही याची डोळा भोगील असे ठणकावून लिहिले.

लेख प्रसिध्द झाला. पंचक्रोशीत या घटनेची चर्चा झाली. लोक हळहळले. गावातल्या काही जणानी वेतोबाला जाबसाल घातली. आठवडाभरात दाजी बामणाचा दगडासारखा पोर, त्याला सर्पदंश झाला. उपचार करण्यापूर्वीच त्याने डोळे फिरवले. लोक उघड उघड बोलायला लागले. बामण चिडला अन भाऊविरूध्द त्याने भाऊंच्या 'सावकारी पाश' ह्या लेखा विरुद्ध अब्रु नुकसानीचा दावा गुदरला. समन्स आले अन् भाऊ कोर्टासमोर उभे राहिले. त्याना वकिल लागत नसे. केसची व्यवस्थित टिपणे काढून आपले प्रतिपादन ते मुददेसूदपणे करीत. त्यांच्यावर ठेवलेल्या दोषारोपांचे त्यानी तर्कशुध्द खंडन केले. आपण प्रसिध्द केले ते वृत्त सत्य आहे. प्रत्येक सत्य सिध्द करण्यासाठी कोर्टाला दिसतील, कोर्टाला ला ग्राह्य

वाटतील असे पुरावे देता येतीलच हे वास्तवात शक्य नसते. प्रस्तुत घटना तशीच आहे असे समर्थन भाऊनी केले.

दाजी बामणाने ग्राम दैवताची खोटी शप्पथ घेतली त्याचे प्रत्यंतर त्याला आले की नाही ? असे खडसावून विचारले. आपण प्रसिध्द केलेले वृत्त खोटे आहे हे बामणाने ग्रामदैवत वेतोबाचा बेलभंडारा उचलून सांगावे असे आव्हान दिले. आपल्या लेखात आपण कोर्टाची, कोर्टाने दिलेल्या न्यायदानाची बेअदबी होईल असे अक्षरही लिहीलेले नाही. किंबहूना बामणाची बेअब्रू व्हावी असाही आपला उद्देश नाही. आपण फक्त वस्तुस्थिती मांडली आहे. असा बचाव भाऊनी केला. अर्थात हे समर्थन कोर्टापुढे कसे टिकावे ? कोर्टाची बेअदबी लेखामुळे झाली एवढ्या आरोपाचे खंडन कोर्टाने ग्राह्य मानले. खेरीज एकदा शपथ घेऊन बामणाने सत्य प्रतिपादन केले. त्यास सामनेवाला चोडणकर यानेही आक्षेप घेतला नव्हता. सबब झालेल्या निर्णयासंदर्भात बामणाने पुनःश्च बेलभंडार उचलून सांगणे ही मात्र कोर्टाच्या आदेशाची बेअदबी होईल असे प्रतिपादन बामणाचा वकिल गवाणकर याने केले. परिणामी भाऊंच्या लेखामुळे बामणाची अब्रु गेली हे सिध्द झाले. कोर्टाने भाऊना सव्वापाचशे रूपये एवढा जबर दंड ठोठावला.

छापखान्याच्या वार्षिक उलाढालीतून तीनशे - साडेतीनशे रूपये भाऊना मिळायचे असा तो काळ. दंडाची रक्कम जबर होती. प्रेस विकून सुध्दा भरपाई होणारी नव्हती. भाऊनी मुदतीत दंड भरला नाही. मग त्यांच्या रहात्या घरातील चीज वस्तूंची जप्ती करून रकमेची परतफेड करून घेण्याची कोर्टाची डिक्री झाली. लोक हळहळले. या पडत्या काळात ज्याना भाऊंविषयी सहानुभूती होती अशा लोकानी दशक्रोशीतले उंबरे झिजवून काही रक्कम उभी केली ती भरली फक्त बावीस रूपये!

अर्थात भाऊ मात्र विचलीत झाले नव्हते. "मी जे छापले ते सत्य आहे. माझा जज्ज म्हणजे ग्रामदैवत वेतोबा, मला तो न्याय देईल. मी देशोधडीला लागावे अशी त्याची इच्छा असेल तर तसे होईल. मला परिणामांची भिती नाही." भाऊ भेटणाऱ्यांना ठासून सांगत. मदत म्हणून जमलेले पैसेही त्यांनी स्वीकारले नाहीत.

ही घटना आई वडिलांच्या कानी जाण्यापूर्वीच भाऊनी त्या दोघाना हवापालटासाठी मिरजेला बहिणीकडे धाडून दिले अन् शांत मनाने ते कामात गर्क झाले. त्यांचा त्या दरम्यानचा अग्रलेखही चर्चेचा ठरला. लेखात त्यानी लिहिले होते कि, 'सत्याचा धोंडा पाण्यात तरतो .मी तर नगण्य. पण जे लिहीले ते सत्यच होते. त्याच्यावर काही भाष्य पक्षकाराने केलेले नाही अथवा बेलभंडार उचलण्याचे आव्हानही स्वीकारले नाही अर्थात विजय माझाच झाला. कोर्टाचा दंड ही नगण्य बाब! भले माझे घरदार मोकळे होईल पण हे अन्याय्य आहे हे प्रत्येकजण कबूल करील, हेच माझे संचित आहे.' हा अग्रलेख पंचक्रोशित खूपच गाजला .

गावातले काही जाणते दाजाी बामणाला भेटले. लोकवर्गणीतून जमवलेल्या बावीस रुपयात भर घालून नगद पन्नास रुपये घेवून बामणाने हा विषय मिटवावा नी जप्तीचा हुकूम रद्द करावा अशी विनंती केली. वेतोबाचा कोप त्याने एकदा अनुभवलेला आहे याचीही जाणीव करून दिली. पण बामणाने जुमानले नाही. ''माझा फडशा झाला तरी चालेल पण भाऊ भिडूयाला नंगा फकीर करून त्याच्या घरादारावरून नांगर फिरवीन तरच मी नावाचा दाजाी बामण!'' त्याने ठणकावून सांगितले. लोक गप्प बसले. या घटनेपूर्वी वर्षभर अगोदर सुरतला भांड्याचा व्यापार करणारे हरजी गावडे, सुरतचे दुकान मुलांवर सोपवून कायम वास्तव्यासाठी गावात आलेले. चार पैसे बाळगणारा माणूस. भाऊंच्या बऱ्याचा! दंडाची रक्कम

a

भरण्यासाठी भाऊना बिनव्याजू पैसे द्यायची तयारी त्याने दर्शवली पण भाऊनी नकार दिला. अगदी निर्वाणीचा उपाय म्हणून जप्तीपूर्वी दोन दिवस तो बामणाला भेटला. आपण भाऊंच्या वतीने दंडाची रक्कम देतो असेही सांगितले. पण बामणाने मान्य केले नाही. “मी पैशासाटना दावो घातलेलो नाय. माज्या मनात त्येका रस्त्यावर हाडूचो हा.” दात ओठ खात बामण म्हणाला.

जप्तीच्या वेळी ढोल ताशाचे वाजप बामणाने सांगितले. गावातल्या म्हारानी नकार दिला म्हणून चार कोसावरच्या गावातले वाजपी दुप्पट सुपारी देऊन त्याने ठरविले. गावात काही खाटखूट होईल, भाऊच्या बऱ्याचे लोक विघ्न आणतील म्हणून पैसे भरून संरक्षणासाठी पोलिस बोलावले. कोर्टाचा बेलिफ, शिरस्तेदार, पोलिस पाटील, दाजी बामण आणि ठाणे अंमलदार असे लटांबर ढोल ताशाच्या गजरात भिड्यांच्या घराकडे निघाले. भिड्यांचे घर एकवशी, आड बाजुला. रस्त्यावर दुतर्फा गावातले शहाणे सुरते आणि पोरेबाळे जमलेली. मोठी माणसे मनात हळहळ करीत बसली. जप्तीचा देखावा बघायला मात्र एकही गावकरी जाणार नव्हता. या प्रसंगी धीर देण्यासाठी, दंड भरून तडजोड करायला बेलिफाने परवानगी दिलीच तर बघायचे ह्या धोरणाने रक्कम बांधून हरजी गावडे भिड्यांच्या घराकडे निघाला. पाळंदिच्या तोंडाशीच भाऊ भिडे हसत उभे असलेले दिसले. ह्या माणसाची हिंमत अचाटच म्हणायची. हरजी मनात म्हणाले. हाती पायी पडून रक्कम भरूया आणि जप्ती टाळूया असा सल्लाही त्यानी पुन्हा एकदा भाऊना दिला. भाऊ म्हणाले, “मी म्हणालो होतो ना? मी न्याय म्हणजे परमेश्वराची आज्ञा मानतो. परमेश्वराचा न्याय खरा. माझे मन मला अजुन सांगते आहे की, जप्ती होणार नाही.” हरजींचा हात धरून दरड चढल्यावर त्यानी घराच्या दिशेने अंगुली निर्देश केला. हरजी चाट झाले.

a

ढोल ताशांचा आवाज जवळ येऊ लागला. बेड्यात कांबळे टाकून त्यावर बैठक जमवीत हरजी गावडे आणि भाऊ पाळंदीकडे पहात राहिले. वाजपाच्या गजरात सगळे लटांबर मुंगीच्या पावलानी दरड चढून वर येऊ लागले. एरवी दरडीची चढण सोपी जावी म्हणून पायऱ्या खोदलेल्या असायच्या पण आज मंडळीची दमछाक करण्यासाठी पायऱ्या उचकटून टाकून आडतिड खणून चढ अधिक कठीण केलेला.मोठ्या कष्टाने दम टाकीत आलेल्या माणसांच्या स्वागतासाठी भाऊ हात जोडून पुढे झाले. "या मंडळी ऽऽऽ! सरकारी कामात सहाय्य करायचे म्हणून मुद्दाम कामाचा खाडा करून मी आज थांबलो आहे मी. चला सुरू करा जप्ती....." दाजीने घराकडे नजर टाकली मात्र....समोरचे दृष्य बघून त्याचे अवसानच गळले.चारी मुंड्या चीत झालेल्या बामणाने तिथे मातीतच बसकण मारली.

भिड्यांच्या घराचे छप्पर पूर्ण उतरलेले,पडव्यांचे वासे, सऱ्या,खांड बारेसुध्दा काढून टाकलेली.फक्त मधल्या चौकातली दोन बारे काढायला अवजड म्हणून तशीच शिल्लक . घराचे सगळे दरवाजे,खिडक्या,झडपे काढून सताड उघडी.घरातले यच्चयावत सामान घरभाटाचा सर्वे नंबर संपतो त्या हद्दीबाहेर नेऊन व्यवस्थित डाळून ठेवलेले. जप्तीदार मंडळी आ ऽऽऽ करून बघितच राहिली. उघड्या दारातून भाऊंची दोन मुले एका परातीतून गूळ आणि पाणी भरलेली कळशी तांब्या घेऊन आली. घसा साफ करीत भाऊ म्हणाले, "आधी सगळ्यानी गूळपाणी घ्या. मग शिस्तीत जप्ती करा नी घराला सील मारा. .. . सगळे सोपस्कार अगदी यथासांग करा. बाहेरचे वाजप कमी पडेल म्हणून मी गावातले वाजपी सुद्धा बोलावून ठेवलेत. जप्ती पूर्ण झाली की त्यांचे वाजप सुरू होईल."

a

दाजी बामणाचे तोंड कांडेचोरासारखे काळे ठिक्कर पडले. त्याच्या कानाशी लागत बेलिफ म्हणाला, “दाजी ऽऽऽ हे भलतेच झाले. आता जप्त काय करायचे? आणि सील कशाला लावायचे? पुढे काय करायचे ते आता तुम्हीच सांगा.” खाली मान घालून दाजी म्हणाला, “आता आणखी काय करण्यासारखे शिल्लकच राहिले नाही. मी जप्ती रद्द करा असा कबुली जबाब देतो. चला परत.” वाजप्याना ढोल ताशे बंद करायला सांगून सगळे लटांबर परतीच्या वाटेला लागले. आता भाऊनी गावातल्या वाजप्याना साद घातली.”अरे वाजप्यानो,जप्तीदार मंडळीना ढोल ताशाच्या गजरात रस्त्यापर्यंत पोचवून या.” भाऊनी फर्मान सोडले. भाऊनी बोलावलेले गावातले वाजपी चांगलेच चेकाळलेले,ते जीव खावून ढोल ताशे बडवित त्या लटांबराला पोचवायला निघाले. जप्तीचा कसा फज्जा उडाला ही बातमी गावभर पसरली आणि हरखलेले गावकरी भिड्यांच्या घराकडे निघाले.

संध्याकाळी उघड्या पडवीत गावडे मंडळीनी जोरदार भजनाची बारी केली. अनायसे छप्पर उतरलेले आहेच, जप्तीचे खेकटे निकाली लागले आहे, तर मधल्या चौकावर टोलेजंग माडी उठवा असा सल्ला लोकानी दिला. भाऊंच्या वकिली डोक्याची तारीफ दशक्रोशीत झाली. त्यानंतर प्रसिध्द झालेला ‘विधात्याचा न्याय’ हा भाऊंचा अग्रलेख खूप गाजला. हरजी गावड्यानी साप्ताहिकाच्या दोनशे जादा प्रती काढायला सांगून त्या स्वखर्चाने तालुका भर जाणकारांकडे पाठविल्या. साधारण देव दिवाळीच्या दरम्याने घडलेली ही घटना. शिमग्यापर्यंत जुळवाजुळवी करून भाऊनी माडी उठविली. गृहप्रवेशाच्या प्रयोजनाला हजार पान उठले. भाऊंच्या कर्तबगारीची साक्ष देत आजही त्यांची माडी दिमाखात उभी आहे आणि त्यांच्या मुला-नातवानी भाऊंचे साप्ताहिक अद्यापही सुरू ठेवलेले आहे.

# ६.तुंबसाळ

काकबली टाकुन माघारी वळताना डेरेच्या कडेला घुशींनी काढलेला उकीर जरा भळभळल्यासारखा वाटला तेव्हा बिळातून कोणी साप किरडू तर बाहेर येत नाही ना? म्हणून निरखुन पहाणाऱ्या बाईला भुरूभुरू बाहेर पडणाऱ्या तुंबसाळ माशा दिसल्या. हल्ली नजर जरा कमी झालेली म्हणून चार पावले पुढेजाऊन तिने नीट तिरखुन बघितले. शंकाच नव्हती, चांगल्या आंगठ्याएवढ्या टरटरीत तुंबसाळींची विशिष्ट लयीत सुरू झालेली ये - जा बघितल्यावर त्यांनी डेगेतल्या घुशीच्या बिळात ठीव (रहिवास) केलेले असणार याची अटकळ बाईला आली आणि तिच्या काळजाात चर्रर झाले. चार मुलींच्या पाठीवर दिवस भरत आलेली सुन! तिला बाळंतपणासाठी कणकवलीच्या धाकट्या जावयांकडे -पेठ्यांकडे पोचवायला गेलेला आणि घरात फक्त बाई आणि तिच्या चार नाती. ऐन मोक्याच्या वेळी ही अवलक्षणी तुंबसाळ सगळी दुनिया सोडून नेमकी आपल्याच घराजवळ अंगणाच्या कडेला ठीव करायला यावी हा मोठा अपशकुन बाईला वाटला. गेल्या चोवीस वर्षात जे हळेखळे झाले ते पुरले नाहीत म्हणून म्हातारपणी आणखी कसले दुदैव राशीला येते आहे? हा नवीन घोर तिला लागला. या तुंबसाळीचा पायगुण, तिने दिलेला एकेक तडाखा आठवून बाई अंतर्बाह्य हादरून गेली.

a

अगदी हीच वेळ!वैश्वदेव करून काकबली टाकायला गेलेल्या गुंडुकाकांना देवगड पोस्टातला रनर येताना दिसला. विष्णु भाऊजी आजारी असल्याची तार मुंबईहुन आलेली! ती द्यायला रनर मुद्दाम कालवीपर्यंत आलेला. त्या दिवशी सकाळीच गोठ्यातुन दुध काढून आल्यावर दुधाची चरवी घडवंचीवर ठेवायला गेलेल्या बाईला ताकमेढीवर बसलेल्या तुंबसाळी दिसल्या. तिने घाबरून हाक मारली म्हणून गुंडुकाका धावत आले. बाईने ताकमेढीकडे बोट दाखवल्यावर भरल्या घरात शिरलेली ही विवशी बघून गुंडुकाकासुध्दा चरकले.

रानावनात उंच झाडावर फांदीला मोहोळ बांधुन रहाणारी ही आगीमाशी, विटकरी रंगाची! आग्या माशांची मोहोळे देवराई तल्या बकुळीच्या, गगनावेरी उंच गेलेल्या अष्टाच्या झाडांवर लटकताना त्यांनी बघितलेली. कुळवाडी तर या तुंबसाळीला पिशागतच म्हणायचे. मागे एकदा भांब्या धनगराची बायको दहाबारा वर्षाच्या तिच्या पोराला घेऊन सुरंगीच्या कळया काढून आणायला गेलेली असताना पोर चढला त्याच फांदीवर नेमके तुंबसाळीचे मोहोळ होते . ते त्याला दिसले नाही. पोर चढला आणि त्याच्या भाराने फांदीला हेलकावे मिळाल्याबरोबर तुंबसाळी उसळल्या. एक माशी डसल्याबरोबर प्राणांतिक बोंब मारीत पोर घसघसत खाली उतरला. त्याबरोबर घंव घंव करीत घोंगावणाऱ्या माशा बघितल्यावर त्याच्या आयशीने फडक्याने माशा झोडपुन जीव घेऊन पळायला सुरवात केली. फर्लांग दिड फर्लांग अंतरापर्यंत माशांनी त्याचा पाठलाग केला अन् त्या माघारी गेल्या. पोराला तोंडावर,पाठी-पोटावर, मानेवर आठ-दहा ठिकाणी माशांनी डंख मारले. आयशीलाही एक दोन माशा चावल्या, संध्याकाळ पर्यंत काळिज फाटेतो प्राणांतिक बोंबा मारीत तडफडुन तडफडुन पोर मेला.

a

सकाळच्या रामप्रहरी ही अवदसा घरात शिरली हे काही बऱ्याचे लक्षण नाही असे गुंडुकाकांनाही वाटले. माडाचे चुडत पेटवुन माशांना धगवून, हुसकावून लावायचे म्हणून चुडत आणायला ते न्हाणीघराकडे गेले. एवढ्यात ताकमेढीवरचे तुंबसाळीचे भिरे घंव घंव करीत उठले अन् बाईच्या डोक्यावर एक -दोन गिरक्या मारून भस्सकन चुलीजवळच्या खिडकीतुन बाहेर पडुन गेले. मग पुरी विरडभर बाईला काय सुधरेनासे झालेले आणि दुपारी जेवणवेळेला ती तार आली. केवळ अन्नाचा अव्हेर करायचा नाही म्हणून कसेबसे चार घास ढकलुन गुंडुकाका मुंबईला जायच्या तयारीला लागले. बोटीचे येते - जाते तिकिट, त्यात विष्णु आजारी म्हणजे नाही म्हटले तरी पंचवीस रूपये तरी जवळ हवेतच! घरात साठवा गाठव करून कशीतरी सात रूपयांची भर झाली. त्यांची आई तेव्हा अर्ध्या घरात वेगळी राहायची. ती चार पैसे बाळगुन असायची. दरमहा विष्णु कडून दहा रूपये मनिऑर्डरने यायचे ते म्हातारी घ्यायची. ती कोणा कोणाला अडीनडीला कर्जाऊ रकमा द्यायची. गुंडुकाकांनी तिच्याकडे उसनवार अठरा रूपये मागितले. पण सगळे समजुन सवरूनही ती चक्क ‘नाही’म्हणाली. “एक दोन रूपये हवेतर महिनाभराच्या बोलीने देईन. पण एवढी रक्कम माझ्याकडे नाय आणि तू काय एक रकमी एवढे पैसे परत करणार ? तुझी तू काय ती वेवस्था कर.” असे ती म्हणाली.

मग अखेरची जीव जीव म्हणून ठेवलेली, सासऱ्यांनी दिवाळ सणाला घातलेली दीड तोळ्यांची मोहोर आईला गहाण म्हणून दिल्यावर तिने अठरा रुपये दिले . ते खिशात टाकून देवगड पर्यंत सोबतीसाठी तातु घाड्याला बरोबर घेऊन ते घराबाहेर पडले. मुंबईला जाऊन पंधरा-वीस दिवस झाले तरी गुंडुकाकांचा पत्ता नाही म्हणून बाई काळजारलेली. म्हातारी सासू मात्र पक्की निगरगट्ट. पोटच्या पोराला

“माझ्याकडे एवढी भर नाय म्हणून सांगून त्याने दीड तोळ्याची मोहोर गहाण टाकल्यावर म्हातारीने अठरा रुपये दिलेन. काका मुंबईला गेले आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी दामु सडेकराला त्याच्या बायकोचे मंगळसूत्र आणि पाटल्या गहाण ठेवुन तीस रूपये दिले, असली काफर बाई! अन् कोण कुठचा तातू घाडी. मास्तर कोणत्या परिस्थितीत मुंबईला गेले हे जाणुन सकाळ संध्याकाळ खेपा मारून बाईची विचारपुस करायचा, तिला धीर द्यायचा. बावीसाव्या दिवशी सामानाची बोचकी घेऊन गुंडुकाका आणि मागुन तोंडात पदराचा बोळा धरून रडत येणारी नर्मदा बघितल्यावर बाई काय समजायचे ते समजली. दोघे येऊन घरात टेकली मात्र,आणि सास्वेने एकदम गळा काढून नकाश्रु ढाळायला सुरवात केली.

रडारड ऐकुन आजुबाजूची माणसे चवकशी करायला जमली. तार मिळून गुंडुकाका मुंबईला पोचेपर्यंत विष्णूला अग्नी देऊन त्याची ‘सारी’ सुध्दा भरून झालेली. किरकोळ ताप आला असेल म्हणून त्याने दुर्लक्ष केले ते नडले नी नवज्वराने त्याचा बळी घेतला. मग त्याचे दिवसवार करून सगळी निर्गत लावून झाल्यावर “मला कालवीला घरी न्या. इथे काय माझे मन रमायचे नाही.” असे सांगणाऱ्या भावजयीला घेऊन ते परत आले वैऱ्यावरही येऊ नये असा प्रसंग! सगळे ऐकून घेतल्यावर म्हातारीने तोडांचा पट्टा सोडलान. “अरे माझ्या कर्मा! ही नर्मदा पांढऱ्या पायाची अवदसा. ही घरात आली आणि वर्षभरात नंदीनीसारखी माझी गाय वाघान खाल्लीन. लग्न होऊन तीन वरसे झाली तरी हिची कुस काय उजवली नाय. अंगावर ताप काढून नवरा मेला तरी हिचे लक्ष नाय. पोराला खाऊन पांढरे कपाळ दाखवायला ही हडळ परत कालवीत आली.”म्हातारीचे वाक्ताडन ऐकल्यावर गुंडुकाका संतापले. “आई तू म्हणजे अगदी कैकयीच्या वरताण आहेस. प्रसंग

कसला आणि बोलत्येस काय ? बापड्या नर्मदेवर बावीसाव्या वर्षी वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. सोन्यासारखा माझा भाऊ काळाने ओढून नेलान यात त्या बिचारीचा काय दोष? विष्णु गेल्यावर तीन दिवस तीने तोंडात पाणीसुध्दा घेतलेन नव्हते. मग मी तिला माझ्या पोराबाळांची शपथ घातली. तेव्हा तिने पेजेचा घोट घेतलान. विष्णूच्या जन्मपत्रिकेत पंचविसाव्या वर्षी वाईट योग आहे तेव्हा त्याचे लग्न उशीरा करा असा भागवत ज्योतिषांनी दिलेला सल्ला तुला आठवतो ना? पण गोगट्यांकडच्या हुंड्याच्या आशेने विष्णूसकट सगळ्यांचा विरोध न जुमानता तू रणकंदन केलेस,जीव द्यायची धमकी दिलीस आणि हट्टाने त्याचे लग्न लावलेस. नकळत का होईना पण तू नर्मदेच्या आयुष्याची माती करून वर आणि तिलाच बोल लावतेस? तुझी जीभ रेटत्ये तरी कशी म्हणतो मी ? निदान प्रसंगाचे गांभीर्य ओळखुन जनलज्जेसाठी तरी तुझी टकळी आता बंद कर!”

एक - दोन दिवसांनी रात्री जेवणखाण उरकल्यावर म्हातारीने गुंडुकाकाना हाक मारून बोलावले. “विष्णूला कंपनीकडून फंड -बिंड काय तरी मिळेल ना ? नि त्याची मुंबईतली खोली तरी आता ठेवून काय करायची? ती विकून कायतरी रक्कम मिळेल ही व्यवस्था जरा बघ.” अशी पृच्छा तिने केली. विष्णूचे दिवस- वार झाल्यावर विष्णुच्या कंपनीत जाऊन कागदपत्रांवर नर्मदेच्या सह्या झालेल्या होत्या. तिचा एक भाऊ मुंबईला रहायचा. त्याच्यावर पुढची जबाबदारी सोपवलेली असल्याचे काकांनी सांगितले. त्या भावालाच पत्र लिहुन विष्णूची खोली विकून टाकायला सांगतो असे सांगुन काका उठले. नर्मदा आता सास्वेकडे रहायला लागली. दोन महिन्यांनी नर्मदेचा भाऊ आणि वडील वस्तीला आले. तिचा भाऊ तिला कायमची माहेरी घेऊन जातो म्हणाल्यावर तिचा पैसाआडका दागिने द्यावे

a

लागतील या भयाने गळा काढून मानभावीपणे म्हातारी बोलली,''मेली ती सून ना से (आहे) तो माझो बोढ्यो (मुलगा), गुंडुशी पटत नाय म्हणुन मी वेगळी रहात्ये. नर्मदा माझी म्हातारपणाची काठी, ती तुम्ही हिरावून घेऊ नका.''ती असे बोलल्यावर बापलेकांचा निरूपाय झाला. सकाळी उठून ते मार्गस्थ झाले. त्याच दिवशी तिन्हीसांजेला म्हातारीने गुंडुकाकांशी भांडण केले. त्यांचा धाकटा मुलगा अविनाश, त्याच्या मुंजीत विष्णूने अहेर म्हणून पाऊणशे रूपये दिलेले, नर्मदावरचा प्रसंग ओळखून गुंडुने ती रक्कम परत करावी अशी मागणी म्हातारीने केली. गुंडुकाका पुरते चक्रावून गेले. “एवढी रक्कम कुठून, कशी उभी करायची? असे ते म्हणाले.” त्यावर म्हातारी अर्वाच्य शिव्या द्यायला लागली.

संतप्त झालेले गुंडुकाका म्हणाले, “विष्णूला शिक्षणासाठी राजापुरात ठेवला तेव्हा पोटाला चिमटा घेऊन मीच त्याचा मॅट्रिकपर्यंतचा खर्च केला ना? तो मुंबईला नोकरी शोधायला निघाला तेव्हा हिची कंठी विकून त्याला तीस रूपये मी दिले. नोकरीला लागल्यावर तो महिनेमाल दहा रूपये मनिऑर्डर पाठवायचा. ते माझ्या नावावर मला मदत व्हावी म्हणून हे त्याने तुझ्याच तोंडावर सांगितलेन ना गो? पण तुझी दातकसाळ नको म्हणून मी दरमहा त्याची मनिऑर्डरने येणारी रक्कम तुलाच देत आलो. तू वेगळेचार केलेस तेव्हासुध्दा विष्णूचा नी तुझा हिस्सा घेऊन मला तिसरी वाटणी दिलीस. धरते माड ते तूच पोटाळलेस खंडाचे भात येते ते विकून तू त्याचा पैसा करतेस. अविची मुंज केली तेव्हा विष्णूने अहेर म्हणून पाऊणशे रूपये दिलेन ते तू काढतेस. पण तो आजारी असल्याची तार आली तेव्हा घरातली शेवटची एक वस्तू मला दिवाळसणाला मिळालेली दीड तोळ्याची मोहोर, ती गहाण टाकून

मी मुंबई गाठली. विष्णूच्या दिवस कार्यासाठी झालेला खर्च मीच केला. मी शाळा मास्तर, माझी मिळकत ती काय?"

पण म्हातारी काहीच ऐकून घ्यायला तयार नाही. भरल्या घरात ऐन तिन्हीसांजेला, "विष्णूचे पैसे तुझ्या अंगावर फुटतील, तुझी पोरेबाळे देशोधडीला लागतील." हे म्हातारीचे शिव्याशाप ऐकल्यावर मात्र बाईला रहावले नाही. लग्न झाल्यापासून आज मितीला बाई सास्वेला एक शब्दही उलटुन बोललेली नव्हती. पुढे वेगळेचार झाले मायलेकांचे भांडण झाले तरी ती तोंड मिटूनच राहीली. पोराबाळांचा उध्दार म्हातारीने केल्यावर मात्र तिला राहवले नाही."सासुबाई एवढ्या पैशाच्या पाठी लागता ते काय जाताना बरोबर नेणार आहात की काय? पोटच्या पोराला, नातवंडाना तुम्ही का म्हणून शापता? तुम्हाला पाऊणशे रूपयेच हवेत ना? मग आमच्या वाटणीचे पडण आहे ते त्या पैशापोटी घ्या. माझी पोरे मोठी होईपर्यंत जनलज्जेसाठी तुमच्या ओसरीवर टकले टेकायला दिलेत तरी डोंबाऱ्या सारखा संसार करायची हिम्मत माझ्यात आहे. तुमचे काही काहीनको, अगदी तोंडभर आशीर्वादसुध्दा देऊ नका. तुम्हाला मामंजींची शपथ घालते, पण माझ्या पोरा बाळांना शिव्याशाप तरी नका हो देऊ!"

मग तिने चक्क सास्वेच्या पायावर लोटांगण घातले. नर्मदेलाही रहावले नाही. ती म्हणाली,"सासुबाई, हे शोभते का तुमच्या वयाला? आणि त्यांच्या बरोबर सात फेरे घातले त्या मला काहीच अधिकार नाही? माझ्यासाठी तुम्ही पैसे मागत असाल तर मी स्पष्ट सांगते. मला पैसे नकोत. आता मरण येईपर्यंत जीव जगवायचा एवढेच उरले आहे. तुम्ही भाऊजींच्या वाटणीचे पडण घेऊन त्यांच्या पोराबाळांच्या तोंडचा घास नका काढून घेऊ." नर्मदेने तोंड घातल्यावर म्हातारीचा भडका

a

झाला.''तु कपाळ पुसकी, घुडग्या आपले कुंकु राखता आले नाही की पुढे वंश वाढविता आला नाही. ती तू मला ब्रह्मज्ञान सांगत्येस? मोठी चुळकी आली मला शिकवायला.'' मग मात्र काकांनी रूद्रावतार धारण केला ''आई आता एकशब्द बोलशील तर मी तुला आई म्हणायचो नाही. पाऊणशे रूपयाच्या बदल्यात ते पडण घे तुला आणि इतःपर माझ्याशी भाषणसुध्दा करू नकोस. ''

खंडाचे भात बंद झाले आणि काकांच्या पगारात बाईचा खुटुरूटु संसार सुरू झाला. रघू चांगल्या मार्कांनी फायनल झाला. त्याला राजापुरात'वारावर' ठेवले. काकांच्या बरोबरीचे पिसे गुरूजी, गुर्जर गुरूजी सहाय्याला आले. राजापुरात गुजर आळीत रानड्यांकडे रोजची देवपूजा करायच्या अटीवर रघुची रहायचीसोय झाली. सात दिवस सात कुटुंबांमध्ये आळीपाळीने जेवायला जायचे'वार'ठरले. तो मॅट्रिक झाला आणि रानड्यांच्या ओळखीने पुढे शिकायला रत्नागिरीला जोगळेकरांकडे राहीला. त्यांच्या घरची पुजा आणि कॉलेज सांभाळून फावल्या वेळेत त्यांच्या हॉटेलात तो कॅशवर बसायचा. त्याच्या मागची सखु पाचवी झाल्यावर शाळा सोडून घरीच राहीली.

अवि फायनल झाला आणि देवगडच्या सुमन मावशीने त्याला शिक्षणासाठी आपल्याकडे ठेवला. तिथे नवीनच हायस्कुल सुरू झालेले.अन् धाकटी सरू तिसरीत. बाईची पोरेबाळे हाता तोंडाशी यायला लागलेली. नेमकी त्याच वेळी गुंडु काकांची देवगड तालुका स्कुलात बदली झाली. ते सकाळीच जेवणाचा डबा घेऊन जायचे ते रात्री उशीरा परत येत. मधल्या वेळी जेवण झाल्यावर शाळेतच विश्रांती घेत. कधी कधी संध्याकाळी मास्तरांना यायला उशीर झाला तर तातु घाडी न सांगता तिठ्यापर्यंत त्यांना आणायला कंदिल नी दांडा घेवून जायचा. रोजच्या

खेपांनी काका हैराण व्हायचे. जाळ वाताने पायाला तडे पडायचे, पाय टेकवत नसे. पण रघू ग्रॅज्युएट होऊन भार उचलील या आशेवर ते आला दिवस ढकलायचे. त्या दिवशी जोगळेकरांचा माणूस रघुला बरे नाही म्हणून काकांना बोलवायला आला नि संध्याकाळी ते बोटीने परभारे रत्नागिरीला गेले.घरची वाट बघतील म्हणून अवि निरोप सांगायला संध्याकाळी कालवीत आला. अकस्मात कसले एवढे आजारपण रघुला आले या चिंतेतच बाई तिन्हीसांजेला देवाजवळ दिवा लावायला गेली. तिने लामणदिवा पेटवला अन् आत जो दृष्य दिसले ते बघून तिचे अवसानच गेल देव्हाऱ्या मागची पुरी भिंत तुंबसाळीनी भरलेली. थोड्या तुंबसाळी देव्हाऱ्यातसुध्दा दिसल्या. दिव्याचा उजेड झाल्यावर त्या भिरीभिरी उडायला लागल्या. बाईने देवखोलीचा दरवाजा आड करून अविला हाक मारली. त्यानेही दार किलेकिले करून आतले दृष्य बघितले. आता माजघरात सुध्दा दिवा लावून उजेड करायची सुद्धा पंचाईत. कसले जेवण नी कसले काय.....

तिघांनिही कप कप दुध पिऊन सारी रात्र ओसरीवर घालविली.

मुले झोपली पण धास्तावलेल्या बाईचा काय डोळा लागेना. दिवस उगवल्यावर देव खोलीतल्या माशा गळसरीतुन भुरू भुरू उडत नाहीशा झाल्या बाईचा जीव थाऱ्यावर नव्हता. तिने अविला देवगडात शाळेलान धाडता घरीच थांबवले. दुसऱ्या दिवशी मात्र अवि रहायला तयार होईना. सरू शाळेतुन आली तेव्हा बाईने दोघींसाठी तांदुळ ओयरले अन् ती स्वयंपाकाला लागली. एवढ्यात काका आणि कोणीतरी येताहेत असे सरू सांगत आली म्हणून बाई पुढील दारी गेली. गुंडुकाकांना गुर्जर मास्तर धरून आणीत होते अन् सोबत पिसे गुरूजी आणि कोणीतरी धोतरकोट घातलेले गृहस्थ येताना दिसले. बेड्यात आल्यावर गुंडुकाकांनी

तिथेच बसकण मारली आणि "रघु गेला गो ऽऽमाझ्या हाताने मीच त्याला पांढऱ्या समुद्रावर अग्नी दिला.... माझे हातपाय मोडले गोऽऽ" म्हणत त्यांनी हंबरडा फोडला. त्यांचे बोलणे ऐकताच बाई उभीच्या उभी धाड्कन फिट येऊन कोसळली. प्रसंग ओळखून नर्मदा धावली, कांदा फोडुन बाईच्या नाकाशी धरला. डोक्यावर पाणी थोपटले. गुर्जर आणि पिसे यांनी गुंडुकाकांना उचलून आणले अन् ओसरीवर माच्यावर झोपवले.

सरू,नर्मदा, गुंडुकाका यांची रडारड ऐकुन माणसे गोळा झाली. जो-तो'काय झाले ऽऽ काय झाले' म्हणून चौकशी करायला लागला. मग जाणत्या माणसांना बाजूला घेऊन गुर्जर मास्तरांनी सारे काही सांगितले. रघुला कावीळ होऊन ती उलटली. दुखणे विकोपाला जााईपर्यंत त्याने कळु दिले नाही. त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यावर जोगळेकरांनी माणूस पाठवून काकांना बोलावून घेतले. गुंडुकाका पोचले तेव्हा रघु ग्लानीतच होता. सकाळी त्याने कसेबसे डोळे उघडले. पण बाप मुलाचे शब्दानेही बोलणे झाले नाही. काका प्रवास - जागरणाने शिणलेले. जोगळेकरांनी त्यांना आंघोळीला घरी पाठविले. त्याचवेळी रघुचे प्राण गेले. त्याचे दहन करून रात्रीच्या येत्या बोटीने जोगळेकर त्यांना घेऊन समक्ष आलेले. कोणालाच काय सुचेना.बातमी वाऱ्यासारखी पसरली. गुंडुकाकांकडे किड्यासारखे माणुस जमले. अविला घेऊन बाईची बहिण आली तिने बळेबळेच दोन घोट पेज बाईला प्यायला लावली.

काकांची अवस्था तर बघवत नव्हती. रडुन रडुन त्यांचा घसा फुलला, तोंडातुन शब्द फुटेना. फक्त ओठ तेवढे हलायचे. दुपारनंतर जाोगळेकरांना घेऊन पिसे गुरूजी गेले गुर्जर मात्र वस्तीला थांबले. तातु घाडी आणि त्याची बायको उपाशी

पोटीच बसुन राहिली. एवढा गदारोळ झाला पण म्हातारीने शब्दानेही चौकशी केली नाही. उलट नर्मदेला हाक मारून बोलावून घेतले अन् दार बंद करून टाकले. चार दिवस मागे पडले तरी गुंडुकाका सावरले नाहीत. प्रसंग ओळखून मुले मात्र सावरली. कोणी समाचाराला आले तर,"काही विषय काढू नका" असे ती बजावीत. तातु रात्रंदिवस गुंडुकाकांच्या पायाशी बसुन रहायचा, बळे बळे चहा पेज पाजायचा. पाचव्या दिवशी संध्याकाळी सातच्या सुमाराला गोठ्यातली जनावरे अचानक हंबरायला लागली म्हणून तातु बघायला गेला तर संपूर्ण गोठाभर तुंबसाळी भिरभिरत असलेल्या दिसल्या. एखाद दुसरी माशी गुरांनाही चावलेली असावी. तशाही परिस्थितीत तातुने म्हैस ,तिचे वासरू आणि गाभण गाय याना गोठ्याबाहेर बांधले. मग अविला देवापुढे नारळ ठेवायला सांगुन अंगणातुन ग्रामदेवतेच्या दिशेने हात जोडून तातूने 'जाबसाल' घातली. तो जेवायला गेल्यावर अविने काकांना दुध पाजले आणि सगळ्यानी वाटी-वाटी पेज प्याली. तासाभरातच जेवण उरकुन तातु घाडी आला रोजच्याप्रमाणे मास्तरांच्या पायाला 'भिरंडेल' लावायला घेतल्यावर त्यांचे पाय गार लागले. त्याने 'मास्तरऽऽ' अशी हाक मारली. मग छातीला कान लावून बघितला आणि आणि मोठमोठ्याने हुंदके देत तो रडायला लागला.

घुशीच्या बिळातुन ये-जा करणाऱ्या तुंबसाळी दिसल्यावर हे सगळे रामायण आठवुन अशुभाच्या सावटीमुळे बाई धास्तावली. पण मन घट्ट करून ती घरात गेली. जेवणे होऊन आवराआवर होतेय एवढ्यात 'सावकारनीऽऽ' अशी शंकर कातकऱ्याची हाक आली. बाईने त्याला अन्न वाढले. जेऊन उठल्यावर पान-सुपारी दिली आणि म्हटले, "शंकरा! तुला तुंबसाळीची काय माहिती आहे रे ?" तुंबसाळ हे नाव ऐकुन चमकलेला शंकर म्हणाला, "काय ग्ये? लय वायट् सैतानी माशी ती.

a

आमी एवड्या उलट्या कालजाचे,म्हणशीन त्या गांजील माशीचा जित्ता म्हंव काढणार! पन तुंबसालीची वार्ता बी नाय करणार. त्येच्यावर चाळा आसतो चाळा!" मग दरडीतले तुंबसाळीचे 'ठिव' बाईने त्याला दाखविले. त्याचे काळजीपूर्वक निरीक्षण करून तो म्हणाला,"सावकारनी ह्या दरडीमंदी मातीचा रांजून सारका खलगा ऱ्हायेल. ही तुंबसाल तीते कोटा बांदतो हाये. दोन-चार रोजाला तेचा कोटा पुरा होऊन बीलाच्या तोंडाजवळ कोट्याचा गोल तांब्या एवडा मुख तुंबसाल बांदील. त्ये मुखाला येक माशी जान्याएवडा ढोबळा ठेवनार आनी कोट्यामंदे ही बया वीन काडनार. त्येच्या कोट्यात मद ऱ्हायेल नाय. खाली पीली ऱ्हायेल. आता हेचा कोटा कसला म्हणशील तर ढोराचा शेन आनी कवा कवा मानसाचा नर्क बी लिपतो हे माशी. तेला रातचा काय दिसत नाय तर राती हे आंदला होतो. तवा हेच कोट्याला मुखाजवळ आग लावली का मंग समदा कोटा जलून जायेल एक बी माशी जीती ऱ्हानार नाय तुमचे घराजवल या शैतानी माशीने कोटा बांदला तर आट रोजाला हेचा कोटा बांदून सुकला की मंग मी हिते येऊन तेला धगवून देईल. "

त्यांचे हे बोलणे सुरू असताना अवि परत आला. तुंबसाळीचे 'ठिव' त्याने बघितले अन् शंकराला दहा रूपये देऊन आठ दिवसानी खेप करायला बजावले. मुलीना दरडीच्या बाजुला फिरकु नका अशी तंबी दिली. आता सकाळ संध्याकाळ बाई दरडीकडे लक्ष करी. तिसऱ्या दिवशी शंकराने सांगितल्या प्रमाणे कोट्याचे मुख बांधुन एका बारीक छिद्रातून माशंची ये-जा सुरू झालेली दिसली. बाईने पक्का निर्धार केलेला. कोटा वाळण्यासाठी आणखी दोन दिवस जाऊ दिल्यावर तिसऱ्या दिवशी बाईने दरडीजवळ थोड्या शेणी अन् भारीभर लाकडे गुपचुप नेऊन ठेवली. रात्री निजानिज झाल्यावर ती बॅटरी घेऊन बाहेर पडली. तुंबसाळीच्या कोट्याजवळ

a

येऊन बॅटरीचा फोकस टाकल्यावर मुखावरच्या छिद्रात अर्धवट बाहेर येऊन राहिलेली तुंबसाळ जरा आत सरकली. काही वेळाने पुन्हा ती माशी छिद्राच्या तोंडाशी अर्धवट बाहेर आली.

बाईने कोट्याला धक्का न लागेल अशा बेताने छिद्राच्या खालच्या बाजुला शेणी रचल्या. कोट्याचे मुख झाकले जाईल एवढ्या अंतरात डेगेला टेकून लाकडाचे दळदार ढलपे तिरके सचले. सगळी तयारी जय्यत झाल्यावर शेणींवर घासलेट ओतून बाईने देवाचे नाव घेतले अन् काडी पेटवुन लावली. रॉकेल पेटून भक्कन मोठी ज्वाळ उठली. कोट्याच्या मुखा भोवती रॉकेल ओतून बाई बाजूला झाली आणि चोर पावलानी अंगणात येऊन तीने अविला हाक मारली. आईचे धारिष्ट्य बघून अवि चकितच झाला. त्याने आणखी दोन-तीन जडशीळ लाकडाची टोणकी बीळावर टेकून पुन्हा बाटलीभर रॉकेल ओतले. दरडीच्या मुखाशी आग चांगलीच प्रज्वलीत झालेली बघितल्यावर माय लेकरे घरात जाऊन निर्धास्त मनाने झोपली.

सकाळी उठल्यावर दात घाशीत अविने तुंबसाळीच्या ठिवाकडे नजार केली. सगळे ठिव जाळून खाक झालेले.... बीळातून बारीक धुराची रेघ येत राहिलेली. एवढ्यात मोटार सायकलचा आवाज आला म्हणून अवि वळला तो पर्यंत धाकटे जावई पेठे गाडी घेऊनच अंगणात आले. इग्निशन बंद करून गाडी स्टँड करीत ते म्हणाले,''शमाला मुलगा झाला. पहाटे पाच वाजता डिलीव्हरी झाली. बाळ बाळंतीण दोघेही खुशाल आहेत.'' पेठ्यांचे हे शब्द कानात पडताच अरिष्ट टळले असे मनात म्हणत बाईने देवाला हात जोडले.

◙◙◙◙◙◙◙

a

# ७. शिदोरी

बाळुच्या दत्तकविधानासाठी त्याचे म्हातारे वडिल बापू आणि वडिलभाऊ अण्णामास्तर दामल्यांच्या वाड्यात आले. आपल्याला बघून बाळू धाव मारीत येईल, आपण त्याला पोटाशी घेऊ,बाळू हमसाहुमशी रडत म्हणेल,"बापू ऽऽऽ मी दत्तक गेलो तरी तुम्हाला विसरणार नाही. महिना-पंधरा दिवसांनी घरी खेप करीन."अशी बापूंना तर खात्री! पण कसचे काय, दामल्यांचा प्रशस्त वाडा,गडगंज इस्टेट यांत बाळू एवढा मश्गुल की साधे 'केव्हाआलात?' इतके विचारायलाही त्याला फावले नाही. अपमानाची लाजिरवाणी बोचणी बापूंचे काळीज कुरतडायला लागली. पण आतड्याची माया भोळी! पोराने जवळ येऊन बसावे,चार शब्द बोलावेत ही इच्छा बापूंच्या मनात पुनःपुन्हा उफाळून यायची. बापूंची ही तगमग अण्णा मास्तरांनी बरोबर ओळखली. त्यांना स्वस्थ बसवेना. मान - अपमान बाजुला ठेवून रात्री त्यांनी बाळूला गाठलेच. बाळू नाइलाजाने बापाजवळ येऊन टेकला. "बाळू, अरे, बापूंशी दोन शब्द बोल तरी. " न राहवून अण्णा म्हणाले. मग बाळू बोलला, "अण्णा, बापुंची तब्येत तितकीशी बरोबर वाटत नाही. त्यांची उगाच देसरड कशाला काढलीस ? तु एकटा येतास तरी पुरे होते." तेवढ्यात बाळुच्या दत्तक बहिणीची हाक आली अन् लगबगीने बाळु आत गेला.

a

दामल्यांचे इष्टमित्र, पाहुणे सगळी तालेवार मंडळी. नोकरांनी गाद्या घालून दिल्या अन् एकेकजण आडवा व्हायला लागला. अण्णा आणि बापू बाहेरच्या ओसरीत कोपरा धरून राहीलेले. त्यांच्या अंथरूणा - पांघरूणाची व्यवस्था कोण करणार? लाज-भीड सोडून अण्णांनी एका गड्याला बोलावून विचारले तेव्हा त्याने आतून एक अर्धे फाटके जाजम आणून दिले. ते पसरून नेसूच्या धोतराचा सोगा पांघरूणासारखा ओढून बापलेक झोपले. दिवसभराच्या दगदगीने बापुना पटकन झोप लागली. पण अण्णाच्या डोक्यात मात्र विचारांचे काहूर उठले.

या बाळुसाठी किती खस्ता खाल्ल्या.त्याच्यावर पोटच्या पोरासारखी माया केली. बाळु खुप शिकेल, बॅरिस्टर होईल ही आपली इच्छा! चांगले शिक्षण मिळेल म्हणून त्याला राजापुरात ठेवला! राहायची, जेवायची राजेशााही सोय सान्यांकडे लावून दिली. महिना तीन रूपये अक्षरशः पोट मारून दिले. त्याचे मात्र बाळूने चीज केले. सातवीच्या परीक्षेत चौऱ्याहत्तर टक्के गुण मिळवून बाळू केंद्रात पहिला आला. मग मॅट्रिकपर्यंत त्याला रत्नागिरीत ठेवण्याची वेळ आली. रत्नागिरी शहर बाजार.आता कसे व्हायचे? हा मोठा पेचच पडला! पण हेडमास्तर बर्वे देवासारखे सहाय्याला आले. त्यांचा एक भाऊ रत्नागिरीलाच स्थायिक. त्याला भेटून त्याच्या ओळखीने कुठे काय जमते का ? हे बघायला अण्णा रत्नागिरीत त्याच्या बिऱ्हाडी दाखल झाले. जमले तर बाळूला त्यांच्या लगामी लावायचा अण्णांचा मनसुबा त्यांची बिऱ्हाडाची चिंचोळी पाजोटी बघून पार ढासळला.

बर्वे मास्तरांचा भाऊ बरीच वर्षे रत्नागिरीत राहिलेला. त्याच्या ओळखी खूप. त्याच्या ओळखीनेच एक गृहस्थ दामले सावकार! कोर्टाजवळ त्यांचा ऐसपैस वाडा. वाड्यात दोनच माणसे , दामले आणि त्याची खाष्ट बायको. त्यांना एकच

a

मुलगी. तिही लग्नकार्य होऊन मुंबईत स्थायिक! दोन्ही माणसे वय झालेली. रोजची देवपुजा करायला कोणीतरी ब्राह्मणाचा मुलगा मिळाला तर आम्ही त्याची राहण्या-जेवण्याची व्यवस्था करू, असे त्यांनी बर्वे मास्तरांच्या भावाला सांगितलेले. तो धागा पकडून अण्णामास्तर बर्व्यांच्या भावाबरोबर दामल्यांना भेटायला गेले. दामले सावकार बरा माणूस वाटला. पण त्याची बायको मात्र द्रव्यलोभी आणि भलतीच आढ्यताखोर आहे हे अण्णांनी तिला बघितल्यावरच ओळखले. एकुण रागरंग पाहता बाळूच्या राहण्याची सोय चांगली होण्यासारखी होती. बाळू वाड्यात राहील, रोज देवाची पुजा करील, त्याची जेवणाची सोय आम्ही बाहेर करू असे त्यांना अण्णांनी स्पष्टच सांगून टाकले. बेत नक्की करून अण्णा घरी परतले.

"तिथे नीट रहा, सांभाळून बोल, आपला अभ्यास बरा की आपण."असे बोधामृत बाळूची आई व बापू यांनी बाळूला व्यवस्थित पाजले. अण्णांचा बाळूवर जीव. राजापुरात त्याने जे यश मिळविले, तिथे त्याची जी नावाजणी झाली. त्यावरून त्याला इतके बोधामृत पाजायला नको असे त्यांचे मत. त्यांनी मोठया हौसेने जाण्याची तयारी सुरू केली. दामल्यांकडे गडी माणसांचा राबता. कोणी काही वस्तू लंपास करील म्हणून अण्णांनी देवगडच्या सहस्रबुध्दे यांच्या दुकानातून एक सुरेख ट्रंक आणि कुलूप किल्ली आणली. बाळू रत्नागिरीला राहायचा म्हणून ग्रामदेवतेवर अभिषेक एकादष्णी झाली. चांगला दिवस बघून विठुशेठ तानवड्याच्या बैलगाडीत बसून रत्नागिरीला जाणारी बोट गाठायला विजयदुर्गला रवाना झाले. वाटभर अण्णा त्याला पुनःपुन्हा बजावीत राहीले. "खाण्या पिण्याची हयगय करू नको. कमी -जास्त पैसे लागले तर न संकोचता कळव. मन लावून अभ्यास कर. वेळच्या वेळी खुशाली कळवीत रहा. तू जेव्हा वकील होशील तेव्हाच माझा जीव शांत होईल, थोडा काळ

कष्ट सोसायला हवे. पुजा मन लावून कर. देवाची सेवा करायला मिळते हे भाग्यच आहे. त्यात मात्र टाळाटाळ करू नको. खोलीचे भाडे भरायचे आहे. तर आपल्याला झेपले नसते. पुजेच्या बदल्यात फुकट राहायची व्यवस्था केली हे दामल्यांचे आभारच आहेत हे लक्षात ठेव. ते नाव ठेवतील असे काही आपल्या हातुन घडायला देऊ नको. “

बाळू भावाचा शब्दन् शब्द मनात साठवून ठेवीत राहिला. आपल्यावर जिवापाड प्रेम करणारा, स्वतःच्या धोतराला गाठी मारून आपल्या शिक्षणासाठी तळमळणारा अण्णा त्याला डोंगराएवढा वाटायला लागला. बोलण्याच्या नादात रत्नागिरी कधी आली कळलेच नाही. पडावातून धक्क्यावर उतरल्यावर ट्रंक, वळकटी घेऊन अण्णा पुढे आणि मागोमाग बाळू चालायला लागले. तेलीआळीचा चढ चढून संपला आणि दामल्यांचे घर दिसायला लागले. दामल्यांचा तो ऐसपैस पसरलेला भव्य वाडा बघून बाळूची छाती दडपून गेली.

ट्रंक,वळकटी ओसरीवर ठेवून दोघेही झोपाळयावर बसले. गड्याने वर्दी दिल्यावर ‘सामान घेऊन आतच या’ असा निरोप आला. दामले,सावकार आणि दामलीण काकू दोघेही चौकशी करायला पुढे आली. गड्याने आणून दिलेल्या तांब्यातले पाणी ओतून अण्णांनी बाळूकडे भांडे दिले. त्याचे पाणी पिऊन झाल्यावर आपण पाणी प्याले. तोपर्यंत दामले सावकार हळूहळू पावले टाकत पलंगावर जाऊन टेकले. अण्णांनी भेट म्हणून आणलेला डबा काढून दामलीण कांकूकडे दिला. त्यांनी ताबडतोब फडका सोडून डबा उघडला. आत चार आंगळे लांब-रूंद अंगठाभर जाड अशा केशरी रंगाच्या आंब्याच्या वड्या! त्या बघतच राहिल्या. मग डब्यातली एक वडी उचलून काकुंनी हुंगून बघितली. आमरसाचा आणि मंद वेलचीचा वास येताच

त्यांची जीभ हुळकली. वडीचा एक तुकडा मोडून तोंडात टाकल्यावर त्यांनी एक ठसठशीत मिटकी मारली अन् त्या म्हणाल्या,”जोग मास्तर,या वडीवरून तरी तुमची परिस्थिती सामधाम आहे असे कोणा रांडेच्याला वाटायचे नाही हो.”

दामलीण काकूंची ही अनपेक्षित प्रतिक्रिया अण्णांना मात्र चांगलीच झोंबली. त्यांनीही चरचरीत प्रतिटोला दिला,”हे बघा दामलेकाकू, माझी आई करंदीकर मामलेदारांची मुलगी! जोग तालेवार म्हणून त्यांनी आपली मुलगी आमच्या बापूंना दिली. आमची सुध्दा कुणकवणात मोठी प्रॉपर्टी. पण आम्हाला भाऊबंदांनी फसविले. धडेवाटपात आमची वाताहात झाली म्हणून अशी सामधाम परिस्थिती आली. पण माझी आई मोठ्या हाताची! चार दिवस उपाशी राहील,पण देण्या घेण्यात मागे नाही यायची!”अण्णांनी तिरमिरीशी उत्तर दिले खरे,पण ते चटकन भानावर आले. आपण दामल्यांच्या आश्रयाला इथे आलो,बाळूला दिवस काढायचे आहेत इथे.मग सारवासारवी करीत ते म्हणाले,”आणि आई म्हणाली, “दामल्यांसारख्या बड्या माणसांना भेट द्यायची आहे! आपले हसे होता कामा नये. गरिबांचा तिळथेंब का असेना, त्यांना तोंडात घालावासा वाटायला हवा.”

बाळू दामल्यांकडे चांगलाच रूळला. रत्नागिरीहून बर्वे मास्तरांच्या भावाची पत्र येत. त्यात आवर्जून बाळूची खुशाली असायची. बाळूचे सुध्दा नेमाने पत्र यायचे. चतुर्थी, दिवाळी या सुट्टयांना तो घरी यायचा. खानावळीत जाऊ नको,आमच्याकडे जेव, असा दामल्यांचा आग्रह व्हायचा असेही तो सांगे. त्यांच्या कडील शिसवी पाट, चांदीची ताटे, तांब्या- भांडी, ग्रामोफोन यांचे वर्णन तो करायचा. म्हणता म्हणता दोन वर्षे कधीच मागे सरली. सुरवातीला अण्णा त्याला दरमहा चार रूपये पाठवायचे. तिसऱ्या वर्षी बाळूने सांगितल्यावरून ते एक रूपया जाादा

पाठवायला लागले. या वर्षात मात्र त्याच्याकडून नियमित पत्रे येईनाशी झाली. गणेश चतुर्थीला दामल्यांची तब्येत बरी नसल्याने गणपतीची जबाबदारी त्याच्यावर पडली अन् चतुर्थीला तो आला नाही. दिवाळीतसुध्दा जेमतेम सणाचे चार-पाच दिवस राहूनच अभ्यास पुरा करण्यासाठी म्हणून तो रत्नागिरीला परत गेला. जाण्यापूर्वी त्याने बापूंना सांगितले की, पुढचे वर्ष अतिशय महत्वाचे आहे. सुट्टीमध्ये आमचे जादा वर्ग आहेत म्हणून मी मे महिन्यात येणार नाही.

चवथ्या वर्षी त्याची पत्रे रतीब घातल्यासारखी चार ओळींची असत.

प्रत्येक पत्रात अभ्यासाचा फारच ताण पडतो,हे वाक्य हटकून असायचे. गणेशचतुर्थीत तर बापू, आई सगळीच वाट बघून बघून थकली कारण तो किंवा त्याचे पत्रही आले नाही. बापूंनी त्याला पत्र पाठविले. त्याचे बाळूकडून जे उत्तर आले त्यात तर त्याने अण्णांना नमस्कारसुध्दा लिहिले ला नव्हता. या पत्रामुळे मात्र अण्णा चमकले. त्यानी पत्र पाठवून बाळुला दिवाळीत काही करून येच! असे कळविले. बाळूकडून उशीरानेच उत्तर आले. आपल्या उत्तरात दामलेकाका आजारी असतात. काका-काकू दोघांनाही माझा लळा लागला आहे. मी दिवाळीत घरी जाणार असे म्हणताच काकू रडायलाच लागल्या. असे चऱ्हाट लिहून दिवाळीला मला यायला जमायचे नाही. दामलेकाकू आईला साडी देणार आहेत. त्या दर वर्षी एका गरीब ब्राह्मण सवाष्णीला साडीचोळी करतात. दिवाळी पूर्वी हस्ते-परहस्ते साडी पाठवून देईन,असे बाळूने लिहिलेले.

आता मात्र अण्णा मास्तर हादरले. समक्ष रत्नागिरीला खेप करून बाळूची भेट घ्यायची असा बेत त्यांनी ठरविला. चार दिवसांनी अकल्पितपणे बर्वे मास्तरांच्या भावाचे अण्णांच्या नावे लिहिलेले पत्र आले. बाळू हा दामले काका- काकूंच्या

मर्जीस उतरला असून त्याला दत्तक घेण्याचा त्यांचा बेत ठरला! बाळूला सुध्दा ही गोष्ट मान्य आहे. एवढेच नव्हे, खुद्द बाळूनेच दामले काकूंना ही गोष्ट पटविली. मुलाचे जन्माचे कल्याण होईल. मॅट्रिकनंतर वकिलीचे शिक्षण फार खर्चाचे! अण्णांच्या कमाईवर खर्च झेपायचा नाही. त्यापेक्षा बाळू दत्तक गेला तर त्यांचा भार तरी जरा हलका होईल. घरी पत्र पाठवून ही गोष्ट कळविण्याचे धाडस बाळूला होत नसल्यामुळे त्याच्या विनंतीवरूनच हे पत्र आपण लिहित आहोत असे बर्वे मास्तरांच्या भावाने कळविले.

पत्र वाचल्यावर अण्णांचे मस्तक बधीर झाले. आपण शाळेत आहोत याचेही भान न राहवून ते हमसाहमशी रडायला लागले. काय झाले ते बर्वे मास्तरांना कळेना. त्यांनी लगबगीने अण्णा मास्तरांना हात धरून ऑफिसमध्ये नेले. स्वतःच्या धोतराच्या सोग्याने त्यांचे डोळे टिपले आणि शांत,गंभीर आवाजात त्यांनी म्हटले, “अहो जोग मास्तर,शांत व्हा! एवढे काय आहे त्या पत्रात?” अण्णानी पुढे केलेले पत्र वाचल्यावर बर्वे मास्तरांचेही डोळे पाणावले. त्यांनी चष्मा काढून डोळे पुसले आणि अण्णांच्या खांद्यावर थोपटीत त्यांनी म्हटले, “अण्णा,तू मास्तर असलास तरी मला लहान भावासारखा. मी तुला ओळखतो! सगळ्याच गोष्टी आपल्या मनासारख्या नाही घडत. आपले प्राक्तन म्हणायचे आणि गप्प बसायचे! तू एकच कर, आई बापूंना जप. येणाऱ्या प्रसंगाला तोंड द्यायला तरी ती घट्ट राहीली पाहिजेत!”

पुढच्या सगळया गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडल्या. दामले सावकारांकडची सवाष्णीसाठी पाणी सोडलेली साडी घरी आली. चावदिवसाच्या फराळाचे ताट न उष्टावता जोगांकडची माणसे कसनुशी बसलेली. आई दामलिणी कडची साडी हातात घेऊन रडत बसलेली. चाव दिवस असल्यामुळे बाहेर कोणीतरी फराळ

a

मागायला आले.''काकानुं फळाऽऽर......'' आवाजावरून कोणीतरी बाई आलेली वाटली. बरोबर पोरेही असावीत. कारण त्यांचा कालवा सुरू झालेला. अण्णा मास्तरांची बायको धीर करून उठली. बाहेर कोण आले हे दाराआडून बघितले. सकाळीच न्हाऊन-माखून डोक्यावर कुंकवाचा मळवट भरून कातकरीण पोरांचे लटांबर घेऊन आलेली दिसली. अण्णांची बायको देव्हाऱ्याकडे गेली. कुंकवाची कुयरी घेऊन तिने देवीला हळदपिंजर वाहिली. सासवेच्या हातातली साडी काढून घेतली. तिला एवढे अवसान कुठून आले कोण जाणे? एका पितळीत दिवाळीचा फराळ घेतला आणि तिने कातकरणीला आत हाक मारून खणा-नारळाने तिची ओटी भरली आणि साडीची घडी मोडून निऱ्या काढल्या. साडी कातकरणीच्या हातात देऊन ती म्हणाली,''बाई गो, तू कोणाच्या रूपाने आली आली असशील कोण जाणे. आज सणावाराची दारात आलीस म्हणून नमस्कार करत्ये. एकच आशीर्वाद दे!आमच्या घरातली अवदसा बाहेर जाऊ दे!''

तिने घरात जाऊन मुलांना फराळाला हाक मारली. मुले फराळ करायला बसली. सासू, सासरे, नवरा आणि स्वतःसाठीही केळीचे फाळके मांडून त्यावर फराळाचे जिन्नस वाढले आणि प्रत्येकासमोर फराळाचे पान नेऊन ठेवले. तिच्या आवेशाने दिपलेल्या अण्णा, बापू यांनी काही न बोलता लाडवाची डिखळी मोडून तोंडात टाकली. सासू मात्र अजून गप्पच. सून तिच्याजवळ जाऊन बसली अन् म्हणाली,''सासूबाई, ह्यांची मिळकत कमी असेल, पण जो आहे ते कष्टाचे आहे. दुसऱ्याच्या भिकेवर जगायला लागत नाही हे ही कमी झाले काय? ती कातकरीण फराळासाठी दारोदार भीक मागत्येय.देवाच्या दयेने आम्हाला चार गोडाधोडाचे जिन्नस करण्याएवढी तरी ऐपत आहे हे भाग्य म्हणा! बाळू भावोजी बालिस्टर होऊन

a

काय पांग फेडणार कर्म!! ‘हे’ तुमच्यासाठी थोडे करतात का ? देवाची दया होईल, माझी पोरे-सोरे उद्या मोठी होतील, आपल्या कष्टावर सोन्याचा इमला बांधतील अशी मला उमेद आहे. तुम्ही जगलात नाही तरी उद्या जग बघेल. आता बाळू भावोजींचा अध्याय समाप्त झाला. त्यांना काय करायचे ते करू देत. यापुढे घरातल्या कोणीही हा विषय काढला तर मात्र मी विहिर जवळ करीन. मी सुध्दा भाऊ लिमयांची मुलगी आहे,म्हटल्या शब्दाला मागे येणार नाही. “ मग सासू - सून फराळ करायला लागल्या. जोगांची दिवाळी आनंदात साजरी झाली. महिन्याभराने बाळूचे पत्र आले.

*॥ श्री कुलस्वामिनी प्रसन्न ॥ मिती मार्गशिर्ष शु॥५ शके १८६०*

*तीर्थरूप वडिलांचे चरणी त्रिकाल मस्तक ठेवून बालके बाळकृष्ण याचा शिरसाष्टांग दंडवत! तुमच्या आशीर्वादेकरून मजला दत्तक घेणेचा मनोदय तीर्थरूप दामलेकाका आणि सौ. दामलीण काकू यांनी मला कथन केला. एकूणात विचार करिता तुमच्यावरचा आणि अण्णांवरचा माझा भार कमी व्हावा अशीच दैवाची योजना दिसत्ये. ती दोघे मजला आपल्या मुलासारिखेच करितात. मनाने दत्तकविधान झालेले आहे. केवळ लौकिक जनांसाठी मिती पौष शुध्द ८, शके १८६० गुरूवार रोजी प्रत्यक्ष दत्तक विधान योजिले आहे. बापू, ती. सौ. आई सर्वांनी यावे असा दामलीण काकूंचा आग्रवाचा निरोप आहे. उद्या सगळा वेव्हार माझ्या हातात आल्यावर मी तुमचा भार अण्णांवर पडायला द्यायचो नाही. आता कार्याची गडबड. सगळे मलाच बघायला हवे.*

a

*ती. अण्णा यांसी आणि सौ. वहिनी यांसी श्री साष्टांग नमस्कार. बालके शिदू,कमा,गजानन यांसी आशीर्वाद. लेखन सीमा॥*

*बाळू उर्फ बाळकृष्ण - रत्नांग्री*

दत्तक विधानाचा ठरलेला दिवस जवळ आला. अण्णांच्या बायकोने मागे ठेवलेल्या दोन पुतळ्या नवऱ्याकडे दिल्या. "ह्या मोडा आणि दामल्यांना चांगला दणदणीत आहेर करा. बापूमामंजी नी सासूबाई दोघांनाही रत्नांग्रीस घेऊन जावा." आहेराची खरेदी झाली. जाण्याचे बेत झाले. अण्णांनी ठेवणीतला कोट बाहेर काढला. आईला पुन्हा पुन्हा सांगुनही ती हो म्हणेना. सुनेने पुन्हा पुन्हा फारच आग्रह केल्यावर ती मानी बाई ताड्कन म्हणाली,"दत्तक जायचा विचार बाळूला सुचला ना, तेव्हाच तो मला मेला. खरे तर जनरीत म्हणून एकटा अण्णा गेला तरी सुद्धा पुरे. ह्यांची लोयली आणि कशाला बरोबर नेतो आहे?तिथे रत्नांग्रीस ह्यांच्या साठी कोण एवढे सुकलेले आहे ? त्या बाळयाला आता धरित्री सुद्धा दिसेनाशी झालेली असेल."

अण्णांचे विचारचक्र खंडित झाले.आता मागील दारी आचाऱ्यांची वर्दळ सुरू झालेली. अण्णा उठून मागील दारी जाऊन आले. हंडा तापत ठेवलेला बघितला. जाऊन बापूंना उठवून आणले. नंतर पाहुण्यांची वर्दळ सुरू झाल्यावर गार पाण्याची आंघोळ करण्याची पाळी नको म्हणून दोघांनीही आंघोळी उरकल्या. सकाळी बाजारात वर्दळ सुरू झालेली दिसल्यावर अण्णा बापुंना घेऊन बाहेर पडले. करमरकरांच्या हॉटेलात जाऊन दोघांनीही गोडाचा शिरा खाल्ला,चहा प्याले आणि फिरत फिरत वाड्याकडे माघारी परतले. गळ्यात गोफ आणि हातात सलकडे, बोटात

a

तीन-तीन अंगठ्या घालून बाळू जसा काय हवेतुनच चाललेला! दत्तक विधानाचा मुख्य कार्यक्रम झाल्यावर दामले सावकार, दामलीण काकू, बाळू आणि मुलगी,जावई आहेर घ्यायला बसले. अण्णांनी पाचही जणांना अंगागवडी केलेला आहेर बघून मात्र पाहुणेसुध्दा चांगलेच चमकले. हा आहेर म्हणजे अण्णाने आपल्याला 'शालजोडीतून' दिलेली आहे, हे बाळू उमजला. त्याला ही गोष्ट वर्मी लागली. दुपारी जेवणावेळी सुरू झाल्यावर बाळू अण्णाजवळ गेला अन् त्याला म्हणाला,"अण्णा! अरे, ऐपत नसताना एवढा मोठा आहेर कशाला म्हणून केलास? आम्हाला काय अशी अपेक्षा नव्हती. "

आता मात्र अण्णाचा तोल गेला! भाऊ तुटला तरी चालेल असा निर्णय घेऊन ते फाड्कन उतरले, "बाळू रे,दामले सावकार- सावकारीण तुला लगेच आपली वाटायला लागली काय रे? आम्हाला अपेक्षा नव्हती म्हणे. जन्मदाते अजून जिवंत आहेत तुझे हेही लक्षात ठेव! माझी ऐपत मोजणारा मोठा पैसेवाला गब्रू झालास नाय तू ? आता सलकडे, अंगठ्या मिळाल्यावर लगेच तुला अण्णा भिकारी वाटायला लागला काय रे ? चौदा रूपये पगारातले सहा-सहा,सात-सात रूपये तुला एकट्याला पाठवून उरलेल्या पैशात सहा पोटे जाळायची श्रींमती काय असते हे तुला नाही कळायचे. एक लक्षात ठेव. माणसाचा मोठेपणा त्याच्याकडे किती पैसे आहेत यावर नसतो अवलंबून, त्याने तो कसा मिळवला याच्यावर मोजला जातो या जगात! आणि पैशाने दत्तक विधाने होतात, पैशासाठी दत्तक विधाने होतात, पण आतड्याची नाती नाहीत विकत घेता येत.

हे पैशाचे आमिष तुझ्या अभ्युदयाच्या आड मात्र यायला देऊ नकोस आणि तू जोडलेल्या नवीन नातेसंबंधातही विषासारखे व्हायला देऊ नकोस. तू 'जोग'

a

आहेस. सिंहाच्या डोक्यावर शिंगे बांधली म्हणून त्याला कोणी रेडा म्हणणार नाही की स्वतः सिंहसुध्दा गवत नि पेंड खायला लागायचा नाही. यापुढे तरी निदान जोगांच्या लौकिकाला आणि दामल्यांच्या ऐश्वर्याला जप. संपत्तीच्या लोभापायी जोगाचे कूळ बुडवलेस नी जन्मदात्यांशी प्रतारणा केलीस, आई-बाप काय उघडी पडायची नाहीतय पण उद्या पैशाच्या मदाने दामले काका-काकूंशी फिरून पडलास, त्यांचेच खाऊन त्यांच्यावरच उलटलास हे मला कळले तर मात्र लक्षात ठेव, मी फाटका असेनपण तू आपल्या वर्तनाने आमच्या नावाला काजळी फासतो आहेस असे जर दिसले तर तू जिवंत रहायचा नाहीस!”

बाळू सर्द झाला नी खेटरासारखे तोंड करून बाजूला गेला. बापू - अण्णा फक्त वरण भात खाऊन उठले. रात्री तर त्यांनी दुपारच्या जडान्नामुळे भूक नसल्याची सबब सांगून जेवण नकोच म्हटले. दोन दिवस झालेल्या दगदगीमुळे रात्री अण्णांना गाढ झोप लागली. सकाळी उठून आंघोळी झाल्या. जााणाऱ्या पाहुण्यांच्या सरबराईत बाळू मश्गूल झाला. बापूंना आणि अण्णांनाही चहाची लहर आलेली पण बोट गाठायला जायचे आहेच. मग खेपेतच बाहेर पडूया असे अण्णांनी ठरविले. त्यानी दामलीण काकूला’येतो’ म्हणून सांगितले. “अहा रे मेल्यांनो, भावाला आवरा आवरीला मदत करायला दोन दिवस रहायचे नाही का ? आणि आमच्याकडचा आहेरसुध्दा अजूनी द्यायचा आहे की.” दामलीण म्हणाली. त्यावर अण्णा म्हणाले, “अहो, आम्ही घरचेच. आहेराचे काय एवढे? मागून पुढून पाहता येईल. बापूंना आता दगदग नाही सोसत. आम्ही हळूहळू निघतो. “

अण्णा आहेर पडत असताना बाळूचा गडी अपेक्षेने पाहतो आहेसा दिसला म्हणून अण्णांनी कोटाच्या खिशात पैशाची पिशवी बाहेर काढण्यासाठी हात घातला

मात्र, खिशात पिशवी नव्हती! सगळे खिसे उलटसुलट तपासून झाले. काल झोपण्यापूर्वी पैशाची पिशवी कोटाच्या खिशात ठेवल्याचे पक्के स्मरण अण्णांना होते . आता काय करायचे? काल रात्री मला काळ झोपच लागली, मोकळी ओसरी आणि मोकाट माणसे, भरवसा तरी कोणाचा नी कसाद्यायचा ? घरी परत जाण्यासाठी परतीच्या भाड्याचे काय ? बरोबर म्हातारा बाप, लांबचा पल्ला, अण्णांना भवजळ आठवले. पण काही झाले तरी आधी इथून बाहेर पडायचे. पुढचे पुढे....गणपती गजाननावर भार टाकून बापूंना घेऊन अण्णा बंदराकडे निघाले.

बापूंना चहाची जोरदार तल्लफ आलेली होती. दामल्यांच्या बेड्यातुन बाहेर पडता पडता,''कुठे तरी बरासा चहा घेऊया''असे बापूंनी म्हटले. ऐकले न ऐकलेसे करून अण्णा चालीला लागले. सकाळची थंड वेळ, 'पण पुढे काय करायचे' या चिंतेने अण्णांना घाम फुटला. सख्खा भाऊ इथे असल्यामुळे स्नेही - सोबती गाठून पैसे मागायचीही चोरी. घामाघूम झालेल्या अण्णांनी मग कोट काढून हातावर घेतला. तेली आळीचा उतार आल्यावर त्यांनी मागे नजर केली. बापूंना एक पिशवी पण तीही जाड झालीसे दिसले म्हणून अण्णा थांबले. बापू जवळ आल्यावर पुढे होत अण्णांनी त्यांच्याकडची पिशवी आपल्या हातात घेतली. या गडबडीत हातावर ठेवलेला कोट खाली पडला. पिशव्यांसकट खाली वाकून दोन बोटांनीच त्यानी कोट उचलला. नेमका कॉलरचा भाग घरला गेला अन् बोटांना काहीतरी जाड लागले.

अण्णांना एकदम आठवण झाली. लख्ख्कन हजारो सूर्य नजरेपुढे तळपून गेल्याचा भास त्याला झाला. अण्णा पहिल्यानेच नोकरीवर रूजू व्हायला जाताना आईच्या पाया पडले. तेव्हा तिने जीव जीव म्हणून जपलेला राजा छाप चांदीचा

रूपया त्याच्या हातावर ठेवला.अण्णांनी तो खर्च न करता कोटाच्या कॉलर जवळील चोर खिशात ठेवला. त्यांनी झटकन चोर खिशातून रूपया काढला अन् हातावर घेतला. गरज फक्त आठ आण्याची! दोघांचे बोटीचे तिकीट प्रत्येकी चार-चार आणे!! त्याकाळी दुकानदार चांदीच्या रुपयाचे चार आणे जादा म्हणजे सोळा आण्या ऐवजी वीस आणे देत. ऐन मोक्याच्या क्षणी आईची शिदोरी कामाला आली. अण्णांचे मन भरून आले. आतापर्यंतचा सगळा ताण क्षणातच शिथिल झाला. ‘बाळू, या रूपयाची सर दामल्यासावकाराच्या गडगंज इस्टेटीत नाही रे. आई,बाप,भाऊ या नात्यांच्या मोबदल्यात तू इस्टेटीचा सौदा केलास पण लौकिकाची शिदोरी, मायेची शिदोरी गमावलीस तू! परमेश्वरा, आत्ता माझ्यावर आली होती अशी सत्वपरीक्षेची वेळ माझ्या बाळूवर कधी आणू नकोस, कारण त्याच्याकडे आता आईच्या मायेची शिदोरी नाही... आणि अशी वेळ त्याच्यावर आणलीसच तर त्याच्या चोरखिशात एक रूपया राहील अशी शिदोरी तरी तू त्याला दे!!”

तेली आळीच्या उतारावरून खाली उतरून गेल्यावर नाक्यावरच्या पटवर्धनांच्या हॉटेलात जाऊन दोन पैशांचा चहा अण्णा - बापू प्याले अन् बंदराच्या रस्त्याला लागले.

◘◘◘◘◘◘◘◘

# ८. भुतां रडचत

ॐ ऽऽ ॐ ऽऽऽऽ ॐ असा गळा काढून रडण्याचा भीषण सूर कानांवर आला. ओसरीवर आप्पा आजोबांच्या कुशीत झोपलेला नातू बाळ्या भेदरून जागा झाला. खोतांच्या घराखाली मळ्याच्या कडेला अस्ताव्यस्त वाढलेले सुरमाड, त्यांच्या कवाथ्यात बसून रात्री - बेरात्री कांडेचोर सुर ओढायचे. त्यांचे ओरडणे हुबेहुब माणसाच्या रडण्यासारखे! दुपारी भेंडीतल्या काळू आत्त्याबरोबर तिची मुलगी मथी आलेली. मथी बाळ्यापेक्षा पावणेदोन वर्षांनी मोठी, पण बोलण्यात भारी पाष्ट! तिच्या घरात आजी, पणजी,परत आलेली आत्ते नि चुलत आज्जी असा सोवळ्या म्हाताऱ्यांचा भरणा. मथी त्यांच्या घोळक्यात बसून त्यांची बोलणी कान पाडून ऐकायची अन् त्यांचेच अनुकरण करून ओख्खाबाई सारखे वाह्यात बोलायची. संध्याकाळी बाळ्याबरोबर परवचा म्हणून झाल्यावर.मथीने काहीबाही भुतांच्या गोष्टी त्याला सांगितल्यान्. “मध्यान् राती भुतां काजी भाजोनी खाचत. मग गरांच्या वाटणी वरनी तेंचा भांडण होचे, मारामाऱ्यो होचत नी मार बसलेली भुतां रडचत. तेंचा रडणां अपशकुनी सचे. ती माणसाच्या मानेवर बसचत. एकदा बेसल्यावर मग ती झाड सोडव्वेची नाय.” असल्या काय बाय गोष्टी आयकूनबाळ्या भलताच टरकलेला!

रात्री कांडेचोरांचे रडणे ऐकल्यावर तो गर्भगळीत झाला. “आजोबाऽऽ भुता रडेवे लागली सत....” असे म्हणत तो आजोबाला बिलगला. कांडेचोरांची ‘कुयेल’वाढली तशी बाळ्याचा धीरच सुटला. मुठी वळून हात आवळीत बाळ्या

ताठ झाला. बाळया नवसासायाने झालेला. म्हणून त्याचे नाक टोचून नाकाच्या उजव्या पाळीत सोन्याची मुदी घातलेली. बाळया आकडी येऊन ताठ झाला. त्या गडबडीत त्याच्या नाकातल्या मुदीत आप्पांच्या अंगावरचे बुरणुस अडकले. नाकपुडी फाटून भळाभळा रक्त यायला लागले. म्हाताऱ्याने बोंब मारली नि घरातली माणसे ओसरीवर जमली. बाळयाच्या तोंडातून फेस अन् नाकातून रक्ताचा ओघळ आलेला. काय करायचे कोणालाच काही सुधरेना. धोंडू गड्याने प्रसंगावधान दाखवीत त्याच्या डोईवर पाणी थोपटले, कांदे आणायला सांगितले. कांदा फोडून हुंगवल्यावर बाळया सावध झाला. पण तो बराच वेळ काहीही बोलेना. मग त्याचे वडिल भाऊ खोत धोंडूला घेऊन मिराशी वैद्याला आणायला गेले.

खोत समक्ष आले म्हणताना वैद्यबुवा लगबगीने घराबाहेर पडले. पोराची नाडी बघता तो फार घाबरलेला आहे हे वैद्यबुवांनी ओळखले. कसलेसे भस्म मधात घालून चाटवल्यावर बाळया सावध झाला. गरम पाण्याने त्याचे तोंड धुऊन नाकावर कसले तरी पाळ उगाळून लेप काढून झाला. बाळयाला गुळपाणी दिल्यावर वैद्यबुवांनी खोदून खोदून चौकशी केली. तेव्हा भुते रडतात नी ते ऐकल्यावर भीती वाटली असे बाळया म्हणाला. वैद्यबूवा हसत म्हणाले, “भुतां कसली ना काय्, ते कांडेचोर रडचत. तेनां घाबरेवे नाकां. भीती वाटचे तर राम राम म्हणवेचा. रामाचा नाव आयकोन भुतां पळचत. खोतानो,तेला एकदा कांडेचोर रडेवे लागले की न्हेवनी दाखवा. मग तेला भीती वाटवेची नाय. नायतर एखादो कांडेचोर मारोनी दाखवा.”

पुढे आठवडाभर वैद्यबुवा रोजा सकाळ-संध्याकाळ खोतांकडे यायचे. त्यांनी स्वतःबाळयाला रामरक्षा शिकवली. बाळया घाबरतो म्हणून रोजा रात्री धोंडू गडी आगरभर फिरायचा. सुरमाड,जुनाट अष्ट,आंबटांबा ही कांडेचोराची आदस्थाने.

a

बचक्याएवढे दगड झाडांवर मेखलावीत “हाड् रे झ्यो ऽऽ झ्यो....तुज्यो मायची.....”असे ओरडत तो कांडेचोरांना पिटाळायचा. एकदा बाळयाला खांद्यावरून न्हेऊन भाऊ खोतांनी कांडेचोर दाखवले. आंब्याच्या फांद्यावरून धावणारे ते विचित्र प्राणी बघून बाळया मनात घाबरलाच. कुळकुळीत काळ्या करडया रंगाचे,माजलेल्या बोक्याएवढे, अंगावर बोट बोट लांब भीस असलेले, कोल्ह्यासारखे झुबकेदार शेपुट असलेले,हिरवे डोळे लकलकावीत धावणारे कांडेचोर चार सेलच्या विंचेस्टर ‘ब्याटरीच्या’ झोतात धावणारे कांडेचोर दाखवून भाऊ म्हणाले, “ते कांडेचोर सचत नी ते रात्री फळांखाचत, नी तेंचा पोट भरले वर ते रडचत....तेंना किणला घाबरेवेचा?”

खोतांचे भले मोठे आगर. नारळ, पोफळी, केळी, अननशी तर कितीक. फळे खाण्याला लबुद असलेले कांडेचोर न येते तरच नवल!या शिवाय आंबे, चिक्कू, पेरू, पोपये, आंबे, फणस, भोकरे, चिकणे, दाभणे, तोरणे,हसोळे अष्ट आणि उंबर यांची फळे , शिवाय आगराच्या कडेला हारीने लावलेल्या वाव वाव लांब केळघडानी वाकलेल्या शेकडो केळी. अशी बारमास नानाविध फळे मिळायची. खेरीज विहिरीजवळच्या दोणीत, खालच्या भरडातल्या डुरे बावीत कायम पाण्याची सोय. मळ्यालगत आगराच्या कडेला गगनावेरी उंच गेलेली सुरमाडांची झाडे. पावसाळा सरताना सुरमाडांच्या कवाथ्यातून घोडूयांच्या शेपटासारखा दोन-तीन हात लांबीचा घोस बाहेर पडायचा. घोसातल्या प्रत्येक तंगुसावर आंगळ आंगळ अंतराने सोललेल्या सुपारीएवढी फळे धरायची. मग तर दीर्घमुदत खाण्याची बेगमीच व्हायची. सुरमाडाच्या फळाना तर कांडेचोर भलतेच लबूद! हे कांडेचोराचे आवडते खाद्य.

a

सुरमाडांवर फळे धरून ती पिकायच्या बेताला आली की अलम दुनियेतले कांडेचोर खोतांचे पडण जवळ करायचे. जुनाट झाडांवरच्या असंख्य ढोलीमध्ये ते वीणी काढायचे. रात्री-बेरात्री त्यांची झोंबटे लागायची. तुडुंब खाऊन अंगणात,दोणीच्या कडेने कुठे- कुठे ते हगून ठेवायचे. त्यांच्या विष्ठेत खाल्लेल्या बियांचा कचकल असायचा. बाळयाला फिट आल्यावर पंधरवडाभराने गोठ्याच्या छपरावर बसून कांडेचोर रडायला लागला. " ही भुतां रडेवे लागली" तशी अंगणात नेऊन त्याला रडणारा कांडेचोर दाखवला. "झ्योऽऽऽ झ्यो"करीत एक लांब 'ताज' (बांबूची काठी) घेऊन धोंडूने त्याला हुसकून लावले. भुताच्या रडण्याचे इंगित बाळयाला कळले. कांडेचोराबद्दलची दडसही जारा कमी झाली. पण महिना-पाऊण महिन्याने त्याला आकडी यायची ती काही कमी होईना. कसलाही हासभास नसताना एकाएकी मुठी आवळून बाळया खाली कोसळायचा. झोपाळयावरून, दरडीवरून, उंबऱ्यात कुठे कुठे अवघाती पडून त्याला जखमा व्हायच्या. कांदा फोडून हुगवीपर्यंत त्याच्या तोंडातून फेस येत राहायचा. हे नसते नष्टचर्य बाळयाच्या मागे लागले म्हणून म्हातारा धास्तावला.देवदेवस्क्या, नारळ, भात -कोंबडे सुध्दा उतरून झाले.

नेहमीच अशी आकडी यायला लागल्यावर बाळयाला लांब लांबच्या वैद्यांकडून उपचार करवून झाले. प्रिंदावणचे पेंढाकर वैद्य,विजयदुर्गातले दत्तूशेठ देवरुखकरकर वैद्य,खारेपाटणचे खडपेकर डॉक्टर३सगळयांना दाखवून झाले. पण बाळयाच्या आकडीचे निदान होईना. जुजबी गुण यायचा. पूर्वी दर चार आठ आकडी यायची. औषाधांचा मारा झाल्यावर वरचेवर येणारी दीर्घ मुदतीने म्हणजे दोन तीन महिन्यानंतर येई एवढेच. बाळयाघाबरल्यामुळे असे होते हेच सगळयांचे अनुमान यायचे. बाळयाची भीती घालवण्यासाठी धोंडू गडी काय काय हिकमती करायचा.

कांडेचोर गुळाला लंपट! धोंडूने काटेरी चापाला गुळाचा खडा बांधून तो अष्टाच्या मुळात ठेवला. गुळ खायला गेलेल्या कांडेचोराची मानच काटेरी दात्यांमध्ये गावली. चापात अडकून मेलेला तो कांडेचोर मुद्दाम बाळयाला दाखवण्यात आला. बाळयाने धिटाईने त्याच्या अंगावरच काठीचे तडाखेसुध्दा लगावले. दोन-चार दिवसांनी कांडेचोर दाखव म्हणून बाळ्या मागे लागला. मग मुद्दाम बर्कनदार बाणून खोतांकडच्या बंदूकीने कांडेचोराची पारध झाली. मारलेले कांडेचोर धोंडू ‘सागोती’ म्हणून न्यायचा.

कांडेचोर निव्वळ फळांवर जगणारा. त्याच्या अंगाला जरा घुडस परमळ आला तरी त्याचे मटण भारी चविष्ट. कांडेचोर मांजरासारखा दिसतो म्हणून मराठा समाजाचे लोक तो खात नसत पण कुळवाडी,कातकरी मुद्दाम पारध करून कांडेचोर मारीत. बाळयाची भीती घालवण्याच्या निमित्ताने धोंडूची चांगली सोय व्हायला लागली. मात्र बाळयाची ‘फिट’काही कमी होईना. खोतीण त्याला घेऊन पुण्यात भावाकडे खेप करून आली. पुण्यात दोन महिने राहून विलायती डॉक्टरांचे उपचार करून झाले. इंग्लिश औषध-गोळयांनी जरा गुण आला खरा पण त्या औषधांनी बाळया कायम झोपेच्या गुंगीत राहायचा. दिवसा उजेडी कधिही नी कितीतरी वेळ बाळया सुस्तावून निजून रहायचा.इंग्लिश’दव्याचा’ हा भलताच परिणाम लक्षात आल्यावर मात्र म्हाताऱ्याने औषध-गोळया फेकून दिल्या. ‘ या औषधांपेक्षा आकडी आलेली परवडली’ म्हातारा त्राग्याने म्हणाला.

बाळया आताशी शाळेत जायला लागला. पहिले तीन चार महिने बरे गेले. कारण बाळया जोमतेम तासभर शाळेत रमायचा नि परत यायचा. हळूहळू तो नियमित जायला लागला. त्यातच एकदा त्याला वर्गात आकडी आली. खोतांचा

a

मुलगा, नवस- सायासाने झालेला. त्यातही त्याच्या आकडीची विचित्र तऱ्हा बघितल्यावर गुरूजींच्या अंगाने घाम उतरला. दोन-तीन वेळा असे प्रकार झाल्यावर वर्गातली पोरे त्याला चिडवायला लागली. खोताचा बाळ्या याऐवजी ती त्याला 'फिटयेरा बाळ्या'म्हणायला लागली. मग घरापर्यंत तक्रार गेली. आप्पा खोत नातवाची बाजू घेऊन शाळेत गुरूजींना भेटायला गेले. न्याय झाले. बाळ्याने ज्यांची ज्यांची नावे सांगितली त्या पोरांना गुरूजींनी खोतांच्या समक्ष बेदम झोडपून काढले. त्यानंतर थोडे दिवस बरे गेले. त्याची कळ कोणी काढीनासा झाला. मार खाल्लेल्या पोरांनी मात्र डुख ठेवला. बाळ्याला कोणी खेळायला घेईना. शाळेत जाताना -घरी येताना काहीतरी निमित्त झाले की पोरे त्याला 'गप ऱ्हव फिटयेऱ्या' म्हणायची. स्वतःची आगळीक असली की बाळ्या गप्प बसे. काही वेळा फिटयेरा म्हणणाऱ्या पोराची तो पाठ घेई. बाळ्या अंगपिंडाने चांगला आडदांड. वरच्या वर्गातल्या पोरांनासुध्दा त्याच्या वार्तेला जायची हिम्मत होईना. पण पोरे भलतीच बाजंदी. तीन-चार पोरे एका मेळाने बाळ्याला मारीत. एक - दोन वेळा हा प्रकारही त्याने सहन केला. त्यानंतर अशाच प्रकारची पुनरावृत्ती झाली. या खेपी बाळ्याने चांगले बचक्या एवढे धोंडे पोराना मारले. एका पोराचे डोके फुटले. गुरूजींकडे तक्रार गेली. खरे तर पोरांनी मुद्दाम बाळूला पिसळवलेला पण गुरूजींसमोर सगळ्या पोरांनी संगमताने खोटे-नाटे सांगून बाजू बाळ्याच्या अंगावर उलटवली.

तक्रार म्हाताऱ्याच्या कानी गेली. त्याने बाळ्याला नीट विचारून घेतले. पोरे संगमताने त्याला त्रास देतात हे चाणाक्ष खोताने ओळखले. त्याने गुरूजींना नीट सगळे समजावुन सांगितले. त्यांनाही ही गोष्ट पटली. काही गरीब पोराना बाजूला घेवून विचारल्यावर पोरे त्याला एकटा टाकतात,एकमेकांशी संगनमत करून त्याला

पिसळवतात हे त्यांच्याही लक्षात आलेले. या वेळीही दोन-तीन आगावू पोरांना गुरूजींनी मार दिला. पुन्हा थोडे दिवस बरे गेले. पण पोरे बाळयाच्या जाशी धुमालाच लागली. आता पोरे त्याची कळ काढीनात. पण आपापसांत एकमेकाला 'गप बस फिटयेऱ्या.... इलो मेलो फिटयेरो' असे म्हणायची. बाळया रागाने लाल व्हायचा,पण त्याला पारिपत्य काय करता येईना. हा प्रकार अतीच व्हायला लागला तेव्हा मात्र एक दिवस बाळयाने जाहीर करून टाकले." में मेलो तरी शाळांत जायवेचो नाय." त्याच्या तक्रारी निस्तरून कंटाळलेल्या आजोबानेही म्हटले, "बाळो,चार यत्ता शिकलो तेवढां पुरे. नायतरी शाळा शिकोनी काय मोठो बालिस्टर होणार से? माजी सगळी इष्टेट कोण खाणार से? से ताच तेच्या सात पिढ्यो खावनी सरवेचा नाय. शिरां पडो त्या शाळेवर!"

कांडेचोरांची पारध आणि दोन तीन महिन्याने येणारी आकडी या दोन गोष्टी सोडल्या तर बाळया अगदी गुणी. अंगा पिंडाने एवढा आडमाप की उभ्या गावात त्याचे मनगट धरायची हिंमत कुठल्या ताकदवान गड्याला झाली नसती. शिक्षण सोडून घरी बसलेला बाळया घरच्या कामात लक्ष घालायला लागला. केळी,चिकू, पोपये, अननशींची राखण करण्यासाठी चार-दोन दिवसांनी तो आगरात फिरायचा. धोंडूचा मुलगा सोन्या त्याच्याच बरोबरीचा. दोघे कांडेचोरांची पारध करायचे. ते आगर सोडून बाहेर जात नसत म्हणून घरातुनही त्यांच्या फिरण्याला आक्षेप आला नाही.

त्या वर्षी कांडेचोर भारीच बोकाळले. दिवसा उजेडी सुध्दा चुकार-माकार कांडेचोर फिरताना दिसायचे. आंबा,अष्ट,वड यांवरची बिळे त्यांना पुरेनात की काय

a

कोण जााणे. त्यांनी गुरांच्या गोठ्यात माळयावर गवतात वीण घातली. गोठ्याच्या छपरावरचे नळे,कोने बाजूला करून ते माळयावर उतरायचे. गोठ्यात जिथे तिथे गळती झाली. पण माळयावर बेगमीचे गवत भरलेले. काही इलाज चालेना. राहत्या घरातही त्यांनी हैदोस घातला. देवाच्या मंडपीवर, शिंकाळयांवर काय वस्तू ठेवायची सोय व्हायली नाही. रात्री-बेरात्री माळयावर त्यांचा नुसता धुडगूस चालायचा. दडादडा धावताना कांडेचोर वस्तुंची सांड लवंड करीत. डब्यांची झाकणे उघडून आतल्या वस्तू खाईपर्यंत त्यांची मजल गेली. केळघडाचा एखादा फणा जरा उजळला की त्यांनी केळयांचा फन्ना केलाच म्हणून समजा. कोठीच्या खोलीत माळवदाला टांगून ठेवलेले केळघड,तोवशी, भोपळेसुध्दा त्यांनी फस्त केले. स्वयंपाक घराच्या कोपऱ्यात ठेवलेले लेपवणाचे नी उरलेसुरले अन्न टाकलेले पातेले तर रोज उपडे केलेले असायचे.

कांडेचोरांच्या येण्याजाण्याच्या वाटा ठरलेल्या असायच्या. घराच्या मागील बाजूला असलेल्या दरडीवरून ते छपरावर उडी मारीत. सोन्या आणि बाळया तिथे दडून बसायचे. कांडेचोर दबकत दबकत पुढे आला की त्याने उडी मारण्यापूर्वी काठीचा तडाखा बसून तो आडवा व्हायचा. पण कांडेचोर मरायला भरी लोचट. दोन-तीन फटके खाऊन रक्त ओकत आडवा पडलेला कांडेचोर सकाळी तिथे दिसत नसे. त्याच्या पोटाला दोरीचा फास टाकून मांडवाच्या खांबाला बांधून ठेवला तर सकाळी तोच कांडेचोर खांबावर चढताना दिसायचा. म्हणून त्याचे पोट वर - खाली व्हायचे बंद होऊन तो पुरा मरेपर्यंत काठीने बदडून काढावा लागे.

संध्याकाळी बाळया नि सोन्या दूध काडायला गोठ्यात गेलेले. गोठ्यात माळयावरील काठ्यांच्या साटीतून कांडेचोरांच्या पाच - सहा शेपटया हारीने

लोंबताना दिसल्या. बाळया भारी हिकमती! गुपचुप पुढे जाऊन त्याने डाव्या उजव्या हातात मिळाल्या त्या शेपटया गच्च ओढून धरल्या. अडकलेले कांडेचोर 'च्रींऽऽऽच्रींऽऽ'करायला लागले. सोन्या दांडका घेऊन माळयावर चढला. गवताची हुसका हुसकी करीत त्याने कांडेचोर शोधले नि दांडकावून आडवे केले. एका खेपेला पाच कांडेचोरांची पिल्ले मिळाली. पण असे मारून कांडेचोर कुठले कमी व्हायला? गोठ्याच्या माळयावर सांदीफटीतून धावणारी पाच-पंचवीस पिल्ली सोन्याला दिसली. सोन्या-बाळयांची रात्री नेमाने फेरी व्हायला लागल्यावर कांडेचोरही शहाणे झाले. ब्याटरीचा फोकस दिसला की दडून राहायचे.त्यांच्या येण्या-जाण्याच्या वाटा बदलल्या. त्यांच्या फिरण्याच्या वेळाही बदलल्या.

कांडेचोरांचा उपद्रव अतीच झाला तेव्हा मात्र अप्पांनी खुप विचार करून वांदरमाऱ्यांना बोलावून घ्यायचे ठरविले. सराई आल्यावर उन्हाळा सुरू झाला की पाच-सहा वांदरमाऱ्या कातकऱ्यांची जोडपी कलंबईच्या वाडीत सड्यावर मुक्कामाला असायची. धोंडू गडी मुद्दाम कंलबईत जाऊन कातकऱ्यांना आवतन देऊन आला. दुसऱ्या दिवशी मध्यान्हीला शंकर कातकरी,त्याची बायको जानी आणि भाऊ रोंग्या अशी तिघे वाड्यासमोर येऊन अंगणात बसली. खांद्यावरचा कामठा (धनुष्य) पडवीच्या खांबाशी ठेवून "सावकार"अशी हाळी शंकराने मारली. तिघेही पावळीत बसली. त्यांचा कुत्रा खळयाच्या पेळेजवळ बसला. तिघांनाही केळीच्या फाळक्या वरून जेवण देऊन कुत्र्याला दोन भाकऱ्या धोंडूने टाकल्या. पण कुत्रा भाकरीला तोंड लावीना.

"तेला वाटता काय की,भाकऱ्या आमाला ठेवलेल्या हायेत. तवा तो तोंड लावणार नाय. तिकडे लांब पालंदीत व्हेवुन घालशाल तरच कुत्रा खाईल. आमच्या

पालावर उघड्या ताटा- टोपात आन्न आसते. पण कुत्रा विरड विरड सामनी बसून रायला तरी त्वांड लावणार न्हाई.'' शंकर म्हणाला. कुत्र्याला लांब पाळंदीत नेऊन भाकऱ्या टाकल्या तेव्हाच त्याने तोंड लावले. जेवून झाल्यावर त्याच पानाच्या खोलप्यातुन ताक पिऊन कातकऱ्यांनी ढुंगणाला हात पुसले. पान खाऊन झाल्यावर शंकर उठला. "आता कांडेचोराचा ठिकाणा दाकवा'' रोंग्या म्हणाला. रोंग्याचा उत्साह बघून सगळयांना हसू आले. कारण त्याचे ध्यान होतेच तसे. लहानपणी पायावरून ताप गेल्यामुळे त्याच्या पायाच्या गडख्या झालेल्या. हातात चपला घालून तो ढुंगणाने फरकट्या मारीत मारीत फिरायचा. त्याला धड उभेही राहता येत नव्हते. हा कसली कर्माची पारध करणार ? असेच सगळयांना वाटले.

कातकरी आल्याची वर्दी लागुन पाच-पन्नास माणसे खोतांच्या घरापुढे जमली. सगळे लमांडर आगरातल्या आंबटांब्याकडे निघाले. सहा पुरूष सरळसोट,दोन गड्यांच्या वेंगेत गावणार नाही एवढे आंब्याचे खोड. त्यावर चार फाटे फुटून अस्ताव्यस्त वाढलेले. दोन फाटे सरळसोट गगनाला भिडलेले नि दोन फाटे जामिनीस समांतर पालखीच्या दांड्यासारखे आडवे गेलेले. आडवे फाटे चढायला भारी अवघड. त्याच्यावरचे आंबे काढायलासुध्दा कोणी गडी चढायचे धाडस करीना. नेमक्या त्याच आडव्या फाट्यांवर कांडेचोरांनी बिळे केलेली! हा कातकरी बिळापर्यंत पोहोचणार तरी कसा ?हाच प्रश्न बघ्यांच्या मनात आला.

आंबटांब्याचे चारी अंगानी फिरून निरिक्षण केल्यावर रोंग्याने दोरी आणायला सांगितली. दोरीच्या एका टोकाला दगड बांधून शंकराने दोरी आंब्याच्या एका फांदीभोवती टाकून घेतली. दोन्ही टोके जुळवून त्याने नि जानीने दोरी ताणून धरली. आता रोंग्या पुढे झाला. चार हात लांबीची आंबाड्याची रशी त्याने

a

कमरेभोवती बांधून घेतली. दोन्ही हातांवर थुंकून तळवे घासले नि दोरी हातात पकडून तो वर जाऊ लागला. आंब्याच्या बेचक्यात पोहोचल्यावर जरा दम खाऊन रोंग्या आडव्या फांद्यावर बसत बसत फरकटूया घालीत बिळापर्यंत पोहोचला. जमिनीवरून शंकराने, “हां, वांयच् फुडेजाजऽऽरा. हां बास,बराबर , तुज्या पायाशी खायल्या आंगाने बील हाये,” अशा सुचना दिल्या. योग्य जागा गाठताच रोंग्याने कमरेची रशी सोडली. आंब्याच्या फांदीभोवती तिचा पक्का फास टाकला. दोरीच्या दुसऱ्या टोकाला सरक फास करून त्यात दोन्ही पावले अडकवली आणि दोरी हातात धरून स्वतःला फांद्यावरून ढकलून घातले.बघ्यांच्या काळजाचा ठोका चुकला.

दोरीच्या फासावर लोंबकळणाऱ्या रोंग्यांच्या तोंडासमोरच कांडेचोराची ढोल. त्याने हाताने फांद्यावर धडाधडा फटके मारले. बिळातले कांडेचोर ‘च्राँऽऽ च्राँ ऽऽ राँ ऽऽ राँ ऽऽ ‘ असा आवाज करू लागले. त्यांचा आवाज ऐकून कुत्रा भुंकायला लागला. रोंग्या बिळातून आत हात घालायचा प्रयत्न करू लागला, पण त्याचा हात आत जााईना. “संकर घब लई न्हानी हाये,हात भतूर जाईत न्हायी” रोंग्या ओरडला. त्यावर शंकर म्हणाला,तू फांद्यावर चढ. मी तुला तीर देतो. तेने घब रूंद कर” रोंग्या खांद्यावर चढून बसला. शंकराने कामठ्यावर वादी (प्रत्यंचा) चढवली आणि नेम घेऊन तीर सोडला.

शंकरचा तीर अचूक रोंग्या बसला त्या जागेला खालच्या अंगाने सप्पकन फांद्यात रूतला. पुन्हा रशीवर लोंबकळत रोंग्याने तीराच्या पात्याने तासून तासून घबीचे तोंड रूंद केले. मग बेदकारपणे हात घालून तंगडीला धरून कांडेचोर बिळाबाहेर पेचून काढला. त्याला फांद्यावर धडाधडा आपटून तो गप्प झाल्यावर फांद्यावर आडवा ठेवला तेवढ्यात बिळातून एक कांडेचोर बाहेर आला आणि त्याने

सरळ जमिनीवर उडी मारली. पण कांडेचोराने जमिन गाठण्यापूर्वी कुत्र्याने अंतराळी उडी मारूनच त्याला पकडले आणि ठार मारले. दोन्ही कांडेचोर जमिनीवर फेकून रोंग्या दुसऱ्या फांद्याकडे निघाला. दुसऱ्या फांद्यावर२/३ बिळे! एका बिळातले कांडेचोर काढीत असताना दुसऱ्या बिळातून बाहेर आलेले कांडेचोर शंकरने जमिनीवरून तीर मारून टिपले.

कातकऱ्यांची पारध बघून बाळयाच्या नजरेचे पारणे फिटले. त्या संध्याकाळी आंबटांब्याकडे बिळातले चौदा कांडेचोर कातकऱ्यांनी मारले. त्यांतल्या आठ कांडेचोरांचे गठळे बांधून रोंग्या कंलबईच्या वाडीत वस्तीवर गेला. शंकर नि जानी घोव बायले वसतीला राहिली. त्यांनी जवळचे कांडेचोर कुळवाड्यांना विकून मिळालेल्या पैशाची दारू खाऊन दोघेही रात्री तर्रर होऊन वाड्यावर आली.रात्री न जेवताच दोघेही गोठ्याच्या पडवीत ढकलली. त्या रात्री मात्र कांडेचोरांचा कुठे पायरवसुध्दा ऐकू आला नाही. दुसरे दिवशी अष्टावरच्या ढोलीत कातकऱ्यांना दोन-तीन बारकी पिल्ले मिळाली. सगळ्या कांडेचोरांना कातकऱ्यांचा माग लागल्यामुळे ते भिऊन सड्यावर पळून गेले असावेत असे धोंडू म्हणाला.

बाळयाची कातकऱ्यांशी चांगलीच गट्टी जमली. तो कवडे मारून द्यायला त्यांच्याबरोबर बंदूक घेऊन रानतळयावर गेला. तिथे त्याला फीट आल्यावर कातकऱ्यांनी त्याला अच्चळ उचलून घरी आणले. अलिकडे फीट येण्यापूर्वी बाळयाला समजायचे. फीट येण्यापूर्वी तो “आयलीऽऽऽआयली”असे ओरडायचा. कातकऱ्यांनी कसल्याशा पाल्याचा रस त्याच्या नाकात पिळून कांदा न हुंगवताच त्याला शुध्दीवर आणला. बाळयाच्या आकडीवर हुकमी औषध शंकराने सांगितले.

a

पण ते मोराच्या रक्तातून घ्यायचे होते. बाळया तयार झाला नाही. खोताकडे दोन दिवस राहून भात - नाचणे, जुनी चिरगुटे आणि खोतांनी दिलेले दोन रूपये घेऊन कातकरी समाधानाने निघून गेले.

कातकरी गेल्यावर आठ-दहा दिवसांनी पुन्हा कुठे कुठे कांडेचोर आढळायला लागले. त्या दरम्यान कातकऱ्यांनी न सांगता खेप घातली. अलिकडे दर पंधरवड्याला कातकरी वस्तीला यायचे. ते वस्तीला आले हे कांडेचोराना कसे काय कळे देव जाणे. पण कातकरी वस्तीला असले की एकही कांडेचोर कुठे उमगेना. खोतांकडे कातकऱ्यांना पोटभर अन्नपाणी, पानसुपारी मिळायची. कातकरी अल्पसंतुष्ट, चोरटे मारटेही नाहीत. अन्न आणि शेरमापटे धान्य मिळालेकी खूश. शिवाय बाळया त्यांना कवडे,ल्हावे मारून द्यायचा. त्या परिसराची कातकऱ्यांना खडान् खडा माहिती. कवडे-ल्हावे यांची ‘बसल’ कुठे असेल याची उज्जू माहिती कातकऱ्यांना असायची. सहसा कधी खेप फुकट जात नसे.

आताशा अप्पा खोत भलतेच थकले. ते कायम झोपून असायचे. अन्न फक्त एकदा -दुपारीच घ्यायचे. “आता माझा नेम नाय्.माझे डोळे मिटण्यापूर्वी नातवाच्या डोक्यावर अक्षत पडूदे. नातसुनेच्या तोंडात साखर भरवून मग में डोळे मिटीन्” असे ते घोकीत राहायचे. कोण येईल जाईल त्याला बाळयासाठी फक्कडशी पोरगी बघायची गळ घालीत. “मी शेलापागोटे देईन. काय तरी बक्षिसी देईन.”अशी लालूच दाखवायचे. पण बाळयाला काही मुलगी सांगून येईना. कार्तिकात ईश्वराच्या देवळात उत्सव व्हायचा. कीर्तनकार मोघेबुवा सालाबादप्रमाणे खोतांकडे आले. त्याच्या मुक्कामात म्हाताऱ्याने बाळयासाठी मुलगी बघायची गळ त्यांना घातली. मोघेबुवा दहा गाव फिरलेले, धोरणी! बाळयाचे अल्प शिक्षण, फिटा हे वर्म त्यांनी उगाळले.

a

तो स्वस्ताईचा काळ. पैशाला भलतीच किंमत! पण बाळ्याला चांगली मुलगी देण्यासाठी पाचशे रूपये बक्षिसी् द्यायला म्हातारा कबुल झाला. मुलगी गरिबाघरची असेल तर लग्नखर्चही ‘आतुन’ द्यायची तयारी दाखविली. ही ‘मात्रा’ चांगली लागू पडली. म्हाताऱ्याकडून “म्हटला शब्द पुरा करीन” असे वचन बुवांनी घेतले. मग त्यांनी गुळणी फोडली. स्वतःचीच दोन नंबरची कन्या यमू बाळ्याला द्यायची तयारी बुवांनी दर्शविली. मुलाचे फिटा येणे सोडले तर बाळ्याचे स्थळ म्हणजो लाखात एक. उत्सव संपल्यावर चौथ्या दिवशी बुवा मुलगी दाखवायला घेऊन आले. बुवांची यमू म्हणजे नक्षत्रच! पहाटेला म्हाताऱ्याने बुवांना हलवून हलवून जागे केले. बक्षिसीचे पाचशे रूपये आणि लग्नखर्च म्हणूनअडीचशे रूपये पडशीत टाकुन बुवा यमूसह घरी गेले. लग्न खोतांच्याच घरी झाले. हौसावलेल्या खोतांनी हात सोडून खर्च केला. चार दिवस जेवणावळी झडल्या. यमुला ओझे व्हावे इतके सुपभर दागिने खोतांनी सुनेच्या अंगावर घातले. त्या वैभवाने दिपलेल्या यमूला बाळ्याच्या फिटांची मग फिकीरच वाटली नाही. त्याच्याकडे लक्ष द्यायला त्याचे स्वतःचे ‘मनुष्य’ आलेले. म्हातारा बिनघोर झालेला. “आता पणतू बघीन, म्हावंदे घालीन आणि मगच मरेन”असे तो म्हणायचा.

पावसाळा जवळ आला. अननसे पिकायला लागली अन् दीर्घमुदत बेपत्ता झालेले कांडेचोर एक -एक करून पुन्हा खोतांच्या आगरात यायला लागले. त्यांचे रडणे ऐकून प्रथम यमू भलतीच घाबरली. बाळ्या बंदूक घेऊन बाहेर पडला. कांडेचोर मारून आणून त्याने यमुला दाखवला. आठवडाभरात कांडेचोरांनी भलताच धुमाकूळ घातला. पण यमू बाळ्याला रात्री-बेरात्री घराबाहेर फिरायला देईना. त्याच्या फिटांचा प्रकार बघितल्यावर दिवसासुध्दा तो बाहेर पडला तर यमू मागून

जायची किंवा धोंडू-सोन्या ह्यांना हातातले काम टाकून त्याच्या पाठीवर धाडायची. आंबटांबा,अष्ट या आदस्थानांमध्ये कांडेचोरांनी पुन्हा 'विणी' घातल्या. रात्री-बेरात्री त्यांचा मुक्त संचार सुरू झाला. वाड्याच्या माळवदावर त्यांची झोंबटे लागली की,सगळ्यांची झोपमोड व्हायची. माळवदावर चढून त्यांना हाकवल्याशिवाय ते जात नसत. बाहेरची फळे संपल्यावर त्यांनी गुरांची खाणी, घरातल्या चीजवस्तू यांच्याकडे मोर्चा वळवला. कातकरी पावसाळ्यात फोंडा घाटापलीकडे जायचे.

कलंबईच्या वाडीत वस्तीवर एकही कातकरी राहत नसे. त्यामुळे भलतीच पंचाईत झाली. सोन्या -बाळया यांची पारध आता राजारोसपणे सुरू झाली. रिकाम्या पिंपात गुळाचा खडा ठेवून पिंपाच्या झाकणाला दोरी बांधून जागत बसायचे. रात्री गुळ खायला कांडेचोर पिंपात शिरला की दोरी ओढून झाकण पाडायचे म्हणजे कांडेचोर पिंपात अडकायचा. नाना युक्त्या लढवून सोन्या-बाळया कांडेचोरांच्या धुमालाच लागले.

रात्री बेरात्री कांडेचोर रडायला लागले की हे "ही भुता लागली रडव्वे" म्हणत बाळया बंदूक उचलायचा. आता कांडेचोरही शहाणे झालेले. काटेरी सापळ्यात,रिकाम्या पिंपात ते चुकूनही अडकत नाहीसे झालेले. बाळया नि सोन्या रात्री जेवणे झाल्यावर आंबटांब्या जवळ दडून राहायचे. कांडेचोर बिळातून बाहेर पडले की खसफस व्हायची. सोन्या बॅटरीचा फोकस टाकायचा नि बाळया बंदूकीने त्या कांडेचोराला अचूक टिपायचा. एकदा गोळी खाऊन पडलेला कांडेचोर मान झाडीत उठून पळायला लागला. बाळया नी सोन्या त्याच्या मागून धावत निघाले. अंगणाच्या पेळेवरून धावत कांडेचोर खालच्या मरडात उतरला. आता कांडेचोर मळयात शिरून नाहीसा होणार हे सोन्या, बाळया दोघांनीही ओळखले. कांडेचोराला

अडवण्या साठी सोन्या वाड्याच्या मागील बाजूने धावत खालच्या अंगाला गेला. बाळया वाड्या समोरूनच खाली निघाला. अंगणातून पायऱ्या उतरून जाईपर्यंत कांडेचोर दिसेनासा झाला. विहिरीच्या आसपास बॅटरी मारून बाळया कांडेचोराला शोधायला लागला.

विहिरीच्या एका अंगाला एका मोठ्या घबीत काही वेळा कांडेचोराची विष्ठा दिसायची. ते आठवून बाळया ती घब निरखून बघायला विहिरीजवळ गेला. विहिरीच्या काठावर बसून त्याने बंदुक बाजुला ठेवली नी बावीत वाकून बॅटरीच्या उजेडात तो घब निरखायला लागला. नेमकी त्याच वेळी बाळयाला फीट येणार असल्याची भावना झाली.''आऽऽयली आयली'' असे ओरडत बाळया उठला. जाणिवेच्या अखेरच्या क्षणीही विहिरीत पडायला होऊ नये म्हणून बाळयाने बाजुला होण्याचा प्रयत्न केला. विहिरीकडून बाळयाचा आवाज आलेला ऐकून यमू,तिचे सासरे, सासू गडबडीने कंदील घेऊन बाहेर पडली. खालच्या अंगाने गेलेला सोन्याही बाळयाचा आवाज ऐकून विहिरीच्या दिशेने धावला.

पेटती बॅटरी नि बंदूक विहिरीच्या कडेला पडलेली दिसली. बाळया मात्र कुठेच दिसेना. यमूला तिथेच चक्कर आली. ती बेशुध्द होऊन खाली पडली. धावत आलेल्या सोन्याने पेटती बॅटरी उचलून आजूबाजूला बघितले. मग खोतांना बॅटरी दाखवायला सांगून तो विहिरीत उतरला. साताठ पुरूष पाण्यात बुडी मारून सोन्याने बाळयाला शोधले. मोठ्या खटपटीने त्याने बाळयाला वर काढले. पाण्याच्या पृष्ठभागावर आल्यावर सोन्याने विहिरीच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीना घट्टपणे पावले टेकली नि बाळयाला अर्धवट पाण्याबाहेर काढले तशी बाळयाचे डोके छातीवर कलंडून लोंबायला लागले.

◙◙◙◙◙◙

# ९. मराठे सर देवो भव

आठवीच्या वर्गावर मराठेसरांचा संस्कृतचा तास सुरू झालेला 'हस्तस्य भूषणं दानं सत्यं कंठस्य भुषणं।श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं भूषणै: किम् प्रयोजनम्' फळयावर सुवाच्च्य सुंदर अक्षरात हे सुभाषित लिहिलेलं अन् सर तन्मय होऊन मधुरवाणीने ते म्हणून दाखवताहेत. मी आणि अशोक करंदीकर दोघेही बऱ्यापैकी हुषार.आम्ही चटकन सुभाषित लिहून घेतलं आणि गाण्याच्या भेंड्या सुरू केल्या, अर्थात हळु आवाजात! आमचं लक्ष नाही हे सरांना समजलं........"काळे! तुला उचलून खिडकीतून बाहेर फेकून देईन आणि करंदीकर तुझी काय वळवळ सुरू आहे? बाहेर छपराच्या पाण्याचा झोत पडतो आहे ना... त्या झोताखाली उभा करीन तुला! रहा, दोघेही उभे रहा." सरांचं शिकवणं पूर्ववत सुरू झालं. नवीन शब्दांचे अर्थ, सुभाषिताचा अन्वयार्थ स्पष्ट करून झाला,सुभाषिताची संथा सुरू झाली. त्यावेळी पुन्हा सरांचं आमच्याकडे लक्ष गेलं. तोपर्यंत मघाचचा प्रसंग सर विसरलेले, आम्ही काहीतरी चाळे करण्यासाठीच उभे राहिलोत असं वाटून सर ओरडले. ''अे जोडगोळी उभे राहून काय करता? लक्ष कुठे आहे तुमचं?'' मी म्हणालो "सर ऽऽ मगाशी तुम्हीच आम्हाला उभं रहायला सांगितलत'त्यावर मिशीत हसत सर म्हणाले 'मी तुम्हाला उठायला सांगितलं...... तुम्ही अचरटा सारखे तास संपेपर्यंत उभेच रहाल असं वाटलं नव्हतं मला......हं बसा खाली. " सरांचा हा असा खाक्या. सरांची वृत्ती शांत -सोज्वळ... कधी कुणा वर रागवणं नाही, कुणाला मारणं नाही. मुलाने कोणतीही (कोणत्याही विषयातली) शंका कितीही वेळा विचारली तरी न चिडता शांतपणाने आणि संयमाने निरसन करणार.

a

त्यांच्या ओरडण्याला मुलीसुध्दा घाबरेनात . बेंचवर उभा रहा, वर्गात मागे जाऊन ओणवा रहा, कान धरून उठाबशा काढ, हा चुकलेला शब्द २००वेळा लिहून दाखव! या सरांनी दिलेल्या शिक्षा फक्त ऐकायच्या असतात. वर्गात काहीतरी चाळे करताना मुल दिसलं आणि सर जवळ आले तरी ते मारणार नाहीत याची खात्री पटली, अन सगळया वर्गाशी सरांची जवळीक निर्माण झाली. मुलं म्हणजो त्यांना जीव की प्राण... मुलं दंगा करणार नाहीत, ओरडणार नाहीत तर ती मुलं कसली? फारच गोंधळ झाला तर ''एऽऽ गप्प बस नाहीतर हेडमास्तरांकडे पाठवीन''असा सज्जड दम सर द्यायचे. सरांचे हे विद्यार्थी प्रेम काही वेळा शिस्तीच्या निर्बंधात बसणारेही नसायचे. त्या वेळी दर शनिवारी आलटून पालटून एका विषयाची परीक्षा व्हायची, सोमवारी पेपर्स तपासून मिळायचे. तशीच संस्कृतची परीक्षा झाली. सरांनी पेपर तपासून झाल्यावर वर्गात वाटले. प्रत्येकजण आपला पेपर बघायला लागला. १/२ चाणाक्ष पोरांनी तपासलेल्या पेपरच्या शेवटच्या पानावर परीक्षेत न लिहीलेली दोन प्रश्नांची उत्तरे लिहीली आणि ते पेपर घेऊन सरांकडे गेले. ''सर ऽऽ माझा हा प्रश्न तपासायचा राहिलाय्!" त्यावर "असं असं, बघू" असं म्हणत सरांनी पाहिलं, खिशातून पेन्सिल काढून मार्क लिहीले आणि बेरीज वाढवून दिली. मग एक -दोन प्रश्न तपासायचे राहिले असं सांगणाऱ्यांचं पेवचं फुटलं.कोणी अशी तक्रार केली की, "सरऽऽ माझं उत्तर चार ओळींचं आहे. त्याचं तीन ओळींचं आहे. पण मला एक मार्क कमी दिलात" सगळया तक्राखोरांना सरांनी मार्क वाढवून दिले. त्या दिवशी संपूर्ण तास तपासलेल्या पेपर्सच्या फेर तपासणीत गेला आणि वर्गातली सगळी मुलं संस्कृत मध्ये पास झाली. शेवटी फेरफाराप्रमाणे मार्कलिस्टमध्ये दुरुस्त्या करताना ही गोष्ट सरांच्या लक्षात आलीशी वाटली कारण सर म्हणाले ''अरे हे काय? सगळे पास कसे

झाले? तुम्ही मला फसवलंत की काय?'' त्यावर सगळा वर्ग साळसूदपणे एक सुरात 'नाही' म्हणाला. सर म्हणाले ''बघा हं, नाहीतर मी पुन्हा परीक्षा घेईन''

कधी कधी सातव्या आठव्या तासाला कंटाळा यायचा.अशा वेळी मराठे सरांचा तास असला की आम्ही हळूच ओरडायचो, "सर ऑफ द्या. सर आज गणिताचे दोन आणि इंग्रजीचे दोन तास झाले.कंटाळा आला.सर, खेळायला सोडा''अशा वेळी नेमका खविसाचा (हेडमास्तर) राऊंड सुरु असला तर नाईलाज व्हायचा. मग दोन सुभाषितं बिनचूक म्हणण्याच्या अटीवर उरलेला वेळ गाण्याच्या किंवा शब्दांच्या भेंड्या व्हायच्या. सर पंचतंत्रातली एखादी कथा सांगायचे,मध्येच कुणाचं लक्ष नाही असं दिसलं तर सर दम देत. " ए मी प्रश्न विचारीन हं गोष्टीवर." चॅट पिरीयडला सर आले की आम्ही चक्क टाळया वाजावायचो कारण आता खविसाची भीती नसायची सरांनी जा! म्हणण्यापूर्वीच सगळा वर्ग ग्राऊंडवर धावायचा.

सर एस्. टी. सी. आणि हिंदी प्रवीण होऊन शिक्षक म्हणून रूजू झाले पुढे बी. ए. आणि बी. एड्. या पदव्या १२/१४ वर्ष नोकरी झाल्यावर त्यांनी मिळवल्या. सर संस्कृत, हिंदी, मराठी, इतिहास शिकवायचे. संस्कृतचे धडे, सुभाषितं सरांना मुखोद्गत... सहसा कधी पुस्तक उघडावं लागत नसे. त्यांची वाणी शुध्द, मधुर,आर्जवी... त्यांचं बोलणं ऐकत रहावं असं वाटायचं. त्यांच्या सात्विक,संयमी व्यक्तिमत्वामुळे सगळा वर्गच भारला जायचा. सर शिक्षा करीत नसले... रागवत नसले तरी त्यांच्या तासाला गडबड गोंधळ चाललाय असं कधी झालं नाही. अक्षरावर त्यांचा बारीक कटाक्ष. चुकीची वळणं ते स्वत: लिहून दाखवायचे. गृहपाठाच्या वहीत चुकलेले सगळे शब्द सर लिहून ठेवायचे. वह्यादेताना चुकलेले

a

शब्द दोनशे वेळा लिहून दाखव अशी शिक्षा ठोठावायचे. कधी चुकून त्यांनी विचारलंच ''काय रेऽऽ शब्द लिहून दाखवायला सांगितलं होतं ना?''तर म्हणायचं ''सर मी मागच्या तासाला दाखवलं. तुम्ही हं म्हणालेत''मग सरांचं समाधान होई.

सहामाही वार्षिक परीक्षांच्या वेळी तर अक्षरश: कहर व्हायचा. मुलं नवस बोलायची,'' देवा महाराजा इंग्रजी- गणिताच्या पेपरला मराठे सर सुपर व्हिजनला येऊ देत.'' सर आले की एखद्या प्रश्नाचं उत्तर येत नसलं की उभ रहायचं. सर म्हणायचे ''काय हवय?'' मी एकाही प्रश्नाचं उत्तर सांगणार नाही.

विद्यार्थि म्हणायचे ''सर उत्तर नको, भाषांतरातला फक्त एकच शब्द अडलेला आहे तेवढाच सांगा.'' पेपर संपत आला की हा प्रकार इतका वाढे की सराना अक्षरश: वर्गभर फिरावं लागे. पेपर संपल्याची घंटा झाली तरीही ४/५ मिनिट मुलं उत्तर पत्रिकाच द्यायचे नाहीत अन् हातातून पेपर काढून घेण्याचं धारिष्ट्य सराना व्हायचं नाही. मग पेपर जमवणं...... पुरवण्यांवर सह्या हे सगळे सोपस्कार होऊन सगळ्यात उशीरा मराठे सरांकडचा गठ्ठा जमा होई. मात्र पेपरला डायरेक्ट कॉपी करणं त्याना खपायचं नाही. एकदा सुरेश पडेलकर गाईडमधलं पान फाडून घेऊन पेपर लिहीत होता. सरांच लक्ष गेल्याचं दिसताच त्याने कॉपी दडवली.....'' पडेलकर कॉपीचा कागद दे'' सरांनी दरडावलं. पण तो काही दाद देईना.मग झडती घेऊन सरानी त्याच्या पॅण्टच्या खिशामध्ये लपवलेली कॉपी बाहेर काढली आणि त्याच्या फाड्कन कानफटात दिली. सरानी मुलाला मारण्याचा हा एवढा एकच प्रसंग माझ्या आठवणीत आहे. एरवी सुपरव्हिजनला आलेले सर आम्हाला इंग्रजीच्या गोष्टीतले देवदूत वाटायचे. पुढे अकरावीला 'चितळे मास्तर' हा पु. ल. देशपांडे यांचा धडा बघितला आणि आम्ही उत्स्फूर्तपणे म्हणाले ''अरे! हे तर आमचे मराठे सर!''

a

वर्गातल्या भिंतीवर लावलेलं एक सुवचन ‘ मातृदेवो भव पितृ देवो भव आचार्य देवो भव’ थोडसं बदलून आचार्य ऐवजी ‘ मराठे सर देवो भव’ असं आम्ही वाचायचो.

पुढे मी शिक्षण क्षेत्रात शिरलो. शिक्षक झालो, मुख्याध्यापक झालो, प्राध्यापक झालो पण इच्छा असुनही मला काही ‘मराठे सर’ होता आलं नाही. माझी मुलगी ‘शरू’ ही मराठे सरांच्या हाताखालीच शिकली. घरी शाळेतल्या गमती जमती सांगताना ती मराठे सरांचा गुणगौरव करायची. काळ बदलला... संदर्भ बदलला मुलं बदलली पण आमचे मराठे सर बदलले नाहीत याचं प्रत्यंतर शरूच्या वर्णनातून मला यायचं. अेकदा काहीतरी कामाच्या निमित्ताने हायस्कूलमध्ये नारकरसरना भेटायला मी गेलो. त्यावेळी कसली तरी परीक्षाच होती. गजर झाला,सुपरवायझर पेपरचे गठ्ठे घेऊन आपल्याला वर्गाकडे रवाना झाले. त्यानंतर थोडासा वेळ गेला आणि अगदी अकल्पितपणे एका वर्गातून टाळयांचा कडकडाट झालेला ऐकला. बोलणं अर्धवट टाकून नारकरसर उठले ‘‘आता सत्यानास झाला. मराठे सर कुठल्यातरी वर्गावर सुपर व्हिजानला गेलेसे वाटतात. आता मला पेपर संपेपर्यंत त्या वर्गाजवळ उभं राहून लक्ष ठेवायला हवं. तुम्ही नंतर या... . मी जरा जाातो” असं म्हणून हेडमास्तर नारकर सर मराठे सरांच्या वर्गाकडे निघाले. धन्य ते नारकर सर आणि धन्य ते मराठे सर!

सरांचं हे वागणं खरोखरच अशैक्षणिक आहे का? हा मनष्य पॉलिसी म्हणून असा वागतो का? या दोन्ही प्रश्नांची उत्तरं मला ‘नाही’ अशीच द्यावी लागतात. सरांचं तत्वज्ञान सांगायचं तर मुल वर्षभरात जे शिकतं त्याचं खरखुरं मूल्यमापन १०० गुणांच्या पेपरमध्ये करता येतं का? तसं असलं तर९०/९५टक्के गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या कितीतरी मुलांचं पितळ उघडं पडेल! अशी कितीतरी मुलं प्रत्यक्ष जीवनात पराभूत झालेली दिसतात. उलट प्रभाकर राणे सारखा गडीकाम करणारा,आठवीत

नापास होऊन शिक्षण सोडलेला माझा वर्गमित्र कलमाची चरी खणताना कुठल्या तरी संदर्भात दाखला देण्यासाठी ३0 वर्षापूर्वी मराठे सरानी शिकविलेलं ‘तक्षकस्य विषम् दन्ते मक्षिकाया मुखे विषम्’ हे संस्कृत सुभाषित स्पष्ट बिनचूक म्हणून दाखवतो एवढंच नव्हे त्या सुभाषिताचा अन्वयार्थही बिनचूक सांगतो आणि मला अंतर्मुख होऊन मराठे सरांचं तत्वज्ञान पचविण्याचा प्रयत्न करावा लागतो. मुलाने कितीही गंभीर चूक केली, त्रास दिला तरी आपला संयम न सोडता त्याच्यावर माया करणं हे सरांचं सेवा व्रत किती शिक्षकांना आचरणात आणता येईल? उदाहरण संग्रहात नमुन्यासाठी दिलेली गणितं सोडवून दाखवायची आणि परीक्षेत जास्तीत जास्त कठिण गणितं घालून मुलांची दांडी उडवणारे गणित शिक्षक, एकाच दिवशी रसायन शास्त्रातील ६५ मुलद्रव्यांच्या संज्ञा पाठ करुन यायला सांगणारे विज्ञान शिक्षक, चुकलेल्या एका शब्दाच्या स्पेलिंगसाठी एक छडी या हिशोबाने ४० छड्यांचा मुलाच्या हातावर पाऊस पाडणारे इंग्रजीचे शिक्षक, खुनशीपणाने मुलाच्या पोटाची चामडी पकडून ती पिरगळणारे, कान सुजेपर्यंत पिरगळणारे, एक कानफटीत मारुन कानातून नाहीतर दातातून रक्त फोडणारे नर व्याघ्र शिक्षक... मुलांची मनस्थिती, मानस शास्त्रातील थकवा आणि विश्राम हे तत्व, दोन्ही पायदळी तुडवून सलग तीन तास एकच विषय शिकवून अभ्यासक्रम पूर्ण करणारे पोर्शनवीर..... या गोष्टी शैक्षणिक आहेत का?

ओढघस्तीची आर्थिक परिस्थिती आणि शाळेत अक्षरश: जाच या दुहेरी त्रासाने मराठे सर पूर्णतः पिचून गेले. शिक्षकांना संहितेनुसार देय असणाऱ्या रजांचा लाभही मिळत नसे. कहर म्हणजे कुटूंबातली व्यक्ती निवर्तली! तिला सरणावर पोचवून दुसऱ्याच दिवषी डोक्यावर टोपी घालून शाळेत जायची पाळी सरांवर आली.

त्या मृतात्म्याच्या और्ध्वदेहिकासाठी मागितलेली रजाही नामंजूर झाली नी सरानां बिनपगारी रजा घेवून मृताचे पिण्डदान करावे लागले. गुणांचं कौतुक करणं सोडाच ,उपमर्द करुन खच्चीकरण करणारे वरीष्ठ या साऱ्या त्रासातही आपली शांत संयमी वृत्ती मराठे सरांनी ढळू दिली नाही की त्याचा ताव मुलांवर काढला नाही. सरांच्या मते शिक्षक हा मुलांचा वत्सल पिता आहे. परीक्षेसारख्या मोक्याच्या क्षणी चक्रव्युह भेदाचे रहस्य अर्धवट सांगून त्या मुलाचा कपाळ मोक्ष उघड्या डोळयानी पहाणं ही ‘अध्यापन वृत्ती’ आहे का? पस्तीस टक्के गुणांच्या निकषावर मुलाचे भविष्य ठरवायचे असेल तर अडलेल्या प्रश्नाचे उत्तर त्याला शोधायची संधी तरी द्या किंवा तुम्ही तरी उत्तर सांगा हे सरांचे प्रांजळ मत!

आपल्या अध्यापन विषया व्यतिरिक्त इतर विषयातल्या प्रश्नांची बिनचूक उत्तरं सांगता येतील असे किती शिक्षक आज सापडतील?जे शिकवले ते मुलाच्या पूर्णपणे पचनी पडले असे सांगणारे (सत्य सांगणारे) किती शिक्षक आहेत? एखा विषयाची पायाशुध्द तयारी केली, प्रामाणिकपणे अभ्यास केला म्हणजे परीक्षेत नक्की उत्तम गुण मिळतील अशी खात्री देणारे किती महाभाग पुढे येतील? मराठे सरांचं तत्वज्ञान तुम्हाला नाही पचलं तर सोडून द्या, पण ते अप्रामाणिक आहेत असा त्यांच्यावर आरोप कराल तर ‘या’ आणि ‘अशा’ कितीतरी प्रश्नांची उत्तरं तुम्हाला द्यावी लागतील. गावठी भाषेत सांगायचं तर चंद्र सूर्य उगवतात, पाऊस पडतो तो तुमच्या आमच्या सारख्या शिक्षकांमुळे नक्कीच नाही... मराठे सरांसारखे शिक्षक आहेत म्हणून! शिक्षण संस्थेचा बॅलन्स राहण्यासाठीही प्रत्येक शाळेत जसे काही इडी अमिन, दाऊद, रतन खत्री, विरप्पन आहेत तसे त्यांच्या बरोबरच निदान एक तरी ‘मराठे सर’ पाहिजेतच असं माझं प्रांजल मत आहे.

◙◙◙◙◙◙◙◙◙

# १०. अत्रंग

तेरवणचा दत्तू मिराशी म्हणजे अत्रंग माणूस. लांबलचक गाठ मारलेली शेंडी, भरभक्कम अंगकाठी, काळाकुळीत - ब्राह्मणाला न शोभणारा वर्ण, तिरकी बकध्यान मुद्रा, दोन भुवयांमध्ये शेंदुराची टिकली, पायघोळ धोतर आणि वर बाहीछाट मुंडे घालून कमरेला कायम पंचाचा वेढा देऊन हातात डोईभर उंचीचा सोटा घेऊन फिरणाऱ्या दत्तूला पोरेसोरे ‘राकस (राक्षस) इलो’ असे म्हणून घाबरून पळायची. पोरांची गोष्ट सोडा.....पण कर्रर ऽ कर्रर चपला वाजवीत आलेले दत्तूचे ध्यान बघून एकटी दुकटी बाईल घाबरून ओरडली तरी कोणाला नवल वाटले नसते. तेरवणात बरीचशी कुळवाड्यांची वस्ती.एकदोन भंडाऱ्यांची घरे, कुंभाराची वाडी, महारांची वाडी , धनगर वस्ती आणि मिराशांचे एकच एक घर. दत्तू ब्राह्मण फक्त जातीचा! संध्येतली चोवीस नावे काय पाठ नसतील की सही पुरती सुद्धा अक्षरांची ओळख नव्हती. वास्तविक गावांत भिक्षुक नाही म्हणून दत्तूच्या आजोबाला गाववाल्यांनी ठिकाण वतन देऊन गावात ठेवला. पुढे भिक्षुकी आणि सावकारी या दोन्ही वृत्ती सांभाळून दत्तूचा आजा भिकंभट याने मळयात ७/८ खंडी भातापुरती जामिन, गुरे चरवायला आडवणात ५एकर सडावळीची जमिन संपादन केली.

दत्तूचा बाप हरीभाऊ हा गायवर्णी मनुष्य. सदैव भिकंभटाला घाबरण्यात बापड्याचा जान्म गेला. बापाची सावकारी त्याला सांभाळता आली नाही. उलट बापाच्या पश्चात् देणेकऱ्यांनी काखा वर केल्या. निर्वाहा पुरती शेती आणि भिक्षुकी

a

यावर हरीभाऊंचा खुटरूटु संसार चालला. त्याचे चार मुलगे उपजताच गेले. त्यांच्या पाठीवर एक मुलगी गंगी आणि तिच्या नंतर झालेला दत्तू! तो सुद्धा जगला म्हणून जगला. जन्मतः वारेचा फेरा त्याच्या मानेभोवती होता. जन्मल्यावर तासभर झाला तरी पोर रडला नाही. सगळयांनी आशाच सोडली. हरीभाऊने देवातला गणपती पाण्यात बुडवून साकडे घातले.दत्तू जगला! पण दत्तूच्यावेळी झालेल्या त्रासाने त्याची आई मात्र अंथरूणाला खिळली ती खिळली. कशी बशी ५/६वर्षे काढल्यावर ती मुक्त झाली. पुढे गंगी सुद्धा लग्न होऊन मणच्याला सप्रे कुटुंबात गेली. हरीभाऊ आणि दत्तू दोघेच घरात राहिले. या प्रपंचाच्या कटकटीत दत्तूला वळण कसे ते लागलेच नाही. भंडारी, धनगर, कुळवाडी, वाणी यांच्या पोरात वाढून तो त्यांचीच बोली शिकला. शाळेचे तर त्याने तोंडच बघितलेले नव्हते.

रीतीरिवाजा प्रमाणे सोळा वर्षाचा झाल्यावर दत्तूच्या लग्नाची खटपट सुरू झाली पण या अडाण्याला मुलगी देणार कोण? हरीभाऊंनी जावयाच्या पाठी लकडा लावला. जावई सप्रे यानी शेजावलीतल्या अन्नान्न दशा असलेल्या भागवतांची काळी ठेंगणी, रांबुक मुलगी बुगी दत्तूला ठरवली. अठरा वर्षाचा घोडनवरा दत्तू चतुर्भुज झाला. बुगी भागिरथी नावाने मिराशांच्या घरात आली. पोरगी रांबुक असली तरी संसारी निपजली. हरीभाऊने सुटकेचा श्वास सोडला म्हणजे अक्षरशः श्वासच सोडला. दत्तूचे लग्न झाल्यावर चार महिन्यातच हरीभाऊ किरकोळ तापाच्या निमित्तानेच खपला. बापाच्या मृत्युमुळे दत्तू मात्र सुधारला. प्रपंचाची जाणीव त्याला व्हायला लागली. बापाच्या जीवावर दोनवेळा गिळून उंडगेपणा करणारा दत्तू कामाला लागला. तेरवण जवळच्याच सौंदाळे गावात ब्राह्मणांची पंधरा घरे. गोडसे, पुराणीक, बर्वे, गोखले अशी सगळी सधन, नामांकित मंडळी. दत्तूने त्यांच्याशी

a

सलोखा केला. तेरवणसारख्या आडवळणी गावात दत्तूचे एकटेच घर, सौंदाळ्यातली ब्राह्मण मंडळी त्याला मदत करायची.

त्याचवेळी कुळकायद्याचे वारे वहायला लागले आणि सावध झालेल्या दत्तूने स्वतः शेती करायला सुरूवात केली. फुकटात आणलेल्या रेड्यांचे जोत केले. दत्तू आणि भागीरथी स्वतः मरेमरे पर्यंत शेतीत राबायला लागले. तरीही एकदोन भंडारी आणि वाणी यांचा त्रास होताच. पण दत्तूचे मनगट धरणारा गडी उभ्या गावात सोडाच पण पंचक्रोशीतही सापडला नसता. मग आडवळणाने त्रास देणे सुरू झाले. दत्तू कडे गडी कामाला येईनासे झाले. पण दत्तूने दम सोडला नाही. पहिल्या कोंबड्याला उठून तिन्हीसांजेपर्यंत तो राबायला लागला. गोखल्यांच्या सल्ल्याप्रमाणे आगराला गडगा घालून माड, पोफळी लावायचा बेत दत्तूने केला. एकट्याने धोंडे फोडून ठिकाणाच्या माथावळीचा आणि उभ्या बाजूचा दोनेकशे हात गडगा त्याने पुरा केला. त्याची हिंमत बघून गावसुद्धा चकित झाला. हळूहळू धनगरानी दत्तू कडे उठा बसायला सुरूवात केली. “काकानु आमाला गडगा घालाया द्या. लय थोडे पैसे मागे ठेवलास तरी चालेल.” शिद्या धनगर बोलता झाला. आगराच्या पायथ्याला बारमाही व्हाळाच्या कडेने गडगा घालायचे काम मोठ्या जिकिरीचे! पावसाळ्यात व्हाळाला तुडूंब पाणी असायचे. लेचा पेचा गडगा पाण्याने वाहून गेला असता. या कामाला दांडगी जमातच पाहिजो असा विचार करून दत्तूने धनगरांना गडग्याचे काम दिले.

सराई सुरू झाली. भात कापून झाल्यावर दत्तूने कुळीथ, वरणे असे कडधान्य मळयात पेरले. त्यातून मोकळे झाल्यावर गडग्याचे काम सुरू झाले. दत्तूकडे कुशाभाऊ गोखले आले तेव्हा व्हाळाच्या कडेने गडग्याची पहिली रांग लावायला

सुरूवात झाली. कुशाभाऊ अनुभवी, दर्दी! काम बघून ते म्हणाले,”दत्तू, तुझ्या या गडग्याचा काय्येक उपयोग होणार नाय. हे आंब्या एवढे दगड उद्या पावसाळ्यात वाहून जातील आणि गडग्याचा निकाल लागेल” या बाजूला दोन माणसांच्या ओझ्याएवढा एक एक दगड लावायला हवा. दत्तूने धनगराना धारेवर धरले. बाचाबाची झाली. कुशाभाऊ ढीग सांगेल, एवढे मोठे दगड फोडून ते जागेपर्यंत न्यायचे कसे? एकतर जाग्यावर दगड पोच करून दे नाहीतर दर वाढवून दे असा पेच धनगरांनी टाकला.

दत्तू चा स्वतःच्या ताकतीवर दांडगा भरवसा. त्यात तो जात्याच अत्रंग! धनगराना म्हणाला, “तुम्ही माझ्या डोक्यावर दगड चढवा.मी स्वत: खेपा घालून दगड जाग्यावर पोचवून देतो.” धनगरानी मान्य केले त्याना वाटले या भटाचा काय नेट असणार? चार खेपात आडवा होईल! काम सुरू झाले. दत्तूने सांगितले तेवढ्या आकाराची जाडशीळ दगडी वळीवे धनगरानी फोडायला सुरूवात केली. दोन गड्यांनी दत्तू च्या डोक्यावर भला दांडगा दगड चढवायचा आणि दत्तूने तो जागेवर न्हेवून टाकायचा.,असे काम सुरू झाले. दत्तू आणि धनगर यांची चुरस लागली. धनगर दत्तूला कुथवण्यासाठी दीड-दोन हात औरस चौरस दोन गड्याना भोयसांड होणार नाहीत एवढे मोठे दगड निवडित. पण दत्तू काय जेरिला आला नाही. गावातले लोक मजा बघायला येऊ लागले. पण काम संपेतो दत्तू मागे हटला नाही. जवळ जवळ दीडशे हात गडगा पुरा व्हायला पाऊण महिना लागला. सगळे दगड दत्तूने स्वतः वाहून नेले. गावातले लोक सोडाच पण आजुबाजुच्या गावातली जाणती माणसेही दत्तू मिराश्याचे भिमकृत्य बघायला येऊ लागली.

दत्तू भटाचे माड नी पोफळी लावून झाल्या. त्याच्या सड्यावरच्या ठिकाणा लगतच गुरचराई. तिथे कुंभार त्यांची गुरे चरवायचे. ते दत्तूचा दुस्वास तकरीत. चोरून मारून गडगा कोसळून दत्तूच्या पडणात गुरे आत घालायचे. दत्तूला कळल्यावर तो गुरांना हाकलून कोसळलेला गडगा डाळायचा. कुंभारांचा त्रास कमी होईना. तेव्हा संध्याकाळची वेळ धरून दत्तू कुंभार वाड्यात गेला. बोलचाली झाली. पुन्हा गुरे गडग्यात दिसली तर मी त्यांना जिवंत ठेवणार नाही. असा दम देऊन दत्तू घरी आला. त्यांनंतर आठवडाभर बरा गेला. एकदा दुपारच्या वेळी दत्तू ठिकाणाकडे चक्कर टाकायला गेला तेव्हा लख्या कुंभाराचा एक दांडगा रेडा गडग्यात चरताना दिसला. दत्तू रागाने बेभान झाला. दत्तूने गडग्याच्या कडेला असलेल्या काजऱ्याचा तीन हात लांबीचा मनगटा एवढा जाड खुंट तोडून घेतला अन् तो गडग्यात शिरला. रेडा जातीवंत मारकुटा.दत्तूला बघताच तो माती उकरायला लागला.

दत्तू तोंडाने ‘हाड् हाड् ‘करीत रेड्याकडे जायला लागला. रेड्याने दत्तू जवळ येताना दिसताच शेपटी दुमती केली आणि चौखूर उधळत दत्तूच्या दिशेने मुसंडी मारली. रेडा दरडीवरून खाली येण्यापूर्वीच दत्तू उडी मारून दरडीवर चढला आणि धावत येणाऱ्या रेड्याच्या मस्तकावर दोन्ही हाताने काजऱ्याच्या खुटाने नेटाचा फटका मारला. फटका वर्मी बसून रेडा जरा दबकला तेवढ्यात पूर्वीच्याच नेटाने तीन चार फटके दत्तूने पुन्हा पुन्हा त्याच्या मस्तकात मारले.’ब्वाँऽब्वाँऽऽ ब्वाँऽऽऽ’ करून रेडा जामिनीवर कोसळला. त्याच्या नाकातून रक्ताचा लोंढा आला. आता दत्तू भानावर आला. आपण काय करून बसलो हे त्याला उमगले. त्याचा बेरकी स्वभाव जागृत झाला. एवढ्या दांडग्या रेड्याचे पाय धरून ओढीत त्याने

रेड्याला साताठ पुरुष उंच डगरीवरून खाली ढकलून दिला आणि त्याच पावली माघारी फिरला.

घरी येताना वाटेत माणसांची जाग लागल्यावर दत्तूने धोतराच्या निऱ्या सोडून ते अस्ताव्यस्त गुंडाळले आणि मातीतच बसकण मारली. अंगाला, तोंडाला माती फासली आणि "धावाऽ रे धावाऽऽ" असा हंबरडा फोडला. माणसे धावतच आली. त्यांना बघताच "लख्या कुंभाराच्या रेड्यान माका मारलान्. आता मी मरतय" असा आरडा ओरड आणि कण्हणे, विव्हळणे सुरू केले. माणसांनी त्याला उचलून घरी पोचवले. बायकोने गरम पाण्याने त्याचे अंग धुवून पंचा पालटायला देऊन त्याला घोंगडीवर झोपवला. दत्तूची बोंबाबोंब सुरूच होती. उजवा पाय त्याने ताठ करून धरलेला तो काय जवळ येईना. भटाला रेड्याने मारले ही बोंब गावभर झाली. जायबंदी झाल्याचे सोंग मात्र दत्तूने बेमालूम वठविले. संध्याकाळी कुशाभाऊ गोखले, बंडोपंत सोहोनी यानाही निरोप पाठवून बोलवून घेतले. रेड्याने आपल्याला कसे घोसळले? मग आपण त्याच्या शिंगाला मिठी कशी मारली? रेडा आपल्या सकट डगरीवरून कसा कोसळला? आपण जिवाच्या कराराने मोडका पाय घेऊन पलिकडे कसे आलो याचे सुरस वर्णन ऐकून मंडळीच्या काळजाचा थरकाप उडाला. संध्याकाळी डगरीखाली पडून रेडा मेला अशी आवई आली. दत्तू मिराशी पाऊण महिना अंथरूणावर लोळत राहिला. त्याच्या पायाला लेप लावून , सापळी बांधून झाली. त्याचे हगणे मुतणेही जाग्यावर व्हायचे. मग हळूहळू तो हिंडा फिरायला लागला. तरीही त्याच्या पायात कसर राहिली, असे गाववालेच सांगत.दत्तूच्या घराजवळ माड पोफळीची बाग नजरेत भरायला लागली. आता बऱ्याच लोकांना त्याचा दुस्वास वाटायला लागला. घराखाली घरभाटाच्या कडेलाच त्याने भाताचा

सरला बंडब्या डाळून ठेवला.शिमगा झाल्यावर मळणी घालून भातयाण गवत गोठ्याच्या माळयावर भरून ठेवायचे असा त्याचा शिरस्ता. पण शिमगा संपण्यापूर्वीच त्याच्या गवताच्या बंडब्यांना आग लागली. आता पावसाळ्यात गुरांचे हाल होणार. दीड दोनशे ओझी गवत जळून गेले. बंडब्यांच्या जवळ असलेले चार माडसुद्धा धग लागून मेले. दत्तूवर मोठेच अरिष्ट आले. दत्तू वरकरणी शांत राहिला. त्याने येशा धनगराला कोंबडा खायला घालून गवताला आग लावणाराचे नाव शोधून काढले. येशाने पक्की बातमी काढली. सदा आणि भिक्या या वाणीवाडीतल्यांचे ते काम असून त्यांना इतर वाण्यांचीही साथ असल्याचे निष्पन्न झाले. त्याना कसा धडा शिकवायचा याचा बेत त्याने आखला. तो संधीची वाट पहात राहिला. दुसऱ्या मोसमातला पाऊस संपला भाताची कापणी झाली. भात झोडून झाल्यावर गवताच्या बंडब्या रचून झाल्या. वाण्यांचे गवत ते मळयात खळयावरच डाळून ठेवायचे.

दत्तू अधूनमधून तालुक्याच्या गावी राजापूरला जायचा. राजापूरच्या विचारे वकिलांशी त्याची चांगली घसण. एकदा अशाच कामाचे निमित्त करून तो राजापूरला गेला. संध्याकाळ झाली म्हणून विचारे वकिलांकडेच तो वस्तीला राहिला. विचारे वकिलांच्या घराला मोकळी ओसरी पडवी. तिथे वेळे गरजेला त्यांचे पक्षकार पथाऱ्या टाकायचे त्याप्रमाणे दत्तू तिथेच टेकला. रात्री निजानिज झाली. सर्वत्र सामसूम झाल्याची खात्री झाल्यावर दत्तू टाकोटाक तेरवणला निघाला. राजापूर ते तेरवण चार कोसांचा पल्ला! तेरवणात येऊन सदा नी भिक्या वाण्यांच्या गवताच्या बंडब्या पेटवून दत्तू रातोरात राजापूरला परत गेला आणि विचारे वकिलांच्या पडवीत झोपला. तो सकाळी उठून तेरवणला आला. तेरवणात बोंबाबोंब उठलेली. वाण्यांचे

गवत जळले. दत्तू वर वहिम घेण्यात आला. पण रात्री आपण विचारे वकिलांच्या पडवीत झोपलेलो होतो असे दत्तूने सांगितले वाण्यांनी विचारे वकिलांना भेटून ह्या गोष्टीची खातरजमा केलेनी. खुदद् वकिल साहेबांचाच पुरावा असल्यामुळे दत्तूचे कारस्थान उघडकीला आले नाही.

दत्तू चार दोन महिन्यानी बहिणीकडे मणच्याला खेप करायचा. तरी पलिकडे गुरवाच्या कौलांच्या वखारीजवळची उजवीकडे जाणारी पाळंद गंगीच्या घराकडे जायची. दत्तू मफतलालच्या होडीतून मणच्यात बंदरात पोचला. तो वखारी जवळ आला तेंव्हा वासू गुरव नी त्याचे भाऊ हमरीतुमरीकर येवून बोलत होते. दत्तूने चौकशी केली त्यावर वासू म्हणाला,"ह्यो कौलावालो इलो हा, उद्या उजवाडापावत कौलाचो पडाव खाली करूचो हा. फाटपटी सुकतीच्या ताणावर तो विजेदुर्गाक जानार, पन आज गडी पारध करूक गेले हत ते सांजवान कदी येती तवां येती नी इले तरी आज काय कौलां उतरूक येवच्ये नाय. मोटी पंच्याईत झाली हा. आमी पाचजान भाव नी घरत आट बायल् मानसं हत पन कौलाचो अख्खो पडाव उतरूक आट धा गडयांची तरी जमात व्हयी. आमची जमात पुरी पडणार नाय." जरा विचार करून दत्तू म्हणाला, "माका चढवू उतरूक मदत क्येलास तर मी खेपेन चाळीस कौला हाणीन. आज मढ्यान् रातीपावत पडाव खाली करून द्येयन. मी पैजेर सांगतय. माका किती रुपाये देशाल?" वासू म्हणाला, "न्हेमीच्या गड्यांक वीस रुपाये देताव तुमका पाच जादा द्येव. चडवू उतरूक आमी भाभाव नीआमची बायल मानसां मदत करू. तुमच्या वांगडान आमी दुकु कौला न्हेवूक मदत करू. कायतरी करून राती सुकती लागण्याच्या टायमापूर्वी कौलां उतरून झाल्याशी कारन."

a

"मी रुपये पन्नास आनी जेवान रांदून खावक चार शेर तांदूळ नी सा मुटी डाळ घ्येयन, बगा जमता काय. दत्तू बोलला. हो नाही करता करता चाळीस रुपयांवर तोड झाली.दत्तूने मुंडं नी पडशी खुटीला अडकवली. गुरवाच्या पडवीत तीन धोंड्यांची चूल मांडून तीन शेराचा भात नी आमटीला ओली चवळी शिजत लावली. भाताला कडयेई पर्यंत त्याने कौलाच्या दहाबारा खेपा आणल्या. दोन हात लांब फळकूट घेवून त्यावर बारा बारा कौलांच्या चार थड्या रचून तो खेपेला अठ्ठेचाळीस कौलं आणी. भात नी चवळया शिजल्यावर आमटी ढवळली नी अर्धा भात उसपून घेवून त्यावर कालवणओतून चटपट जेवण उरकले. सुपारीचं अख्खं खांड चघळीत पुन्हा खेपा घालायला सुरुवात केली .चार पाच तासानी पाच मिनिटं दम घेवून दुपारी झाकून ठेवलेला भात नी आमटी खाल्ली नी सुपारीचं खांड चघळीत पुन्हा काम सुरु केलं.

काळवं पडल्यावर चार फाणस लावून त्या उजेडात काम सुरु राहिलं. मदत करणाऱ्या माणसांच्या जोड्या तीन चार वेळा बदलल्या. पण दत्तूने कामात खळव न पाडता एकटाकी काम सुरु ठेवलं . दरम्याने ही वार्ता गंगीच्या घरी कळल्यावर तिचा नवरा नी दीर येवून भेटून गेले. त्याना आपण काम पूर्ण करून रात्री उशीरा टकलं टेकायला येवू असं सांगून दत्तूने वाटेला लावले रात्री अकरा वाजता काम पूर्ण झालं. दत्तूने पुन्हा दीड शेराचा भात शिजत लावला.विहीरीवर जावून थंड पाण्याने आंघोळ केली. भात आमटी रांधून झाल्यावर शांत जेवण उरकलं मुंडं चढवून गुरवाने दिलेले चाळीस रुपये पडशीत टाकले नी गंगीकडे गेला. "आता मी निसूर झोपणार आहे. उद्या सकाळी मला आपण होवून जाग येई पावत उठवू नका." अशी वर्दी देवून त्याने जी ताणून दिली ती दुसरे दिवशी अकरा वाजे पर्यंत!

a

भागिरथी रांबुक असली तरी तिन्ही मुले मात्र नक्षत्रासारखी. थोरली सखु आणि धाकटा मुलगा अनंत रूप आणि गुण दोन्ही बाबतीत आईवडिलांपेक्षा वेगळी निपजली. मुलींना तेव्हा जास्त शिकवण्याची प्रथा नव्हती. सखुच्या चार यत्ता झाल्यावर तिचे शिक्षण थांबले. अनंता मात्र चौथी, त्यानंतर सातवी करून तालुक्याच्या गावी इंग्रजी शाळेत जायला लागला. सखुला पदर आला. आता पोरीच्या लग्नाचे मनावर घ्या अषी भुणभुण भागीरथीने दत्तूच्या पाठी लावली. कुशाभाऊंच्या मनात ही मुलगी भरलेली. कधीतरी चेष्टेत, “तुला सून करून घेईन” असे ते म्हणायचे. एके दिवशी धूर्त दत्तू सखुसाठी शब्द टाकायला गोखल्यांकडे गेला. रात्री जेवणखाण झाल्यावर कुशाभाऊ त्यांचे भाऊ अप्पा, गोविंदा, बाबु गप्पा मारायला बसले आणि दत्तूने खडा टाकला. अप्पा गोखले पटकन म्हणाला, “कुशाच्या दिप्यासाठी पोरगी काय वाईट नाही पण मिराशी.आमचा बडेजाव तुम्हाला झेपेल का? हुंडा काय देनार?” दत्तूने याची योजना पक्की ठरवलेली!

गोखल्यांकडे बारमास पाटाचे पाणी असायचे.त्यांच्या घरापासून कुत्र्याच्या भुंकेएवढ्या अंतरावर धरण अन तिथून पाण्याचा पाट काढलेला. दत्तू म्हणाला,”हुंडा म्हणून रोख रक्कम द्यायची काय माझी उपत नाय. पण तुमचा पाण्याचा पाट मी स्वत: माझ्या खर्चाने आणि आंग मेहनतीने चिरेबंदी करून देईन.” विषय तसा चेष्टेवारी नेण्याइतपत या उद्देशाने अप्पा गोखले म्हणाले, “दत्तूकाका! बघा हो!! तुम्ही स्वतःच्या खर्चाने आमचा पाट चिरेबंदी बांधून द्यायचा. पाट बांधून झाला की लग्नाचा बार उडवू.” त्यावर दत्तू बोलला, “बघा हां, मी मागे येणार नाय.मुलगी तुमच्या घरात पडणार असेल तर मी माझा शब्द पुरा करीन.” दत्तूने खुंटी बळकट केली. दोन दिवसांनी ढोकण, छिनी, घण, पहार ही हत्यारे आणि सुरुंगाची दारू नी

वाटीचे भेंडोळे घेऊन दत्तू पाट बांधण्यासाठी गोखल्यांच्या घरी आला. त्याने आपला शिधा पण सोबत आणलेला. सामान पडवीत टाकून त्याने अप्पांना हाक मारली. “अप्पा पाट बांधायला आलो आहे.”

दत्तू बहाद्दर गडी निघाला.सुरुंग घालून अनगळ धोंडी फोडल्या. जवळ जवळ पाऊण महिना राबून त्याने चिऱ्याची वळीवे काढली. आपल्या खर्चाने दोन तासपी मदतीला घेवून सगळया वळीवाना सहा आंगळे खोल नी रुंद पन्हळी खोदून घेतली. या मुदतीत दोन वेळा आपले जेवण तो स्वतः रांधून खाई. गोखल्यांनी आग्रह केला तर तो सांगे, “आता एकदम लग्नाच्या पंगतीत व्याह्यांच्या मांडीला मांडी लावून बसेन तेंव्हाच तुमच्याकडे जेवणार.” दत्तूची वळीवे काढून होईपर्यंत गोखले मजा बघत राहिले. वळीवांचा ढीग पडल्यावरमात्र त्यांची खात्रीच पटली. अप्पा गोखले एकदा रात्री गप्पांच्यावेळी दत्तूला म्हणाले,”मिराशी आता आम्हाला आणखी लाजवू नका. मी तुम्हाला शब्द दिला. कुशाच्या दिपकला तुमची सखू करून घेणार म्हणजे घेणार! उद्यापासून चिरे तासायला मी गडी सांगितले आहेत तुम्ही फक्त देखरेख करुन पाटाचे बांधकाम करुन घ्या, तुम्ही शब्द खरा केलात असे हवे तर मी स्टँप पेपरवर लिहुन देतो, पण आता तुम्ही राबू नका,आम्हाला काही कमी नाही, लक्ष्मी पाणी भरायला आमच्या घरी चालून येतेय हे आमचे भाग्य . आता यात काय ते समजा.” गोखले खरोखरच दिलदार , पोरीचे सोने झाले! या विचाराने दत्तूचे ऊर भरुन आले .

पाटाचे बांधकाम आता वेगाने सुरु झाले. गोखले नको म्हणाले तरीही काम संपेपर्यंत दत्तूने दगड वहाणे,चर खणणे,छिनेलांची पन्हळी बसवणे ही कामे केलीच. पंधरा दिवसात पाट बांधून पूर्ण झाला आणि चिरेबंदी पाटातून घोंघावत पाटाचे पाणी

a

गोखल्यांच्या दारात पूर्वीपेक्षा अधिकच वेगाने पडायला लागलं. मग जनरीत म्हणून बैठक झाली. ‘मुहूर्त’ ठरला देण्या-घेण्याचा प्रश्नच गोखल्यांनी ठेवला नव्हता. त्यांच्याच दारात त्यांच्याच खर्चाने सखूचे शुभमंगल झाले . दृष्ट लागावी अशा थाटामाटात गोखल्यांनी कार्य केले. सखूच्या अंगावर सूपभर वीस तोळे सोने घातले आणि लक्ष्मी होऊन ती गोखल्यांच्या घरात नांदायला लागली . पंचक्रोशीतली माणस दत्तूच्या धाडसाचे मुक्त कंठाने कौतुक करायला लागली. “दत्तू मिराशी अत्रंग खरा पण त्याची जिगर कोणाला यायची नाही!”

◘◘◘◘◘◘◘◘

a

# ११.देवकळा

खांद्यावर ठासणीची बंदूक आणि हातात भलामोठा दांडा घेऊन संध्याकाळच्या वेळेस भिवा टिपवण्याकडे निघालेला. बहुतेक सशाच्या पारधीला निघालेला असावा असेच बघणाऱ्याना वाटले असते. पण, आजची शिकार मोठी होती आणि वेगळीही होती. उभ्या रानात वाघ समोर आला तरी त्याला अंगावर घेण्याची हिंमत असलेला भिवा यापूर्वी एकदा याच शिकारीला जाऊन कच खाऊन माघारी फिरला होता, कारण सावज साधेसुधे नव्हते. खोत वकील म्हणजो काही डुक्कर नव्हता कि दिसला आणि घातली गोळी. दशक्रोशीत खोत वकिलाचा लौकीक. वकिली मुळे कोर्ट दरबारी, पोलिस स्टेशनवर त्याचे लागेबांधे. गोळी घालणे एकवेळ सोपे पण पचवणे अवघड गेले असते. काम मोठे जोखमीचे. उभ्या भाटलेवाडीत हाहाःकार माजला असता. शिवाय खोत म्हणजो गावदेवी माउलीचे मानकरी. यदाकदाचित गावकऱ्यानी एकत्र येऊन जाबसाल घातली असती देवीला तर पोलिस परवडले असे म्हणायची पाळी. कारण देवीचा लौकिक मुळी होताच तसा! परशा घाडी हा देवीचा अवसर. देवीचे प्रमुख मानकरी आणि गावकरी एकत्र येऊन त्यानी देवीला जााब घातला आणि परशावर देवकळा आली की नजरेसमोर घटना घडत आहे असे तो वदायला लागला असता. तो जो सांगता ते कोर्टापुढे सिद्ध व्हायचीही गरज पडली नसती. भिवा नेस्तनाबूत झाला असता. म्हणून खोत

वकिलाचा सावत्र भाऊ दादा खोत याने रोख रूपये पाच हजार आणि रेवाळीच्या मळ्यातली ५खंडी उत्पन्न देणारी जमिन एवढे आमिष दाखवूनही हिंमतबाज भिवा पहिल्या खेपी कच खाऊन माघारी फिरला.

दादा खोत भिवाच्या इशारतीची वाट बघीत ओसरीवर येरझारा घालीत असताना पाळंदीतून अचानक वकिलाचा आवाज आला आणि भिव्याने झक मारली हे दादा खोत मनोमन उमजला. एवढी मोठी रक्कम आणि सोन्यासारखा जमिनीचा तुकडा इतके दांडगे आमिष दाखवूनही भिवाने फसविले यामुळे दादा खोताच्या अंगाची लाही लाही झाली. शेवटी हे कुळवाडी जातीवरच जायचे.हे कसले मराठे! दादा खोताच्या मनात येऊन गेले. अखेर रात्री उशीरा भिवाची हाक आल्यावर दादा खोत घुश्श्यातच बाहेर गेला.

मागिलदाराच्या उंबरठ्याजवळ कापऱ्या आवाजात भिवा म्हणाला, “दादानू रागाक येव नको, पण देवकळेच्या भयानं माजा मन घेयना. परशाच्या अवसरान खरा काय तां सांगल्यान तर माजी पुरी वाट लागात. ह्या मनात इला म्हणान मी पारद करूच्या शिवायच इलय.” भिवाचा खुलासा ऐकल्यावर दादा खोतसुद्धा थोडासा वरमला. “मगे बोलॉया” एवढेच सांगून तो घरात आला. ह्या वकिलाचा काटा कसा काढायचा या विचाराने दादा खोत एवढा हैराण आणि उतावळा झालेला की, भिवाने जी अडचण पुढे केली त्यादृष्टीने विचार करणेच त्याला सुचले नव्हते. गोष्ट खरी होती.वकिलाचा खून पचविण्यासाठी सरकार दरबारी कायतरी बांधिलकी करता आली असती. . ..त्यासाठी पाण्यासारखा पैसा ओतता आला असता. कारण वकिलाचा काटा काढायला की, खोतांची गडगंजा इस्टेट एकट्या दादाच्या हाती

येणार असती! या इस्टेटीमुळेच आपल्या वकिली करणाऱ्या सावत्र भावाचा काटा काढायला दादा खोत तयार झालेला!

दादा आणि वकिल यांचा बाप भाऊ अण्णा! त्याने दोन बायका केल्या. दोघीही खोतांच्या वाड्यात सुखासमाधानाने नांदल्या थोरलीचा मुलगा अनंता म्हणजे दादा खोत. तो काय विद्येत रमला नाही. चार यत्ता शिकून त्याने खोताना शोभेल असे उद्योग करायला सुरूवात केली. धनगराची भागी, सुताराची काशी, घाड्याची सखू या अंतूच्या भानगडी निस्तरून भाऊअण्णा जेरीला आला आणि दांडेलीच्या प्रभूखानोलकरांच्या मुलीशी त्याने अंतूचे लग्न लावले. लग्नानंतर अंतू थोडासा निवळला आणि खोतीच्या कामात लक्ष घालू लागला. गावची पोलीस पाटीलकी आणि देवस्थानचा मानकरी म्हणून अंतू बामण हा दादा खोत या उपाधीपर्यंत पोचला.

धाकटा लक्ष्मीकांत मात्र विद्येत चांगला निपजला. उच्च शिक्षण पूर्ण करून भाऊअण्णांच्या इच्छेप्रमाणे वकिलीच्या पदापर्यंत तो पोचला. मात्र लक्ष्मीकांत वकिल झालेला पहाण्याचे भाग्य भाऊअण्णाला लाभले नाही. त्याला जलोदराची व्याधी झाली आणि मुंबई -पुण्यातला उपचार देऊनही लक्ष्मीकांतला वकिलीची सनद मिळण्यापूर्वीच भाऊअण्णा आटोपला. त्याच्या माघारी घरच्या कारभाराची सूत्रे अनायसेच दादा खोताच्या हाती आली. लक्ष्मीकांत एवढे शिकून देवगड कोर्टात वकिली चालवायला भाटलेवाडीत येऊन राहील अ शी दादा खोताला अटकळ नव्हती. पण कसलाही छंदफंद न करता एकमार्गी लक्ष्मीकांत वकील होऊन घरी आला. देवगड ते भाटलेवाडी रोजा ये-जा करणे जमणारे नसल्यामुळे त्याने देवगडलाच ऑफिस थाटले. पण रविवार आणि सुटीच्या वेळी न चुकता घरी येणे,

a

घरचे कुलाचार, गाववाडा यात लक्ष घालणे सहे मात्र मात्र दादा खोताल रुचले नाही. त्यातच त्याचे सासरे दाजी खानोलकर हे महा बेरकी. त्यांनी जावयाच्या मार्गात आलेले त्याच्या सावत्र भावाचे हे विघ्न दूर करण्यासाठी दादा खोताचे कान भरायला सुरू केले. वकिल हा सगळ्यांशी मिळून मिसळून गोडीगुलाबीने वागून भाटलेवाडीत मानमरातब मिळवायला लागला तेव्हा मात्र दादा खोताने त्याचा काटा काढायचा पक्का निर्धार केला.

जनलौकीकात दादा खोत आणि वकील यांच्यात उघड वैमनस्य दिसत नसले तरी घरच्या व्यवहारात वकिलाने लक्ष घालणे हेच दादाला मान्य नसल्याचे वकिलालाही जााणवत होते. देवीच्या वार्षिकाच्या वेळी खोताना देवळात मानाची जागा. देवीची पंचारत घ्यायचा मान त्यांचा, देवीची पालखी गाव फेरीला बाहेर पडल्यावर पहिल्याने खोतांच्या दारात यायची. खोतांची मानाची पूजाा झाल्यावर मग तरंग गावात वाडीवाडीवर जायचे अशी प्रथा. शिमग्याला होळी तोडडून आणल्यावर खोताने तिची पूजा केल्यावर होळी उभी करीत. पहिला मानाचा नारळ खोत फोडायचा. मग खेळे देवीच्या ओवरीत पहिली टिपरी मारून खोतांच्या वाड्यावर जायचे. तिथे खेळल्यावर मगच त्यांनी घरोघरी टिपरी मारायची. हे आणि असे अनेक कुळाचार दादा खोत सांभाळी.

वकिल आला त्या वर्षी देवीच्या उत्सावात पंचारत धरायला वकील पुढे आला आणि पहिली ठिगणी पडली. घरातला वडिल माणूस म्हणून हा मान फक्त आपणालाच मिळेल हे सांगून दादाने वकिलाचा सर्वांसमक्ष पाणउतारा केला. त्यानंतर नारळीचे पाडप, भाताचा खंड अशा घटनांमधून तेढ निर्माण व्हायला लागली. वकिलाने घरच्या उत्पन्नाचा नीट जमाखर्च ठेवायचा सल्ला दिला तेव्हा तर

a

दादा खोत त्याच्या अंगावरच धावून गेला. वकिलाला कालावलच्या सामंताची मुलगी सांगून आली तेव्हा त्या कार्यातही विघ्न घालण्याचा हर प्रयत्न दादा खोताने केला. पण वकिलाचे तालेवार पाहुणे सामंत खमके निघाले. त्यांनी दादाला नाव ठेवायला जागा मिळणार नाही असे थाटामाटात कार्य करून दिले.

वकील तुल्यबळ व्हायला लागला. तो वकिल असल्यामूळे जनलोकात त्याचा दबदबा वाढायला लागला. आता विलंब उपयोगी नाही अशी ठाम खूणगाठ मनाशी बांधून दादा कामगिरीला लागला. दुसऱ्या महायुद्धात मर्दुमकी गाजवून आलेल्या भिवा परबाशी दादाने संधान साधले. अन् वकिलाला उडवायचा बेत पक्का झाला. व्यवहार ठरला, देवीचा बेलभंडारा उचलून दादा-भिवाच्या आणाभाका झाल्या आणि दिवस ठरला. योजनेप्रमाणे गवळदेवाच्या देवळाजवळच्या आडवणात काजू लागवड करण्यासाठी पहाणी करायला म्हणून दादाने वकिलाला आडबाजूला काढले. त्याच्यासोबत गंग्या धनगर ठरल्याप्रमाणे संध्याकाळी उशीर करूनच आला. वकील आणि गंग्या बाहेर पडले. आडवणात फिरून गंग्या परस्पर धनगर वाड्याकडे आणि वकील घरी यायचा असे ठरलेले. ही संधी साधून वकिलाला वाघबिळा जवळच्या व्हाळाच्या कडेला गाडून टाकायचा. व्हाळा जवळच्या उक्षीच्या झाळीजवळ खड्डा खणून त्याला गाडायचे आणि गाववाल्यांना संशय नको म्हणून आदल्या दिवशी मारलेला ससा घेऊन भिवाने दादाच्या घरी येऊन इशारत द्यायची हा बेत पक्का झाला. सगळे काही मनाजोगते जमून आले. पण आयत्या वेळी देवस्थानच्या भितीने कच खाऊन भिवा रिकामाच परत फिरला.दादा खोत चरफडला, तरीही भिवाने केलेली अटकळ बरोबर आहे हे त्यालाही पटले.

a

दादा खोत मग सल्ला मसलतीसाठी आपल्या सासरवाडीला गेला. दाजी प्रभूखानोलकर हे कोर्ट कज्जे खेळलेले, त्यानी कैक उन्हाळे, पावसाळे बघितलेले. वकिलाचा काटा अलगद कसा काढायचा याचा अचूक बेत त्यांनी जावयाला सांगितला. सांगितल्या गोष्टीत कानामात्रेचा बदल झाला तरी मान अडकेल आणि मग आपणही त्यातून तुझी सुटका करू शकणार नाही असे दादा खोताला त्यांनी स्पष्ट बजावले.

सासरवाडीहून आल्यावर दादा कामाला लागला. भिडू पहिल्याने होते तेच. गंग्या धनगर आणि भिवा परब, अन त्यांच्या जोडीला देवीचा अवसर परशा घाडी हा नवा भिडू! कारण खरी मदार त्याच्यावरच.”हे अवसर-बिवसर सगळा स्वांग आसा. तुमी भिया नको, माणसार जर देवकळा इली असती तर तेंका देवळात बसयले असतात मा! देवकळा नाय नी शिवकळा नाय, पैशाची कळा सगळ्या परास मोठी. रूपये शंभर खळखळावून दाकवलास लास काय परसो घाडी तुमी सांगशात तसा वदतलो.” हे नवीनच ज्ञान दादा खोताला सासऱ्याच्या मुखातून प्राप्त झालेले म्हणून दादा खोताने नव्या बेतात देवीचा

अवसर परशा ह्याला सुद्धा सहभागी करून घेतला. शंभर रूपये हा आकडा ऐकल्यावर परशा घाडी नेसूची लंगोटी फेडून नाचायलाही तयार होता.

वकिलाचा घातवार उजाडला! नवरात्रात करायच्या देवीच्या उत्सवाचा बेत ठरविण्यासाठी अनंत चतुर्थीनंतर चार दिवसांनी कोर्टाचे काम उरकल्यावर संध्याकाळी वकिलाने भाटलेवाडीत यायचे असे ठरले होते. तरीचा भाग एकवशी, निर्मनुष्य.संध्याकाळी चुकार माकार एखादा उतारू असला तर असायचा. म्हणून वकिल यायचा असेल तेंव्हा दिगू तेल्याची बैलगाडी त्याला आणायला मोंडतरीवर

जायची. देवगडातून कोणाची तरी गाडी करून वकील मोंडतरीवर येत असे आणि तरीपलिकडे आल्यावर दिगू तेल्याच्या गाडीतून भाटलेवाडीत येत असे हा नेहमीचा शिरस्ता!

वकिलाची पारध ठरली त्या दिवशी दुपारी भिवा परबाचा भाऊ दिगू तेल्याच्या घराकडे गेला. तेल्याचे बैल घरापासून जरा दूर अंतरावर मांगरात बांधलेले असायचे. भिवाचा भाऊ मांगरात गेला आणि रवंथ करीत बसलेल्या बैलाच्या डोळयात दाभण मारले अन त्याच पावली माघारी फिरला. जेवणखाण होऊन झोप घेतल्यावर दिगू तेली जामानिमा करून गाडी बाहेर काढायला मांगराकडे निघाला. तो मांगरात गेला मात्र. बैलाचा डोळा सुजून रक्त ठिबकताना बघून त्याच्या तोंडचे पाणी पळाले.बैलाने थयथयाट करून शेणामुताचा नुसता राडा केलेला. काय करावे हे दिगूला समजेना.बैल तर दिगूला हारीमोरी घेईना. नुसता पायरव झाला तरी तो चवताळून मारायला धावायचा. आता वकिलाला आणायला जायचे कसे? मोठा पेच त्यालाही पडला. बैलाच्या डोळ्यापेक्षाही खोतांच्या कामाची खोटी झाली तर त्याला फार महागात पडले असते. म्हणून तो तसाच धाव मारीत खोताच्या वाड्यावर गेला. अशान अशी गोष्ट झाली म्हणून त्याने दादा खोताचे पाय धरले.आता आयत्या वेळी वकिलाला आणायला गाडीची सोय काय करायची हा दादा खोताला पेच पडला.मग कोणतरी गडी वकिलाला आणायला तरीपर्यंत पाठवायचा ठरवला. त्याप्रमाणे परशा घाडी वकिलाला आणायला मोंडतरीकडे निघाला. परशा तरीवर पोचल्यावर अगदी फुटक्या तिन्हीसांजेला शेवटच्या फेरीने वकिल आला त्यावेळी होडीत आणखी कोणीच उतारु नव्हता.

a

भिवा परब दिवस मावळायच्या बेताला बंदूक घेऊन टिपवण्याकडे जायला निघाला. टिपपवण्यावर ठरलेल्या देवरण्याच्या आड गंग्या धनगर भिवाची वाट बघितच बसलेला त्याला दिसला. मग दोघेही मोंडतरीकडून गावाकडे येणाऱ्या वाटेला लागले. भाटलेवाडीच्या वेशीवर गवळदेवाच्या कोंडाळयाजवळ ते दबा धरून बसले. कारण वकिल परशा घाड्याबरोबर त्याच गाडी रस्त्याने यायचा असे ठरलेले. त्यांना फार वेळ वाट बघावी लागली नाही. साधारण काळोख पडायच्या बेताला लांबून येणारे परशा आणि वकील गंग्याने अचूक ओळखले. ठरल्याप्रमाणे भेकऱ्याच्या ओरडण्यासारखा ‘ख्यॅक ख्यॅक ‘आवाज गंग्याने काढला.आवाज ऐकल्यावर परशाने इशारा ओळखला!

गवळदेवाचे कोंडाळे येण्यापूर्वी तो इराकतीसाठी म्हणून बाजूच्या झाळीआड गेला अन परश्या येईपर्यंत दम खाण्यासाठी म्हणून वकील गवळदेवाच्या कोंडाळयाजवळ थांबला. काय होते कळण्यापूर्वीच वकिलाच्या तोंडावर घोंगड्याचा बोखारा टाकून हुमदांडग्या भिवाने त्याच्या गच्च आवळून धरले. मग परशा आणि गंग्याने वकिलाला जाम बांधले आणि त्याचे बोचके घेऊन तिघेही गवळदेवापासून लांब असलेल्या टेंबाकडे निघाले. वकील ओरडायला लागला तेव्हा भिवाने त्याला आडवा पाडला. तशी गंग्या त्याच्या पोटाकर बसला नी भिवाने अंदाजानेच हातातल्या रशीचा फास वकिलाच्या नरड्याभोवती गच्च आवळला. त्याबरोबर वकील आचके द्यायला लागला.थोडा जोर काढल्यावर रक्ताचा थेंबही न सांडता वकील थंड झाला. पुढचे काम मग एकदम सोपे होते. टेंबावर आडबाजूला असलेल्या उक्षीच्या झाळीमागे खणून ठेवलेल्या खड्ड्याजवळ पोचल्यावर परशा

खोताच्या घरी जायला निघाला. गंग्या, भिवा ह्यानी वकिलाला गाडून त्याच्यावर दगड-माती टाकून पुरी होईपर्यंत रात्र होऊन गेली.

साधारण जेवणवेळेला परशा घाडी दादा खोताच्या घरी पोचला. काळोख पडेपर्यंत वाट बघूनही वकिल आला नाही. होडीची शेवटची फेरी झाल्यावर मी माघारी फिरलो एवढे सांगून उजेडासाठी चुडती पेटवून परशा घरी गेला. काहीतरी कोर्टाचे काम निघाल्यामुळे वकील आला नाही.असा विचार करून दादा खोताच्या घरची जेवणे उरकली. बेत ठरल्याप्रमाणे पार पाडला असणार म्हणून दादा खोत निश्चिंत झाला असला तरी भिवा किंवा गंग्या भेटेपर्यंत त्याच्या जीवाला शांतता लाभणे शक्य नव्हते.

उजाडल्यावर गंग्या धनगर घोंगड्यातून भेंडे बांधून दादा खोतांच्या घरी आला. भेंडे दिलावर रात्री भिवा परबाला टिपवण्यावर 'समंधाने' धरले.त्याची बंदूक मोडली. भिवाला चांगले घोसळले. कसाबसा जीव वाचवून भिवा मध्यानरात्री घरी आला अशी बातमी त्याने दादा खोताला दिली. हे ऐकल्यावर काम फत्ते झाले हे ओळखून दादा खोत हरखून गेला. भिवाला समंधाने धरले याची मोठी चर्चा गावात सुरू झाली. भिवा अधून मधून आरडे-ओरडे,दात खाई. मग परशा घाड्याने त्याच्यावरून कोंबडे उतरून काढले., देवीला गाऱ्हाणे केले.

वकील ठरल्या दिवशी आला नाही यापेक्षा अधिक फिकीर खोतांनी केली नाही. नाही म्हणायला वकिलाची आई दोनतीन वेळा दादाला म्हणाली,"दादा वकील कित्या ईले नाय तेची चवकशी करूक देवगडाक गडी धाडूक व्हयो." पण दादाने उडवाउडवीच केली. मात्र चौथ्या दिवशी वकिलाच्या बायकोने वकिलाची तब्बेत वगैरे बिघडली की काय? याची चौकशी करायला देवगडातून भाटलेवाडीत

गडी पाठवला. गडी आल्यावर भाटले वाडीत येण्यासाठी बाहेर पडलेला वकिल चार दिवस कुठे दडी मारून बसला आहे? काहीच तर्क कोणाला करता येईना. आता मात्र धोतर कोट घालून दादा खोत जाातिनिशी देवगडात गेला. त्याने भावजयीची भेट घेतली. वकील देवगडातून कधी निघाला वगैरे चौकशी केली. वकील देवगडातून निघाला तो तरी पलिकडे झाला.त्याने तेल्याची गाडी येईल म्हणून थोडावेळ वाट बघितली. काळवं पडायला लागल्यावर मात्र उशीर व्हायला नको.म्हणून तो गाडीवाटेने चालत निघाला. इथपर्यंत माहिती त्याने भावजयीला दिली. मात्र तो पुढे कुठे गेला याबददल कोणालाच काही सांगता येईना असे भावजयीला सांगून वकिलाचा शोध लागेपर्यत तू घरी चल असे सांगून तिला घेऊन दादा खोत भाटलेवाडीत आला.

वकिलाचा शोध घ्यायला चारी दिशाना माणसे रवाना झाली. कालावलला सामंतांकडे, त्याच्या सासुरवाडीला निरोप गेला. सगळ्या पाहुण्या सोयऱ्यांकडे गडी जाऊन आले पण कुठेच काही पत्ता लागेना. वकिलाच्या सासऱ्यानी आपला शहाणपणा चालवून पोलिस स्टेशनला खबर द्यायचे सुचविले. मग पोलिस तपास वगैरे सोपस्कार पार पडले. दसऱ्याच्या दिवशी देवीच्या अवसराने दिवाळीपर्यत वकील घरी येईल असे सांगितले. वकील कुठे आहे, काय आल्यावर सगळा उलगडा होईल, असा खुलासा देवीच्या अवसराने केला.

वकिलाचे बेपत्ता होणे ही घटना हळूहळू थंड पडत चालली. परशा भगताची बिदागी, गंग्या धनगर आणि भिवा परब यांची बिदागी बिनबोभाट मिळाली. पुढच्या मिरगापासून रेवाळीच्या मळ्यातली जमीन भिवाने खंडाने म्हणून कसायला घेतली. वकिलाची बायको वर्षभर खोतांच्या वाड्यावर राहिली. पण हाल जाच करायला

सुरूवात झाल्यावर ती कायमची माहेरी रहायला गेली. दाजी प्रभुखानोलकराचा सल्ला दादा खोताला चांगलाच मानवला. पैशाच्या देवकळेचा महिमा खरोखरच मोठा असतो हे दादा खोताला पुरते उमगले अन् वकिलाचे नाहीसे होणे ही बाब भाटलेवाडीतील एक दंतकथा बनून राहिली.

# १२. प्रकृतेः क्रियमाणानि

कोर्टाचा बेलिफ आणि कोतवाल ह्याना घेऊन दाजी प्रभु भिकू घाड्याच्या घरासमोर थांबला. भार्गव शास्त्रींच्या घरावर जप्ती आलेली आहे हे कळताच भिकू पुरता हडबडला. गावचा पोलिस पाटील म्हणून सरकारी कामात मदत करणे त्याला भागच होते. सगळा लवाजामा भार्गवशास्त्री सोहोनींच्या वाड्यावर जाईपर्यंत जप्तीची बातमी खाजणतडीत वणव्यासारखी पसरली. असे काही विपरीत घडेल याची गंधवार्ताही नसल्यामुळे गावावर शोककळा पसरली. हातातले काम टाकून जो-तो भार्गवशास्त्र्यांच्या घराकडे निघाला. सरकारी मंडळी अंगणात आली तेव्हा पूजा उरकून निर्माल्य टाकण्यासाठी शास्त्रीबुवा बाहेर आलेले होते. चापून चोपून नेसलेला पितांबर, खांद्यावर धाबळीचे उत्तरीय, चकचकीत श्मश्रू केलेल्या डोईवरील गोपद्माकार घेऱ्यातून बाहेर पडून मानेपर्यंत रूळणारी भक्कम शेंडी, मस्तक, बाहू, छाती यावर ओढलेले तिबोटी भस्म पट्टे आणि शांत संयमी मुद्रा असलेले शास्त्रीबुवा. त्यांच्या दर्शनानेच बेलिफाच्या मनात त्यांच्याविषयी अपार आदरभाव जागृत होऊन ‘नमस्कार’ असे म्हणत त्यांच्या समोर वाकून त्याने भूमीला हस्तस्पर्श केला. किंचित हसतच शास्त्रीबुवानी ‘स्वागतम’ असे शब्द उच्चारताच त्याना पुढे बोलू न देता दाजी प्रभू म्हणाला, “तुमचे स्वागत स्वीकारायला आम्ही आलेली नाही भटजीकाका. आत्ताच्या आत्ता नेसत्या वस्त्रानिशी वाड्याबाहेर पडा.तसा जप्तीचा हुकूम आहे आमच्याकडे.” त्यावर जारबेच्या स्वरात बेलिफ म्हणाला,”एवढा अघोरीचरीपणा बरा नव्हे रे बामणा. एका सज्जन ब्राह्मणाचे मुलाबाळांचे घर आहे हे. शास्त्रीबुवांची नुक्ती कुठे पूजा होत्येय. शास्त्रीबुवा, तुम्ही सोवळे बदलून सावकाश पणे या.तोवर

आम्ही ओसरीवरच टेकतो. गडबड धांदल करण्याची काही गरज नाही आणि हे बघ बामणा तू पावळीतच उभा रहा. अजून तुला घराचा ताबा दिलेला नाही.”

जप्तीची वार्ता ऐकून सगळा गाव हळु हळू शास्त्रीबुवांच्या घरासमोर जमा व्हायला लागला. असे कसे झाले ? दाजी बामणाची बुध्दी अशी कशी फिरली ? जो तो खालच्या आवाजात कुजबूजू लागला.दोन महिन्यापूर्वी मामलेदाराची नोटीस आली तेव्हा शंकरेश्वराच्या देवळात जमून सगळया गाववाल्यानी आणाभाकाही घेतलेलेल्या.त्यावेळी दाजी बामण हजर होता. मग गावासमोर गप्प राहून आयत्यावेळी शेण खायची दुर्बुध्दी त्याला कषी काय सुचली ? हे-हे सगळे थांबवायला हवे. कायदा झाला म्हणून काय झाले? शेवटी बामणाला गावातच रहायचे आहे ना ? घर खाली केल्यावर शास्त्रीबुवांच्या माणसांनी जायचे कुठे ? त्यांनी काय कुणाचे चार चव्वल बुडवले आहेत थोडेच ? हा निर्णय काय एकट्या शास्त्रीबुवांचा नाही, खार जमिनीचा सारा भरायचा नाही हे सगळया गावानेच ठरवलेले होते. ज्याला जे सुचेल ते जो तो दबल्या आवाजात कुजबुजू लागला. झाली गोष्ट फारच विपरीत होती. पण हे अरिष्ट टाळायचे कसे ? हे काही त्या जानपद माणसाना उमगत नव्हते. महापाताळयंत्री बामण, त्याने अवघाती मोका बघून वर्मी घाव घातलेला.

देवघरात सोवळे बदलीत असता शास्त्रीबुवांच्या मनात विचारांचे काहूर उठले. सोहोन्यांच्या सात पिढ्या खाजण तडीतल्या या वाड्यात नांदल्या. भार्गवशास्त्र्यांचे वडिल कृष्णशास्त्री अन चुलते रामशास्त्री तर वाईला वेद विद्या शिकून झाल्यावर काशीच्या कालभैरव देवस्थानचे पुजारी हरिभक्त पारायण श्रीपादबुवांकडे कीर्तनविद्या शिकण्यासाठी राहिलेले. कृष्णशास्त्रींना कौटुंबिक

जबाबदारीमुळे कीर्तन विद्या अर्धवट सोडून खाजणतडीत यावे लागले. पण रामशास्त्री मात्र गुरूचा वारसा सांभाळीत काशीलाच स्थायिक झालेले. दोन तीन वर्षानी एकदा त्यांची खाजणतडीत फेरी व्हायची. भार्गवच्या मुंजीतही ते सहकुटुंब आलेलेले. भार्गव चुणचुणीत, एकपाठी आहे. मधुर गळयाची दैवी देणगी सुध्दा त्याला लाभलेली आहे. हे ओळखून विद्याभ्यासासाठी म्हणून त्यानी भार्गवला आपल्या सोबत काशीला नेले. घनपाठी झालेला भार्गव विद्याध्ययन पूर्ण करून खाजणतडीत आला तेव्हा दशक्रोशीत त्याच्याबद्दल चर्चा झालेली. वेदविद्या आणि कीर्तन यामध्ये पारंगत असलेल्या या स्थळासाठी थोरा मोठ्यांच्या मुली सांगून आल्या. मात्र त्यांचे वडील कृष्णाशास्त्री यानी जन्म टिपण उत्तम जुळणारी वाड्यातल्या चिंतामणशास्त्रींची यमुना निवडली अन ती गंगा या नावाने सोहोन्यांच्या वाड्यात नांदायला लागली.

अत्यंत सात्विक, सदाचरणी भार्गव शास्त्रींना गावातच नव्हे तर दशक्रोशीमध्ये मान मिळायचा. कीर्तनासाठी तर त्यांना रत्नागिरी, गुहागर, गोवा, करवीर, नृसिंहवाडी अशी दूरदूरची निमंत्रणे यायची. शास्त्रीबुवा एकदा कीर्तनासाठी उभे राहिले की उत्तर रात्र उलटली तरी भान हरपलेला श्रोतृवृंद तन्मय होऊन खिळून रहायचा. जनलोकात उत्तम लौकिक अन् सन्मान असला तरी शास्त्रीबुवांची गृहस्थिती जेमतेम. केवळ चरितार्थाला पुरेल इतपतच! घराखाली मळयात दहा खंडी भाताचे उत्पन्न देणारी भूमी असली तरी मळेशेती अशाश्वत असायची. शास्त्रीबुवांची वाटणी खाजणाच्या पार कडेला खाडीच्या ऐन नस्तात! मुसळधार वृष्टी होऊन मळयातले पाणी फारच तुंबले की खारे पाणी अडविण्यासाठी घातलेल्या चिखलाच्या बांधाला खांडी पडायच्या. सुरूवातीला हातभर असलेले खिंडार

a

जोरगतीच्या भरतीमुळे फसाफसा वाढत जायचे. सुकती लागली की वेगाने निचरणारे मळयातले पाणी खांडीचा आय आणखी वाढवायचे अन मग दुसऱ्या भरतीच्या वेळी खाडीचे खारे पाणी मळयात शिरून भातशेतीचा तुळांकार करीत असे. बांधाला पडलेल्या या खांडी वेळेवर बुजवल्या तर ठीक नाहीतर संपूर्ण मोसभर मळा खारटाणी खाली पड रहायचा. मग कसली शेतीनी कसले काय! निम्मे मळयात चिमटीभर सुध्दा भात पिकत नसे. त्यातल्या त्यात गाव कुसाकडे ज्यांच्या जमिनीच्या वाटण्या होत्या ते शेतकरी मात्र कधी बुडत नसत.

शास्त्रीबुवांच्या पणजोबांच्या कारकीर्दीत तर म्हणे निम्म्या मळयात खाजणाचेच सम्राज्य पसरलेले. पण पणजोबा दूर दृष्टीचे. त्यानी सरकार दरबारी खेटे मारून सारा माफीचे फर्मान मिळवले. मग गावकऱ्याना हाताशी घेऊन स्वतःच्या देखरेखी खाली खारे पाणी अडविण्यासाठी बांध घातला. शिलकीतले सोने नाणे खर्चून बांध घातला. वास्तविक निम्मे मळा सोहोन्यांच्या मालकीचा. कारण खाजणतडीतले ते मोठे वतनदार. पण काही कुणबी घराणी हाताशी धरून स्वतःकडे चरितार्थापुरती चार आणे हिश्श्याची वाटणी ठेऊन उरलेली चार आणे हिस्से रशीची जमिन माळगवे, हेमले, कानडे, घाडी, राघव या लोकांना बक्षिस पत्राने ताब्यात दिली. चिखलाचा पक्का बांध घातल्यावर मळयातले पावसाचे पाणी जाण्यासाठी वरच्या कडेला आठ हात लांबीचे फाडे ठेऊन तिथे उंडलीच्या लाकडाची तीन झडपे असलेला दरवाजा बसविला. ही झडपे समुद्राच्या दिशेने उघडत अस्त. त्यामुळे सुकतीच्या वेळी मळयात साठलेले पावसाचे पाणी खाडीत वाहून जायचे नी पाणी तुंबण्याचा धोका रहात नसे.

भरतीच्या वेळी दरवाजे बंद होवून खाडीतले खारे पाणी मळयात येत नसे.मात्र पंधरा वीस वर्षानी एकदा दरवाजाची चौकट आणि झडपे बदलावी लागत. कारण सतत पाण्यात राहिल्यामुळे सुरळया पडून, कुजून ती कोरम होत. तसेच पावसाळ्यातसुध्दा मुसळधार पाऊस पडे. तेव्हा आणि उधानाची भरती येई तेंव्हा रात्रंदिवस बांधावर राखण धरावी लागे. कुठे बारीक खांड पडताना दिसली तर लगेच वाडीतले झिलगे बोलावून ती बुजवून घ्यावी लागे. काहीवेळा मळयातल्या पाण्याला अती फुग पडतेशी वाटली तर पहारीने दरवाजाच्या झडपाना बिजागरा सारख्या लावलेल्या लोखंडी पट्टया उचकटून झडपे काढून टाकावी लागत. काहीवेळा सगळे उपाय थकत आणि बांध फुटून मळयात खारे पाणी शिरून मळा मोसमभर पड रहायचा. खाजणातली शेती ही अशी बिनभरवशी, रक्ताचे पाणी करणारी असली तरी जेव्हा कधी पिक पदरात पडे तेव्हा केलेल्या कष्टाची भरभरून परतफेडही खाजण शेती करायची.

जवळ जवळ पन्नास साठ वर्षेअशी बिनबोभाट गेली. त्यानंतर कोणी कशी काय कळ फिरवली नकळे. पण ब्रिटिश अंमलदाराचा सारा माफी रद्द केल्याचा हुकूम आला आणि खाजाणतडीतच नव्हे तर खारेपाटणपासून विजयदुर्गपर्यंत खाडी किनाऱ्यालगत खारजामिनी असलेल्या गावांमध्ये एकच बोंबाबोंब झाली. काही गावानी जमिनी पडच टाकल्या, काही ठिकाणी एकजूट करून जमिनी कसायच्या पण सारा भरायचा नाही. कदाचित कोर्टाने जमिनी लिलावात काढल्या तर गावातल्या कोणीही लिलावात बोली लावायला न जाता लिलाव मोडीत काढायचे असे ठरवले. काही गावानी ज्याना धोका कमी होता, पिकांची शाश्वती होती त्यानी बिनबोभाट सारा भरला. काही गावानी रदबदली करून मामलेदार - अंमलदाराना '

चरू- हवीष्य ‘ अर्पण करून गुपचुप सारा माफी करून घेतली. आपत्ती सगळयांवर असली तरी एकसंघटित प्रयत्न नव्हते. काहीजणांनी मुळी येईल त्या किमतीला जमिनी विकून टाकल्या नी आपल्यापुरता ‘मनस्ताप’ काढून टाकला. ज्याला जे सुचेल ते त्याने केले. सारा भरण्याचे फर्मान काढणारा अंमलदार बदलून गेल्यावर तर सगळाच गोंधळ झाला. कधीतरी कुठल्यातरी तहसिलात मागची प्रकरणे उकरून नोटिशी काढल्या जात. घाबरलेले जमिनदार मामलेदार नी त्यांचे फर्जीज्यादी यांच्या स्वाहा करण्यासाठी उघडलेल्या टाळयात काहीतरी ‘हवी’ टाकीत नी मग उकरलेली प्रकरणे गुलदस्त्यालगत रहायची. भार्गवशास्ह्त्र्यांचे लग्र झाले त्यावर्षी अशीच नोटिस लागली होती. शंकरेश्वराच्या देवळात मून मग गावाने मळा पड टाकायचा निर्णय घेतला. पावसाळयात कोणीतरी अव्वल कारकून मळा पड असलेला बघून गेल्यावर सारा माफी झाली नी दुसऱ्या मोसमात खाजणतडकरानी पुन्हा शेती करायची सुरूवात केली.

दिवाकराचा जन्म झाला आणि बऱ्याच वर्षानी सोहोन्यांचे घर बाललीलानी भरून गेले. कृष्णशास्त्रींना तर नातवाच्या कौतुकापुढे दिवस पुरत नसे. नित्यकर्मे अन् देवपूजा एवढीच सांसारिक गुतवणूक पार पाडून बाकी सगळा वेळ ते नातवावर संस्कार करण्यात घालवित. पाच वर्षे वयाच्या दिवाकराने महिम्न, पवमान मुखोदगत केले, त्याची वाणी एवढी शुध्द, आवाज असा मधुर की जटापाठी, घनपाठी शास्त्र्याने सुध्दा त्याच्या मुखातून महिम्न ऐकल्यावर कौतुकाने मान डोलवावी. आता त्यांच्या मुंजीचे वेध आजीला लागले. भार्गवच्या पाठीवरची त्यांची मुलगी कृष्णी तिचे लग्र झाल्यापासून घरात मंगलकार्य झालेलेच नव्हते.नातवाची तमुंजा गजाबारात करायची. भार्गव शास्त्रींचा लोकसंग्रह तर केवढा

मोठा.त्यांचा लौकिक किती थोर.मुंजीच्या निमित्ताने दशक्रोशीतला ब्रह्मवृंद जमला तर अनायासे सहस्त्र भोजनही घडेल असे बेत आजी - आजोबा योजू लागले. मुंजीचे सूप वाजल्यावर हळुहळू फावल्या वेळात सामान - सुमान, निमंत्रणे यांच्या याद्या ते करायला लागले. यंदा मळाही चांगला पिकलेला. खंडाचे पंचवीस खंडी भात कोठारात भरलेले आहे. भार्गवच्या आणि स्वतःच्या प्राप्तीतूनही शिलकीत टाकलेली माया मुंजीचा थाट उडवायला पुरेशी आहे या विचाराने कृष्णशास्त्री अगदी निर्धास्त मनाने येऊ घातलेल्या मंगल कार्याची जोडणी करण्यात मग्न झाले.

मुंज दोन महिन्यांवर आली.आता शंकरेश्वराला मानाचे निमंत्रण करून बाहेरगावच्या काशी, नृसिंह क्षेत्र, गोव्यापासूनच्या आप्तेष्टाना आमंत्रणे पाठवायची सुरूवात करायला हवी असा बेत बापलेकानी आखला. त्याच दिवशी ‘शेत सारा’ भरणा करण्यासंबंधीची मामलेदाराची नोटिस आली. फारशी गांभीर्याची बाब नव्हती पण अगदीच दुर्लक्ष करूनही भागणारे नव्हते. मग भार्गवशास्त्री तालुक्याच्या गावी मामलेदारांच्या भेटीला तिथले एक प्रतिष्ठीत वकिल रघुनाथपंत गोरे याना घेऊन गेले. अधिकारी ‘मुलकी’ निघाला. परिस्थितीची त्याला पूर्ण कल्पना पण कुणीतरी प्रांताकडे चुगल्या केल्यामुळे वरून हे प्रकरण आल्याची माहिती त्याने दिली. त्याने सांगितले की, आम्ही आणखी दोन नोटिसा देऊन लिलावाची ऑर्डर काढू. सगळ्या जमिनदारानी एकजूट करून ‘लिलाव’ निकाली काढा आणि नंतर सारा माफीसाठी अर्जा करा. मी तुमच्या अर्जावर शिफारस देऊन कायमची सारामाफी मिळवून देईन. तुम्ही निश्चिंत रहा. पण लोकाना याची कल्पना देऊन एकजूट मोडू नका. एखाद्याची नियत फिरली तर मात्र मला काहीच करता येणार नाही. तेंव्हा तुम्ही फक्त एवढीच

सावधगिरी घ्या. निर्धास्त होऊन घरी आलेले शास्त्रीबुवा हौशीने मुंजीच्या तयारीला लागले.

शास्त्रीबुवानी शंकरेश्वराच्या देवळात सगळया गावकऱ्यांची बैठक भरविली. मंडळी जमल्यावर मामलेदाराशी झालेले बोलणेही त्यांनी सांगितले. उलट सुलट विचार विनीमय चाललेले असताना दाजी बामणाने मात्र शंका उपस्थित केली. 'म्हंजे ह्यो नोटिशी वरना इलेल्या आसत. फुडे काय व्हयत ता मामलेदाराक पण सांगाक येवचा नाय. काय व्हयत जायत ता बगू. ही कायमची झंझटा करीत ऱ्हवन्या पेक्शा ते पेक्षा कम जास्त किंमतीक आपल्या हिशाची जमिन इकान टाकलेली काय वायट. मी आपलो तुमका सावद करूचा म्हनान सांगतय." अर्थात त्याचा हा सल्ला ऐकून फुका पासरी किमतीला जमिनी फुकून टाकायला लोकांचे शहाणपण काही चुलीत गेलेले नव्हते. प्राप्त परिस्थितीत सर्वानी गप्प रहायचे. लिलावाच्या नोटिशीना कोणीच दाद द्यायची नाही अन् लिलाव घ्यायलाही कोणी पुढे व्हायचे नाही. अशा शंकरेश्वराच्या साक्षीने आणाभाका झाल्या.

सोहोन्यांच्या घरातली माणसे मुंजीची तयारी करण्यात मग्न झाली. मुहुर्त निश्चित झाल्यावर दिवस वार बघून ढोल ताशाच्या गजरात ग्रामदेवाला मानाचे निमंत्रण देऊन झाले अन् . हळद पिंजरीचे बोट लावून बाहेर गावची आमंत्रणे रवाना झाली. पापड, फेण्या, सांडगे, कुरडया यांचे जिन्नस येऊन पडले. निवड टिपण सुकवले - वाळवणे या उस्तवारीने सास्वा सुना अगदी टेकीला आल्या. आता कापड चोपड आणि चांदीचे ताम्हन,पळी पंचापात्री,सोवळी अशी महत्वाची खरेदी करण्यासाठी भार्गवाने मुंबई - पुणे गाठावे असा लकडा त्याच्या आई - वडिलांनी त्याच्या मागे लावला. मग खरेदीसाठी जाण्याचा दिवस नक्की झाला. भार्गवशास्त्री

a

सामान खरेदीसाठी गावातल्या दोन माणसाना सोबत घेऊन मुंबईला रवाना झाले त्याच्या दुसऱ्या दिवशी मामलेदाराची नोटीस आली.

अर्थात या नोटिशीचा फारसा विचार कोणीच केला नाही. शास्त्रीबुवांनी नोटिस आपल्या कपाटात टाकली. भार्गवशास्त्री कापड चोपड आणि सामान घेऊन दहा दिवसानी परत आले. रात्री नवीन खरेदी करून आणलेली किटसन गॅसबत्ती पेटवून त्या उजेडात घरच्या मंडळीनी सोवळी - शालू, पितांबर, देण्याघेण्याची नी रोजा वापराची लुगडी मोठया हौसेने बघितली. पुढचे तीनचार दिवस मग खास माणसाना सामान दाखवण्यात कसे गेले ते कळलेच नाही. मुंजीला महिनाभर अवधी उरला. कामाच्या झपाट्यामुळे फक्त महत्त्वाचे जिन्नस म्हणजो लाडू, भिक्षावळयात घालायचे पाच पदार्थ एवढेच करणे शिल्लक राहिलेले होते. मागील दारी पुढील दारी अंगण करण्यासाठी गडी आले. अंगणसुकल्या वर चार दिवसानी मांडव घालायची जुळणी सुरु असताना लिलावाचा दिवस उजाडला.

त्या दिवशी शास्त्रीबुवा गडी घेऊन मांडवासाठी मेढी तोडायला आडवणात गेले. गड्यांच्या फैलात दोन वाटेकरी ही आलेले, त्यांच्या पैकी कोणीतरी लिलावाची डिक्री आल्याचा विषय काढला नी सगळयानी खो खो हसत सरकारची टर उडवली. मात्र त्याच वेळी दाजी बामणाने रक्कम घेऊन तालुका गाठला आहे हे कुणालाच माहिती नव्हते. दुपारी उशीराच मामलेदारानी सूचना दिली अन् पट्टेवाल्याने लिलावाची पुकारणी केली. ही केवळ कायद्याची अंमलबजावणी केल्याचे नाटकच आहे हे सर्वानाच माहिती होते. पण लिलाव पुकारल्यावर दाजी बामण उठला. त्याच्या सोबत पंच म्हणून त्याने तालुक्यातलेच दोन प्रतिष्ठित स्नेही घेतलेले. पंचा समक्ष आपण भार्गवशास्त्री सोहोन्यांच्या हिस्सेरशीच्या दंडाची रक्कम

भरून लिलाव घेंणार आहोत असे तो म्हणाला. लिलावाची बोली वाढवायला दुसरा कोणी पक्षकारच नव्हता. त्यामुळे फक्त सरकारी वसुली एवढी सव्वाशे रूपये रक्कम भरून शास्त्रीबुवांच्या मळे जमिनीसह त्यांचे घर घरभाटाचे लिलाव घेऊन मिळकतीचा ताबा मिळण्यासंबंधात मामलेदारची ऑर्डर घेतली. त्या दिवशी तो तालुक्यातच राहिला. गावात कदाचित गडबड होईल असा धूर्त विचार करून त्याने कोर्टामार्फत लिलावातील मालमत्तेचा पोलिस संरक्षणाखाली ताबा मिळण्यासाठी अर्ज केला.

कोणाची नियत फिरून आपण अडचणीत येऊ याचा विचारही भार्गवशास्त्रींच्या मनाला शिवलेला नव्हता. आजतर लवकर आंघोळ वगैरे उरकून बाहेर गावची निमंत्रणे करण्यासाठी ते बाहेर पडायचे होते अन् अकस्मात जप्तीचे ववॉरंट घेऊन दाजी बामण मिळककतीचा ताबा घ्यायला आला म्हणताच त्यांचे डोके सुन्न झाले. सोवळयाचा पिळा गाठ मारून मांडवीवर टाकल्यावर घाईघाईत धोतर पालटून निऱ्या काढीत ते ओसरीवर आले. “हं आता बोला काय ते . आता आम्ही काय करायला हवे ?” या सत्पवित्र ब्राह्मणाला घर खाली करून सर्व माणसानी ताबडतोब बाहेर पडा असे सांगायला सरकारी हुकूमाची तामिली करायला बांधलेले बेलिफ आणि कोतवाल यांचीही जिभ रेटेना. पण बामण गुर्मीत म्हणाला, “न्हेसल्या वस्त्रासकट सगळयानी भायर पडान् घर घरभाटाचो ताबो माका देवचो. तुमच्या दंडाची रक्कम भरून मी लिलाव घितलय्. सगळा सयसामान जयच्या थय ठेवन् लगच्या लगेच सगळयांका भायर काडा.” आता मात्र बेलिफाला राहवले नाही,”दाजी आता मात्र तू इथे सुध्दा थांबू नको. अंगणाबाहेर जाऊन पाळंदीत थांब. आम्ही घराचा ताबा घेऊन या डिक्रीवर शास्त्रीबुवांची सही झाली की तुला ताबा

a

देऊ. मात्र तोपर्यंत मध्ये एक अक्षरही बोलशील तर ताबा देण्याचे काम मी रद्द करीनच पण सरकारी कामात अडथळा आणलास म्हणून तुला आधी पोलिस कस्टडीत टाकीन." बामण खेटरासारखे तोंड करून बाहेर गेला. हा विषय स्वयंपाक घरात बायकांपर्यत गेलाच होता. कृष्णशास्त्री परसदारी विहीरीवर आंघोळीला गेलेले.त्याना बोलवायला शास्त्री बुवानी दिवाकरला पाठविले.

जप्ती आल्याचे समजाताच म्हाताऱ्या कृसणशास्त्रींचे अवसानच गेले. अति दुःखामुळे त्यांना रडूही येईना. भकास आवाजात ते म्हणाले, 'परमेश्वरा. सात पिढ्या ह्या वाड्यात नांदल्या. मोठ्या हौसेने नातवाच्या मुंजीचा घाट घातलेला असताना हा कसला अभद्र प्रसंग आला रे आमच्यावर ?" भार्गव शास्त्री आता मात्र सावरले, वडिलांना शांत करीत त्यांच्या खांद्यावर थोपटल्या सारखे करून ते म्हणाले, "बापू, तुम्हीच असा धीर सोडू नका. तुमच्या नातवाची मुंजा कालभैरवाच्या साक्षीने काशी विश्वेश्वराच्या दारात लागावी अशीच विधी योजना आहे त्याला आपण काय करावे/" मग भगवदगीतेतल्या तिसऱ्या अध्यायातील श्लोक त्यानी खणखणीत आवाजात म्हटला, "प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः। अहंकार विमूढात्मा कर्तामिति मन्यते." आता शांत विमनस्क झालेले कृष्णशास्त्री उठले. त्यानी पत्नी - सुनेला सांगितले,"आत्ताच्या आत्ता सोवळी बदलून नेसूची पातळे पालटा. आपल्याला हे घर सोडून कायमचे काशीला जायचे आहे." खाली मान घालून सून म्हणाली, "मामंजी, हे जायचे म्हणून भात शिजत ठेवला आहे. शिजते अन्न टाकून जाऊ नये म्हणतात. तेवढा शिजाला की उतरून ठेऊन वैश्वदेव उरकून बाहेर पडले तर नाही चालणार?"

कृष्णशास्त्री धारदार आवाजात म्हणाले,''नाही, अहो राजाज्ञा झालीय,त्यापुढे तुमचा वैश्वदेव कुठला ? तो भात तसाच राहू दे चुलीवर. आज आमच्याा हातचा वैश्वदेव काकबली नको आहे कोणाला. तुम्ही फक्त सोवळे बदला आणि बाहेर पडा.'' सून - म्हातारी टाकोटाक नेसूची पातळे नेसून ओटीवर आल्या. सर्वांनी उंबऱ्यासमोर उभे राहून हात जोडले. मग भार्गवशास्त्रींनी दिवाकरला उचलून खांद्यावर घेतले अन् हसतमुखाने मंडळी घराबाहेर पडली. ओसरीवरून अंगणात उतरता उतरता भार्गव शास्त्री बेलिफ -कोतवाल यांच्याकडे वळून म्हणाले,''सरकारी आज्ञेप्रमाणे आम्ही घर घरभाटासह लिलावातल्या मिळकतीचा ताबा सोडून नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पडलो आहोत. आता दाजीप्रभूला ताबा द्या . बिचारा रंजीस येऊन तुम्ही बोलावण्याची वाट पहातेय.''

◙ ◙ ◙ ◙ ◙ ◙ ◙ ◙

# १३. सांबरशिंग

तब्बल बत्तीस वर्षांनी स्वतःच्या मारूतीमधून अशोक मूळगावी हुंबरटला निघालेला. सोबत क्लबमधले उच्चभ्रु मित्र. आजपर्यंत केवळ कथा-कांदबऱ्यांमध्ये वाचलेलं कोकणातलं गाव बघायला, एन्जॉयमेंट म्हणून! कॉकटेल पार्टी रंगात आली की अशोक आपल्या चौसोपी वाड्याचं रसभरीत वर्णन करायचा. ओसरी,पडवी असलेलं प्रशस्त घर. पायाचे घडीव काळवत्री दगड असलेलं मजबुत उंच जोतं. ओसरीवरचे वेलबुट्टी कोरलेले खैराचे भक्कम खांब. अस्सल सागवानी भव्य तुळया. त्यांच्या दर्शनी टोकांना वर्तुळाकार छेद घेऊन त्यावर कोरलेल्या नागफणा. दर्शनी दिंडी दरवाजाची नक्षीकाम केलेली चौकट. तिच्या मध्यभागी गणपती अन् ऋध्दिसिध्दी कोरलेल्या. शंभर वर्षांची परंपरा सांगणारा, कडीपाटाचा, राजांगण असलेला खोतांचा वाडा! ओसरीवर, राजांगणाच्या कडेवर मागील दारी असे तीन शिसवी झोपाळे. राजांगणाजावळच्या झोपाळ्याला खूर असल्यामुळे तो काढल्यावर त्याचा खाटेसारखा वापर व्हायचा. झालंच तर आजोबांनी खास बनवून घेतलेला चंदनी पलंग. त्या काळी मुद्दाम बेळगावातून चंदनी लाकूड सामान आणून तो बनवून घेतलेला. चांदोबा मासिकात सरदारांच्या वाड्याची चित्रं असतात. त्या चित्रांमध्येच बघायला मिळतो असा तो राजेशाही पलंग.

दुसऱ्या दिवशी पार्टीचा हँगओव्हर आला की मग अशोक सकट सगळ्यांनाच हुंबरटमधल्या त्या खोतांच्या वाड्याचं विस्मरण व्हायचं. अशोक

शिक्षणासाठी म्हणून मामाचं बोट धरून मुंबईला गेला नी इंजिनिअर होवून मुंब ईतच नोकरीला लागला, अशोकची पत्नी शांता मुंबईईतच जन्मलेली नी लाडाकोडानं वाढलेली. ती ललना गावाचं नाव काढलं की नाक मुरडीत, उठून जायची. नोकरी अन् पार्ट्या या व्यापातून गावाची आठवण तरी कुठली व्हायला? आई-भाऊ अधूनमधून यायचे. त्यांचं गावंढळ मालवणी बोलणं अन् मॅनरलेस, रबीश् वागणं. ती मुबंईला आली की तासा दोन तासांतच राहूलला घेऊन शांता सरळ गिरगावला माहेरी जायची. आई वारल्यावर अशोक चा मामाच हुंबरटला गेलेला. भाऊ त्याच्याबरोबर मुंबईला आले नी मामाकडेच दादरला राहायचे. कधीतरी दोन-तीन महिन्यांनी अशोक त्यांना भेटून यायचा. बस्स! १० वर्षानी भाऊ गेले अन् हुंबरट विस्मृतीच्या खोल गर्तेत बुडून गेलं.

अगदी अलीकडेच,अडीच-तीन वर्षामागे कुणीतरी पटेल नामक व्यापारी कणकवलीतील दोघा पुढाऱ्याना घेऊन अशोकच्या फ्लॅटवर आला. हुंबरटमधला तो वाडा आजूबाजूच्या जमिनीसह तीन लाख रूपयांना खरेदी करायची ऑफर त्या मंडळींनी दिली. खरं तर मुंबईतल्या हिशोबाप्रमाणे वाड्याचेच पंचवीस लाख मिळाले असते. पण हुंबरटसारख्या आड खेड्यात एवढ्या प्रॉपर्टीसाठी दोन तीन लाख रूपये सुद्धा मोजण्याचं धारिष्ट्यही कुणी दाखवलं नसतं. भाऊ गेले. त्यानंतर सात खंडी धान्य पिकवणारी सुपीक मळेजमिन कुळांना विक्री करण्याची नोटिस आलेली. राणे, घाडी, दळवी, पाष्टे अशा कुळांनी सरकारी दराप्रमाणे रक्कम पोहोच केली. त्या मातब्बर जमिनीची किंमत एक हजार बाराशे रूपये मात्र रोख घेऊन पावलो असं नोटरीसमोरं अशोक ने लिहून दिलेलं. कांतीभाई पटेलची ऑफर ऐकल्यावर अशोकला शेतजमिनीच्या किमतीचं स्मरण झालं.

देसायांची जमीन-वाडा बी. के. जी. हायवेला लागून फोंड्याला जाणाऱ्या फाट्यालगत मोक्याच्या जागी असल्यामुळे पटेल एवढी मोठी रक्कम द्यायला तयार झालेला. त्या जागेवर त्याला हार्डवेअर-कन्स्ट्रक्शन मटेरियल विक्रीचं दुकान आणि बेंडसा घालायचा असल्याचं तो बोलला. हो ना करता साडेचार लाखाना व्यवहार ठरला. बसल्या बैठकीत दोन लाख हार्ड कॅश त्यानं ॲडव्हान्स म्हणून दिली. हायकोर्टात नव्याने प्रॅक्टीस सुरू करणाऱ्या राहूलला नवीन कार पाहिजे असं शांता म्हणालेली. हुंबरटची प्रॉपर्टी विकून राहूलची कारची हौस भागली असती. अशोकला कंपनीची कार मिळालेली. कंपनीचं सेल्स डिपार्टमेंट त्याच्याकडेच. महिन्यातून पंधरा दिवस तो टुरवरच असायचा. म्हणून स्वतःची कार घेणं त्याला सुचलंच नव्हतं. घराच्या व्यवहारातुन अकल्पितपणे मोठी रक्कम आली म्हणून अशोकसह त्याचं त्रिकोणी कुटूंब जाम खुष झालेलं. हुंबरटचं घर, तिथले कुळाचार, खोती असं काहीबाही अशोक मोठ्या हौसेनं शांताला सांगायचा. पण मुंबई अंगात मुरलेली ती उच्चभ्रु पुरंध्री! अशोक चा घर हा विषय सुरू झाला की चक्क खोट्या जाभंया देत "ओऽऽ शीट्! स्टॉप दिस हंबग!!"असं म्हणत ती चक्क उठून जायची.

कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर अंबानी रिटायर्ड झाले. त्यांच्या जागी केरळचा जेरोन इसो आला. त्यानं हळूहळू ऑफीस कब्जात घ्यायला सुरवात केली. अशोक ची प्रॉडक्शन सेक्शनला ट्रान्स्फर झाली. पुढचे धिंदवडे चुकवण्यासाठी महिनाभरातच अशोकने स्वतः रिझायनिंग लेटर दिलं अन् फेअरवेल पार्टी घेऊन तो नोकरीतून मुक्त झाला. तो टेन्शन -फ्री झाल्याबद्दल मग ओबेरॉयला दोस्त मंडळींची पार्टी झाली. त्याच पार्टीत एक दिवस मागे पडलेला हुंबरटच्या वाड्याचा विषय निघाला. अशोकचा वाडा अन् कोकण बघून गोव्यापर्यंत फिरून यायचा बेत मूळ

धरू लागला. या वेळी मात्र हँगओव्हर उतरल्यावरही अशोकला आपल्या बेताचं विस्मरण झालं नाही. दोन दिवसांत सगळ्या मित्रांना कॉन्टॅक्ट करून त्यानं हुंबरट गोवा ट्रिप फिक्स केली.

ट्रिप फायनल झाल्यापासून अशोक जसा काही हवेतच तरंगायला लागला. अंतर्मनात खोल दडलेला वाडा आता त्याला दिसू लागला. जर्दाळू खात खात झोप्या घेणारा खोतांचा अशोक त्याला दिसू लागला. अशोकला झोपाळा खुपच आवडायचा. गावातली एक-दोन ब्राम्हणांची घरं सोडली तर कुणाकडेच झोपाळा नसायचा. अशोककडे तर तीन-तीन झोपाळे. चौकातल्या झोपाळ्यावर बसून दणक्यात झोप्या काढल्या की राजांगणातून वरचं मोकळं आभाळ दिसायचं. रात्री पलंगावरती मऊ गादीवर झोपलं की राजांगणाच्या मोकळया चौकातून शुभ्र, शीतल चंद्रप्रकाशाचा झोत चौकात उतरायचा. चौकातून थेट चांदोबाच्या गावाला जाणारा तो एक भला थोरला जिना आहे असंच अशोकला वाटायचं. खेळायला येणारे त्याचे मित्र तर त्या प्रशस्त वाड्यात दडादडा धावायचे. मुलांना वाड्यात फिरायचं मुक्तव्दार असायचं. पण बाबल्या उपाध्ये, वाघाटे तलाठी आणि शाळेतले साटम गुरूजी सोडले तर ओसरीवरून आत मधल्या चौकात येण्याचं धाडस गावातला कुणीही मनुष्य सहसा करू धजावत नसे.

मित्रमंडळ मुंबईहून थेट हुंबरटला जायचं ठरलेलं. पण निघायच्या दिवसापूर्वी दोन दिवस, साबळे बिल्डरनी तो बेत थोडासा बदलला. त्यांचा कुणी कलीग चिपळूणच्या अलीकडे लोटे माळावरच्या इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये राहायचा. त्याने अलीकडे तिथे फर्म सुरू केलेली. त्याच्याकडे हॉल्ट करून मग पुढे जायचं असं साबळ्यानी सुचवलं. ठरलेल्या दिवशी मंडळी मुंबईबाहेर पडली. खेड मागे पडलं

a

तेव्हा कोकणात बरंच परिवर्तन झालेलं असावं, ही गोष्ट अशोकच्या पुसटशी ध्यानात आली. लोटे माळ आल्यावर तर तिथला जगड्व्याळ इंडस्ट्रियल एरिया बघून अशोक पुरता चक्रावूनच गेला. साबळयांच्या मित्राचं युनिट तर स्वतः अशोक ज्या कंपनीत होता, तेवढं मोठ्ठं आहे हे त्याच्या ध्यानात आलं.

सकाळी सात वाजता मंडळी लोट्याहून बाहेर पडली. संगमेश्वर, हातखंबा,लांजा पार करीत मारूतीनं तरळा गाठलं. आता आपल्या परिसराच्या खुणा अशोकला कुठे कुठे दिसू लागल्या. तरळा पेट्रोल पंपावर मारूती थांबली. केवळ पिक्चरमध्ये शोभावा असा तो पॉश पेट्रोल पंप बघितल्यावर आपल्याला पार्टीचा हँगओव्हर तर आलेला नाही ना? अशी शंका अशोकला आली. जवळ जवळ अडतीस वर्षांपूर्वी अशोकची मुंज झाली. त्यानंतर तो आईबरोबर नाधवडयाच्या मावशीकडे गेलेला. त्या वेळचं बकाल तरळं त्याला कुठेच दिसेना. चायनीज स्नॅक्स कॉर्नर, बीअर बार या गोष्टी कोकणात कधी रूजतील यावर त्यानं स्वप्नातसुध्दा विश्वास ठेवला नसता. निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली की, कोकणचा कॅलिफोर्निया वगैरे करण्याची राजकारण्यांची पेपरबाजी वाचून अशोक हसायचा. हा दरिद्री, वैराण भाग कधी सुधारेल हे त्याने गृहीतच धरलेलं नव्हतं. वास्तवात कॅलिफोर्नियालाही मागे टाकणारं कोकण बघितल्यावर आपण एखादं दुःस्वप्न तर पाहत नाही ना ? असा त्याचा गोंधळ उडाला.

प्रशस्त बी.के.जी.रोड,त्यावरून धावणाऱ्या पॉश मारूती, ट्रॅक्स, सुमो, मोटारसायकल्स, दुतर्फा अपटुडेट स्लॅबच्या बिल्डिंग्ज या जंजाळात अशोक त्याच्या बालपणात बघितलेलं नी आता हरवलेलं कोकण शोधू लागला. नांदगाव तर त्याने ओळखलंच नाही. मारूतीनं सावडाव गाठल्यावर मात्र बॉबकटवाल्या

a

बिनकुंकवाच्या मॉड ललनांच्या गर्दीत हिरवीगार, भरजरी पैठणी लेऊन कपाळभर ठसठशीत चिरी लावणारी आईच भेटल्याचा आनंद अशोकला झाला. आता हुंबरट येणार म्हणून तो सरसावून बसला. गाडी दोन वळणं घेऊन पुढे गेल्यावर त्याची नजर जुना गाडीतळ शोधू लागली. तळावरची घोरिप चिंच तर किती लांबून दिसायची. पण दुतर्फा असलेले स्टॉल, स्लॅबच्या इमारती नि वाहनांची वर्दळ यामुळे त्याची गडबड उडाली. ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगून तो खाली उतरला. हॉलिडे रिझॉर्टसमोर हारीने तीन कार थांबल्या म्हणून कॅशियर सावरून बसला. त्याने डॉल्बी सिस्टीमचं स्वीच ऑन केलं. मुंबईला नुकत्याच रिलीज झालेल्या कुठल्याशा पिक्चरमधलं अशोकला न आवडणारं रटाळ, ‘अपने वादों को तोड न जाऽऽना’ हे गीत ऐकताच आपण नक्की बेशुध्द पडणार, या भितीपोटी तो सावधपणे रस्ता क्रॉस करून पलीकडे गेला. ‘भालचंद्र मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, प्रोपा. दळवी बंधू ‘ हा बोर्ड दिसला. काऊंटरवर उभा असलेला सोनेरी काड्यांचा चष्मा लावलेला रमेश दळवी त्याने अचूक ओळखला. अशोक तीन यत्तांनी त्याच्या मागे होता .

“मी भाऊ देसायांचा मुलगा अशोक” त्यानं मोठ्या अपेक्षेनं सांगितलं. पॉश मारूती कारमधून उतरलेलं मालदार गिऱ्हाईक या पलीकडे ओळखीची काहीच खुण रमेश दळवीच्या डोळयांत दिसेना. “बोला साहेब, आमच्याकडे इंपोर्टेड वस्तूंचा स्टॉक आहे. आणि सग़ळया प्रकारचा कोकणी मेवाही मिळतो.” सराईत विक्रेत्याचे हसू ओठांवर आणीत दळवीशेठ उद्गारले. “नाही, म्हणजे मला औषधं किंवा वस्तू नकोत, मी भाऊ खोतांचा मुलगा अशोक. बत्तीस वर्षानी प्रथमच हुंबरटला येतोय्.” खरेदीऐवजी रिकामी चौकशी करणारे गिऱ्हाईक असे तुच्छतेचे भाव आता दळवीशेठच्या चेहऱ्यावर उमटले. तो मारूतीमधून आलाय हीच दळवींच्या लेखी

a

जमेची बाजू. म्हणून उत्तर देण्याची तसदी नाराजीनं कां होईना दळवीशेठनी घेतली," पण खोतांचा वाडा कांतीभाई पटेलने मागेच खरेदी केला ना ?" त्यावर अशोक म्हणाला, " हो, खरंय् ते! मी मित्रांबरोबर गोव्याला फिरायला निघालोय्. म्हटलं जाता -जाता वाड्याचं दर्शन घ्यावं. मी तर इतक्या वर्षांनी कोकण पाहतोय. सगळा भाग आमूलाग्र बदलून गेलाय. उगीच चुकायला व्हायचं अशी भीती वाटली म्हणून म्हटलं नीट चौकशी करूया." त्यावेळी पायऱ्या चढून वर येणाऱ्या नव्या गिऱ्हाईकाकडे बघत दळवी म्हणाले. "हां, ते बी खराच! असेच दोन मिनिटे पुढे जा. तुमचा वाडा आता जाग्यावर नाही आता . पॅराडाईज बीअर बारचा मोठ्ठा बोर्ड लागेल. त्याच्या बाजूला लाद्या, कडाप्पे फरशांचे ढीग आणि बेंडसा दिसेल. तीच तुमच्या वाड्याची जागा."

खट्टू झालेल्या अशोकने पँटच्या खिशातून रूमाल बाहेर काढला. चष्म्याच्या काचा पुशीत तो मारूतीमध्ये जाऊन बसला. मारूतीनं वेग घेतला. मिनिटभरातच 'पॅराडाईज बीअर बार'ची पाटी दिसली. अशोकने गाडी थांबवायची खूण केली .मित्रांना बारमध्ये बसवून, "मी पाच मिनिटं चौकशी करून परत येतो. तुम्ही तोपर्यंत रिलॅक्स व्हा." असं सांगून अशोक बाहेर पडला. बारच्या कडेला उभा असणारा अशोक भिरीभिरी पाहू लागला. तो पाऊस-पाण्यात सडून गेलेला ढोल्या फणस त्याने अचूक ओळखला. त्याचे सोनचाफ्याच्या फुलासारखे कापे गरे दशक्रोशीत प्रसिध्द. आषाढ्या पौर्णिमेपर्यंत त्याचे फणस मिळायचे. वटसावित्रीला तर खोतांकडचे फणस- गरे न्यायची किती लोकांची वहिवाट. ढोल्या फणसामागे चार डेरेदार आंब्याची झाडं. एवढे आंबे धरायचे की काढणार तरी कधी नी कसे ?

आख्ख्या हुंबरटातली पोरं पडीचे आंबे पुंजावायला जमायची नि मे महिन्यात तर वांदरांची झुंडच आंब्यावर वसतीला थांबायची.

बीअर बारच्या जाग्यावर असलेलं, आभाळात उंच गेलेलं अष्टाचं झाड!! त्याच्या शेंड्यावर घारींची घरटी असायची. त्याच्या अजस्त्र फांद्यांना असलेल्या बिळांमध्ये पावसाळ्यात शिंगचोचे पोरं काढायचे. सुपाएवढे पंख असलेली उलटी पाखरं म्हणजे वटवाघळं चिर्रर्रऽऽचिर्रर्र करीत अष्टाची फळं खायला रात्री जमायची. वातामुळे पायांच्या गडख्या झालेल्या आजीला कुणीतरी औषध सांगितलेलं. 'उलट्या' पाखराची चरबी लावून मालिश केलं की वात नाहीसा होतो. मग भाऊंनी गावातल्या बर्कनदाराला, सख्या दळव्याला मुद्दाम बोलावून घेतलं. त्याने खोतांची ठासाची बंदूक साफसुफ केली. रात्रीच्या वेळी काळोखातच नेम धरून एक उलटं पाखरू त्यानं अचूक टिपलं. तो ओंगळवाणा हिडुस पक्षी,त्याच्या अंगाला येणाऱ्या धुरटाणीनं अशोकच्या पोटात नुसतं ढवळून आलं. वटवाघळाची चरबी कशी काढतात ते बघायलासुध्दा तो थांबला नाही. त्यानंतर पंधरा दिवस सकाळ-संध्याकाळ बायजा धनगरीण आज्जीच्या ढोपरांना मॉलिश करायला यायची. पुढे पुढे तर चरबी ठेवलेल्या शिश्याचं बुच उघडलं की त्या 'हिवळ' घाणीनं त्याच्या आईचं डोकचं उसळायचं!

विषण्णमनाने मान खाली घालून अशोक कडाप्पांच्या लाद्यांच्या, जंजाळातून बेंडशाकडे निघाला. 'धाड्ऽऽ धाड् टर्रर्र- ट्रँग्-टर्रर्र' आवाज काढीत अजास्त्र ओंडक्याच्या चिंध्या करणारा बेंडसॉ, त्या आवाजाने त्याचे कान किटले. बेंडशासमोर कंपाऊंडच्या कडेला परिचयाची वस्तू दिसली. 'भाताच्या घिरटीचे पेड'

जमिनीवर टाकून कांतीभाईनं हातपाय धुण्याची सोय केलेली. त्याच्या पुढेच वाड्याच्या खराब झालेल्या वासे-खिडक्या - दरवाजांच्या चौकडी नी भोगरलेले लाकडी खांब यांचा डाळ रचलेला.

ओसरीवरच्या दिंडी दरवाजाच्या चौकटीची शीर वाळवीने खाल्लेली लाकडं त्याने अचूक ओळखली. ऋध्दि सिध्दीच्या जागी वाळवीने कातरलेल्या खुणा अन् मध्यभागी सोंड झडलेला गणपती. उन्हापावसानं तडकलेली तुळयांची लाकडं, भोगरलेले वासे नि दोन वसवी जवळ पेचलेली मुसळं अशा टाकाऊ लाकडांचा तो ढीग. लाकडं कोसळू नयेत म्हणून टेकून ठेवलेलं वेंगेतही मावणार नाही एवढं मोठं पोहे कांडायचं काळवत्री दगडाचं व्हाईन बघितल्यावर अशोक भक्तीभावानं पुढे झाला. एका तडे पडून सडणाऱ्या खांड बारावर भाऊंनी चुन्याच्या बोटाने लिहलेली आजोबांची मृत्यू तिथी मिती फाल्गुन शु॥ ५ शके १८३५. उन्हा पावसात अस्पष्ट कां होईना, पण आजोबांची मृत्युतिथी शाबूत राहीलेली. लाकडांच्या ढिगाशी तळात लाकडी घोड्याचं मुंडकं. अशोक लहान असताना भाऊंनी नारायण सुताराकडून करून घेतलेली ती दोनचाकी गाडी. घोड्याच्या मुंडक्याचा भाग अन् आयाळीपाशी कणा बसवून दोन चाकं नि हातात धरायचा दांडा. अशोक खाली बसला अन् ढिगाखालची ती गाडी त्याने खेचून घ्यायचा प्रयत्न केला. खूप जोर केल्यावर वरची लाकडं कोसळली अन् घोडा दिसेनासा झाला.

"ए ऽऽ काय पायजेल रे ? इते कसल्या वस्तूला हात लावायचा नाय्." पटेलाचा कोणी नोकर डाफरत पुढे आला. शरमिंदा होत अशोक बोलला, "मला कांतीशेठ पटेलना भेटायचं आहे. " त्यावर नोकर बोलला,"मंग सरळ फाटी जाऊन

डाव्या हातीला वळा. तिने शेठचा बंगला हाये." अशोक बंगल्याकडे जाऊ लागला. खोतांचा वाडा भुईसपाट करून त्या ठिकाणी उभारलेल्या स्लॅबच्या भव्य बंगल्यातुन कांतीशेठ बाहेर पडताना दिसला.

अशोक समोर आला तरी त्याला न ओळखताच कांतीभाई पुढे निघाला. खरेदीच्या वेळी त्याने अशोकच्या रेक्लमेशन स्कीममधील फ्लॅटवर दोन खेपा घातलेल्या. न राहवून अशोकने हाक मारली, "कांतीशेऽठ, ओळखलंत की नाही?" डोळयाचा चष्मा काढून अशोकला आपादमस्तक न्याहाळल्यावर ओशाळं हसत कांतीशेठ म्हणाला, "हांऽऽहां सायब्... हे साला चस्म्याचा नंबर बदली करायले झ्याले. आत्ता वळखले मी. तुमी तर आमच्ये मालक देसाईसाब!"

कांतीशेठ सोबत अशोक त्याच्या ऑफिसकडे निघाला. लाकडाच्या पातळ फळया, रिफा ओबडधोबड ठोकून तयार केलेल्या ऑफिसचं दार कांतीशेठनी उघडलं. चिंचोळया जागेत एक टेबल, दोन खुर्च्या, जेमतेम चार माणसं बसतील एवढी जुन्या वाड्यात मागिलदारी असणारी जुनी घडवंची आणि भिंतीकडेला भक्कम लोखंडी लॉकर. शेठच्या खुर्चीमागे अशोकच्या आजोबांचा चंदनी पलंग मात्र शाबूत असलेला दिसला. पलंगावर गोणत्याचं तरट अथंरून उशीऐवजी एस. टी. च्या सीटमधला आडझोड फाटलेला चार वीती लांबीचा धुळीनं माखलेला स्पंजाचा तुकडा टाकलेला. खोलीच्या कोपऱ्यात ठोकलेल्या फळीवर 'दुर्गा माँ'चा फोटो अन् त्याच्या दोन्ही बाजुंना 'शुभ लाभ' अशी गुजरातीत लिहीलेली वेडीवाकडी अक्षरं. खुर्च्या -टेबलामागे उधळलेला भुसा. जमिनीवर तर पाय रूततील एवढा भुशाचा थर! देवीला अगरबत्ती ओवाळून खुर्चीत बसल्यावर कांतीशेठ बोलू लागला, "मंग कदी आले तुमी साब? हुम्रटमदी तुमचे कोन सगेवाले ऱ्हाईतेत काय

?" त्यावर "आताच, पाच मिनिटांपुर्वीच मी आलो. आम्ही मित्रमंडळी गोव्याला निघालोत. म्हटलं जाता -जाता जन्मभूमीचं दर्शन घ्यावं." अशोक म्हणाला. त्यावर एका नोकराला बोलावून कांतीशेठ म्हणाला,"आरे, ज्यानू ह्या सायबांल्ला ज्यरा कंपौंडमदे फिरवून आन अने समोरच्या टपरीवाल्याकडे दोन पेशल सांग. अर्जंट आन असा बोल."

टपरीवाल्याला ऑर्डर सांगून जानु आला. इच्छा नसतानाही अशोक त्याच्या सोबत निघाला. जानूशी त्याचं बोलणं झालं जानू हरी वालमाचा नातू, भाऊंना ओळखणाराच निघाला. भाऊ खोतांचा मुलगा अशी अशोकची ओळख पटल्यावर जानू भाटासारखा बोलू लागला,"फोंडा -कणकवली यांच्या नस्तावरची ऐन मोक्याची खोतांची जागा धंद्याला पावरफुल्ल. एवढं मोठं ठिकाण,टोलेजंग वाडा,बेरकी कांतीभाईने अवघ्या साडेचार लाखांत गिळलं. कोपऱ्यातल्या दोन-अडीच गुंठे जागेचे बारवाल्याकडून त्याने साडे तीन लाख रूपये मोजून घेतले. कोकण रेल्वे आल्यावर जागांच्या किमती मुंबईच्या वरताण झालेल्या. खोतांची जमीन -वाडा ऐन रस्त्यावर. रस्त्याकडेची दीड एकर जागा पटेलाने स्वतःसाठी ठेवली. मागच्या बाजूला घरांसाठी ५० बाय५०फुटांचे प्लॉट पाडून एन. ए. करून घेतले. हायस्कूल, मराठी शाळा, बँक, आरोग्य केंद्र, इथला नोकरवर्ग किती... झालंच तर धंद्यासाठी बाहेरगावातून येऊन स्थायिक झालेले व्यापारी. घराचे बावीस प्लॉट प्रत्येकी चाळीस हजारांना हातोहात गेले. ठिकाणातले आंबे, सागवान, फणस, आईन, किंदळी शेकडो घनफुट लाकुड झालं. चिव्याच्या बेटातल्या काठ्यांचे दोन ट्रक फुल लोड भरले.

a

अगदी अष्टाच्या झाडाचे सुध्दा आंबा पार्सल पिंजरे ठोकून पटेलाने देवगडात नेऊन विकले. वाड्याच्या थोड्याफार खिडक्या, दरवाजांच्या चौकटी नि वासे वाळवी लागून फुकट गेले. पण बाकी बरचसं लाकुडसामान म्हणजे अक्षरशः सोनंच होतं. जुनाट सागवानी बारं- तुळया चिरताना चंदनासारखा सुवास सुटायचा. खोतांच्या प्रॉपर्टीचा पटेलानं पैसाच पैसा केला. वाड्यातली जुनी तांब्या-पितळेची भांडी, त्यांची मोड तीनशे किलो झाली. खोतांचे दोन झोपाळे कांतीभाईने दीड-दीड हजारांना विकले. एक झोपाळा त्याला खुर आहेत. त्याचा उपयोग तो आपल्या साठी खाटेसारखा करतो. खोतांचा शिसवी देव्हारा न् मंडपी अण्णा जोशांनी बावीचशे रूपयाला घेतली. पहारी, कुदळी, फावडी, कोयते, जुनी शेर, नवटांग, कुडव, पायलीची मापं, लोणचं कालवायच्या लाकडी काथोटल्या, चिनी मातीच्या बरण्या -पेले हर चीज नेमक्या किमतीला विकून पटेलाने पैसा च पैसा कमावला. नाही म्हणायला देव्हाऱ्यातले देव तेवढे टोपलीत भरून गावाबाहेरच्या गवळदेवाजवळ ओतलेले आहेत.

वाड्याची खरेदी केल्यापासून जानू पटेलाकडे नोकरी करीत असल्यामुळे त्याने अगदी खडान् खडा माहिती अशोकला दिली. शेवटी त्याने उपोद् घात केला, “खोत! तुमी एवडे शाणे-सुर्ते. इथे परत्यक्ष येऊन, गावतल्या जाणत्या माणसांकडे दरा-दामाची चौकशी करून तरी येव्हार करायचा होता. अहो, तुमच्या तीन पिढ्यांना हयातभर हातार् पाय डाळून बसून खाण्या इतका पैसा भेटला असता. पन सायेब, तुम्ही सगळ्याची माती क्येलीत.” जानुच्या या वाक्ताडनाने सर्द झालेला अशोक माघारी वळला. पटेलाच्या ऑफिसात ते परत आले. टेबलावर बशीखाली झाकलेल्या कपाकडे बोट करीत कांतीशेठ म्हणाला,”साब, च्या घ्या!”

a

अशोकने साय धरलेला तो चहाचा कप जानू च्या हाती देऊन म्हटलं, “घे तू! मी चहा पीत नाही. “ त्याने सफारीच्या खिशातून विल्सचं पाकीट बाहेर काढलं. सिगरेटसाठी हात पुढे केलेल्या कांतीशेठला सिगरेट देऊन त्याने पाकीट खिशात ठेवलं.’’कांतीशेठ, समोरच्या लाकडांखाली एक खेळण्यातला लाकडी घोडा आहे. घराची आठवण म्हणून मी तो नेणार आहे. जरा नोकरांना सांगून तेवढी लाकडं चाळवायला हवीत.’’

नोकरांनी लाकडांचे तुकडे बाजुला केले. नाकपुडी तुटलेला,एक चाक शाबूत असलेला घोडा मिळाला. त्याच्या बाजुलाच एक सांबराचं शिंग पडलेलं मिळालं. ओसरीवर भिंतीत खुंटीसारखं बसवलेलं ते हातभर लांबीचं सांबरशिंग नि घोडा अशोकने उचलला.मग खिशातून शंभरची नोट काढून पुढे केली. “कांतीशेठ, या दोन वस्तुंची अल्प किंमत म्हणून हे ठेवा.” त्यावर “नकोऽनको” म्हणत कांतीशेठने नोट घेतली. नित्य सवयीनुसार ती उजेडात पारखुन लेंग्याच्या खिशात ठेवली. “सायब, पैशाची काय जरवर नवती. ते घोडा तर खराबच हाय. हरीणचा सिंग तेवडा किंमतबाज हाये. बंबईमदे तेचा पाचसो रूपिया सजमदे मिळेल. ते लाकडाचा समज्यून आमी राबीटमदी फ्येकला. तुमचा फ्लॉटमदे चांगला शो पीस ऱ्हाईल बगा. कांतीशेठची भेट म्हणून!” रुमालानं सांबरशिंगावरची माती अशोकनं पुसली. डोळ्यात गोळा होऊ पाहणारे अश्रू निग्रहानं थोपवीत जड आवाजात अशोक म्हणाला, “बराय् कांतीशेठ, चलतो आता! कधी मुंबईला आलात तर जरूर या!!” अन् तोंड फिरवून तो रस्त्याच्या दिशेनं जाऊ लागला.

◘◘◘◘◘◘

# १४. उत्तराधिकारी

अनिरूध्दची फिएस्टा कुडोपी फाटयावरून आत वळली नी कुपेरीच्या डोंगर कुशीत मठाचं गोपूर स्वच्छ दिसू लागलं... कच्चकन ब्रेक लावीत अनिरूध्दनं हात जोडले. ब्रेक लावताच 'सारे जहाँसे अच्छा' ची धुन वाजली. अकरा वर्षापूर्वी एस.एस.सी.ला ९४.२३ टक्के गुण मिळवून बोर्डात पहिला आलेला अनिरूध्द धुवट पांढऱ्या पिशवित कपडे भरून मुंबई गाडीची वाट पहात बसलेला. झीरोकट केस, भ्रुकुटी मध्यात अष्टगंधाची टिकली, खाकी पँट– पांढरा शर्ट असा शाळेचा गणवेश घालून रूपारेल कॉलेजमध्ये दाखल झालेला भिक्षुकाचा मुलगा.'हॅलो भटजी काका, रामपुर का लक्ष्मण' असं जोरदार स्टंपींग झालं. ते आठवून त्याला हसू आलं. पुढे एम.एस्सी.ला फिजिक्समध्ये युनिव्हर्सिटीत फर्स्ट आल्यावर झालेला सत्कार, राज्यपालानी केलेलं कौतुक, विचारपूस. "आय विल रिमेंबर यु यंग किड... व्हेअर इज दिस कुडोपी?"

अयाचित वृत्तीने भिक्षुकी करणारे षडशास्त्री वामन भटजी... कुडोपी, पळसंब, रामगड, चिंदर, त्रिंबक,आचरा,वायंगणी या सात गावात तंगडतोड करून मिळणाऱ्या भिक्षुकीच्या कमाईवर पोसलेला रूटुखुटु संसार, तीन बहिणींच्या पाठीवर जन्मलेला, चौथे अपत्य म्हणून आचरा हायस्कूल मध्ये फी नादारीही न मिळालेला अनिरूध्द. बोर्डात पहिला आल्यावर मात्र त्याचं भाग्य उजळलं. आमदार आप्पा

a

गोगटेनी अगदी जातिनीशी त्याच्या उच्च शिक्षणाची जबाबदारी उचलली. मुंबईला नामांकित कॉलेजमध्ये ॲडमिशन, राहण्या–जेवण्याची उत्तम सोय लागली. अनिरूध्दने त्याचं चीज केलं| मुंबईच्या मायानगरीचा मोह त्याला झाला नाही. बारीक केस अन् अष्टगंधाची टिकली ही त्याची आयडेंटीटी कधीच बदलली नाही|

पी.एच.डी.अवॉर्डहोण्यापूर्वीच बी.ए.आर.सी. कडून अप्रॅण्टिसशीपची ऑफर आली.जॉईन होण्यापूर्वी आईबाबांचे, स्वामींचे आशिर्वाद घ्यायला अनिरूध्द कुडोपीला आला. बापलेक मठाकडे स्वामींच्या दर्शनाला निघाले. आगर ओलांडीत असता सौर सुक्ताची ऋचा कानी आली. तल्लख स्मृतींच्या अनिरूध्दने मनातल्या मनात पठण सुरू केलं.अंगणाच्या कडेला पाटाच्या धारेवर पाय धुवुन दोघे मठात प्रवेशले. प्रसन्न मुद्रेने हाताने बसायची खूण करीत स्वामींनी ऋचा पूर्ण होताच पठण थांबवलं.

सध्याचे स्वामी हे मठाचे नववे उत्तराधिकारी. प्रत्येक पिढीत कुणी ना कुणी संन्यास घेऊन पीठ सुरू ठेवण्याचा प्रघात. मठ किंवा स्वामी तसे प्रसिध्दीच्या झोतात नसायचे.मात्र त्या परिसरात स्वामींचा अधिकार मोठा. त्यांचे अलौकिकत्व निर्विवाद असलेलं! स्वामी पीठावर बसून उच्चारतील

तो शब्द खरा ठरणार अशी भाविकांची अपार श्रध्दा. या श्रध्देला साजेल असं स्वामींच वागणं बोलणं विनम्र आणि सात्विक. त्यांच ज्ञान चतुरस्त्र आणि सर्वस्पर्शी! लागोपाठ तीन कन्या झाल्यावर वामन भटजींनी प्लॅनिंगचा विचार केलेला. पण “ पुत्रप्राप्ती शिवाय मोक्ष नाही” हा स्वामींचा आदेश उभयतांनी शिरोधार्थ मानला अन् स्वामींच्या आशिर्वादाने अनिरूध्दचा जन्म झाला.

a

दहावीच्या अभ्यासाचा धोशा सुरू होईपर्यंत अनिरूध्द नित्यनेमानं मठात जायचा, महिम्न, रूद्र, श्रीसूक्त, लक्ष्मी सूक्त, पुरूष सुक्त, सौर सुक्त, त्रिसुपर्ण, ऋग्वेद शाखेची धर्मकृत्यं अनिरूध्दला मुखोद्गत झाली ती स्वामींमुळे. बी.ए.आर.सी.त अप्रॅण्टिस म्हणून जॉईन होण्यापूर्वी तो भक्तीभावाने स्वामींचे आशिर्वाद घ्यायला मठात गेलेला. त्यावेळी एन्रॉन प्रकरण रंगात आलेलं. स्वामींचा मार्ग आध्यात्मिक, दिनक्रम, साधना, सर्वसामान्य माणसापेक्षा भिन्न, अलिप्त संन्यस्त जीवन जगणारे स्वामी... पण देशात घडणाऱ्या घटनांची इत्यंभूत माहीती त्यांना असायची. ट्रान्झिस्टरवरच्या बातम्या ते नित्यनेमाने ऐकायचे.

“गॅट करार, एन्रॉन यांच्या रूपाने एक वेगळी गुलामगिरी - विवशी हिंदुस्थानात येतेय...” स्वामी म्हणाले “अनिरूध्द हे शासनकर्ते महाराष्ट्र विकायला निघालेहेत. सर्वसामांन्याना विजेच्या रूपाने संजीवनी देणारी एम.एस. ई.बी.! तीच्या नरड्यावर टाच आणू पहात आहे हे सरकार. कुडोपीत नारळी—सुपारीचं उत्पन्न निघतयं ते वीजेमुळे.पण उद्या हिच वीज सगळयांना कफल्लक बनवणारेय! मला स्वच्छ दिसतयं, विकासाच्या सगळया नाड्या विद्युत उर्जेच्या ताब्यात अन् ही वीज शासनकर्त्यांची बटीक होणार. श्रीकॄष्ण परमात्म्याला प्रसवणारी देवकी कंसाच्या कारागॄहात बंदिवान झाली होती ना ? तव्दत परिस्थिती आहे. पण ही एम.एस.ई.बी. वंध्या आहे, नी तिचा धनी नपुंसक आहे.” दीर्घ श्वास सोडीत स्वामी पुढे बोलू लागले. “अनिरूध्द तुझ्याकडे कुशाग्र बुध्दी आहे. चांगल्या कंपनीचा आधार तुला मिळतोय. तू काही शासन उलथून टाकू शकणार नाहीस हे मान्य... पाऊस थांबवता येत नाही पण मस्तक झाकायला छत्री उघडता येते. ते कार्य तू कर. आर्यांच्या पवित्र संस्कॄतीचा तुला वारसा आहे. सौरसुक्ताचं निष्ठेनं चिंतन कर. तुला मार्ग सापडेल. एनन्रॉनचा

कचरा व्हावा असा काही उपाय तू शोधून काढ. हे कुडोपीचं ऋण तुला फेडायचं आहे...” विचारांच्या तंद्रित घरासमोरचा तुळसांबा कधी आला ते अनिरूध्दला कळलचं नाही. कच्कन ब्रेक दाबीत फिएस्टा थांबली. ‘सारे जहाँसे अच्छा’ ची धून पुन्हा एकदा वाजली.

बॉनेटवर तांब्यातलं पाणी ओतून आईने कुंकवाचं सुरेख स्वस्तिक काढलं. त्यावर तुळशीची मंजिरी आणि अनंताचं फुल ठेवलं. वामन भटजीनी नारळ वाढवून मोटारीवर पाणी शिंपडलं. खोबऱ्याची शिरणी काढून चार तुकडे चार दिशांना फेकले. एक तुकडा बॉनेटवर ठेवला.अनिरूध्दने गाडी स्टार्ट करून अंगणाच्या कडेला सावलीत लावली.’सारे जहाँसे अच्छा’ घुमत असताना हातभर औरस चौरस लोखंडी पत्र्याची पेटी सांभाळीत अनिरूध्द गाडीतून खाली उतरला.

काय सांगू किती सांगू असं अनिरूध्दला झालेलं. “आई—बापू एक मोठा शोध लावलाय् मी! सगळं काही तुम्हाला समजणार नाही. पण सौर उर्जेवर चालणारं यंत्र आहे.या पेटीत काचेच्या आत चारणीाच्या पानांसारखी दिसणारी कार्बन पत्र दिसताहेन ना...? ती सूर्यप्रकाशातली ऊर्जा शोषून घेतात. त्यांच्याखाली पेटीत अगदी तळाशी एक जनित्र आहे त्यात सूर्यप्रकाशाचं विजेत रूपांतर होऊन ती साठवली जाते. सूर्याचे थेट उन्ह तासभर पडलं की पुरे अथवा नुसत्या उजेडात ही पेटी तीन तास ठेवली तर जी वीज तयार होईल ती एका कुटुंबाला दोन दिवस पुरेल. सहा दिवे, चार पंखे, फ्रिज, टी.व्ही. आणि अर्ध्या अश्वशक्तीची पाण्याची मोटार हे सगळं चालेल एवढी वीज यातून मिळेल. याचा खर्च फक्त बावीसशे रूपये. साधारण पाच वर्षानंतर आतली कार्बनपत्रं बदलावी लागतील. त्याचा खर्च येईल दीडशे-दोनशे रूपये.”

“या शोधाबद्दल खरंतर नोबेल पारितोषिक मिळायला हवं...पण...” “पण काय? पुढे बोल ना...” भटजी म्हणाले. “पण वरिष्ठ आणि राजकारणी यांनी माझ्यावर दडपण आणलंय्” नाही तरी नोबेल पारितोषिक काय देईल? एवढी संपत्ती माझा हा शोध खरेदी करण्यासाठी एक अमेरिकन कंपनी देऊ करतेय...अख्ख्या कुडोपी गावात अंथरता येतील एवढ्या नोटा... बाहेर आहे तसल्या दोन गाड्या मला भेट मिळाल्या आहेत. ही गाडी मी खास तुमच्यासाठी आणलीय्!” आई -बापू कोणीच काही बोललं नाही.

संध्याकाळी वामन भटजी अनिरूध्दच्या गाडीत बसून मठात गेले. स्वामी अनिरूध्दकडे पहातच राहिले. “अरेऽऽ तुझं कपाळ उघडं कसं?” असं म्हणत स्वामींनी त्याच्या भ्रुकुटी मध्यात अष्टगंधाची टिकली लावली.त्याक्षणी

सहस्त्र सुर्यांच्या तेजाने दिपून अनिरूध्दने डोळे मिटले. त्याच्या मस्तकावर थोपटीत स्वामी म्हणाले, “बाळ... भानावर ये... तू कोण आहेस याचा विसर पडू देवू नकोस...” भानावर येवून डोळे उघडीत अनिरूध्द बोलू लागला. “स्वामी ऽऽ क्षमा करा. माझी भ्रांती दूर झाली. एका दुष्टचक्रात मी जवळ जवळ अडकणारचं होतो. पण... मी त्यातून बाहेर पडणारेय्! निस्पृहस्य तृणम् जगत... लोभ मोह ... आसक्ती यापासून मी मुक्त होणारेय!”

“स्वामी माझ्या अधिकाऱ्यांपासून ते महनीय राजपदस्थ व्यक्तींसह सर्वांनीच माझ्यावर प्रचंड दडपण आणलय्. एक तर अमाप द्रव्यराशी घेवून सुखोपभोग भोगणं...त्यासाठी माझा शोध मी त्यांना विकणं... अथवा कस्पटाप्रमाणे दूर फेकलं

a

जाईल! नोकरी तर जाईलचं... कदाचित माझ्या जीवावरही उठतील ते. मी बनवलेलं एक सौर जनित्र त्यांच्या हातात आहे... पण सुटकेचा मार्ग मला दिसलाय स्वामी... मी अगोदरपासूनची त्याची खबरदारी घेतलीय्''

"माझ्या यंत्रात सौरशक्तीचं विद्युत उर्जेत रूपांतर करून साठविणारी यंत्रणा... मी ती डिकोड केलीय.त्याची रचना फक्त मीच उलगडू शकेन. अन्य कुणीही ती समजून घेण्यासाठी उघडू पाहिल तेव्हा योग्य कोड दिला नाही तर सगळं सर्किट नष्ट होईल. त्याचा कोड आहे 'सौरसूक्ताचे पहिले पाच श्लोक'! ते म्हणताना एका स्वराचीही चूक झाली तरी कोड निरर्थक ठरेल. माझा शोध सहजासजी त्यांच्या हाती लागणार नाही. प्रश्न उरला माझ्या जिवीत वित्ताचा आहे. तो सोडवायचा उपायही सुचलाय मला. मठासारखी दुसरी सुरक्षित जागा नाही. या ठिकाणी सर्वसंग परित्याग करून संन्यस्त जीवन सुरू केल्यावर मला कुणाची भय भीतीही बाळगण्याचं कारण काय? स्वामी तुमच्या पश्चात

तुमचा कोणी कुटुंबिय आजच्या परिस्थित संन्यास घेवून तुमचा वारसा चालवणार नाही. तुमचे उत्तराधिकार मी या क्षणी स्विकारतोय...मठाच्या उत्पन्नातून कुडोपी एन्रॉनमुक्त करण्याएवढं भांडवल तरी नक्कीच उभं राहील. आता माझी साधना तीच असेल. आई- बाबा तुम्ही शांतचित्ताने घरी जा... मी आता संन्यास घेवून स्वामींचा उत्तराधिकारी म्हणून मठातच रहाणार आहे''

◙ ◙ ◙ ◙ ◙ ◙ ◙

a

**ई साहित्य प्रतिष्ठान सोळा वर्षाचे होत आहे.**

**प्रा. श्रीराम काळे यांचे हे ई साहित्यवरील पहिले पुस्तक.**

प्रा. श्रीराम काळे हे एक सिद्धहस्त प्रतिभाशाली लेखक आहेत. देवगड येथील बीएड विद्यालयात त्यांनी नवीन पिढ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांच्या पिढ्या घडवल्या. गेली चाळीसेक वर्षे ते लेखन करत आहेत व अनेक नामवंत नियतकालिकांतून त्यांच्या कथांना प्रसिद्धी लाभली आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. ते मानतात की ई पुस्तके हे दिवसेंदिवस वाढत जाणारे भविष्यकाळाचे माध्यम आहे व ते मराठीतही वाढायला हवे.

प्रा. श्रीराम काळे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२),

अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस(२), मिलिंद कपाळे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे.

यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।